# अनुक्रमणिका


4 अध्यक्षीय– जयंत पाटील– निवडणूक रोखे : जगातला सर्वात मोठा घोटाळा

5 संपादकीय– डॉ. सुधीर भोंगळे– ६०० वकिलांच्या पत्राचा अन्वयार्थ : भाजपचा छुपा अजेंडा

10 भाषणे– शरद पवार : संविधानाच्या रक्षणासाठी एकजुटीने लढा देऊया

26 बोल सुप्रिया सुळे यांचे...

30 हुकुमशाही आली? : अनंत बागाईतकर

37 आतून हादरलेल्या भाजपची मदार बाजार बुणग्यांवर!– व्यंकटेश केसरी

44 महाविकास आघाडीची भोर येथील सभा, भाषणे...
१) सत्ता परिवर्तन केले तरच देशातील लोकशाही वाचेल– शरद पवार
२) निवडणुकीची ही लढाई महाराष्ट्राच्या अस्मितेची– सुप्रिया सुळे– ४८
३) मावळ्यांनी ठरवलं तर असाध्य काहीच नाही– संग्राम थोपटे– ५४
४) अब की बार भाजप तडीपार– संजय राऊत– ५६

58 यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभ,मुंबई, भाषणे...
१) संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची अपेक्षा चव्हाण साहेबांकडून पूर्ण– शरद पवार–५८
२) चव्हाण सेंटरच्या माध्यमातून दरवर्षी नवीन उपक्रमांचा प्रयत्न– सुप्रिया सुळे–६१
३) विज्ञानासह तंत्रज्ञानात गुंतवणुकीची आवश्यकता– डॉ. सौम्या स्वामीनाथन–६४
४) चव्हाण सेंटरकडून माणूस घडविण्याचं कामं– डॉ. अनिल ककोडकर–७०

72 केजरीवाल अटकेमुळे भाजपची जगभर बदनामी– जतिन देसाई

76 महाविकास आघाडीची निफाड येथील सभा– भाषणे...
१) मोदीवादी शक्ती बाजूला करून देशात बदल करूया– शरद पवार– ७६
२) महाराष्ट्रातलं सरकार घाबरलंय– जयंत पाटील– ७९
३) सरकार आवळा देऊन कोहळा काढतंय– डॉ.अमोल कोल्हे–८२
४) गद्दारी गाडल्याशिवाय थांबायचं नाही– डॉ. जितेंद्र आव्हाड–८४

86 कानोकानी– घंटाकर्ण (हलके–फुलके राजकीय किस्से)

94 भाजपपासून मुक्तीसाठी सर्वांनी एकत्र राहूया– शरद पवार

96 जाता–जाता : फिरस्ता

102 शेवटचे पान– हेमन्त टकले– फॅसिस्टांना दाखवा पराभवाचे अस्मान!



**संचालक**
**हेमन्त टकले**
---
**संपादक**
**डॉ. सुधीर भोंगळे**
---
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.
---
**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी सहाय्य**
दिलीप रोडे
**फोटो**
प्रशांत चव्हाण
---
**वर्गणीचे दर–**
**वार्षिक रु. ५००/–**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
---
**मुद्रक, प्रकाशक**
**हेमन्त प्रभाकर टकले** यांनी **'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'** च्या वतीने मीडिया आर ॲण्ड डी., १३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर–३, आरएससी–२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई–४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई–४०००२० येथून अंक प्रकाशित केले.

## अध्यक्षीय



# निवडणूक रोखे
## जगातला सर्वात मोठा घोटाळा

**एकीकडे 'न खाऊंगा न खाने दुंगा' म्हणायचे आणि दुसरीकडे 'जो भी है वो मैंही खाऊंगा.'**

आज टिव्हीद्वारे जाहिराती प्रसारित केले जात आहे. सर्वत्र सत्ताधारीच दिसतील अशी व्यवस्था केली जात आहे. जाहिरातींवर एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च केला जात असेल तर विचार करा यांची मिळकत किती असेल? या सरकारने इलेक्टोरल बाँड्स नावाची व्यवस्था मध्यंतरी सुरू केली. विविध संस्थांच्या माध्यमातून यांनी पैसे घेतले त्याची माहिती गुप्त ठेवण्यात आली. लोक कोर्टात गेल्यावर सुप्रीम कोर्टाने सांगितले की सर्व व्यवहार जाहीर करा. हे जाहीर झाल्यावर कळले की निम्म्याहून अधिक पैसे हे भाजपला मिळाले आहे. ज्यांनी पैसे दिले त्यांच्यावर ईडी, आयटी या संस्थांद्वारे कारवाई सुरू होती. पैसे दिले तेव्हा सुटका झाली. हा उघड उघड भ्रष्टाचार आहे, भ्रष्टाचार कसा करावा याची नवी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रकार मागच्या पाच वर्षांत झाला. एकीकडे 'न खाऊंगा न खाने दुंगा' म्हणायचे आणि दुसरीकडे 'जो भी है वो मैंही खाऊंगा' असे केले जात आहे. या निवडणूक रोखे घोटाळ्यांसंबंधी आपण काही बोलण्यापेक्षा भाजपच्या नेत्या आणि देशाच्या अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांचे पती आणि ज्येष्ठ राजकीय अर्थतज्ज्ञ डॉ. परकला प्रभाकर यांनी ४ एप्रिल २०२४ रोजी पुण्यातील गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेत व्याख्यान दिल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना जी विधाने केली आहेत, त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. 'निवडणूक रोखे घोटाळा म्हणजे मोदीगेट' असा थेट आरोप करून डॉ. परकला प्रभाकर म्हणाले ''निवडणूक रोखे हा देशातीलच नाही, तर जगातील सर्वात मोठा घोटाळा आहे. मी त्याला 'मोदीगेट' घोटाळा म्हणतो. या प्रकरणाची स्वतंत्र आयोग नेमून त्याच्यामार्फत चौकशी झाली पाहिजे. केंद्रीय गृहमंत्री पदावरील व्यक्तीने निवडणूक रोख्यांचे केलेले समर्थन अत्यंत हास्यास्पद आहे. त्यांनी निवडणूक रोख्यासंबंधी जनतेला सांगितलेली माहिती व आकडेवारीही चुकीची असून खोटी माहिती देऊन जनतेची दिशाभूल करण्यात आलेली आहे. पक्षाप्रती असलेला आदर म्हणून सत्ताधाऱ्यांसह विरोधी पक्ष, अन्य पक्षांना निधी मिळालेला असू शकतो. पण सत्ताधाऱ्यांना मिळालेल्या निधीकडे लक्ष द्यावे इतका तो मोठा आहे. सरकार शेवटच्या मिनिटापर्यंत रोखे घेतलेल्यांची यादी द्यायला सर्वोच्च न्यायालयाला तयार नव्हते. स्टेट बँकेने तर प्रचंड आडमुठी भूमिका घेतली होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने बडगा दाखविल्यानंतर स्टेट बँक सरळ झाली आणि त्यांनी मुकाट्याने माहिती सादर केली. या माहितीतून आपल्या निदर्शनास आले आहे की, निवडणूक रोख्यातून सर्वाधिक निधी भाजपला मिळाला आहे. त्यानंतर ज्यांनी निधी दिला त्या कंपन्यांना कामे कशी मिळाली, याचाही मोठा संबंध आहे आणि त्याचाही खोलात जाऊन तपास केला पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही पक्षाचे केंद्रीय संस्थांवर नियंत्रण नाही. या संस्थांचा वापर निधी गोळा करण्यासाठी करण्यात आलेला आहे. हे उघडपणे दिसतच आहे. नफा नसलेल्या २३ कंपन्यांनी सत्ताधाऱ्यांना निधी दिला याचा अर्थ पडद्यामागे असलेल्या कोणीतरी हा आर्थिक व्यवहार केला आहे. याचे तपशील बाहेर आले पाहिजे. निवडणूक रोखे घोटाळ्याची माहिती आता हळूहळू लोकांमध्ये झिरपत असून तो निवडणुकीतील प्रचाराचा मोठा मुद्दा बनत चालला आहे. त्याचा मोठा फटका भाजपला निश्चित बसेल. निवडणूक रोखे हा तांत्रिक मुद्दा असेल तर टूजी प्रकरण काय होते? रेल्वे बसमध्ये व सार्वजनिक सर्व ठिकाणी निवडणूक रोख्यांच्या मुद्द्यांवर आता लोक जाहीरपणे चर्चा करू लागले. निवडणूक रोखे मुद्द्याचा निवडणुकीवर परिणाम होणार नाही, असे म्हणणे म्हणजे लोकांच्या बुद्धिमत्तेवर व ज्ञानाबाबत शंका घेण्यासारखी आहे. आम्ही स्वच्छ आहोत, ना खाऊँगा, ना खाने दुँगा, असे दररोज म्हणावे लागणे हे संशयास्पद आहे'', असेही डॉ. परकला प्रभाकर यांनी सांगितले. भाजपला हा घरचा आहेर आहे. आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हा विषय गावांगावांत नेला पाहिजे आणि भाजपचे खरे पितळ उघडे पाडले पाहिजे.

टिव्हीवरील जाहिरातींच्या माध्यमातून काँग्रेसने ७० वर्षांत काय केले नाही हे सांगितले जात आहे. हे १० वर्षे सत्तेत आहेत, यांनी १० वर्षात काय केले याचीही एखादी जाहिरात करा. ७० वर्षांत काम केले म्हणून देश आज इथपर्यंत आला आहे. मागच्या १० वर्षात यांनी देश अधोगतीकडे नेला. आज देशातील तरुणांना रोजगार नाही. पीएच.डी झालेली मुले आज शिपायाच्या नोकरीसाठी अर्ज भरत आहेत. ग्लोबल हंगर इंडेक्समध्ये आपल्या देशाचा नंबर १११ वा लागतो. भाजप यावर उत्तर देईल का? का देश पुढे गेला नाही? यांचे उत्तर काय असेल तर तुम्ही साठ वर्षात काय केले? आम्ही फक्त १० वर्षांचा हिशोब मागतोय तर यांची ही परिस्थिती आहे. टिव्हीवर जे दाखवले जाते ते फक्त दिसायला चांगलं आहे, खरी परिस्थिती तुम्ही आम्ही भोगतोय असे ते म्हणाले.

## संपादकीय



# ६०० वकिलांच्या पत्राचा अन्वयार्थ

# भाजपचा छुपा अजेंडा

एकेकाळी म्हणजे अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेल्या भाजप आणि इतर राजकीय पक्षांच्या आघाडीच्या(एनडीए) सरकारच्या वेळी एका मुद्याचा सतत उल्लेख व्हायचा. त्याला इंग्रजीत 'हिडन अजेंडा' म्हणजेच सरकारच्या 'मनातील गुप्त उद्दिष्टां'चा हा मुद्दा होता. सरकारच्या मनातील ही गुप्त उद्दिष्टे उघडपणे न बोलता ती पूर्ण करण्यासाठी पावले टाकत रहायची असा त्याचा अर्थ होता. म्हणूनच त्याला 'हिडन अजेंडा' म्हटले जाई. विरोधी पक्षांची ही गोळी इतकी बरोबर लागली होती की अनेकवेळेस भाजप संघ परिवाराला बचावाच्या पवित्र्यात जावे लागले होते. त्यासाठी वाजपेयींच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारने राज्यकारभारासाठी मार्गदर्शक अशी राष्ट्रीय विषयपत्रिका (नॅशनल अजेंडा फॉर गव्हर्नन्स) जाहीर करुन या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न केला होता. तरीही संघ परिवाराच्या दबावाखाली वाजपेयींनी राज्यघटनेच्या पुनर्विलोकन व फेरमीमांसेसाठी एका समितीची स्थापना केलीच होती. तेव्हाही संघपरिवाराच्या राज्यघटनाविरोधी भूमिकेला पोषक असे हे पाऊल असल्याची टीका झाली होती. न्यायमूर्ति वेंकटचलय्या यांच्या नेतृत्वाखाली ही समिती स्थापन झाली होती आणि अखेर या समितीने दिलेल्या अहवालाचा सारांश हाच होता की राज्यघटनेत काळाशी सुसंगत आवश्यकतेनुसार बदल किंवा दुरुस्त्या करण्याची सोय किंवा तरतूद घटनादुरुस्तीच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्यामुळे राज्यघटना पूर्णपणे बदलून नव्याने निर्माण करण्याची आवश्यकता नाही. त्याचबरोबर या समितीने जे अत्यंत महत्वाचे मत नोंदविले होते ते हे होते की राज्यघटनेचा गाभा किंवा मूलभूत चौकट बदलण्याचा अधिकार संसदेला देखील नाही आणि कोणत्याही घटनादुरुस्तीद्वारे राज्यघटनेची मूलभूत चौकट कोणत्याच राजवटीला बदलता येणार नाही. यानंतर राज्यघटना बदलण्याच्या चर्चेला विराम मिळाला. परंतु वाजपेयींसारख्या उदारमतवादी नेत्याला देखील संघ परिवाराच्या दबावापुढे झुकावे लागले होते ही बाब येथे लक्षात ठेवावी लागेल. आता तर संघ परिवाराने उराशी बाळगलेल्या प्रमुख उद्दिष्टांची पूर्तता करणारे सरकार अस्तित्वात आहे. अयोध्येतील राम मंदिर उभारणीची बाब न्यायालयाच्या निर्णयाच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली. जम्मूकाश्मीरला विशेष दर्जा देणारी घटनेतली कलमे हटविण्यात आली. आता फक्त समान नागरी कायद्याबाबतचे उद्दिष्ट उरले आहे. याखेरीज भारतीय दंडविधान (आयपीसी इंडियन पीनल कोड), फौजदारी कायदे संहिता (क्रिमिनल प्रोसिजर कोड सीआरपीसी) आणि पुरावाविषयक कायदा (इंडियन इव्हिडन्स ॲक्ट) यांच्यातही सरकारने त्यांना हवे तसे बदल करुन ते अधिक कडक केलेले आहेत. या कायद्यांचा वापर करुन नागरिकांचा छळ होऊ शकतो ही शंका अनेकांच्या मनात आहे परंतु सरकारने तूर्तास तरी त्या शंका साधार नसल्याचे म्हटले आहे. परंतु या सर्व उदाहरणांवरुन स्पष्ट होणारी एक गोष्ट एवढीच की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेली राज्यघटना बदलून त्याजागी त्यांना हवी असलेली नवी राज्यघटना आणण्याचे त्यांचे मनसुबे आता उघड होऊ लागले आहेत. आता या मंडळींचे गुप्त हेतु स्वच्छ आणि स्पष्टपणे समोर दिसू लागले आहेत. आता तर कोडगेपणाने त्यांचे प्रतिनिधी चारशेपेक्षा अधिक संख्याबळ मिळाल्यानंतर राज्यघटना बदलणार असल्याचे जाहीरपणे सांगू लागले आहेत. कर्नाटकातील भाजपचे एक अत्यंत वाह्यात खासदार अनंतकुमार हेगडे यांनीच अगदी अलीकडे हे विधान केले आहे. याबद्दल त्यांच्यावर कारवाई झालेली नाही. फक्त त्यांच्याकडे स्पष्टीकरण मागण्यात आले आहे. ज्या राज्यघटनेची संसदसदस्य म्हणून शपथ घेतली जाते, ज्या राज्यघटनेच्या आधारे देशाचा राज्यकारभार केला जातो त्या राज्यघटनेच्या अस्तित्वावरच आता ही मंडळी घाला घालायला निघाली आहेत. संघ परिवाराचे हे उद्दिष्ट आता निर्णायक वळणावर आलेले आहे. याची दखल जनतेने घेण्याची वेळ आलेली आहे.

मनातल्या गोष्टी कधी ना कधी ओठावर येतच असतात. तसेच राज्यघटनाबदलाचे झाले आहे. या देशाच्या उपराष्ट्रपतींच्या श्रीमुखातून राज्यघटनेबाबत, न्यायसंस्थेबाबत जी काही मुक्ताफळे उधळण्यात आलेली आहेत ती याच मनोवृत्तीची द्योतक आहेत. उपराष्ट्रपति हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे अधिकारपद आहे. राष्ट्रपति, उपराष्ट्रपति आणि नंतर पंतप्रधानांचे राजशिष्टाचारानुसार स्थान आहे. त्यामुळे देशाचा उपराष्ट्रपतीच राज्यघटनेबद्दल आपली जीभ सैल सोडत असेल तर त्याहून देशाचे दुसरे दुर्दैव नसेल. या विद्वान उपराष्ट्रपतिमहोदयांनी काय म्हटले ते प्रथम पाहू. अखिल भारतीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या वार्षिक परिषदेत बोलताना

उपराष्ट्रपतींनी आपले हे महान विचार प्रकट केले. पीठासीन अधिकारी म्हणजे देशभरातील विधानसभा व विधान परिषदांचे अध्यक्ष व सभापति होय म्हणजेच जी मंडळी कायदेमंडळ किंवा विधिमंडळांचे संचालन करतात त्यांच्या परिषदेसारख्या महत्वाच्या व्यासपीठावरुन उपराष्ट्रपतींनी हे न्यायसंस्था आणि राज्यघटनाविरोधी वाक्ताडन केले. ज्या केशवानंद भारती प्रकरणात (१९७३) सर्वोच्च न्यायालयाने राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीला धक्का लावता येणार नाही किंवा त्यात दुरुस्ती करता येणार नाही असा जो ऐतिहासिक निर्णय दिला होता त्यावरच उपराष्ट्रपति महोदयांनी टीका केली होती. केशवानंद भारती प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय किंवा न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रीय न्यायिक आयोग स्थापन करण्याची शिफारस करणारा कायदा रद्द करणाचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय हे दोन्ही अनुचित असून त्या निर्णयांमुळे देशात वाईट पायंडा पडण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या महान विद्वत्तेनुसार कायदे करणारी संस्था म्हणून संसद ही सर्वोच्च आहे आणि संसदेला कायदे करण्याचा, राज्यघटना बदलण्याचा अधिकार प्राप्त आहे. त्यांच्या विधानावर किंवा मतप्रदर्शनावर कायदेपंडितांकडून सडकून टीका होणे अपेक्षितच होते. राज्यघटना आणि न्यायसंस्थेबाबतची उपराष्ट्रपतींची ही मते अयोग्य आहेत आणि एकप्रकारे राज्यघटना व न्यायसंस्थेवर तो हल्ला आहे अशी सर्वसाधारण प्रतिक्रिया दिली गेली. प्रख्यात कायदेपंडित प्रशांत भूषण यांनी तर उपराष्ट्रपतींनी पुन्हा राज्यघटना व कायद्याचे अध्ययन करावे अशी उपरोधपूर्ण टिप्पणी केली. देशाचे माजी गृहमंत्री व अर्थमंत्री पी. चिदंबरम हेही प्रख्यात वकील आहेत. त्यांनी उपराष्ट्रपतींच्या या राज्यघटना व न्यायसंस्थाविरोधी शेरेबाजीला विरोध करताना या देशात संसद ही सर्वोच्च नसून राज्यघटना ही सर्वोच्च असल्याचे प्रतिपादन केले. देशाचा राज्यकारभार या राज्यघटनेच्या आधाराने चालतो कारण तो राज्यकारभारासाठीचा मूलभूत मार्गदर्शक दस्तावेज आहे. त्यामुळेच राज्यघटनेत ज्या शाश्वत मूल्य व तत्वांचा उल्लेख करण्यात आला आहे त्यात संसदेला किंवा कोणत्याही सरकारला बदल करता येणार नाही. राज्यघटनेच्या मूलभूत चौकटीची जी संकल्पना न्यायसंस्थेने विकसित केली त्यामागील हेतु हा होता की केवळ संसदेत बहुमत आहे म्हणून कोणत्याही सत्ताधारी पक्षाला किंवा सरकारला राज्यघटनेचा चेहरामोहराच बदलून टाकण्याचा अधिकार प्राप्त होणार नाही. उद्या एखाद्या सरकारला म्हणजेच पक्षाला संसदेत बहुमत आहे म्हणून तो पक्ष देशाची संसदीय लोकशाही व्यवस्था रद्द करुन अध्यक्षीय प्रणाली लागू करु शकतो काय किंवा संघराज्य प्रणालीनुसार राज्यांना असलेले अधिकार रद्द करु शकतो काय असे प्रतिप्रश्नही चिदंबरम यांनी उपराष्ट्रपतींना या निमित्ताने विचारले. केवळ बहुमतवादी किंवा बहुसंख्यकवादी दृष्टिकोनातून राज्यघटनेचा विचार करणे आणि केवळ बहुमत आहे म्हणून राज्यघटनेची मोडतोड करण्याचा अधिकार मिळतो ही धारणाच सदोष व पूर्णपणे अयोग्य, अनुचित व सर्वस्वी चुकीची आहे आणि म्हणून अमान्य आहे.

उपराष्ट्रपतींनी भले हे भाषण त्यांचे म्हणून केलेले असले तरी ते भाषण तयार करणारे वेगळे लोक असतात. उपराष्ट्रपति हे केवळ मुखवटा आहेत. त्यांचे बोलविते धनी वेगळेच आहेत. ते कोण आहेत हेही लपलेले नाहीत. अर्थात विद्वान उपराष्ट्रपतींनी ही टीका फारशी मनावर घेतलेली नाही किंवा त्याचा प्रतिवाद करण्याचा किंवा खुलासा करण्याचे साधे सौजन्यही दाखविलेले नाही. जेव्हा देशातील उच्चपदःस्थच पिंजऱ्यातले पोपट होतात आणि मालकाच्या सांगण्यानुसार मिठू मिठू बोलायला लागतात किंवा मालकाच्या सांगण्यानुसार वागायला लागतात ती अधःपतनाची सुरुवात असते.

राज्यघटना आणि न्यायसंस्थेला नावे ठेवल्याबद्दल टीकेचे धनी झाल्यानंतरही उपराष्ट्रपतींची बोलघेवडेपणाची सवय बहुधा गेलेली नसावी. अलीकडेच सुमारे सहाशे वकीलांनी देशाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना एक पत्र लिहिले व त्यात काही हितसंबंधी गट व समूह हे न्यायसंस्थेवर दबाव आणून राष्ट्रविरोधी काम करीत आहे. ते न्यायसंस्थेलाही बदनाम करीत आहेत. विशेषतः राजकीय व्यक्तींशी निगडित भ्रष्टाचाराच्या प्रकरणांच्या माध्यमातून ते विशिष्ट प्रकारचे गैरसमज पसरवीत आहेत आणि हे धोकादायक आहे व ते थांबविण्याची आवश्यकता आहे असा या पत्राचा आशय होता. गेल्या काही काळापासून मोदी सरकारच्या गळ्यातले ताईत बनलेले वरिष्ठ वकील हरीश साळवे यांचाही या सहाशे वकीलांमध्ये समावेश आहे. तर विद्वान उपराष्ट्रपतींनी आता हा मुद्दाही हाती घेतला नसता तरच नवल घडले असते. उपराष्ट्रपतींनी या विषयावर आपले मतप्रदर्शन केले आणि या वकीलांना पाठिंबा दिलाच परंतु देशाच्या पंतप्रधानांनाही या वकीलांना पाठिंबा देण्याचा मोह आवरता आला नाही. पंतप्रधानांना या सहाशे महान वकीलांचा एवढा पुळका येण्याचे कारण काय याची मीमांसा किंवा यामागील रहस्यही जाणून घेणे महत्वाचे आहे.

तर मंडळी, हरीश साळवे यांच्यासह या वकीलांना अचानक न्यायसंस्थेचा पुळका येणे, न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य व स्वायत्तता अबाधित राखण्याबद्दलची कळकळ व त्याबद्दल वाटणारे महत्व अशा भावना निर्माण झालेल्या दिसतात. पण हे आताच का घडत आहे यालाही कारण आहे. याला कारण एकच आहे की इलेक्टोरल बाँड्स उर्फ निवडणूक रोखे प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जी कणखर भूमिका घेतली त्यामुळे हरीश

साळवे यांच्यासह सहाशे वकीलांना त्या स्वतंत्र बाण्याने केलेल्या निर्णयाची ॲलर्जी निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांना न्यायसंस्था काही हितसंबंधी आणि राष्ट्रविरोधी शक्तींच्या दबावाखाली काम करीत असल्याची उपरती झाली. आता हरीश साळवे व अन्य कायदेपंडितांना एकच प्रश्न विचारावासा वाटतो की भ्रष्टाचार उघडकीस आणणे हा देशद्रोह कधीपासून झाला ? हे वकील जाऊद्यात या देशाचे जे महान उपराष्ट्रपति आहेत त्यांनी देखील हे प्रकरण उघडकीस आणणाऱ्यांना देशद्रोही, राष्ट्रविरोधी म्हणून गणले आहे. यावर कडी म्हणजे देशाच्या पंतप्रधानांनी या गोष्टींना पाठिंबा दर्शविला आहे. म्हणजेच पंतप्रधानांच्या लेखी सरकारी भ्रष्टाचार उघडकीस आणणे हे पाप आहे, तो देशद्रोह आहे आणि ते देशविरोधी कृत्य आहे. मग याचा दुसरा अर्थ काय होतो ? याचा दुसरा अर्थ हाच होतो की उपराष्ट्रपति, पंतप्रधान आणि हरीश साळवे यांच्यासह सहाशे वकीलांना या देशातील सरकारी भ्रष्टाचार उघडकीस यायला नको आहे. उलट माध्यमांनी, जागरुक नागरिकांनी, वकीलांनी या सरकारी भ्रष्टाचाराकडे डोळेझाक केली पाहिजे अशी त्यांची अपेक्षा आहे. निवडणूक प्रचारसभांमध्ये हेच पंतप्रधान भ्रष्टाचार मुक्ततेच्या गोषणा करीत असतात. एवढेच नव्हे तर काहीही झाले, कितीही विरोध झाला तरी भ्रष्टाचाऱ्यांना सोडणार नाही, त्यांच्याविरुध्द कारवाई करणारच अशा ज्या गगनभेदी घोषणा करीत हिंडत आहेत ती भूमिका खरी की सरकारी भ्रष्टाचार उघडकीस आला म्हणून जीव कासावीस झालेल्या सरकार उपकृत व पुरस्कृत वकीलांना ते देत असलेला पाठिंबा खरा हे अनाकलनीय आहे. पंतप्रधान प्रतिनिधित्व करीत असलेल्या भाजपच्या खात्यात निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून सात हजार कोटि रुपयांच्या आसपास रक्कम जमा झाली. ती रक्कम शुध्द आहे काय हे पंतप्रधानांनी त्यांची ५६ इंची छाती ठोकून देशाला सांगितले तर चांगले होईल. परंतु परनिंदा म्हणजेच विरोधी पक्षांना फक्त नावे ठेवण्याच्या राजकीय विकृतीचे (संस्कृति नव्हे) प्रतिनिधी असल्याने त्यांच्याकडून ही अपेक्षा नाही. त्यासाठी तेवढी प्रगल्भता आणि बौध्दिक क्षमता असावी लागते. सुमारबुध्दींचे ते काम नव्हे ! या वकीलांना पाठिंबा देताना पंतप्रधानसाहेब काय म्हणतात ते पाहू. ''गुंडगिरी आणि धाकदपटशा ही काँग्रेसची जुनी मुरलेली संस्कृति आहे. पाच दशकांपूर्वी त्यांनी सरकार बांधील न्यायसंस्थेची (कमिटेड ज्युडिशियरी) कल्पना मांडली होती आणि निर्लज्जपणे ते त्यांच्या स्वार्थी हितसंबंधांसाठी इतरांकडून बांधिलकीची अपेक्षा करीत आहेत परंतु देशाबाबतच्या बांधिलकीबद्दल बोलत नाहीत. १४० कोटि लोक त्यांना नाकारतात यात काही आश्चर्य नाही.'' व्वा, काय जबरदस्त डायलॉगबाजी केली आहे पंतप्रधानसाहेबांनी. मुळात न्यायसंस्थेच्या आचरणाचा आणि काँग्रेसचा काही संबंधच नाही. याच न्यायसंस्थेने तथाकथित टूजी स्पेक्ट्रम असो की कोळसा खाण परवाने असोत या प्रकरणात काँग्रेसवर म्हणजेच त्यांच्या सरकारवर भरपूर ताशेरे झाडले आहेत. तेव्हा तर भाजप संघपरिवारातली मंडळी लई थुईथुई नाचत होती. त्यावेळी त्यांच्या या समूह नाचण्याच्या कार्यक्रमात अण्णा हजारे नामक व्यक्तीही सामील होती. यानंतर या दोन्ही प्रकरणात प्रत्यक्ष स्वरुपात भ्रष्टाचार नसल्याचे उघडकीस आले. स्पेक्ट्रम प्रकरणातील आरोपी राजा व अन्य मंडळींना न्यायालयाने सोडून दिले होते. उलट ज्या विनोद राय नामक सीएजीने (महालेखा नियंत्रक) हे खोटेनाटे अहवाल सादर करुन भाजप संघ परिवाराला मदत केली होती त्याने मागाहून हे अहवाल चुकीचे असल्याची कबुलीही दिलेली आहे. या व्यक्तीला हे करण्याबद्दल बक्षीस म्हणून बीसीसीआयवर प्रशासक म्हणून नेमून लठ्ठ पगाराची सोय करण्यात आली होती. सांगण्याचा मुद्दा हा की भाजप संघ परिवाराच्या संस्कृतीतच हा खोटेपणा काठोकाठ भरलेला आहे. अर्धसत्य बोलायचे आणि लोकांची दिशाभूल करायची हा यांचा परंपरागत धंदा आणि यांचा पिंडच हा बनवाबनवीचा आहे. इंदिरा गांधी यांच्या काळात कमिटेड ज्युडिशियरीची चर्चा झाली होती. यामध्ये शंकाच नाही. परंतु केवळ बहुमत आपल्या हाती आहे म्हणून इंदिरा गांधी यांनी ही संकल्पना देशावर लादली नाही. त्या काळात देशात अध्यक्षीय राज्य प्रणालीबाबतही चर्चा झालेली होती. परंतु बहुमत आहे म्हणून त्यांनी लगेचच अध्यक्षीय पध्दती देशात लागू केली नव्हती. राजीव गांधी यांना महाकाय बहुमत होते. जवळपास तीन चतुर्थांश बहुमत होते. परंतु त्यावेळी देखील एकाही काँग्रेस खासदाराने चला, या बहुमताचा वापर करुन राज्यघटना बदलून टाकू, असे म्हटलेले नव्हते. म्हणूनच पंतप्रधानसाहेबांना एवढेच सांगणे आहे की काँग्रेसची निंदा जरुर करा परंतु बुध्दी वापरुन करा आणि वस्तुनिष्ठ करा. खोट्यानाट्या व अर्धवट गोष्टी सांगून जनतेला संभ्रमित करुन त्यांची दिशाभूल करण्याचे धंदे बंद करा. तुम्ही जर खरे लोकशाहीवादी असाल आणि संसदीय लोकशाही प्रणालीशी एकनिष्ठ व बांधील असाल तर ते कृतीतून दाखवून द्या. संसदेला महत्व न देता मनमानी पध्दतीने राज्यकारभार करायचा याला निष्ठा म्हणत नाहीत. संसदेतील प्रश्नोत्तरात भाग घ्या, संसदेच्या चर्चांमध्ये विरोधी पक्षांचे म्हणणे ऐकून घ्यायला शिका. हे काहीच न करता लोकशाहीबद्दलचे बेगडी प्रेम दाखवून फुकाचे नाटक करीत बसणे बंद करा.

आता जरा या सहाशे उपकृत व पुरस्कृत वकीलांच्या पत्रातील मुद्यांवरही नजर टाकावी लागेल. हरीश साळवे यांच्याखेरीज बार कौन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष मन्नकुमार मिश्रा, अदीश आगरवाला, पिंकि आनंद यांच्या समावेश आहे. ही जी प्रमुख मंडळी आहेत ही थेट भाजपशी निगडित आहेत.

पिंकि आनंद यांना मोदी राजवटीतच सॉलिसिटर जनरल केले होते. काही हितसंबंधी गट न्यायसंस्थेवर दबाव टाकत आहेत आणि न्यायालयांची बदनामी करण्यासाठी न्यायिक प्रक्रिया प्रभावित करीत आहेत असा आरोप करुन एका विशिष्ट राजकीय हेतुने आणि तकलादू तर्काच्या आधारे हे काम केले जात असल्याचे म्हटले आहे. हे हितसंबंधी गट मुद्दाम होऊन न्यायसंस्थेच्या तथाकथित सुवर्णकाळाचे  दाखले देऊन एक चुकीचे वातावरण तयार करीत आहे व तसा प्रचारही करीत आहेत. यामुळे वर्तमान न्यायिक प्रक्रियेला हिणकस किंवा सदोष ठरवून लोकांचा न्यायसंस्थावरील विश्वास उडविण्याचे काम ही मंडळी करीत असल्याचेही पत्रात नमूद करण्यात आले आहे. न्यायसंस्थेच्या भूतकाळाचे जाणीवपूर्वक दाखले देऊन वर्तमान न्यायसंस्था व न्यायिक प्रक्रियांना हेतुपूर्वक सदोष ठरविण्याचा प्रयत्न केला जात आहे. न्यायालयातील खंडपीठांची रचना व त्यावरील न्यायाधीशांच्या नेमणुका या कशा सोयीने केल्या जातात, इतर न्यायसंस्थांबरोबर भारतीय न्यायसंस्थांची अनुचित तुलना करणे आणि न्यायाधीशांच्या सन्मानावर थेट हल्ला करण्याचे प्रकार सध्या घडताना दिसत आहेत. हा जो हितसंबंधी गट आहे तो त्यांच्या राजकीय हितसंबंधांना अनुकूल अशा निर्णयांचा उदोउदो करतो आणि अनुकूल नसलेल्या निर्णयांवर टीका करतो असा आरोपही पत्रात करण्यात आला आहे. आता हा जो शाहजोगपणा किंवा मानभावीपणा या पत्रात करण्यात आला आहे तो किती बनावट आहे हेही लक्षात घ्यावे लागेल. न्यायाधीशांवर विशिष्ट प्रकारचाच निर्णय देण्याबाबत दबाव आणले गेले तेव्हा या सहाशे वकीलांना जाग आली नव्हती. अयोध्या प्रकरणात राममंदिराच्या उभारणीला अनुकूल निर्णय देताना जनमानसातील श्रध्देला प्राधान्य दिले गेले होते आणि त्यामध्ये कायदेशीरपणाचा अभाव होता तेव्हा या कायदेपंडितांना कायदा, न्यायसंस्था आणि न्यायप्रक्रियेची आठवण झाली नव्हती. अयोध्येचा निकाल दिल्यानंतर तत्कालीन सरन्यायाधीश निवृत्त झाले आणि लगोलग त्यांना राज्यसभेवर घेण्यात आले होते तेव्हाही या वकीलांची दातखीळ बहुधा बसली असावी. याच निर्णयात सहभागी असलेले आणखी एक न्यायाधीश (त्यांचाही या खंडपीठात समावेश होता) निवृत्त झाल्याच्या दुसऱ्या दिवशी एका राज्याचे राज्यपाल म्हणून नेमले जातात तेव्हा या वकीलांची वाणी लुळी पडत असावी. पश्चिम बंगालच्या उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राजीनामा देऊन सरळ भाजपमध्ये प्रवेश करतात तेव्हा या वकीलांना न्यायसंस्थेशी निगडित मूल्ये व नीतीमत्तेची जाणीव होत नाही. हे तर काहीच नाही. गुजरातमधील सोहराबुद्दिन शेख हत्या प्रकरणाशी संबंधित विशेष न्यायालयाचे न्यायाधीश बीएच लोया यांच्या संशयास्पद हत्येबाबत साधी चौकशी करण्याचे सौजन्यही तत्कालीन सरन्यायाधीशांनी दाखविले नाही आणि संबंधित अर्ज फेटाळून लावताना अशी याचिका म्हणजे न्यायसंस्थेवर हल्ला असल्याचे म्हटले होते. परंतु लोया यांचा मृत्यु संशयास्पद असल्याचे अनेक पुरावे मागाहून उजेडात येऊनही न्यायसंस्थेला त्याची दखल घ्यावीशी वाटली नव्हती. याचे कारण स्पष्ट होते की लोया यांच्या समोरचे प्रकरण देशातील शक्तिमान अशा राजकारणी व्यक्तीच्या विरोधातले होते आणि त्याबाबत कणखर भूमिका घेण्यात सर्वोच्च न्यायालय कमी पडले ही भावना जनमानसात तयार झाली. किमान या प्रकरणाच्या तटस्थ चौकशीची मागणी मान्य करण्यात काहीच गैर नव्हते. परंतु ते देखील न्यायसंस्थेकडून केले गेले नाही. तरीही त्यावेळी कुणीही न्यायसंस्थेविरुध्द चकार शब्दही काढला नाही. येथे निवडणूक रोखे प्रकरणातील गैरव्यवहार उघडकीस आणल्याबरोबर या वकीलांना विलक्षण त्रास झाला असावा आणि त्या वेदनेतूनच त्यांना हे पत्र लिहिण्याची प्रेरणा मिळाली असावी.


न्यायसंस्थेला वेसण घालण्याचे प्रकार या देशाला नवे नाहीत. परंतु गेल्या दहा वर्षात जे प्रकार चालू करण्यात आले आहेत त्यामुळे न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता टिकण्याबद्दल शंका येऊ लागल्या आहेत. सर्वप्रथम या सरकारने उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या नेमणुकीची प्रक्रिया स्वतःच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हापासून न्यायसंस्थेमध्ये या सरकारच्या हेतुबद्दल शंका निर्माण झाल्या आहेत. न्यायाधीशांच्या नेमणुकांसाठी राष्ट्रीय न्यायिक आयोगाच्या स्थापनेची तरतूद असलेल्या कायदा मोदी सरकारने संमत केला खरा परंतु त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले आणि न्यायालयाने तो रद्द ठरविला. याचे कारण या कायद्यानुसार न्यायाधीशांच्या नेमणुकांच्या प्रक्रियेत सरकारकडे अवाजवी अधिकार देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. न्यायालयांना न्यायाधीश  नेमणूक प्रक्रियेतील सरकारचा निर्णायक अधिकार अमान्य होता. म्हणूनच त्यांनी तो कायदा रद्दबातल ठरवला. एकप्रकारे या नेमणुकांबाबतचा निर्णायक अधिकार स्वतःकडे घेऊन केवळ सरकारधार्जिणे न्यायाधीश नेमून आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी न्यायासंस्थेचा वापर करुन घ्यायचा आणि न्यायसंस्था आपल्या विरोधात जाणार नाही यासाठी सरकार धार्जिणे न्यायाधीश नेमायचे असा डाव यामागे असल्याचे स्पष्ट झाले होते. हा कायदा रद्द ठरविल्याची बाब मोदी व त्यांच्या सरकारच्या जिव्हारी लागली हे उघड सत्य आहे. कारण या कायद्याच्या द्वारे त्यांना न्यायसंस्था नियंत्रित आणि अंकित करणे सुलभ होणार होते आणि तेही कायदेशीर मार्गाने होणार असल्याने मोदी राजवटीला ते सुखावह वाटत होते. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते फेटाळल्याने त्यांच्या सर्व मनसुब्यांवर

पाणी पडले. कमिटेड ज्युडिशियरी किंवा सरकारधार्जिणी न्यायसंस्था ही काँग्रेसची निर्लज्ज कल्पना असल्याचे म्हणणाऱ्या पंतप्रधानांनी हा जो कायदा केला होता तो कोणत्या हेतुने केला होता याचे उत्तर मिळाले तर बरे होईल. त्यामुळेच हा कायदा फेटाळला गेल्यानंतर न्यायाधीश नेमणुकांच्या प्रक्रियेत सरकारने नेमणुकांना हिरवा कंदील दाखविण्यासाठी टाळाटाळ सुरु केली. सर्वोच्च न्यायालयाने ज्यांची नावे न्यायाधीशपदासाठी निश्चित केली त्यांना मंजुरी देण्यात अक्षम्य दिरंगाईचे धोरण मोदी सरकारने अवलंबिले. हे कोणत्या नैतिकतेत बसते याचे उत्तर मिळण्याची आवश्यकता आहे. तरीही नैतिकता आणि मोदी राजवटीचा दुरान्वयानेही संबंध आहे का असे विचारण्याची पाळी आली आहे. याचे कारण मोदींच्या सरकारमध्ये न्यायसुसंगत असा राज्यकारभार होताना दिसत नाही. राज्यघटनेने भारतात संघराज्य प्रणालीचा पुरस्कार केलेला आहे. विकेंद्रीकरण हा या प्रणालीचा आत्मा आहे. परंतु सत्तेत आल्याबरोबर मोदींनी संघराज्य प्रणालीचा प्रमुख आधारस्तंभ असलेला योजना आयोग आणि राष्ट्रीय विकास परिषदेचे अस्तित्व नष्ट करुन टाकले. निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरच घाला घातला आणि आयोग हा सरकारची बटीक म्हणून कसा राहील हे पाहिले. जेव्हा न्यायसंस्थेने याला हरकत घेतली तेव्हा सरकारने न्यायपूर्ण भूमिका घेण्याऐवजी न्यायसंस्थेलाच फाट्यावर मारण्याची भूमिका घेतली. मुक्त आणि खुल्या निवडणुका हा लोकशाहीचा आत्मा आहेत. त्यामुळे या निवडणुकांचे संचालन करणारा निवडणूक आयोग हा स्वायत्त व तटस्थ तसेच सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त असला पाहिजे. त्यासाठीच राज्यघटनेने आयोगाला घटनात्मक आणि स्वायत्त दर्जा दिला आहे. यासाठी निवडणूक आयुक्त देखील सरकारच्या प्रभाव दबावापासून मुक्त असले पाहिजेत व त्यांची नेमणूक निःपक्ष पध्दतीनेच झाली पाहिजे हे न्यायालयाने सांगितले. त्यासाठी सरन्यायाधीशांचा समावेश असलेली निवड समिती स्थापन करण्याचा निर्णय न्यायालयाने दिला होता. सर्वसाधारणपणे असा निर्णयांचा सन्मान करण्याची लोकशाही प्रथा असते. परंतु मोदी सरकारने या निवडसमितीचे स्वरुपच बदलणारा कायदा केला व त्यातून सरन्यायाधीशांना वगळले. आता या समितीत पंतप्रधान, गृहमंत्री आणि लोकसभेतील सर्वाधिक जागा असलेल्या विरोधी पक्षाच्या नेत्याचा समावेश असेल. म्हणजेच समितीचा निर्णय बहुमताने करताना सरकारलाच अनुकूल असलेल्या व्यक्तीची निवड करण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला. त्याची प्रचीती सरकारने लगेचच दिली. निवडणूक आयोगात दोन आयुक्तांची पदे रिक्त होती. त्यातील एक पद आयुक्तांच्या निवृत्तीमुळे रिक्त झाले होते. परंतु दुसरे निवडणूक आयुक्त अरुण गोयल यांनी त्यांच्या निवृत्तीला तीन वर्षांचा अवधी असूनही राजीनामा दिला. त्यांचे राजीनाम्याचे कारण स्पष्ट झालेले नाही. तर अशा या दोन आयुक्तांच्या जागा सरकारने नव्याने केलेल्या कायद्यानुसार असलेल्या समितीमार्फत भरल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभेतील काँग्रेसचे गटनेते अधीररंजन चौधरी यांची समिती होती. बैठकीच्या आदल्या रात्री चौधरी यांच्याकडे २१० पात्र उमेदवारांची यादी पाठविण्यात आली. दुसऱ्या दिवशी बैठक सुरु होण्यापूर्वी काही वेळ आधी आठजणांची नावे त्यांना देण्यात आली. त्यानंतर लगेचच बैठक सुरु झाली आणि मोदी व शहा यांनी ग्यानेशकुमार व सुखबीरसिंग संधू या दोघांची नावे निश्चित करण्यात आल्याची माहिती चौधरी यांना दिली. चौधरी यांनी या कार्यपध्दतीला तीव्र आक्षेप घेतला. पात्र व्यक्तींची पार्श्वभूमि समितीच्या एका सदस्याला न देता परस्पर त्यांची निवड करणे अनुचित आहे असे सांगून त्यांनी या नेमणुकांना विरोध दर्शविला. परंतु बहुमताच्या तत्वावर समितीचे काम चालत असल्याने आणि मोदी व शहा समितीत असल्याने त्यांनी ज्यांची निवड केली त्यांच्यावर शिक्कामोर्तब होणे अपेक्षितच होते. त्यामुळे हा निव्वळ फार्स केला जात आहे. या पद्धतीने निवडणूक आयोगाची रचना आणि नेमणुका होत असतील तर त्या आयोगाकडून निःपक्ष आणि खुल्या निवडणुका घेतल्या जातील अशी अपेक्षा तरी कशी करायची असा प्रश्न आहे. थोडक्यात एवढेच म्हणता येईल की या सरकारला म्हणजेच सत्ताधाऱ्यांना लोकशाही प्रणालीतील स्वायत्त संस्थांचे वावडे आहे आणि त्यांचे अस्तित्वही त्यांना खुपत आहे. त्यामुळेच या संस्थांना सरकारचे गुलाम बनविण्याची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. न्यायसंस्थेने सरकारच्या या दबावाला भीक न घालण्याचे धोरण गेल्या काही काळात अंगिकारलेले असल्याने आता या सरकारचे हस्तक, दलाल न्यायसंस्थेच्या मागे पडले आहेत. त्यांनी न्यायसंस्थेचा पिच्छा पुरविण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी त्यांनी सहाशे वकीलांच्या एका पत्राने सुरुवात केली आहे. उपराष्ट्रपति व पंतप्रधानांसारख्या उच्चपदःस्थांनी त्यास पाठिंबा देऊन सरकारच्या मनातील भावना प्रकट केल्या आहेत. आता न्यायसंस्थेवर या सत्ताधाऱ्यांचा घाव कधी व कसा पडेल हे पहावे लागेल. यासाठीच असे सत्ताधारी सत्तेत येणे देशाला परवडणारे नाही. या देशात न्याययंत्रणा, निवडणूक आयोग, संसद यासारख्या सर्वोच्च लोकशाही संस्था स्वायत्त व स्वतंत्र आणि सत्ताधाऱ्यांपासून स्वतंत्र राहिल्या नाहीत तर त्याची किंमत देशाला म्हणजेच जनतेला मोजावी लागेल. म्हणूनच अशा लोकशाहीविरोधी मनोवृत्तीला सत्तेपासून दूर ठेवण्याची वेळ आली आहे.

बारामतीच्या व्यापारी घटकांनी त्यांचा कार्यक्रम रद्द केला. पण, एक प्रकारची चिंता त्यांच्या मनामध्ये होती आणि त्या चिंतेपोटी आपण असा कार्यक्रम न घेतलेला बरा ही स्थिती त्यांची असेल. महाराष्ट्रातल्या व्यापारी घटकांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मी २-३ दिवस या क्षेत्रामध्ये घालवलेले आहे. त्यामुळे, हे प्रश्न सोडवून दिले तर त्यातून देशाची अर्थव्यवस्था मजबूत करायची असेल तर व्यापाराकडे दुर्लक्ष देऊन चालत नाही. आणि म्हणून मी ही भूमिका सतत घेतली. आणि मला गंमत वाटली की, बारामतीच्याच व्यापाऱ्यांनी या संदर्भातील मीटिंग घेणे त्यांना शक्य नाही हे मला कळवले. गेल्या ५० वर्षात मला महाराष्ट्रात असे कोणी कळवले नव्हते. लोक घाबरलेले असतात. स्वतःचे मत मांडायला घाबरू शकतात, मी समजू शकतो. पण, दुसऱ्याची मते ऐकून घ्यायला देखील घाबरतात. हे चित्र बारामतीमध्ये पाहायला मिळाले.

आम्ही बघतो देशाच्या संसदेमध्ये आणि सरकारमध्ये काय चाललेले आहे. काँग्रेस पक्ष, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्ष, माझ्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अन्य काही घटक पक्ष त्यांची मते आहेत. या सर्व गोष्टी घडून आणण्यासाठी आम्ही का खबरदारी घेतली त्याचे महत्त्वाचे कारण, आम्हाला या देशाच्या संविधानाच्या रक्षणासंदर्भातील संबंधीची चिंता वाटते. तुम्ही आजचं वर्तमानपत्र बघितले असेल, त्यामध्ये एक बातमी आहे. कर्नाटकामध्ये भारतीय जनता पार्टीच्या एका खासदाराने जे मंत्री होते, त्यांचं नाव श्री. हेगडे. त्यांनी प्रचार सभेत भाषण करताना असे सांगितलं की, 'या देशाच्या संविधानामध्ये बदल करण्यासाठी आम्हाला शक्ती द्या.' याचा अर्थ काय ? तुम्ही देशाच्या संविधानामध्ये बदल करण्याचा विचार करत आहात ?

आज या देशाच्या आजूबाजूचे जे देश आहेत. त्या देशांमध्ये मला कधी ना कधीतरी कामानिमित्त जाण्याची संधी मिळाली. चीनमध्ये त्यांच्या राष्ट्रपतींशी काही वेळा राजकीय कामांसाठी जाण्याची मला संधी मिळाली. पाकिस्तान सारख्या देशांमध्ये तिथल्या राष्ट्रप्रमुखांसंदर्भात विचार विनिमय करण्याची संधी मला मिळाली. बांग्लादेश मधील राष्ट्रप्रमुखासंदर्भात चर्चा करण्याची संधी मला मिळाली. या सर्व देशांमध्ये कधी ना कधीतरी लोकशाहीचे राज्य असताना सुद्धा लष्कराने पुढाकार घेतला. किंवा अन्य संस्थेने पुढाकार घेतला. आणि तेथील लोकांची संख्या उद्ध्वस्त केली हे चित्र आपण पाहिलेले आहे. आणि त्यामुळे आपल्या आजूबाजूला असे सर्व घडत आहे. अशा पार्श्वभूमीवर आज ज्यांच्या हातात सत्ता आहे. त्या संविधानाच्या संबंधित या पद्धतीने वर्तणूक करतात, याचा अर्थ या निवडणुकीकडे अतिशय गांभीर्याने बघण्याची गरज



आहे. या स्थितीत जो कोणी संविधानाला धक्का देण्याचा प्रयत्न करत असेल त्याच्यासाठी आणि त्याच्या विचारांसाठी, त्या संघटनेसाठी भले कितीही किंमत मोजावी लागली. पण, ते होऊ द्यायचे नाही. हा निकाल आम्ही सगळ्यांनी घेतला आणि त्या दिशेने वाटचाल करत आहोत.

आज महाराष्ट्रामध्ये काही वेगळे घडत आहे असे दिसते. संसद ही या देशाची संस्था आहे आणि अलीकडच्या काळात आम्ही हे बघत आहोत की, १० वर्षामध्ये त्या संसदेचे महत्त्व कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. उदाहरण द्यायचे झाले तर, पार्लमेंटचे सेशन आता १ महिन्यापूर्वी संपले. या सबंध १ महिन्याच्या सेशनमध्ये देशाचे प्रधानमंत्री पार्लमेंटमध्ये क्वचितच आले. अमित शहा यांनी २८ दिवसात पार्लमेंटचे कधी तोंड देखील पाहिले नाही. अनेक असे प्रसंग आहेत. काही घटकांची मनस्थिती अशी आहे. त्यांची विचारधारा अशी आहे की, संसदेला काय महत्त्व द्यायचे? कशासाठी महत्त्व द्यायचे?

प्रचंड बहुमताच्या जोरावर आपल्याला हवे असेल ते आपण करू शकतो, तर संसद कशाला हवी.

दिल्लीमध्ये तुम्ही जर कोणी गेला असाल, तर नवीन संसद बांधलेली आहे. जुनी संसद तुम्हाला आठवत असेल, तर माझ्यासारख्या लोकांनी अनेक वर्ष जुन्या संसदेत घालवले. त्यामुळे, आमची एक बांधिलकी त्या वास्तुशी आहे. बांधिलकी त्या वास्तुतून तयार झालेल्या हजारो निर्णयाशी आहे. आता नवीन संसद झाले. जी जुनी संसद होती. त्याच्या एका बाजूला राज्यसभा, एका बाजूला लोकसभा आणि मध्ये सेंट्रल हॉल. सेंट्रल हॉल अशी जागा आहे की दोन्ही सभागृहातले लोक एकत्र येऊन तिथे बसू शकतात. राष्ट्रपतींचे भाषण त्या ठिकाणी होते. विचारविनिमय करण्याची सर्व सदस्यांना संधी मिळते, मग तो कोणत्याही पक्षाचा असो. हे अनेक वर्षांपासून चालू आहे. माझ्यासारख्याला, मी सीनियर स्वतःला म्हणतो, कारण मी संसदेत अनेक वर्ष आहे. माझ्या बाजूला अनेक पक्षांचे खासदार येऊन बसतात.


पक्ष आमचा कोणताही असो पण अटल बिहारी वाजपेयी जेव्हा बोलायचे तेव्हा आम्ही सर्व एकत्र जाऊन तिथे बसायचो, एकत्रित चर्चा करायचो. नवीन पार्लमेंट झालं. एक गोष्ट मोदी साहेबांनी केली ती म्हणजे, लोकसभा, राज्यसभा यांचे सभासद एकत्रित काही येऊ नये. एकत्रित येऊन विचारविनिमय करण्याचे आमचे जे व्यासपीठ होते ते बंद केले. संसदेतील अंतर इतके ठेवले की, आम्ही एकमेकांना भेटू देखील शकत नाही. ही भूमिका त्यांनी ठरवून केलेली आहे. कारण पार्लमेंट सुरू झाले ते पहिल्यांदा पार्लमेंटमध्ये आले. कदाचित तुम्ही पाहिलं असेल त्यांनी पार्लमेंटच्या दारात साष्टांग नमस्कार




# संविधानाच्या रक्षणासाठी एकजुटीने लढा देऊया

शरद पवार





२२ फेब्रुवारी १९६७ रोजी शरद पवार यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीतील पहिला विजय मिळवला होता. त्यावेळची मतमोजणी दर्शविणारे छायाचित्र.

केला. आम्हाला वाटले ठीक आहे, या पार्लमेंटच्या संदर्भात प्रचंड आदर आणि आस्था या व्यक्तिमत्त्वात आहे. पण नंतरच्या काळात आम्ही बघत आहोत. त्यातील यत्किंचीतही आदर त्यांच्यात नाही. पार्लमेंट हे इन्स्टिट्यूशन आहे. आज या राज्यकर्त्यांकडून या इन्स्टिट्यूशनची प्रतिष्ठा ठेवली जात नाही. आणि हे असेच राहिले तर त्या कर्नाटकातल्या खासदाराने सांगितलं त्याप्रमाणे आम्हाला संविधानात बदल करायचा आहे. तसा बदल करून मूलभूत अधिकारावर संकट येण्याची शक्यता आज नाकारता येत नाही. आणि म्हणूनच आम्ही बसून पुढाकार घेतला की, राजकारणात आमचे मतभेद असतील. शिवसेनेमध्ये आपल्यात मतभेद असतील, आणखीन काँग्रेस आणि त्यांचे मतभेद असतील. पण, आज देशाचे संविधान वाचवायचे आहे. त्यासाठी जागरूक आणि प्रश्नांची मांडणी करण्यासाठी कुवत असलेले हे सभासद निवडून दिले पाहिजे आणि त्यासाठी आज या निवडणुकीला सामोरे जात आहोत.

अनेक ठिकाणी मी बघत आहे. लोकांना बदल हवाय. तो बदल देण्याची कुवत असलेली विचारधारा ही त्या ठिकाणी हवी आहे आणि त्यासाठी विचारधारा द्यायची असेल तर आम्हाला आमची जबाबदारी सोडून चालणार नाही आणि त्यासाठी त्या भावनेने आम्ही या निवडणुकीला सामोरे जात आहोत. काही लोक म्हणतात की वय झालं, अमुक झालं. मी त्या वयाची चिंता कधी करत नाही. कसली वयाची चिंता करायची? लोकांनी माझ्यासारख्या वयाच्या माणसाला काय कमी दिले? वयाच्या २६ व्या वर्षी विधानसभेवर या बारामतीकरांनी बसवले. त्या वेळेची निवडणूक काही सोपी नव्हती. विरोधात एका साखर कारखान्याचे प्रमुख होते आणि मी कॉलेजमधून बाहेर पडलेला विद्यार्थी होतो. पण ती सर्व निवडणूक शिक्षित लोकांनी, तरुणांनी, डॉक्टर आणि वकिलांनी हातामध्ये घेतली. त्या काळामध्ये करंदीकर नावाचे एक चांगले वकील होते. ते नुसते वकील नव्हते तर समाजामध्ये त्यांची एक प्रतिष्ठा होती. निवडणुकीला मी उभा राहिलो. करंदीकर यांना आम्ही आप्पा म्हणायचो आणि आप्पांनी मला सांगितले की, तुझ्या निवडणुकीच्या प्रचारासंबंधीची सर्व जबाबदारी मी घेतो आणि त्यांनी ती जबाबदारी घेतली. लोकांनी पाठिंबा दिला आणि त्यावेळी, निवडणुकीमध्ये १७ हजार मतांनी मी विजयी झालो. तेव्हापासून आजपर्यंत एक दिवसाची ही सुट्टी मला कोणी दिली नाही. खरंतर शेतीमध्ये काही लोक काम करतात. तुमच्या शेतीमध्ये काम करणाऱ्या लोकांना तुम्ही सुट्टी देतात. पण, मला कधी कोणी सुट्टी दिली नाही. आजपर्यंत दिली नाही. पण यामुळे, एक गोष्ट आहे की, लोकांचा विश्वास आहे. लोकांचा सन्मान आहे आणि त्या सन्मानाने आणि विश्वासाने समाजासाठी जे जे काही करता येईल ते करण्यासंदर्भातील



बारामती कृषि विकास प्रतिष्ठान

जबाबदारी ही लोकप्रतिनिधींची जबाबदारी आहे आणि त्या भावनेने आम्ही सर्व एकत्रित काम करत आलो. अनेक संस्था पाहायला मिळतात. आज हे साहेब विद्या प्रतिष्ठानचे काम सांभाळतात. आम्ही अभिमानाने सांगू इच्छितो की, उत्तम संस्था सर्वांनी मिळून उभी केली. निश्चितपणाने हेही सांगू शकतो की, कुठेही प्रवेशाला देणगी दिली नाही. फर्स्ट कम फर्स्ट कॅंडिडेट प्रवेशाने आला तर त्याला त्या ठिकाणी संधी मिळते. आज अशा संस्था अनेक सहकारी चालवत आहेत.

शेतीच्या संदर्भात आम्ही लोकांनी १९७१ साली कृषी विकास संस्था उभी केली. आज देशामध्ये यासंबंधीतील संस्थांच्या शाखा आहेत आणि कौन्सिल फॉर इंडिया एग्रीकल्चर आयएआरआय देशातली सर्वात मोठी कृषी क्षेत्रातल्या संबंधितीतील शास्त्रज्ञांची मोठे संस्था आहे. त्या संस्थेने देशातल्या अशा संस्थेचा निष्कर्ष काढला त्यामध्ये बारामतीची संस्था ही सबंध हिंदुस्थानात क्रमांक दोनवर आहे. त्यासाठी आपण काम करतो. या अशा अनेक संस्था आपण चालवतो. हे आपले यश आहे. सभा चालू होण्यापूर्वी मी ऑफिसमध्ये बसलो. ऑफिस पण चांगलं आहे. मी विचारलं हे ऑफिस कोणाचे आहे? ते म्हणाले तुमचं. नंतर लक्षात आलं, या संस्थेचा अध्यक्ष मी आहे. संस्था उभारण्यात देखील मी कष्ट केले होते. पण, जे कोणी चांगले लोक यायचे त्यांच्यावर जबाबदारी टाकायची. संकट आलं, अडचण आली तर त्यांच्याशी सुसंवाद ठेवायचा आणि त्यामुळे अशा अनेक पद्धतीने संस्था चालू असायच्या. पण, ही जबाबदारी आपण काम करून दुसऱ्यावर द्यायची याचा मला धक्का बसला. सन्मानाने अनेक प्रकारच्या ज्या जबाबदाऱ्या आहेत त्या कुणीतरी बघाव्या हा दृष्टिकोन मी अलीकडच्या काळात स्वीकारलेला होता.

## पार्लमेंटमधील सुप्रियाची कामगिरी लक्षवेधी

मला एका गोष्टीचा आनंद आहे की, माझी मुलगी म्हणून नव्हे, पण सुप्रियाने पार्लमेंटमध्ये प्रवेश केल्यानंतर काही खासदार असे आहेत, की जे ११ वाजता पार्लमेंट मध्ये जातात आणि ते ६ वाजेपर्यंत तिथून निघतात. मी त्यातला नाही आहे. मी शाळा कॉलेजमध्ये जसे तास बुडवायचो, तशी सवय मला होती आणि त्यामुळे, मी काही ११ ते ६ बसत नाही. मला आस्था असलेल्या विषयांसंदर्भात मी पूर्णपणे हजर राहतो. पण, सुप्रियाचे असे आहे की, ती ११ ते ६ बसलेली असते. आणि म्हणून पार्लमेंट मध्ये नित्याने येणारे आणि जास्तीत जास्त हजेरी लावणारे, जास्तीत जास्त प्रश्न उपस्थित करणारे, बिलावर भाष्य करणारे भाष्य करणारे जे सदस्य आहेत, त्या ५८८ सदस्यांमध्ये पहिल्या २ मध्ये सुप्रियाचे नाव आवर्जून घेतले जाते. आणि म्हणून काम करण्याच्या संदर्भातील संसदीय कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन त्या पद्धतीची भूमिका संसदेत घेण्याची आज आवश्यकता आहे.

पार्लमेंटमधील भाषणे तुम्ही पाहिली आणि त्यातील

सुप्रियाची भाषणे जर पाहिलीत, तर तुमच्या लक्षात येईल कोणत्याही गोष्टीवर सखोल अभ्यास करून व्यवस्थित मांडणी करायची आणि हे सर्व करत असताना व्यक्तिगत पातळीवर अशा प्रकारचे सूत्र त्यांनी घेऊन त्या ठिकाणी ते काम करतात. आणि त्यामुळे अशा व्यक्तीमत्वाला आपण विजयी करावे. या जे न्यायाधीश होते त्यांना काढून टाकले. सुप्रीम कोर्टाच्या न्यायधीशांना केंद्र सरकार एखाद्या समितीतून काढतात, ही संपूर्ण न्यायसंस्थेची बेइज्जत आहे, आणि त्याविरुद्ध निश्चितपणाने आवाज उठवला पाहिजे. माझा स्वतःचा अनुभव आहे. त्या काळामध्ये वकिलांचे जे रिक्रुटमेंट होते ती पद्धत



संसदेत सुप्रिया सुळे बोलताना सारे सभागृह कान देवून ऐकत असते.

संदर्भातील आग्रह आज आम्ही लोकांनी करण्याचे ठरवलेले आहे.

## वकिलांकडून देशाला दिशा देण्याचं काम

देशामध्ये तुम्ही ज्या क्षेत्रात काम करतात. त्या क्षेत्रातील घटकांनी देशातल्या अनेक संकटाच्या काळामध्ये अत्यंत मोलाची कामगिरी केली. देशातल्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये वकिलांचे काम प्रचंड होते. प्रत्येक वेळी देशाला एक दिशा देण्याचे काम तुम्ही लोकांनी केलेले आहे. सद्य परिस्थितीत या सगळ्या घटनांची जाण असलेल्यांनी शांत बसून चालणार नाही. त्यामुळे, तुमची जी काही भूमिका असेल ती संसद आणि संविधान याची प्रतिष्ठा राखण्यासाठी जे जे काही करता येईल ते तुम्ही अवश्य केले पाहिजे आणि त्यासाठी, ही निवडणूक देशाच्या दृष्टीने अत्यंत गरजेची आहे. मी पक्षाचा विचार करत नाही. आपण आपले मत विचार परिवर्तनासाठी सुरक्षित ठेवून आपली उपस्थिती या मतदानाच्या कामासाठी द्यावी आणि आज देशासमोरची आव्हानं आहे त्याला तोंड देण्यासाठीची शक्ती आहे त्याला सामोरे जावे.

कोलकाताच्या न्यायाधीशांनी दोन दिवसांपूर्वी, तिथल्या ज्या मुख्यमंत्री आहेत ममता बॅनर्जी त्यांच्या प्रत्येक निर्णयात त्यांनी उत्तम निर्णय दिला. इलेक्शन कमिशन संदर्भातला प्रश्न आला, जो प्रश्न आला किंवा तिथली जागा भरायची आहे त्या संदर्भातील जी नियमावली होती त्या नियमावलीत बदल केला. ती बदलली कशी तर त्यामध्ये सुप्रीम कोर्टाचे

वेगळी होती. तेव्हा मुख्यमंत्री आणि चिफ जस्टीस निकाल घ्यायचे. मी स्वतः न्यायाधीशांबरोबर बसून निर्णय घेण्यामध्ये सहभागी झालो. आणि मी अभिमानाने सांगतो, मी असे अनेक निर्णय घेतले, एकाही निर्णयांमध्ये आमच्यात कधी दुमत झाले नाही. प्रत्येक निर्णय हा एकमताने झालेला आहे. आणि आज असे महत्त्वाचे निर्णय घेण्यासंदर्भात जी यंत्रणा आहे त्यामधून चीफ जस्टिसला काढून टाकायचे. फक्त प्राईम मिनिस्टर आणि होम मिनिस्टर यांच्या खात्यामध्ये सबंध नियुक्ती करण्याचा अधिकार द्यायचा. माझ्या मते हा संसदीय लोकशाहीच्या



सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड हे सपत्नीक राष्ट्रध्वजाला अभिवादन करताना

विरोधात कारभार चालू आहे आणि म्हणून या सर्व प्रश्नाकडे पाहायचे असेल तर गांभीर्याने पाहिले पाहिजे. तुमच्या पुरते वैयक्तिक नसून तुमच्यामध्ये समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची शक्ती आहे. तुम्ही घटक असे आहात की, तुम्ही जनमत तयार करू शकता. लोकांना मार्गदर्शन करू शकतात आणि ती जबाबदारी आणि कर्तव्यावरून तुम्हाला बाजूला जाता येणार नाही. मला यानिमित्ताने तुम्हाला हेच सांगायचे. मला खात्री आहे की, बारामती आणि इथला प्रत्येक घटक राष्ट्रीय गरजेची जी स्थिती निर्माण झालेली आहे त्याची नोंद घेऊन आपण पावलं टाकाल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

## लोकांची साथ मिळाल्याने ५६ वर्षे काम करता आले

कालच देशाचे गृहमंत्री आपल्या राज्यात आले होते आणि त्यांच्या मुंबईच्या भाषणामध्ये त्यांनी सांगितलं की, ५० वर्ष महाराष्ट्रावर शरद पवार बसले. मी त्यांचा आभारी आहे. ५० वर्षे लोकांनी त्या ठिकाणी मला निवडून दिले हे त्यांनी मान्य केले. आज यंदाच्या वर्षी महाराष्ट्राच्या विधिमंडळात जाऊन पहिल्यांदा आमदारांना निवडून देऊन, नंतर खासदार, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, राज्यसभा; हा सर्व काळ जर पाहिला, तर तो ५६ वर्षे आहे आणि आज देशाच्या पार्लमेंटमध्ये एक माणूस सतत ५६ वर्ष कुठे ना कुठेतरी लोकांच्या कामात आहे असे चित्र नाही. आणि ते चित्र माझ्यामध्ये तुम्ही लोकांनी तयार केले. तुम्हा लोकांची साथ होती.

लोणावळा शहर हे गांधी नेहरूंच्या विचारांचे शहर होते. आणि मावळ तालुक्यात एका बाजूने गांधी नेहरूंचा विचार आणि दुसऱ्या बाजूने जनसंघाचा विचार. आधी सुरुवातीच्या काळामध्ये रामभाऊ म्हळगी देखील येथे आले होते. अनेक लोक जनसंघाच्या विचारांचे या तालुक्यात होते. पुणे जिल्ह्यामध्ये दुसरा कोणताही असा तालुका नव्हता की, जिथे काँग्रेसची शक्ती झाली आणि जनसंघाची शक्ती झाली आणि हे चित्र बदलायचा निर्धार आम्ही लोकांनी केला. त्यामध्ये अनेक तरुण सहकारी होते. तुम्हा लोकांना काही लोक माहिती असतील. जगन्नाथराव हे आमच्या विधानसभेमध्ये होते. असे अनेक लोक होते. ज्यांच्या सामुदायिक कष्टातून हा तालुका, मतदार संघ भाजपाकडून काढला गेला आणि गांधी नेहरूंच्या विचाराला आपण शक्ती द्यायला सुरूवात केली.

महाराष्ट्रामध्ये एक वेगळी स्थिती निर्माण झाली. आणि त्यामधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना आम्ही लोकांनी केली. ही स्थापना करत असताना विचारधारा ही बदलली नाही. विचारधारा ही गांधी आणि नेहरूंचीच. आज देशाची सत्ता ज्यांच्या हातामध्ये आहे ते गांधींचे नाव घेतात आणि जवाहरलाल नेहरूंना शिव्या घालतात. हा देश स्वातंत्र्याच्या पूर्व काळामध्ये स्वातंत्र्य देण्यासाठी ज्यांनी कष्ट केले, ज्यांनी आयुष्याचा उमेदीचा काळ इंग्रजांच्या गुलामीमध्ये घालवला. त्यांनी गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले, सुभाषबाबूंचे नेतृत्व स्वीकारले, तसेच जवाहरलाल नेहरू यांचे नेतृत्व आणि



योगदान या देशाच्या स्वातंत्र्यासाठी होते. आणि देश स्वतंत्र करण्यासाठी ज्यांनी कष्ट केले, पुढाकार केला त्याची नोंद ही जाणकारांनी घेतलेली आहे. आणि देशाचे प्रधानमंत्री आज सर्वात जास्त टीका ही जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या विचारांना करत असतात. मोठी गंमतीची गोष्ट आहे.

## जनतेच्या पैशाने स्वतःची प्रसिद्धी

आज आपण जवळून बघतो. देशाचे प्रधानमंत्री प्रत्येक दिवशी एक जरी वृत्तपेपर पाहिला, तर त्याचं पूर्ण पान त्यांचीच जाहिरात आहे की नाही? रोज जाहिरात आहे. आणि त्या जाहिरातींमध्ये मोदींचे गुणगान आणि आणखीन काय काय; शेवटी ही जाहिरात कुठून आणि कुणाच्या खर्चाने, कुणाच्या पैशाने दिली जाते याचा विचार केला तर, या देशातल्या जनतेच्या पैशाने आपली प्रसिद्धी ही त्या ठिकाणी केली जाते. आणि हे गृहस्थ देशाच्या जनतेला आज गॅरंटी द्यायला निघालेले आहेत. कसली गॅरंटी?

आत्महत्या करण्याचे दिवस मोदींच्या कालखंडामध्ये आले, ही गोष्ट या देशाला शोभणारी नाहीये. आज शेतकरी पुन्हा आंदोलन करण्यासाठी त्या ठिकाणी रस्त्यावर आहे आणि म्हणून बळीराजाला आज हे दिवस पहावे लागले. त्यांना सत्तेवर बसायचा अधिकार नाही, हे सांगायची वेळ आज या ठिकाणी आलेली आहे. प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, आमच्या हातामध्ये सत्ता द्या. आम्ही देशाची बेकारी घालवतो. आज या देशामध्ये तरुण मुलांना नोकरी नाही. कोट्यावधींची बेकारी घालवण्यासंबंधीचा तुमचा शब्द, तुमचे आश्वासन हे गेले कुठे? मोठ-मोठी आश्वासने द्यायची. टीकाटिप्पणी करायची. याशिवाय दुसरे काही काम या राज्यकर्त्यांनी केले नाही.

एक साधी पद्धत आहे की, देशाचा प्रधानमंत्री असतो किंवा कोणी मंत्री असतो, तो जर एखाद्या राज्यात गेला आणि ते राज्य जर त्यांच्या विचारांचे नसले तरीही केंद्राचं मंत्रिमंडळ त्या राज्याच्या प्रश्नाची सोडवणूक करणे आणि त्या राज्याच्या निवडून आलेल्या मुख्यमंत्र्यांचा सन्मान करणे हे केंद्राच्या



**ममता बॅनर्जी यांचे चाळीतले हे राहते घर. या खोलीला अटल बिहारी वाजपेयी व प्रणब मुखर्जी यांनी भेट दिली होती**

आम्ही आमच्या सरकारच्या काळात शेतकऱ्यांना कर्जमाफी दिलं आणि त्यांनीही त्यांच्या पिकांचं उत्पादन दुपटीनं वाढवलं. पण आज हे सांगतात की, आम्ही शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करत आहोत. आता १० वर्ष होतील मोदींना सत्तेवर येऊन, पण कधी उत्पन्न दुप्पट वाढले का? एकच गोष्ट वाढली ती म्हणजे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. कष्ट करणारा, काळ्या आईची सेवा करणारा शेतकरी, त्याला त्याच्या मालाची योग्य किंमत मिळत नाही. डोक्यावरचे कर्जाचे ओझे फिटत नाही. घरातल्या थकबाकीमुळे, कर्जबाजारी झाल्यामुळे घरच्या सामानाचा लिलाव निघतो आणि त्यामधून सुटका व्हावी याआधी शेवटी तो शेतकरी बळीराजा आत्महत्येच्या रस्त्यावर जातो. ही शेतकऱ्यांना गॅरंटी दिली. आज बळीराजाला

मंत्र्यांचे आणि प्रधानमंत्र्यांचं काम असते. आज आपण नरेंद्र मोदींचे भाषण बघतो. काल ते बंगालमध्ये होते. बंगालमध्ये भाषणाला सुरुवात केली ती ममता बॅनर्जींवरून. ममता बॅनर्जी कोण? तिथे १० वर्ष मुख्यमंत्री म्हणून निवडून आलेल्या एक भगिनी. अतिशय साधी राहणारी. ममता आणि मी एकत्र काम केले. आम्ही दोघेही केंद्रीय मंत्रिमंडळात एकत्र होतो. त्यांच्या घरी देखील मी कोलकाताला गेलेलो आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल, गेले २५ वर्ष पार्लमेंटमध्ये, ५ वर्ष केंद्रामध्ये मंत्री, १० वर्ष मुख्यमंत्री. त्यांचे घर केवढे आहे माहिती आहे का? १० बाय १० ची खोली; १० बाय १०च्या खोलीत राहणारी एक भगिनी आज त्या राज्याचे नेतृत्व करते. लोक सन्मानाने तिला ३-३, ४-४ वेळेला निवडून देतात. तिच्या हातामध्ये राज्य

देतात. देशाच्या प्रधानमंत्र्यांना अभिमान वाटला पाहिजे की, आमच्या देशातली एक भगिनी एक मोठे राज्य समर्थपणाने चालवते. पण, तिथे जाऊन त्यांच्यावर टीकाटिप्पणी करणे, हे लोकशाहीला विशेषतः संसदीय लोकशाहीच्या चौकटीमध्ये बसत नाही. हे काम त्यांनी त्या ठिकाणी केलेले आहे. अनेक गोष्टी सांगता येतील.

## भ्रष्टाचारी लोकांसाठी भाजपकडे वॉशिंग मशीन

आज भ्रष्टाचार हा देशाचा सर्वोच्च विषय आहे आणि मोदी साहेब त्यावर बोलतात की, आमच्यावर त्यांनी टीका केली. महाराष्ट्रामध्ये ते एकदा आले. दिल्लीमध्ये पार्लमेंटमध्ये एक पुस्तक त्यांनी तयार केले आणि आम्हा सर्वांना दिले. त्या पुस्तकात होते काय? पुस्तकात हे होते की, भाजपाची सत्ता नव्हती त्यावेळेला म्हणजे, आमची सत्ता होती त्या काळात किती चुकीच्या गोष्टी या झाल्या? आणि त्यातील पहिली गोष्ट अशी होती की, महाराष्ट्रामध्ये मुंबईला जवानांसाठी एक

त्यांनी सांगितलं की, महाराष्ट्रामध्ये पाटबंधारे खात्यामध्ये ७० हजार कोटींचा घोटाळा हा झालेला आहे. महाराष्ट्रामध्ये सहकारी बँकेमध्ये घोटाळा झाला. हा आरोप त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर केला. मी जाहीरपणाने सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये असा घोटाळा कोणी केलाच नाही. कुणी केला असेल, तर तुमच्यात हिम्मत आहे तर तुम्ही चौकशी करा. सुप्रीम कोर्टाचा माणूस नेमा. पोलीस खात्याचा माणूस नेमा. आणि त्या मार्फत ही चौकशी होऊ द्या. एकदा समजू द्या, 'दूध का दूध और पानी का पानी'. पण, आता त्यावर ते बोलत नाही. ज्यांच्यावर आरोप केले हे घटक आज कुठे आहेत? याची पाहणी तुम्ही केली पाहिजे. याचा अर्थ असा आहे की, आज भाजपमध्ये एक वॉशिंग मशीन झालेले आहे. वॉशिंग मशीन; कपडे खराब झाले असतील तर मशीन मध्ये टाका, मग बाहेरून स्वच्छ होतील आणि ज्यांच्यावर आरोप झालेले असतील. भ्रष्टाचार असेल तर, भाजपात या आणि स्वच्छ होऊन बसा. आणि त्यांच्या विचारांनी काम करा. आज




हाऊसिंग सोसायटी काढली. तिचे नाव, आदर्श सोसायटी आणि त्या आदर्श हाऊसिंग सोसायटीमध्ये काँग्रेसचे त्या वेळेचे माजी मुख्यमंत्री त्यांचे हात आहेत. त्यांनी जवळच्या नातेवाईकांना तिथे जागा दिल्या आणि सत्तेचा गैरवापर झाला, ते नाव कोणाचे होते ? त्यांचे नाव, अशोक चव्हाण. हा आरोप कुणावर होता तर अशोक चव्हाणांवर होता आणि अशोक चव्हाणांच्या या आरोपावर सातव्या दिवशी अशोक चव्हाण भाजपमध्ये गेले. राजीनामा दिला. १५ व्या दिवशी त्यांना खासदार केले, म्हणजे तुम्ही एका बाजूने आरोप करता आणि दुसऱ्या बाजूने स्वतःच्या पक्षात घेतात.

भोपाळला पंतप्रधानांनी १ वर्षापूर्वी भाषण केले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, तिथे खूप भ्रष्ट लोक आहेत. आणि

या पद्धतीचे राजकारण केले जात आहे आणि म्हणून सत्तेचा एका बाजूने गैरवापर, विरोधकांवर टीका आणि त्या पद्धतीने देश मी चालवणार हे चित्र घेऊन भाजप आणि विशेषतः मोदी साहेब आणि त्यांचे सहकारी देशात काम करत आहेत.

अनेक गोष्टी सांगता येतील. सत्तेचा गैरवापर तर इतका; झारखंड नावाचे एक राज्य आहे. तिथे आदिवासी लोक राहतात. तिथे आदिवासी मुख्यमंत्री होते. त्यावर यांनी आरोप केले आणि आज त्यांना तुरुंगात टाकले. गेल्या आठवड्यामध्ये दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकलं. अरविंद केजरीवाल हा एक चमत्कारिक मुख्यमंत्री आहे. दिल्लीमध्ये त्यांनी जनतेसाठी दवाखाने काढले, जनतेसाठी त्यांनी शाळा काढल्या आणि सबंध हिंदुस्थानातून आदर्श शाळा व दवाखाना कसा




असतो हे बघायला लोक त्या ठिकाणी येतात असं मोठं काम केजरीवाल यांनी केलं. आज तेच केजरीवाल तुरुंगात आहेत, कशासाठी? प्रधानमंत्र्यांच्या काही धोरणावर टिका केली म्हणून. या केजरीवालांनी मागची निवडणूक केली, ८० आमदारांच्या जागा होत्या त्यांच्याकडे. त्यांच्या किती निवडून आल्या माहितीये? ८० मधल्या ७८; फक्त २ जागा त्यावेळी विरोधी पक्षांना मिळाल्या. म्हणजे ९८ टक्के निकाल लोकांनी दिला. एवढा लोकप्रिय मुख्यमंत्री आज तुरुंगात आहेत का? तर प्रधानमंत्र्यांवर टिका करतात. आज सबंध सत्ता विरोधकांना तुरुंगात टाकण्यासाठी वापरली जात आहे. केजरीवालांचे दोन मंत्री तुरुंगात आहेत. ममता बॅनर्जी ज्या बंगालच्या मुख्यमंत्री आहेत, त्यांचे मंत्री तुरुंगात आहेत. अनेक ठिकाणी लोकांचे प्रतिनिधी तुरुंगात टाकून एक प्रकारची दडपशाही या देशात सुरु केलेली आहे. त्यामुळे साहजिकच एक संकटाचं चित्र आज देशामध्ये दिसतंय, हे आपल्याला बदलायचं आहे. ते बदलायचं असेल तर एकजूट असली पाहिजे. माझी खात्री आहे महाराष्ट्रामध्ये उद्धव ठाकरे असतील, मी असेल, काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात असतील, आणखी आमचे नेते असतील, या सगळ्यांना आज एकत्र येऊन राज्याला आणि देशाला पर्याय द्यायला यंत्रणा आपण उभी केली पाहिजे, ही भूमिका आम्ही लोकांनी घेतली आणि ती आम्ही करणार आहोत.

महाराष्ट्रामध्ये अनिल देशमुख नावाचे नागपूरचे राज्याचे गृहमंत्री होते. त्यांच्यावर आरोप केला की, यांनी १०० कोटी पैसे एका शिक्षण संस्थेला घेतले. महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांना त्या ठिकाणी अटक केली. ६ महिने तुरुंगात ठेवले आणि शेवटी कोर्टामध्ये त्यांना सोडण्यात आले. आणि सोडल्यानंतर १०० कोटी वगैरे हे तथ्यच नाही. १ कोटी रुपयांची देणगी कॉलेजची इमारत बांधण्यासाठी चेकने घेतली, हा विषय त्या ठिकाणी निघाला. आज बाळासाहेब ठाकरेंनी शिवसेना स्थापन केली. मराठी माणसाच्या प्रश्नांची मांडणी ते सामना वृत्तपत्रातून करतात. सामनाचे संपादक संजय राऊत हे खासदार आहेत. माझ्या शेजारीच पार्लमेंट मध्ये त्यांची जागा आहे. आणि सामना मधून नरेंद्र मोदींच्या सरकारवर ते टीका टिप्पणी करतात. त्यांनी टीका केली म्हणून त्यांना ४ महिने तुरुंगात टाकले. लोकशाहीमध्ये लिखाणाचे स्वातंत्र्य आहे की नाही ?

## मोदींचे काम लोकशाहीला संकटात नेणारे

अगदी जुन्या काळापासून आपण जर पाहिले तर, जवाहरलाल नेहरू असो, इंदिरा गांधी असो, आणखीन कोणते नेते असो यांच्यावर अनेकांनी टीका केली. त्यांच्या धोरणावर टीका केली. पण, नेत्यांवर टीका केली म्हणून लेखकाला किंवा संपादकाला तुरुंगात टाकले जाते हे या देशात कधी घडले नाही. पण, ते या वेळेच्या राज्यकर्त्यांच्या कालखंडात घडत आहे. आज मोदींचे हे जे सर्व काम चालू आहे या देशातल्या लोकशाहीला ते संकटात नेणारे आहे. आणि देशाची लोकशाही ही संकटात गेली तर सामान्य माणसाचे अधिकार जातील. उद्ध्वस्त होतील. आणि म्हणून २ गोष्टींसाठी जे वाटेल ते झाले तर आपल्याला जागृत राहावे लागेल. आणि ते म्हणजे मूलभूत लोकशाहीचे स्वातंत्र्य आणि या देशाची घटना; तिचे संरक्षण करणे हे तुमचे, माझे, सगळ्यांचेच काम आहे. आणि ते करण्यासाठी आता निवडणुका आलेल्या आहेत. त्या निवडणुकीमध्ये आपल्याला एकत्र राहून विचार करावा लागेल.

## शरद पवार म्हणतात मला

आज महाराष्ट्रामध्ये आम्ही एकत्र बसून प्रयत्न केले. मी स्वतः, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस पक्ष आणि काही मित्र पक्ष आणि सर्वांनी मिळून महाविकास आघाडीची स्थापना केली.



कालच आमची बैठक झाली. येत्या आठवड्यामध्ये आम्ही सगळ्या उमेदवारांची निवड या गोष्टी कायम करू. एकत्र राहून लोकांना पर्याय देऊ. माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे की, आम्हा सगळ्यांच्या वतीने महाराष्ट्र विकास आघाडीचे जे कोणी उमेदवार असतील त्यांच्या पाठीशी तुमची शक्ती उभी करणे ही जबाबदारी तुम्हा सगळ्यांची आहे. आत्ताच बाफना सर सांगत होते इथल्या काही लोकांनी आमदारांनी आजच्या मिटींगला तुम्ही येऊ नये यासाठी काही दमदाटी केली. आणखीन कोणावर टीका केली. आणि म्हणून त्यांना फोन करण्यात आला. ही मोठी गंमतीची गोष्ट आहे. लोकशाहीमध्ये एखाद्या नेत्याची गोष्ट चुकली, तर टीका करायची नाही, जाहीर बोलायचे नाही आणि तसे बोलले तर दमदाटी इथल्या आमदारांनी केली. मला त्यांना सांगायचे आहे, 'बाबा रे तू आमदार कोणामुळे झाला ? तुझ्या सभेला इथे कोण आले होते ? त्या वेळेचा तुझा पक्षाचा अध्यक्ष कोण होता ? फॉर्म भरायला चिन्ह आणि नेत्याची सही लागते ती माझी होती. आणि माझ्या सहीने तू निवडणूक लढलास. आणि तुम्ही आज त्याच पक्षाच्या, त्याच विचारांच्या कार्यकर्त्यांनी जे तुम्हाला निवडून आणण्यासाठी राबले, घाम गाळला, आज त्यांना तुम्ही दमदाटी करतात.' माझी विनंती आहे, एकदा दमदाटी दिली तर बस्स, पुन्हा जर असं काही केले तर, 'शरद पवार म्हणतात मला.'

तुम्ही त्याची काळजी करू नका. मी या रस्त्याने कधी जात नाही. पण, त्या रस्त्याने जाण्याची स्थिती कोणी निर्माण केली तर सोडतही नाही. आज तुम्ही लोकांनी आम्हा सर्वांना आग्रहाने बोलावले. तुमच्याशी बोलायची संवाद साधण्याची संधी मला मिळाली. त्याबद्दल तुम्हा सर्वांचा मी अंत:करणापासून आभारी आहे. आमचे जे तीन पक्ष आहेत. तिघांच्या ज्या खुणा आहेत. ज्याचा उमेदवार येईल त्याचा विचार करा. एक खूण शिवसेनेची मशाल आहे. राष्ट्रवादीची खूण तुतारी वाजवणारा माणूस आहे आणि काँग्रेसचा पंजा आहे. या तिन्ही पैकी ज्याचा उमेदवार इथे असेल त्याच्या पाठीशी शक्ती उभी करा.

## लोकशाही देशाची महत्त्वाची विचारधारा

लोकशाही या देशाची महत्त्वाची विचारधारा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना दिली आणि त्या घटनेनं सामान्य माणसाचे अधिकार हे स्पष्ट झाले. या निवडणुकीचं वैशिष्ट्य हे आहे की, जो अधिकार आपल्याला मिळाला, तो संविधानानं, घटनेनं अधिकार मिळालेला आहे. ज्या देशामध्ये घटनेचा अधिकार आहे, त्याच्यावर पायमल्ली केली जाते, त्या देशामध्ये हुकूमशाही येते. आणि हे आपण भारताच्या आजूबाजूच्या देशामध्ये बघितलं. बांग्लादेशमध्ये मुजीबूर रहेमान तिसरे अध्यक्ष होते त्यांची हत्या केली गेली आणि लष्कराने देश हातात घेतला. पाकिस्तानमध्येही असंच घडलं, लष्कराने देश हातामध्ये घेतला. श्रीलंकेमध्येही असच घडलं तिथेही देश लष्कराने हातामध्ये घेतला. आणि ज्यावेळी देश लष्कर हातात घेतं, त्यावेळी तुमचे माझे सगळे अधिकार


नष्ट होतात आणि ते व्हायचं नसेल, ती स्थिती येऊ द्यायची नसेल तर घटनेचं रक्षण करणं हे तुमचं-माझं कर्तव्य आहे. सुदैवाने डॉ. बाबासाहेबांनी घटनेनं हा आपल्याला अधिकार दिलेला आहे.

## बारामतीकरांची नेहमीच साथ

बारामती आणि हा मतदारसंघ इथं तुम्ही लोकांनी अनेकदा आम्हा लोकांना संधी दिली, शक्ती दिली. लोकांच्यासाठी सत्ता वापरायची असते तो प्रयत्न केला. आता तुम्ही एमआयडीसीचा उल्लेख याठिकाणी केला. काय होतं इथं? शैक्षणिक संस्था नव्हत्या, कॉलेज नव्हतं. मला आठवतंय की, १९५८ साली मी ११ वी पास झालो. इथल्या एम.ई.एस. हायस्कूलमधनं आणि कॉलेजला शिकायचं होतं. बारामतीत कॉलेज नव्हतं. तेव्हा पुण्याच्या कॉमर्स कॉलेजमध्ये जावं लागलं. इथे कॉलेज नव्हतं. आज काय चित्र दिसतंय? एकट्या विद्या प्रतिष्ठानमध्ये ३५ हजार मुलं मुली शिकतात. शारदानगरमध्ये असेच हजारो मुलं मुली शिकतात. माळेगाव कॉलेजमध्ये अशीच हजारो मुलं मुली शिकतात. सोमेश्वरमध्ये अशीच हजारो मुलं मुली शिकतात आणि बारामती हे पुण्याच्या नंतर शैक्षणिक केंद्र बनलं. आणि चांगल्या प्रकारचं केंद्र बनलं. विद्या प्रतिष्ठानची कधी आपण देणगी घेतो का? काही ठिकाणी शैक्षणिक संस्था म्हणजे धंदा झाला आहे. तो धंदा आपण इथे येऊ दिला नाही, आणि चित्र बदललं. लोकांना ही संधी आपण दिली. शैक्षणिक सुविधा दिल्या. हाताला काम पाहिजे, म्हणून एमआयडीसी केली, कारखाने आणले. शक्यतो माझा प्रयत्न हा होता की, इथे कारखाने कसे आणायचे. ते धुरांडे हवेमध्ये पर्यावरणामध्ये काही नुकसान होईल असे शक्यतो कारखाने येऊन द्यायचे नाहीत. मग येऊन द्यायचे काय तर, शेती आणि शेतीमाल याच्यावर प्रक्रिया करणारे हे कारखाने बारामतीत आणायचे. दुधाच्या सोसायट्या आधी काढल्या. दूध जास्त झालं. पुण्याला दूध पाठवत होतो. पण पुण्याला मर्यादा यायला लागल्या. मग त्या दूधावर प्रकिया करण्यासाठी काय करता येईल, दूधाची पावडर तयार करायला लागलो. पावडर करताना पावडरचं काय करायचं, मग चॉकलेटं तयार करणारी फेरेरो रोशर सारखी कंपनी आली. त्या पावडरपासून चॉकलेट केले.




आज तुम्ही जर मुंबईच्या विमानतळावर गेलात, परदेशातून लोकं येतात आणि त्यांच्या हातात त्यांनी काही खरेदी केलेली पार्सल हातात असतात. आणि मी अनेकदा बघतो. इंग्लंडला जाऊन, सिंगापूरला जाऊन, दुबईला जाऊन लोकांनी जे मुलांसाठी चॉकलेट खरेदी केलेले असते ते चॉकलेट बारामतीचं आहे. आणि हे परदेशातून लोक खरेदी करतात. आपला माल, तुमचे कष्ट, त्यांनी तयार झालेला माल परदेशात जातो आणि लोकांना वाटतं फॉरेनचा माल आहे. आणि



बारामती येथील चॉकलेट कारखाना


बारामतीचे विद्या प्रतिष्ठान याची स्थापना शरद पवार यांनी केली.

तो फॉरेनचा माल ते गृहस्थ खरेदी करतात. आणि इथे आनंदाने याठिकाणी त्याचा आस्वाद घेतात. अशा अनेक कंपन्या काढल्या. पिआज्योसारखी कंपनी काढली.

आपला सगळा भाग कमी पावसाचा आहे, दुष्काळी आहे. जिथे पाणी आहे तिथे शेती आहे. त्याकाळात इंग्रजांनी भाटघर धरण बांधलं, आणि निरा डावा आणि निरा उजवा कालवा झाला. त्यामुळे पाणी येतं तिथे ऊस होतो. पहिल्यांदा जेजुरी लागतं, तिथे कारखाने काढले; त्याच्या आधी सासवडला काढले; जेजुरीवरून बारामतीत आलो, तिथं एमआयडीसी काढली. पाटसमधून यायला निघाल्यावर कुरकुंभ एमआयडीसी काढली. इंदापूरमध्ये आणि इंदापूरच्या पलीकडे एमआयडीसी काढली. आणि पुण्यातून साताऱ्याकडे जाताना शिरवळ या दुष्काळी ठिकाणी सुध्दा कारखाने काढले आणि हजारो लोकांना काम मिळालं, याचा परिणाम घरामध्ये बदल झाला.

बारामतीतून मी विधानसभेला आमदारकीसाठी उभा राहिलो. त्यावेळेला अनेक गावांमध्ये आम्ही गेलो. लोक स्वागत करायचे. त्यावेळेला खुर्ची नव्हती. बारदाणा टाकायचे बसायला. तो बसायला खाली असायचा आणि चहा द्यायचे. चहा द्यायचे तो पितळीतनं! गरम पाणी आणि त्याच्यात गुळाचा खडा आणि ती पितळी द्यायचे. पितळीतनं चहा मी स्वतः प्यायलोय. नंतर निवडून दिलं. काही ना काहीतरी काम सुरु केलं. कारखानदारी वाढवायला सुरुवात केली. सुधारणा झाली. पुढच्या पाच वर्षात पुन्हा निवडणुकीला उभा राहिलो. तर त्या ठिकाणी चहा देताना पितळी गेली, कान तुटलेला कप आला. तो कप असा असायचा, त्याचा कान तुटलेला असायचा. त्याच्यानंतर आणखी तिसऱ्यांदा निवडून आलो. मंत्री झालो, मुख्यमंत्री झालो. तिथे अनेक गोष्टी केल्या. आणि नंतर कुणाच्याही घरामध्ये गेलो तर कपबशी यायला लागली. ती जी मुलगी आमची सून असेल, ती ट्रेमधून कपबशी आणून चहा द्यायला लागली. एखाद दुसरी खुर्ची घरात बसायला लागली. आणि आज जर घरी गेलं तर त्याच्याही पुढे सुधारणा झाली. आज घराचं राहण्याचं वातावरण हे बदललं आहे. आणि त्याची दोन महत्त्वाची कारणं; एक, मुली शिकल्या आणि दुसरी गोष्ट हाताला काम मिळालं. मुली शिकल्या तर घरं सुधारतं. आज घरं पूर्णपणे बदललेली आहेत. फक्त मुलं शिकून चालत नाहीत तर मुली शिकल्या पाहिजेत. आणि जेव्हा मुली शिकतात तेव्हा तुमचं घर सुधारल्याशिवाय राहत नाही आणि म्हणून बारामतीमध्ये मुलींच्या शिक्षणासाठी अधिक लक्ष दिलं गेलं. मुलींच्या शिक्षणाला बारामतीत आधार आहे. गुंडगिरी होऊन देत नाही, मुलींचं संरक्षण केलं जातं आणि हाताला काम दिलं जातं. हे परिवर्तन चालू ठेवायचं आहे.

# शरद पवारांनी साताऱ्यात थाटात उडवली कॉलर

**सातारा जिल्हा हा पहिल्यापासून शरद पवार यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा असल्याचे वेळोवेळी दिसून आले आहे. याच साताऱ्यामध्ये पावसात झालेल्या त्यांच्या सभेने इतिहास रचला होता. आता लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी २९ मार्च रोजी साताऱ्याचा दौऱ्यात थाटात कॉलर उडवून एका प्रकारे उदयनराजे भोसले यांना आव्हान दिले. पवारांच्या या कृतीचा व्हिडीओ सध्या चांगलाच चर्चेचा विषय ठरतोय. महायुतीकडून उमेदवारीची साशंकता असल्यामुळे उदयनराजे यांनी तुमची भेट घेतली का अशी विचारणा केली असता उदयनराजे यांनी माझ्याशी संपर्क केलेला नाही. आमचे काहीही बोलणे झालेले नाही, असे पवार यांनी सांगितले. पुढे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी दोन्ही हातांनी थाटात कॉलर उडवली. पवारांनी कॉलर उडवताच पत्रकार परिषदेत एकच हशा पिकला. यावेळी शरद पवार यांनादेखील हसू आवरले नाही. उदयनराजे भोसले हे त्यांच्या अनोख्या स्टाईलमुळे ओळखले जातात. ते भर सभेत, पत्रकार परिषदेत किंवा एखाद्या कार्यक्रमात थाटात कॉलर उडवतात. मात्र याच उदयनराजेंच्या सातारा जिल्ह्यात जाऊन शरद पवारांनी पत्रकार परिषदेत दोन्ही हातांनी कॉलर उडवली. हा व्हिडीओ पाहून उदयनराजेंना पाडण्यासाठी शरद पवारांनी कंबर कसली आहे, असे अनेकजण म्हणत आहेत. शरद पवारांच्या कॉलर उडवण्याच्या या कृतीची सध्या सगळीकडेच चर्चा होत आहे. साताऱ्याच्या मातीत प्रचारसभांचा धुरळा उडायचा अद्याप बाकी आहे. त्याआधीच पवारांनी थेट कॉलर उडविल्यामुळे साताऱ्याची निवडणूक रंगतदार होणार, असे म्हटले जात आहे.**



## आज सत्तेची वाटचाल हुकूमशाहीच्या दिशेने

काही लोकांनी वेगळी भूमिका घेतली. लोकशाहीमध्ये कुणालाही भूमिका घ्यायचा अधिकार आहे. पण एक अट आहे. मी तुम्हाला मत मागितलं, तुम्ही मला मत दिलं, तुम्ही मला निवडून दिलं आणि निवडून दिल्यानंतर मी जे मत ज्या नावाने, ज्या पक्षाने, ज्या कार्यक्रमाने तुमच्याकडे मागितलं, ते नाव, पक्ष, सगळं तुम्ही विसरला. मग तुम्ही लोकांची फसवणूक करता. ही फसवणूक होता कामा नये. राजकारणामध्ये लोकांना जपणूक कशी करणार? त्यासाठी धोरण आखलं पाहिजे. शिक्षणाबद्दलचा विचार असेल, शिक्षणाचं सार्वत्रीकरण व्हायचं असेल तर त्यासाठी शैक्षणिक धोरण आखावं लागतं, शेतीच्या संबंधीचं धोरण आखावं लागतं.

आजचे प्रधानमंत्री काय म्हणतात? आजचे प्रधानमंत्री कर बसवतात, वसूल करतात. त्या वसुलीतून १०० रुपये आले तर त्यातले ६ रुपये खिशात टाकतात आणि सांगतात तुमच्या खिशात मी पैसे टाकले. माझी पैसे टाकायची गॅरंटी आहे. ही गॅरंटी कशी? वसूल करायचे १०० आणि ६ परत द्यायचे.



दिलेला शब्द हा पाळला पाहिजे. लोकांचं भवितव्य हे पाळलं पाहिजे.

आज दुर्दैवाने देशामध्ये जे काही घडतंय ते वेगळं घडतंय. मोदी साहेब प्रधानमंत्री आहेत. त्यांची धोरणं काय? कोणते निर्णय त्यांनी घेतले. सत्ता ही लोकांच्या भल्यासाठी वापरायची असते. आज सत्ता ही हुकूमशाहीच्या रस्त्याला आपण जातो, त्या पध्दतीने वापरली जाते.

धोरण आखण्यासाठी पार्लमेंटमध्ये जायचं असतं. आताच सुप्रियाने सांगितलं की, पार्लमेंटमध्ये आम्ही गेलो. आणि कामगारांचं धोरण याच्यावर चर्चा करायची असेल, त्याच्यात आम्ही सहभागी नाही झालो तर आम्ही कामगारांच्या हिताची १०० वसूल करायची गॅरंटी हे आजचे प्रधानमंत्री म्हणतात. ही सामान्य माणसाच्या दृष्टीने योग्य गोष्ट नाही. हा जो राज्य चालवण्याचा प्रकार आहे तो देशाच्या हिताचा नाही. जिथे हित नाही, तिथे बदल पाहिजे. बदल पाहिजे असेल तर लोकसभेची निवडणूक महत्त्वाची आहे, म्हणून निवडणूकीत बटण दाबलं पाहिजे.

## परिवर्तनाची तुतारी वाजवायची आहे

आता यावेळेची खूण ही वेगळी आहे. घड्याळ्याची खूण ही तुम्हाला पाठ होती. आता गंमत झाली. पक्ष, घड्याळ, झेंडा सगळ्याचीच चोरी झाली. बाकी किरकोळ काही नाही, होलसेल चोरी झाली. सगळेच्या सगळे सोडून

गेले. आता सगळ्या देशाला माहीत आहे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणी स्थापन केला? हा पक्ष आपण स्थापन केला. जे घेऊन गेले, त्यांनी मागच्या निवडणुकीमध्ये मतं मागितली. ती कुणाच्या नावाने मागितली? राष्ट्रवादीच्या नावाने, नेत्याच्या नावाने. झेंडा कोणता होता? तोच घड्याळाचा होता. त्यामुळे हे सगळं घेऊन मंडळी गेली. त्यामुळं काही लोक नाराज झाले. मी म्हटलं नाराज व्हायचं नाही. गेले ते गेले! आपण नवीन उभे करू. हा अधिकार लोकांनी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला दिला आहे. नवीन पक्ष काढू. काही



नसताना पक्ष काढला, तर पक्ष नुसता काढला नाही तर राज्य हातामध्ये घेतलं. अनेकांना मंत्री केलं, अनेकांना आमदार केलं, अनेकांना खासदार केलं, अनेकांना केंद्राच्या मंत्रीमंडळात घेतलं. नवनवीन धोरणं घेतली. महिलांसाठी धोरणं केली. कधीही या देशामध्ये महिलांना बापाच्या प्रॉपर्टीमध्ये कायद्याने अधिकार नव्हता, तो दिला. महिलांना अनेक गोष्टीत संधी दिली. त्याचं कारण, घर सुधारलं पाहिजे आणि त्यासाठी सत्ता वापरली गेली. हा निर्णय घेणारा जो पक्ष होता, तो पक्ष चोरीला गेला. तर नवीन उभा करू. एका दिवशी आपल्या घरात सुध्दा चोरी होते, म्हणून आपण घर चालवणं बंद करतो का? पुन्हा एकदा उभं राहू, त्याच पध्दतीनं आम्ही आज हा निकाल घेऊन नवा पक्ष, नवी खूण, नवा झेंडा, कार्यक्रम जुना हा घेऊन पुढे आलेलो आहोत. नेहमीची खूण आहे ती आता गेली, आता तुतारी आली. शिवछत्रपती ज्यावेळेला संघर्षाने जातात त्यावेळेला सन्मानाने लोक त्यांच्या पाठीशी उभे राहतात. पण विजय संपादन करून ज्यावेळेला शिवछत्रपती परत येतात त्यावेळेला दाराशी याच तुतारीने त्यांचं स्वागत होतं. आज महाराष्ट्रात झालेल्या बदलातून महाराष्ट्राच्या सामान्य माणसाच्या जीवनाच्या परिवर्तनाची तुतारी वाजवायची आहे. त्यासाठी ही खूण लक्षात ठेवली पाहिजे. आणि हे काम तुम्ही लोकांनी करावं.

ही निवडणूक अत्यंत महत्वाची निवडणूक आहे. आपण सर्वांनी एकजूट कायम ठेवली. पुढील काळात सुध्दा एकीच्या जोरावर, संघर्षाच्या जोरावर, कष्टाच्या जोरावर आणि या उभ्या केलेल्या कारखानदारीच्या जोरावर आपल्या सगळ्यांचे संसार कसे बदलतील याची काळजी घेऊ आणि ती निश्चित तुम्ही घ्याल हीच खबरदारी याठिकाणी व्यक्त करतो.

## व्यापाऱ्यांच्या अडचणी सोडवू

कुठलाही देश, कुठलेही राज्य, कुठलाही तालुका हा पुढे न्यायचा असेल तर व्यापार वाढला पाहिजे, व्यवहार वाढला पाहिजे. त्यामध्ये दोन भाग आहेत एक मोठा व्यापार करणारे लोक, दुसरे छोटे लोक. आजपर्यंत बारामतीमध्ये व्यापारी संघटना अनेक वर्षे काम करत आहेत. पण त्यामध्ये छोट्या लोकांचा विचार हा कमी होता, ही भूमिका आम्हा लोकांच्या आता लक्षात आली. श्रीयुत सस्ते व श्रीयुत पाटणकर या लोकांनी पुढाकार घेऊन नवी संघटना बांधली. याच्यात लाखात व्यवहार करणारा कोणीही नसे, हजारात व्यवहार करणारे असे. हे छोटे व्यापारी शेवटी आपले कुटुंब चालवतात, गावाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याला हातभार लावतात. म्हणून या छोट्या व्यापाऱ्यांची एक संघटना असावी या दृष्टीने स्वाभिमानी व्यापारी महासंघ ही संस्था आज या ठिकाणी उभी राहिली.

संस्था स्थापन करण्यामध्ये ज्यांनी पुढाकार घेतला त्यांना एकच गोष्ट सांगायची आहे की हे लहान व्यावसायिक आहेत. त्यांच्या अडचणीत अधिक लक्ष घाला, जिथे त्यांच्या अडचणीसंबंधी सोडवायला तुम्हाला काही मर्यादा आल्या तर आम्हा लोकांना कॉन्टॅक्ट करा. आमची शक्ती व पाठिंबा हा छोट्यांच्या पाठीमागे राहील. मला बारामती व सबंध महाराष्ट्राचा छोटा-मोठा उद्योग, व्यापार, हा वाढवायचा आहे. हा वाढवणं याचा अर्थ आर्थिकदृष्ट्या राज्य समृद्धीच्या दिशेने जाणं. ते काम करायचं असेल तर आपल्याला प्रयत्न करावे लागतील. हे संघटन तुम्ही उभं केलं; आता निवडणुकीची प्रक्रिया आहे ती संपल्यानंतर पुन्हा एकदा आपण बसू.




## सरकारला शेतकऱ्याची काडीची चिंता नाही

अनेक गोष्टी, अनेक आश्वासनं या सरकारने आपल्या सर्वांना दिली पण त्याची अंमलबजावणी केली नाही. इंदापूर तालुका शांत विचाराने, एकत्रितपणाने समाजकारण करणारा हा तालुका आहे. मला आठवतंय ५६ वर्षांपूर्वी मी महाराष्ट्राच्या विधानसभेत पहिल्यांदा निवडून आलो. माझ्या आधी दहा वर्ष शंकरराव भाऊ इथून निवडून येत होते १९५२ सालापासून. आम्ही दोघे बरोबर आमदार झालो, नंतर आम्ही दोघे बरोबर मंत्री झालो आणि एक गोष्ट इंदापूरने आम्हाला शिकवली की सत्ता कधी डोक्यात जाऊ द्यायची नाही. शंकरराव भाऊंनी राजकारण केलं पण हवेत कधी ते राहिले नाहीत, सत्ता कधी डोक्यात गेली नाही, नम्रता कधी सोडली नाही, स्वच्छ कारभार कधी सोडला नाही. आणि त्यामुळे साहजिकच त्यांची आठवण, त्यांचे स्मरण आजही तुम्हाला मला सगळ्यांना होते. पण आज मात्र संकटं वेगळी आहेत आणि त्यासाठी एकजुटीची आवश्यकता आहे, प्रश्न खूप आहेत.

आपला सगळा भाग हा जास्तीत जास्त ऊसाची शेती करणारा आहे. कारखानदारी काढली, दोन पैसे मिळतील याची काळजी घेतली, उजनीचं पाणी पाठीमागनं, निरा डावा, उजवा कालवा, त्याची मदत आपल्याला होते. या सगळ्या गोष्टींमुळे या भागामध्ये काही मर्यादित जिराईत भाग सोडला तर बागायत भागाचं क्षेत्र हे दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे साहजिकच उत्पन्न वाढतंय. उत्पन्न वाढून नुसतं चालत नाही, त्याला रास्त किंमत मिळाली पाहिजे. त्यांनी शेतकऱ्याचे उत्पन्न २०२२ पर्यंत आज २४ आहे दुप्पट करण्याचे आश्वासन दिलं, काही घडलं का? तुमचं उत्पन्न दुप्पट झालं? आज २०२४ आहे २०२२ ला होणार होतं. २०२४ आलं तुमचं उत्पन्न वाढलेलं नाही. यावेळी अनेक निकाल असे घेतले ज्याचा उल्लेख त्यांनी केला. कांदा निर्यात बंदी कांद्याचे भाव गडगडले, कांदा उत्पादक रस्त्यावर आला. टोमॅटो, कापूस उत्पादन करणारा शेतकरी तोही हवालदिल झाला आणि या सरकारला त्याची काडीची चिंता नाही.

माझ्याकडे ज्यावेळेला शेती खात्याचं काम होतं आणि आम्ही कांदा परदेशात जायची काळजी घेतली त्याचा परिणाम इथे कांद्याचे भाव वाढले. कांद्याचे भाव ज्यावेळेला वाढले त्यावेळी पार्लमेंटमध्ये मी बघितलं भाजपवाले गळ्यात कांद्याच्या माळा घालून आले पार्लमेंटमध्ये. घोषणा करायला लागले 'शरद पवार होश में आओ, प्याज की किंमत नीचे लाओ' त्यांनी दंगा केला. आमच्या सभापतींनी मला सांगितलं की भाव खाली आणा अशी मागणी आहे, तुम्ही याचा खुलासा करा. मी सांगितलं, कांदा जिरायत शेतकऱ्याचं पीक आहे, वर्षातून एकदा त्याला पीक मिळतं आणि कधीतरी भाव मिळतो, ही स्थिती असताना त्याचा लाभ शेतकरी घेत असेल तर कांद्याचे भाव खाली आणा तुम्ही म्हणता. मी शेती मंत्री आहे तोपर्यंत कांद्याचे भाव खाली येऊ देणार नाही. कुणी काहीही करा. कोणी गळ्यात कांद्याच्या माळा घाला किंवा कौलाच्या माळा घाला, आमचं धोरण बदलणार नाही. कारण काळ्या आईची सेवा करणारा हा इमानदार शेतकरी, त्याचा संसार टिकवायचा असेल तर

त्याच्या घामाची किंमत ही त्याला द्यायलाच पाहिजे आणि ती दिल्याशिवाय गत्यंतर नाही. आजचे सरकार त्याबद्दलचे विचार करत नाही.

साखर आपण बनवतो. देशाची गरज भागवून जादा साखर परदेशात पाठवतो. परदेशात पाठवल्यावर दोन पैसे जादा मिळतात त्यामुळे ऊसाची किंमत देता येते. केंद्र सरकारने सांगितलं की परदेशात पाठवायचं नाही आणि पाठवायचं असेल तर त्यावर कर आणि जीएसटी आम्ही बसवू आणि त्याचा परिणाम आज अनेक कारखान्यांमध्ये, त्यांच्या गोदामांमध्ये हजारो नाही लाखो साखरेची पोती पडली. दिल्लीमध्ये आम्हाला साखर हा त्याठिकाणी पाठवतो. दुसरं काहीतरी करावं लागेल. प्रधानमंत्र्यांनी सांगितलं की साखरेपासून तुम्ही इथेनॉल करा. चांगली कल्पना होती इथेनॉल करायचा, कारखाने टाकले, कारखान्यात नवीन सुविधा केली, इथेनॉलची निर्मिती झाली, इथेनॉल तयार झालं आणि त्याच्यावर बंदी घातली. आता म्हणे पाठवायचं नाही. मोठी गंमत आहे, प्रधानमंत्री सांगतात इथेनॉल करा, प्रधानमंत्री सांगतात कारखान्यांनी नवीन डिस्टिलरी काढली पाहिजेत, प्रधानमंत्री सांगतात याला आमची परवानगी आहे आणि हे सगळं केल्यानंतर त्याच्यावर बंधन घालतात. त्याचा परिणाम त्या कारखान्याच्या डोक्यावर इथेनॉलच्या कारखान्याचं ओझं वाढलं, बँकेचं कर्ज काढलं आणि त्याचा परिणाम आज उसाची किंमत देण्याची ताकद त्याठिकाणी राहिलेली नाही. याचा अर्थ हा आहे की, ज्यांच्या हातात सत्ता आहे, त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांची जाण नाही. त्याचा परिणाम हाच होतो की एका बाजूने महागाई आहे, दुसऱ्या बाजूने बेकारी आहे, तिसऱ्या बाजूने भ्रष्टाचार आहे आणि हे सगळं घडतंय या देशामध्ये हे घालवायचं असेल तर चुकीचे निर्णय जे घेतात त्यांना सत्तेपासून बाजूला करणं हे तुमचं आणि माझं कर्तव्य आहे, ते काम याठिकाणी आज आपण केलं पाहिजे.

## काँग्रेसप्रमाणं तुमचंही अकाऊंट बंद करतील

निवडणुका जवळ आल्या आहेत. हे सरकार निवडणुका नक्की कशा होऊ देतील, याची आज खात्री वाटत नाही. काँग्रेस पक्ष देशाचा महत्वाचा पक्ष, गांधी, नेहरू यांचा पक्ष. आज त्या पक्षाला लोकांसमोर जायचं असेल, लोकांसमोर आपली मांडणी करायची असेल तर त्यासाठी काही गोष्टी छापाव्या लागतात, प्रचार करावा लागतो, सभा घ्याव्या लागतात, त्यासाठी खर्च येतो. तो खर्चच बंद केला आहे. काँग्रेस पक्षाचा बँकेत असलेलं अकाउंट, तेच बंद केलं आणि सबंध त्यांचा व्यवहार बंद करून टाकला. आज काँग्रेस पक्षाचं अकाउंट त्यांनी थांबवलं, उद्या तुम्ही भूमिका घेतली तर तुमचंही खातं ते बंद करतील, आणि दोन पैसे कष्टाने मिळवले तर तो तुमचा वापरायचा अधिकार सुध्दा उद्ध्वस्त करतील. एवढी टोकाची भूमिका आज या राज्यकर्त्यांची होत आहे. म्हणून हा संकटाचा प्रसंग आहे इथे एकत्र झाले पाहिजे, यांचा पराभव झाला पाहिजे आणि ते करण्यासाठी ठिकठिकाणचे आघाडीचे उमेदवार, मग शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादीचा किंवा अन्य सहकाऱ्यांचा असेल, त्यांना विजयी करणं हे तुमचं आणि माझं काम आहे.

सत्ता ही विकासासाठी करायची असते म्हणतात, सत्ता ही अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी खऱ्या अर्थाने करायची असते, आणि त्याचे जे जे घटक आहेत, मग शेती, उद्योग, शिक्षण या प्रत्येक क्षेत्रामध्ये काही ना काही करून लोकांचं जीवन बदलेल कसं याची खबरदारी घेण्याची गरज आहे. नेमक्या या प्रश्नांकडे मोदी साहेबांचं लक्ष नाही. मोदींनी आखलेली धोरणं हिताची नाहीत, आणि जिथे धोरणं हिताची नसतात, त्याठिकाणी बदल करण्याचा निकाल घ्यावा लागतो आणि तो बदल करायचा असेल तर मतदान आणि ती मतदानाची संधी आज तुम्हा सगळ्यांना मिळालेली आहे.

तुम्ही नेहमीच मतदान करता. यावेळेला मतांचा विक्रम करण्याची गरज आहे. यावेळेला त्या मतदान प्रक्रियेमध्ये अडचणी खूप आहेत. एखादा वेगळा विचार घेऊन कुणीतरी आला तर त्याबद्दलचा संघर्ष होऊ शकतो. हा वैचारिक संघर्ष असतो. पण संघर्ष हा कुटुंबातून सुरु झाला, गावातनं सुरु झाला. त्याचे दुष्परिणाम असतात आणि त्यामुळं लोक अस्वस्थ होतात. खरं म्हटलं तरी ही अस्वस्थता मला महाराष्ट्रात व बारामतीमध्ये दिसते, आणखी काही ठिकाणी दिसते. कारण एकप्रकारचा दबाव आहे. दबावानं समाजकारण राजकारण करता येत नाही. तुमच्या प्रश्नाची सुटका ही दबावाने होणार नाही. मत मान्य नसेल तर मान्य नाही सांगा, अमान्य करा. त्याबद्दलचा आवाज उठवा. पण मत मांडायचं नाही, लोकांशी संवाद साधायचा नाही, ही भूमिका योग्य नाही आणि ही भूमिका देशात व महाराष्ट्रात होते. हे देशाच्या आणि संसदीय लोकशाहीच्या दृष्टीनं अत्यंत घातक आहे, त्याला आपण तोंड द्यायचं आहे. बारामती ही कुणाचाही अन्याय सहन करणारी, अत्याचार सहन करणारी राहिलेली नाही. त्यासाठी तुम्हाला एकदा जागं करावं या हेतूने मला तुम्हा व्यापाऱ्यांशी संवाद साधायचा होता. तुम्ही मतदान कराल त्याचा आनंद आहे पण तेवढंच काम नव्हे, आजची देशाची परिस्थिती पाहता जे बदल करायचे आहेत ते लोकांना जाऊन सांगणं आणि लोकांचं जनमत तयार करणं याच्यात सुध्दा तुम्ही पुढाकार घ्यायची गरज आहे. ती तुम्ही घ्यावी एवढीच सूचना या ठिकाणी करतो.

■■■

“ गार मेळाव्याचा मंडप ५ कोटींचा होता. निवडणुकीत आपण एकदा बटन दाबले की, पेट्रोल आणि सिलेंडरचे भाव वाढतात. आजकाल महिलाच मला येऊन सांगतात की, आम्हाला सर्व माहिती आहे. निवडणूक झाली की आमच्या सिलेंडरचे भाव वाढणार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर पेट्रोल आणि डिझेलचे भाव २ रुपयांनी कमी केला. भाव वाढवला तर कंपनीने वाढवला आणि कमी केला तर आम्ही केला. म्हणजेच आपला तो बाळ्या आणि दुसऱ्याच कारटं असे हे प्रशासन आहे.

“ मी अमित शहांचे धन्यवाद मानते कारण त्यांनी यावेळी आमच्यावर कोणतेही भ्रष्टाचाराचे आरोप केले नाहीत. आतापर्यंत त्यांनी ज्यावेळी महाराष्ट्रात दौरा केला आहे. त्यावेळी त्यांनी एनसीपी म्हणजे नॅशनल करप्ट पार्टी म्हटलं आहे. मात्र त्यांनी यावेळी असे कोणतेही आरोप केले नाहीत. आम्ही राजकारणात हिशोब करायला आलो नाही ५५ वर्ष जर महाराष्ट्र जनतेने साहेबांना प्रेम दिलं आहे तर त्यांच्या प्रश्नांचं उत्तर त्यातच आहे. आमच्यावर आता परिवारवादाचे आरोप केले जातात.





भाजपमध्येही अनेक राजकीय परिवार आहेत आणि मी आहेच परिवारवाद.

“ या देशात आणि राज्यात भ्रष्टाचार आणि बेरोजगारी वाढली आहे. आपला देश भ्रष्टाचारमुक्त करायचा आहे.

# बोल सुप्रिया सुळे यांचे...

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा आणि बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार खासदार सुप्रिया सुळे यांनी मार्च महिन्यात राज्यात विविध ठिकाणी केलेली भाषणे आणि प्रसार माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केलेल्या विविध विषयांवरील मतांवर एक दृष्टिक्षेप...**






त्यासोबतच शेतकऱ्यांच्या हमीभावासाठी काम करणार आहोत. एकत्र लढणार आणि जिंकणार आहोत.

" आपल्या आमदाराला सांभाळलं पाहिजे. त्यांना मावळे घालतात तसं चिलखत घालून पाठवलं पाहिजे. त्या विधानभवनामध्ये आजकाल काहीही होतंय. हे अबकी बार हे गोळीबार सरकार आहे. तुम्हाला चालेल का तुमचा आमदार तिकडं जाऊन डोकी फोडतोय.. हे विधानभवन आहे का?,

" शिवसेनेने अनेक वर्षे संघर्ष केला. त्यावेळी आम्ही सत्तेत होतो. मात्र आता आम्ही संघर्ष करण्यास शिकत आहोत. भाजपही भ्रष्ट जुमला पक्ष आहे. निवडणूक जिंकण्यासाठी ते कोणत्याही थराला जातील. साम, दाम, दंड आणि भेद या पैकी कोणत्याही नीतीचा वापर करण्यास तयार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. त्यामुळे वाटते तेवढी ही निवडणूक सोपी नाही. या निवडणुकीकडे केवळ निवडणूक म्हणून पाहता येणार नाही. राज्याची अस्मिता आणि प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व टिकविण्यासाठीची ही लढाई असणार आहे. त्यामुळे निवडणूक जिंकण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करावे लागतील.

" आम्हालाही तिकडे जाता आले असते, मी आणि रोहित दोघेही मंत्री होऊन लाल दिव्याच्या गाडीत आलो असतो, पण तुम्हीच सांगा की मी माझे वडील जो संघर्ष करीत आहेत, त्यांना साथ द्यायची, सत्याच्या बाजूने उभे राहायचे की सत्तेला जवळ करायचे....रोहितने आमची साथ दिली म्हणून त्याच्यामागे ईडी लावली.

" कुणी कुणाचा प्रचार करावा कुणाच्या बाजूने जायचे हा ज्याच्या त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे, आम्ही कोणावरही जबरदस्ती करत नाही, पण आमच्या कार्यकर्त्यांना त्रास द्यायचा प्रयत्न केला तर ती दडपशाही आम्ही खपवून घेणार नाही. आज चौकशीचा ससेमिरा व त्रास देण्याची आमची वेळ आहे पण उद्या तुमच्यावरही ही वेळ येणार आहे हे विसरु नका.

" प्रेमाने मागितल असत तर सगळच प्रेमाने दिल असत, देण्यामध्ये जी मजा आहे ती घेण्यामध्ये नाही... जसा तुमचा एक स्वाभिमान आहे तसा माझाही एक स्वाभिमान

आहे, मी एक स्वाभिमानी मराठी मुलगी आहे, कोणी आदराने प्रेमाने काहीही मागितल तर आपण देणार ही आपली संस्कृती आहे. पण जर दमदाटीने कोणीतरी काढून घेतल तर मग इच्छा असेल तरी देणार नाही.

“ महाराष्ट्राचे महत्व कमी करणाऱ्या अदृश्य शक्तीशी माझी लढाई आहे. केंद्र म्हणजे मोठा भाऊ आहे, राज्यावर म्हणजे छोट्यावर भावावर अन्याय करुन चालणार नाही, एकमेकांची मदत करुनच हा देश पुढे जातो, केंद्र व राज्याने एकमेकांना मदत करुनच पुढे जायचे आहे. मी पांडुरंगाची भक्त आहे, त्या पांडुरंगाच्या मनातच काहीतरी असेल त्यामुळे माझ्या नशीबात तुतारी वाजविणारा माणूस हे शुभ चिन्ह आले. चांगल्या कामाची सुरवात आपण तुतारीने करतो, मला हे चिन्ह मिळण माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे.



“ काँग्रेसची खाती गोठविणे, एजन्सींचा विरोधकांविरुध्द होणारा वापर, एजन्सीचे अधिकारी दबावाखाली, विरोधकांनी काही बोलायचे नाही बोलले तर एकतर तुरुंगात जायचे किंवा भाजपमध्ये प्रवेश करायचा इतकाच विषय या देशात राहिलेला आहे, ही अघोषित आणीबाणीच नाही का? ईडी व सीबीआय यांनी केलेल्या कारवायांपैकी ९५ टक्के फक्त विरोधी पक्षातील नेत्यांवरच झाल्या आहेत, असा एक सरकारी डेटा कालच आला आहे. अरविंद केजरीवालांची अटक दुर्दैवी असून लोकशाहीचा दररोज या देशात खून होतो आहे, स्वातंत्र्य राहिलेच नाही, भाजपकडून अघोषित आणीबाणी आहे. जो विरोधात बोलतो त्यावर कोणती तरी कारवाई केली जाते. जगातली लोकशाही धोक्यात आली आहे. ज्यांच्यावर आरोप झाले त्यांना भाजप प्रवेश देते आहे.

“ रोहित व युगेंद्र पवार गेले काही दिवस प्रचार करत आहेत.ज्या पध्दतीने युगेंद्र प्रथमच माझा प्रचार करत आहे, वारंवार तो बाहेर गेल्यावर शांततेच्या मार्गाने प्रचार करतोय, दर वेळेस त्यालाच कसा घेराव घातला जातो, मला माध्यमातून समजले, त्याला जाब का विचारता, मला जाब विचारा, मला घेराव घाला, मी उत्तर द्यायला सक्षम आहे, आमच्या घरातील मुलांवर ज्या पध्दतीने घेराव घातला जातो हे दुर्दैवी आहे, गुंडागर्दी महाराष्ट्रात चालणार नाही. पोलिसांकडून आपणहून आम्हाला जेव्हा इनपुट आले तेव्हा मला काळजी वाटली, त्या नंतर मी पोलिसांना पत्र दिले.

“ बारामती हा पुरोगामी विचारांचा महाराष्ट्राचा केंद्रबिंदू आहे. कितीही संघर्ष करायला लागला, तरी आम्ही



वेगळा विचार याठिकाणी येऊ देणार नाही. हा छत्रपतींचा व शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा महाराष्ट्र आहे. आम्ही महिलांना कोपऱ्यात टाकू देणार नाही. कितीही कष्ट करावे लागले, तरी संविधान बदलू देणार नाही.

“ काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत दोनशे आमदार, तीनशे खासदार असलेल्या पक्षाला बारामती लोकसभा मतदारसंघामध्ये त्यांच्याकडे एक कार्यकर्ता नसावा, जो माझ्या विरोधात उभा राहू शकतो. त्यांना आमचं घर, पक्ष फोडावा लागतो आणि पवार साहेबांचंच आडनाव वापरावं लागतं. मी पवारांची लेक असले, तरी राजकारणात मी सुळे यांचं नाव लाऊन राजकारण केलंय. पार्लमेंटमध्ये माझी ओळख बारामती लोकसभा मतदारसंघ अशीच आहे.

“ ७० वर्षांत तुम्ही ज्या शाळा-कॉलेजांत शिकलात आणि आज आम्हाला प्रश्न विचारता आहात, ते काम काँग्रेसच्या विचारांनी केलेलं आहे. म्हणून तुम्ही आज आम्हाला प्रश्न विचारत आहात. आजकाल लहान पोरंही बोलतात, की मला दगड मारू नको, नाहीतर तुमच्यामागे ईडी लावतो.

“ इलेक्टोरल बॉण्डसंदर्भात आम्ही सर्वांनी संसदेत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. त्याच इलेक्टोरल बॉण्डबाबतची गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या संदर्भातील जी काही माहिती समोर आली आहे, ती माहिती धक्कादायक आहे. जे काही महत्वाच्या ठराविक इन्फ्रास्ट्रक्चर कंपन्या आहेत, त्यांची नावे या इलेक्टोरल बॉण्डच्या यादीत आहेत. गेमिंग आणि गॅम्बलिंग करत असलेल्या




“ बारामतीकरांनी मला संसदेत भाषण करायला पाठवलं आहे. चहा प्यायला नाही. सरकारी नोकऱ्यांमध्ये कॉन्ट्रॅक्ट व्हायला लागले, तर प्रायव्हेटमध्ये तर कोणीच विचारायला नाही. बारामती मतदारसंघातल्या सर्व एमआयडीसी या २० ते २५ वर्षांपूर्वी आल्या आहेत. बारामतीत नमो महारोजगार मेळावा झाला आणि ४३ हजार नोकऱ्यांचं गाजर दिलं गेलं. या मेळाव्यात दिलेल्या दहा हजार नोकऱ्या कायमस्वरूपी आहेत की नाही माहित नाही. पण, ८ मे पर्यंत नक्की आहेत.

कंपन्यांची नावे सुद्धा या यादीमध्ये आहेत. ज्या कंपनीवर ईडी, सीबीआयच्या केसेस आहेत, अशा कंपनींची नावे देखील या इलेक्टोरल बॉण्डच्या यादीत आहेत. त्यामुळे या प्रकरणाची श्वेतपत्रिका आलीच पाहिजे. इलेक्टोरल बॉण्डची पारदर्शक श्वेतपत्रिका आली पाहिजे. यामध्ये कोणी बॉण्ड घेतले आणि कोणत्या पक्षाला देण्यात आले याचा खुलासा झाला पाहिजे. या सर्व गोष्टींची माहिती या देशातील सर्व नागरिकांना असली पाहिजे.

■■■



# हुकुमशाही आली?

**अनंत बागाईतकर**

अखेर दिल्लीचे मुख्यमंत्री अऱविंद केजरीवाल यांना ईडीकडून अटक करण्यात आली. अटकेसाठी गुन्हा सिध्द व्हावा लागतो. परंतु येथे अजब न्याय चालू आहे. प्रथम अटक करुन चौकशी सुरु केली जात आहे. दिल्लीमधील मद्य परवाना धोरणातील आर्थिक गैरव्यवहाराचा मुख्य आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या धोरणाचा ज्यांना लाभ झाला त्यांच्याकडून केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला कोट्यवधि रुपयांचा लाभ मिळाला आणि त्यांनी ते पैसे गोवा व इतर राज्यातील निवडणुकीसाठी वापरले असे या आरोपाचे स्वरुप आहे. या प्रकरणात सर्वप्रथम दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया, त्यानंतर मंत्री सुरेंद्र जैन, खासदार संजयसिंग यांना ताब्यात घेण्यात आले होते आणि त्यांना जामीन देखील मिळू देण्यात आले नव्हते. सिसोदिया आता जवळपास वर्षाहून अधिक काळ अटकेत आहेत. त्यांच्या पत्नीची प्रकृति बिघडल्यानंतरही त्यांना पत्नीला भेटण्याची संधी देण्यात आली नव्हती. याच मालिकेत अखेरचा घाव अऱविंद केजरीवाल यांच्यावर घालण्यात आला. झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री असलेल्या अरविंद केजरीवाल यांच्यावर ईडीने जाळे फेकले. सर्वसाधारणपणे प्राथमिक चौकशीनंतर संबंधित आरोपीला जामीन मिळतो. कायद्याच्या भाषेत बोलायचे झाल्यास बेल इज ए रुल, जेल इज रेअर. म्हणजे जामीन मिळणे हा नियमानुसार हक्क व अधिकार आहे. तुरुंगवास हा अपवादात्मक परिस्थितीत असतो. आतापर्यंत मोदी सरकारने असंख्य सामाजिक कार्यकर्ते, राजकीय नेते अशांना ईडीच्या माध्यमातून पकडलेले आहे आणि चौकशीचे नाटक करुन दीर्घकाळ तुरुंगवासात ठेवले आहे. एक सामाजिक कार्यकर्ते स्टॅन स्वामी वयोवृध्द होते आणि त्यांची प्रकृती खालावलेली असतानाही त्यांना जामीन देण्याची माणुसकी मोदी राजवटीने दाखवली नव्हती आणि हे वयोवृध्द सामाजिक कार्यकर्ते तुरुंगातच मरण पावले. उदाहरणे अनेक आहेत.


पण ही एकाधिकारशाही वाढतच चालली आहे आणि ती या निवडणुकीच्या द्वारे प्रस्थापित होऊ पहात आहे हे अत्यंत चिंताजनक आहे.

सर्वसाधारणपणे आणि कायद्यानुसार देखील एखाद्या व्यक्तीविरुध्दचे आरोप सिध्द होत नाहीत तोपर्यंत ती व्यक्ती निरपराध मानण्यात येते. परंतु मोदी राजवटीने मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्यात केलेल्या दुरुस्तीनुसार एखाद्या व्यक्तीला या कायद्याच्या तरतुदींखाली अटक करण्यात आल्यानंतर त्या व्यक्तीने आपण निरपराध आहोत हे सिध्द करायचे असते आणि तोपर्यंत त्याला तुरुंगात ठेवण्याचा अधिकार तपास यंत्रणांना मिळतो. याचाच अर्थ कायद्याच्या मूलभूत व्याख्येनुसार आरोप सिध्द करण्याची बाब प्रतिपक्षावर नसून आरोपीने स्वतःचे निरपराधित्व सिध्द करायचे असा हा उलटा न्याय चालू करण्यात आला आहे. त्यामुळेच मोदी राजवटीने ईडी या आर्थिक गुन्हे तपास यंत्रणेचा जो उद्दामपणे गैरवापर सुरु केला आहे त्यामागील कारण हे आहे. मनी लाँडरिंगचे गुन्हे या तपास यंत्रणेच्या अधिकारातही येतात. या प्रकाराची कार्यपध्दती अगदी सोपी आहे. सत्ताधाऱ्यांचे विविध जागी पेरलेले दलाल किंवा हस्तक एखादा आरोप करतात. सत्ताधाऱ्यांना नकोशा झालेल्या नेत्याविरुध्द किंवा कार्यकर्ते किंवा पत्रकारांविरुध्द हे आरोप केले जातात. मग त्या दलालाचे काम संपते आणि ईडी उर्फ एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट उर्फ सक्तवसुली संचालनालय यांचा वरवंटा सुरु होतो. वर म्हटल्याप्रमाणे संबंधित आरोपीवर स्वतःचे निरपराधित्व सिध्द करण्याची जबाबदारी येते आणि तोपर्यंत त्याला तुरुंगाची हवा खावी लागते.

अरविंद केजरीवाल यांच्या प्रकरणात असेच झाले. अरविंद फार्मा नावाच्या औषधनिर्मिती करणाऱ्या कंपनीचा मालक शरदचंद्र रेड्डी याला ९ नोव्हेंबर २०२२ रोजी कथित मद्य परवाना घोटाळ्यासंदर्भात चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले होते. १० नोव्हेंबर रोजी ईडी तर्फे त्यांना अटक करण्यात आली. यानंतर लगेचच यांच्या कंपनीने ५ कोटि रुपयांचे निवडणूक रोखे भाजपच्या नावे खरेदी केले. यानंतर ते जवळपास सहा महिने तुरुंगात राहिले. या काळात त्यांनी वेगवेगळे असे आठ नऊ जबाब दिले होते आणि त्यामध्ये त्यांनी या मद्य परवाना प्रकरणात अरविंद केजरीवाल यांचा संबंध नसल्याचे म्हटलेले नोंदविण्यात आलेले आहे. मात्र यानंतर अचानक रेड्डी यांना साक्षात्कार व्हावा त्याप्रमाणे त्यांनी अरविंद केजरीवाल यांचे या प्रकरणात नाव घेतले (२५ एप्रिल २०२३) आणि मे महिन्यात त्यांची जामीनावर सुटका करण्यात आली. ईडीने त्यांच्या जामीनाला विरोध केला नाही. एवढेच नव्हे तर ते माफीचे साक्षीदारही झाले. यानंतरच्या काळात भाजपची सेवा करण्यासाठी असेल रेड्डी यांनी निवडणूक रोखे खरेदी करुन त्यांच्यावरील उपकाराची फेड केली. जून २०२३ मध्ये त्यांनी भाजपच्या नावे २५ कोटि रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केल्याची नोंद आहे. यानंतरही रेड्डी यांची निवडणूक रोखे म्हणजे बाँड्स खरेदी चालू ठेवली. उपलब्ध नोंदीनुसार त्यांनी सुमारे ५५ कोटि रुपयांचे बाँड्स खरेदी केले आणि त्याचे पैसे






भाजपला मिळालेले आहेत. आता या प्रकरणाचे हे तपशील समजल्यानंतर भारतातले लोक एवढे दुधखुळे तर अजिबात नाहीत की त्यांना यातील भानगड लक्षात येणार नाही. रेड्डी यांनी सुरुवातीला केजरीवाल यांच्या बाजुने दिलेले जबाब आणि अचानक त्यांना साक्षात्कार व्हावा त्याप्रमाणे केजरीवाल यांचे मद्य परवाना प्रकरणात नाव घेण्याची झालेली बुध्दी, मग त्यांची झालेली सुटका, मग ते झालेले माफीचे साक्षीदार आणि या उपकाराची उतराई म्हणून त्यांनी भाजपला ५५ कोटि रुपयांचे रोखे खरेदी करुन दिलेली निवडणूक देणगी ही एक सुसंगत मालिका आहे. म्हणजे हे राज्यकर्ते कंपन्यांना केवळ धाक दाखवून त्यांच्याकडून देणग्या उकळत नाहीत तर त्यांच्याकरवी आणि त्यांच्या तोंडून विरोधी पक्षांच्या नेत्यांची नावे वदवून त्याआधारे विरोधी पक्षांच्या नेत्यांना जेरबंद करण्याचे, त्यांना अनिश्चित काळापर्यंत तुरुंगात डांबण्याचे कारस्थान करीत आहे. ही एक विकृत अशी हुकुमशाही मनोवृत्ती आहे. लोकशाही न मानणारी ही मंडळी आहेत म्हणूनच विरोधी पक्ष मुक्त असलेले राजकारण करण्याची कोडगी भाषा करताना ते आढळतात.

दिल्ली विधानसभा आणि पंजाब विधानसभेत आम आदमी पार्टीने मिळविलेल्या यशाने सत्तापक्ष अस्वस्थ होणे स्वाभाविक आहे. परंतु लोकशाहीत कधी विरोधी पक्षांची जीत होणे आणि सत्तापक्षाची हार होणे या गोष्टी सहज मानल्या जातात. परंतु सुमारबुध्दी आणि हुकुमशाही वृत्तीच्या व्यक्तींना हे सहन होत नाही आणि संधी पाहून विजयी झालेल्या विरोधी पक्षांना धडा शिकविण्याचे खुनशी प्रकार ते करीत राहतात. वर्तमान सत्ताधाऱ्यांनी ईडी हे एक असे हत्यार बनवले आहे की त्याच्या मदतीने ते वाटेल त्या कारवाया करु लागले आहेत. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांनाही अनेक महिने तुरुंगात ठेवण्याचा प्रकार करण्यात आला. परंतु सहा महिन्यांनंतरही त्यांच्याविरुध्दचे आरोपपत्र सादर करण्यासाठी सबळ पुरावे व माहिती उपलब्ध नसल्याचे कोर्टासमोर कबूल करुन त्यांना सोडण्यात आले होते किंबहुना सोडावे लागले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांच्या विरुध्दही हाच प्रकार झाला आणि सबळ पुराव्याअभावी आरोपपत्र दाखल करता न आल्याने त्यांची मुक्तता करण्याचे आदेश न्यायालयाने दिले. ईडीची गैरवापर कसा सुरु आहे याचे ताजे उदाहरण सर्वांच्याच समोर आहे. मुंबईतून महाआघाडीतर्फे अमोल कीर्तीकर यांना उमेदवारी जाहीर झाली. ते निवडून येण्याची भीती राज्यकर्त्यांना वाटली असावी. त्यामुळे सकाळी त्यांची उमेदवारी जाहीर होताच दुपारपर्यंत त्यांच्या नावे ईडीची नोटिस आली. मुंबई महापालिकेच्या कथित खिचडी घोटाळा प्रकरणी त्यांना ही नोटिस देण्यात आली. याच्या उलट प्रफुल्ल पटेल, अशोक चव्हाण, छगन भुजबळ, अजित पवार यांनी भाजपबरोबर हातमिळवणी करताच त्यांच्या विरुध्दच्या विविध प्रकरणांमधून त्यांची सुटका झालेली आढळते. भाजप वॉशिंग मशीन किंवा भाजप धुलाई केंद्राची ही कमाल आहे. आधी स्वतःच कपडे खराब करायचे आणि ते स्वतःकडे आले की (म्हणजेच भाजपला शरण आले की) धुवून स्वच्छ करायचे असे हे कारस्थान आहे.

मनी लाँडरिंग प्रकरणातील सर्वात महत्वाची बाब असते ती त्या प्रकरणातील रक्कम किंवा पैशाच्या मागोव्याची. ज्याला इंग्रजीत मनी ट्रेल असे म्हटले जाते. कोणत्याही गैरव्यवहारात कुणाला तरी लाभ झालेला असतो किंवा वेगळ्या भाषेत सांगायचे झाल्यास कुणाचे तरी खिसे गरम झालेले असतात. मग ते खिसे कुणाचे गरम झाले हे शोधणे म्हणजे मनी ट्रेल किंवा पैशाचा मागोवा घेणे असे म्हटले जाते. अरविंद केजरीवाल यांना जर मद्य परवाना प्रकरणी पैशाचा लाभ झाला असेल तर त्या पैशाचा मागोवा किंवा मागमूस हा कुठेतरी लागला पाहिजे. प्रत्यक्षात एका पैशाचाही मागोवा ईडी घेऊ शकलेले नाही. उलट माफीचा साक्षीदार करण्यात आलेल्या शरदचंद्र रेड्डी याने भाजपच्या नावे ५५ कोटि रुपयांचे बाँड्स खरेदी केल्याचा पुरावाच समोर आला आहे. आता भ्रष्टाचाराचा पैसा कुणाकडे आहे याचे उत्तर भाजप आणि भाजपच्या महान नेत्यांनी देण्याची वेळ आली आहे. वरील तपशीलांवरुन एकच गोष्ट ध्यानात येते ती म्हणजे सत्ताधारी आता आगतिक झाले असावेत आणि विरोधी पक्षांना बदनाम करण्यासाठी ते वाटेल त्या थराला जाण्याच्या तयारीत दिसतात.

या निवडणुकीत खरोखर सत्ताधाऱ्यांनी ताळतंत्र सोडलेला दिसतो. कदाचित सर्वोच्च न्यायालयाने या सरकारने लागू केलेली निवडणूक रोखे (इलेक्टोरल बाँड्स) ही योजना बेकायदेशीर ठरविल्याने ते बहुधा पिसाळलेले असावेत. कारण


ईडीच्या मार्फत उद्योगव्यावसायिकांना धाकदपटशा करणे आणि त्यांच्याकडून देणग्या उकळणे हा यांचा धंदा यामुळे उघडकीस आला आहे. निवडणुकीसाठी देणग्या देखील फक्त आपल्याच पक्षाला मिळाल्या पाहिजेत आणि इतर पक्षांना नुसते काही तुकडे मिळू द्यायचे असा हा दुष्ट आणि कपटी डाव आहे. तो फसल्याने सत्ताधाऱ्यांची चिडचिड होणे स्वाभाविक आहे. परंतु खालच्या दर्ज्याचे सूडबुध्दी राजकारण करण्याची त्यांची खुमखुमी अद्याप जिरलेली नाही. प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसची गळचेपी करण्यासाठी आणि त्या पक्षाला पैशाअभावी निवडणूकच लढता येऊ नये या हेतुने त्यांच्या विरुध्दची सोळा सतरा वर्षांपूर्वीची प्रकरणे उकरुन काढण्यात आली. ज्याला सामान्य भाषेत विवरणपत्र भरणे म्हणतात किंवा इंग्रजीत इन्कमटॅक्स रिटर्न्स भरणे म्हणतात ते रिटर्न्स न भरण्याचे प्रकरण प्राप्तीकर विभागाने हुडकून काढले आणि त्याबद्दल काँग्रेस पक्षाला काही कोटि रुपयांचा दंड ठोठावला आणि त्यांची बँक खाती गोठवली. रिटर्न्स न भरणे हा गंभीर अपराध नाही. तो दंडात्मक आहे आणि कमाल दहा हजार रुपयांचा दंड त्याबद्दल केला जाऊ शकतो. प्राप्तीकर विभागाने काँग्रेसला १८२३ कोटि रुपयांच्या दंडाची नोटिस पाठविलेली आहे आणि १३५ कोटि रुपये काँग्रेसच्या खात्यांमधून परस्पर घेऊनही टाकलेले आहेत. हा दंड १४ लाख रुपयांच्या ठेवींसाठी आहे असे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना दावा केला आहे. एवढेच नव्हे तर भाजपकडून थकित असलेल्या ४६०० कोटि रुपयांच्या येणे रकमेकडे प्राप्तीकर विभाग सोयीस्कर दुर्लक्ष करीत आहे असा आरोपही त्यांनी केला. भाजपच्या बेहिशोबी ४२ कोटि रुपयांच्या ठेवीपोटीच्या दंडाची रक्कम ४६०० कोटि रुपये असल्याचे त्यांनी सांगितले. या ठिकाणी ही बाब लक्षात ठेवली पाहिजे की सर्व राजकीय पक्षांना प्राप्तीकरातून पूर्ण सवलत आहे. परंतु त्यांना लोकप्रतिनिधित्व कायद्यात नमूद केलेल्या मार्गांपेक्षा व्यापारी मार्गाने (म्हणजे ज्यात नफा तोटा असतो अशा) मिळालेल्या पैशावर मात्र कर लागू होतो. मात्र रिटर्न्स भरणे अनिवार्य असते आणि त्यासाठी पक्षाचे बॅलन्सशीट सादर करणेही बंधनकारक आहे. प्राप्तीकर विभागाच्या आधीच्या एका प्रकरणात आलेल्या नोटिशीबद्दल काँग्रेसने प्राप्तीकर विभागाच्या लवादाकडे दाद मागितलेली आहे आणि ते प्रकरण प्रलंबित असतानाही प्राप्तीकर विभागाने परस्पर हे उद्योग केले आहेत. आता या प्रकरणावरुन आरडाओरडा सुरु झाल्यानंतर निवडणुका होईपर्यंत कारवाई थांबविण्यात येत असल्याचा मानभावीपणा करण्यात आला आहे. परंतु प्राप्तीकरविभागाला हे धंदे करायला सांगितले कुणी हा प्रश्न आहे. त्यांच्या बोलवित्या धन्याचाही उलगडा होण्याची गरज आहे.


विरोधी पक्षांना दमदारपणे निवडणूक लढविता येऊ नये यासाठी सत्ताधाऱ्यांकडून ज्या कारवाया केल्या जात आहेत त्याचे हे नमूने आहेत. निवडणुकीआधीच अशी संकटे या पक्षांवर आणून त्यांना ग्रस्त आणि त्रस्त करायचे की निवडणूक लढविणे त्यांना अशक्य व्हावे. ही एक राजकीय विकृती आहे. भारतीय संस्कृतीचे ठेकेदार असलेल्यांना ही विकृती, विकृत मनोवृत्ती शोभनीय नाही. स्वतःला शूरवीर समजणाऱ्यांनी मैदानात खुलेपणाने लढणे अपेक्षित असते. हाती सत्ता आहे म्हणून विरोधी पक्षांवर मागून वार करणे हा भ्याडपणा आहे. याला ५६ इंची छाती म्हणत नाहीत. विरोधी पक्षांना अशा रीतीने त्रस्त करण्याचे उद्योग सरकारी पातळीवरुन सुरु झाल्यानेच दिल्लीच्या रामलीला मैदानात झालेल्या इंडिया आघाडीच्या विराट सभेत सर्व वक्त्यांनी निवडणुका



लढण्यासाठी सर्व राजकीय पक्षांना समान संधी न मिळाल्यास त्याचा सर्व दोष निवडणूक आयोगावर जाईल असा स्पष्ट इशारा दिला. या इशाऱ्यानंतर निवडणूक आयोगामध्येही त्याची दखल घेतली गेल्याची माहिती मिळते. किंबहुना गेल्या काही महिन्यांपासून आणि विशेषतः निवडणूक रोख्यांना न्यायालयाने बेकायदेशीर ठरवून त्यातील माहिती उघडकीस आल्यानंतर या चर्चेने जोर पकडला आहे. कारण या तथाकथित बेकायदेशीर रोख्यांच्या माध्यमातून भाजपला सर्वाधिक म्हणजे ६९०० कोटि रुपयांच्या देणग्या प्राप्त झाल्या आहेत. इतर पक्षांना देणग्या मिळालेल्या असल्या तरी भाजपच्या तुलनेत त्या रकमा सहा सात पटीने कमी आहेत. इतकी तफावत समोर आली आहे. त्यामुळेच साधनसंपत्तीच्या बाबतीत इतर पक्ष भाजपची बरोबरीच करु शकणार नाहीत अशी स्थिती आहे. त्यातूनच निवडणुकीमध्ये सर्व राजकीय पक्षांना समान संधी मिळाली पाहिजे या मागणीने जोर धरला आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करताना या मुद्याचा उल्लेख केला होता. निवडणुका लढण्याची समान संधी सर्वांना आहे आणि त्याला बाधा आणणाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल असे आयोगाने म्हटले होते. आता आयोग स्वतःच्या शब्दांना किती जागतो ते पहावे लागेल. परंतु २०१९ मधील लोकसभा निवडणुकीपूर्वी निवडणूक आयोगाने सर्व तपास यंत्रणांना निवडणुका होईपर्यंत त्यांच्या कारवायांबाबत सबुरी बाळगण्यास सांगितले होते. यावेळी निवडणूक आयोगाने अद्याप त्याबाबत निवेदन केलेले नाही परंतु या तपास यंत्रणांना आस्तेकदम जाण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो अशी अपेक्षा आहे.

या निवडणुकांमध्ये विरोधी पक्षांना प्रचारासाठीही प्रतिबंध करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने मोदी सरकारने लागू केलेली निवडणूक रोखे योजना बेकायदेशीर ठरविली. त्याचबरोबर या रोख्यांद्वारे कोणत्या पक्षाला किती आणि कोणत्या उद्योगपतींकडून देणग्या मिळाल्या याचे तपशीलही सार्वजनिक करण्यात आले. यावरुन या योजनेचा सर्वाधिक लाभ भाजपला झाल्याचे उघडकीस आले. त्याचबरोबर ज्या उद्योगव्यावसायिकांवर ईडी, प्राप्तीकर विभागाची नजर होती त्यांनी भाजपला देणग्या दिल्याचेही उघड झाले. त्यामुळे भाजपचे नेतृत्व अस्वस्थ होणे अपेक्षितच होते. त्यामुळेच या माहितीच्या आधारे त्यांनी भाजपविरुध्द प्रचार करु नये यासाठी सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या कारवाया सुरु केल्या. सर्वप्रथम त्यांनी विरोधी पक्षांच्या जाहिराती माध्यमांमध्ये येऊच शकणार नाहीत आणि प्रसिध्दच होऊ शकणार नाहीत यासाठी माध्यमांच्या मालकांवर दबाव आणण्यास सुरुवात केली. माध्यमांनी काँग्रेसच्या जाहिराती स्वीकारण्यास नकार दिला. निवडणूक रोख्यांच्या बातम्या प्रसिध्द केल्या जाऊ नयेत यासाठीही माध्यमांवर दबाव आणला गेला आहे. त्यामुळेच अचानक या विषयावरील बातम्या बंद झालेल्या आढळतात. आता त्यावर सार्वत्रिक आरडाओरडा सुरु झाल्यानंतर लाजेकाजेस्तोवर काँग्रेसच्या जाहिराती वृत्तपत्रे व इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर येऊ लागल्या आहेत. सत्ताधाऱ्यांनी मतदारांपुढे सत्य, वास्तव येऊ नये यासाठी अटोकाट प्रयत्न सुरु केले आहेत. परंतु त्यात त्यांना यश येताना दिसत नाही. कारण समाज माध्यमांद्वारे (सोशल मीडिया) भाजप, त्यांचे नेतृत्व यांचा पोकळपणा आता जगजाहीर होऊ लागला आहे. त्यामुळे त्यांची चिडचिड वाढलेली आहे हे उघड आहे. यातून त्यांनी काही आततायी कारवाई करु नये एवढीच अपेक्षा आहे.




भाजप व संघ परिवाराला देशाची राज्यघटना बदलायची हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. त्यांचे अनेक नेते तसे उघडपणे बोलूही लागले आहेत. त्यामुळे राज्यघटनेचे संरक्षण करण्याचे आव्हान विरोधी पक्षांसमोर आहे. यामध्ये राज्यघटनेला आदर्श मानणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा व मतदाराचा समावेश होतो. निवडणूक आयोगासारखी घटनात्मक संस्था स्वायत्त

असावी असे राज्यघटनेत नमूद असताना निवडणूक आयुक्तांना सरळसरळ पंतप्रधानांकडून नेमले जाते ही बाब काय सूचित करते याची जाणीव ठेवायला लागेल. निवडणुकांच्या ऐन तोंडावर एक निवडणूक आयुक्त पदत्याग करतात. तीनपैकी आयुक्तांच्या दोन जागा रिक्त होतात असा प्रकार पूर्वी घडलेला नाही. अशा स्थितीत पंतप्रधान घाईघाईने दोन आयुक्तांची नेमणूक करतात आणि दुसऱ्या दिवशी ते निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करतात हे कोणत्या स्वायत्ततेत बसते हा प्रश्न आहे. निवडणूक आयोगाची स्वायत्तता आणि तटस्थता टिकविण्यासाठी निवड समितीत देशाच्या सरन्यायाधीशांचा समावेश असावा असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्यानंतर मोदी सरकारने तत्काळ कायदा करुन निवडसमितीत सरन्यायाधीशांचा समावेश वगळला. आता या समितीत पंतप्रधान, एक केंद्रीय मंत्री आणि लोकसभेतील सर्वाधिक मोठ्या विरोधी पक्षाचा नेता यांचा समावेश केलेला आहे. म्हणजे सरकारला हव्या त्या व्यक्तीला नेमण्यासाठी निवडसमितीची अशी रचना करण्यात आली आहे. जे दोन आयुक्त आता नेमले त्या समितीत पंतप्रधान आणि त्यांचे खास गृहमंत्री अमित शहा होते आणि काँग्रेसचे लोकसभेतील नेते अधीररंजन चौधरी होते. समितीच्या बैठकीच्या आदल्या रात्री चौधरी यांच्याकडे २१० लोकांची नावे पाठविण्यात आली होती. त्यानंतर सकाळी बैठकीच्या काही मिनिटे आधी त्या २१०तून निवडलेल्या आठजणांची नावे त्यांना सांगण्यात आली आणि बैठकीत त्यातील दोघांच्या नावावर शिक्कामोर्तब करुन पंतप्रधान व गृहमंत्र्यांनी चौधरी यांना चर्चेसाठी कोणताही वाव न देता काही मिनिटात बैठकीचा फार्स संपविला. याचा अर्थ स्पष्ट आहे की या सरकारला सर्व सरकारी संस्थांवर स्वतःचे वर्चस्व राखायचे आहे आणि केवळ तोंडदेखलेपणासाठी किंवा नाटक म्हणून निवडसमितीचा फार्स करायचा आहे.

१८व्या लोकसभेची निवडणूक निर्णायक ठरणार आहे. कारण आता सत्ताधारी बेधडक आणि कोडगे झाले आहेत आणि निवडून आल्यानंतर ते त्यांची मनमानी अत्यंत निर्घृणपणे सुरु करणार आहेत हे आता स्पष्ट होऊ लागले आहे. घटनात्मक संस्थांवर त्यांनी आधीच वरचष्मा करण्यास सुरुवात केली आहे. परंतु नव्याने सत्तेत आल्यास देशाच्या न्यायसंस्थेवर हल्ला करण्यास त्या मागेपुढे पाहणार नाहीत हेही स्पष्ट होऊ लागले आहे. त्यामुळेच या सरकारचे भक्त असलेल्या सहाशे वकीलांनी त्यांचे म्होरके हरीश साळवे यांच्या नेतृत्वाखाली एक निवेदन अलीकडेच सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना सादर केले. वकीलांमधील एक गट न्यायसंस्थेवर दबाव आणत आहे आणि अत्यंत तकलादू मुद्यांचे भांडवल करुन न्यायालयांना त्यावर प्रतिक्रिया देण्यास भाग पाडत आहे आणि हा सर्व प्रकार अत्यंत चिंताजनक आहे अशा आशयाचे हे पत्र या भक्तवकीलांनी सरन्यायाधीशांना लिहिले आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे देशातील प्रमुख समस्यांवर मूग गिळून बसणाऱ्या पंतप्रधानांना अचानक कंठ फुटला आणि त्यांनी देखील या पत्राला समर्थन दिले आहे. पंतप्रधानांच्या समर्थनामुळे या वकीलांचे भक्तीस्थान काय आहे हे आपोआपच उघड झाले. निवडणूक रोखे प्रकरणात भाजप संघ परिवाराच्या भ्रष्टाचाराचा असाकाही पर्दाफाश झाला असल्याने आणि सर्वसामान्य जनतेला या भाजप संघ परिवाराचे खरे स्वरुप कळल्याने ही अस्वस्थता आणि चिडचिड सुरु झाली आहे. आपण फारमोठे देशभक्त, राष्ट्रवादी, स्वच्छ चारित्र्याचे असल्याचा आव आणणाऱ्यांचे हे खरे स्वरुप निवडणूक रोखे प्रकरणात उघडकीस आल्याने आता अजुन त्यामधील माहितीचे तपशील बाहेर येऊ नयेत यासाठी त्याविषयीच्या बातम्यांवर देखील बंधने व बंदी टाकण्यापर्यंत सत्ताधाऱ्यांची मजल गेली आहे. परंतु आता बिंग फुटलेले असल्याने आता थेट न्यायसंस्थेवरच हल्ला करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे आणि त्याचा भाग म्हणून सरकारचे भाट असलेल्या वकीलांमार्फत हा पत्रप्रपंच सुरु करण्यात आला. ही केवळ सुरुवात आहे. जर ही मंडळी पुन्हा सत्तेत आल्यास न्यायसंस्थेलाही बंदिस्त करायला मागेपुढे पाहणार नाहीत अशी चिन्हे दिसू लागली आहेत. त्यामुळे मतदारांनी त्वरित सावध होऊन येऊ पाहणाऱ्या हुकुमशाहीला आवर घालण्याची वेळ आली आहे.

■■■



भाजपची नवी राज्यघटना

राष्ट्रवादी स्वाभिमानी आचार! राष्ट्रवादी विचार!!

# नमो नावाचे अभियान कशासाठी?

# आरक्षणाचे धोरण योग्य पद्धतीने राबविले जात नाही?

**माझे मत :**

**'नमो- अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची वस्ती सन्मान अभियान'**

राज्य सरकारच्या सामाजिक न्याय विभागाने दि २४ नोव्हेंबर २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे वरील नावाचे अभियान सुरू केले आहे. नमो का तर प्रधानमंत्री माननीय नरेंद्र मोदी यांचा ७३ वा वाढदिवस साजरा करण्यासाठी राज्य सरकारने ७३ वस्त्यांची निवड केली आहे.

**२. या अभियानात,**

१.रमाई आवास योजना / पीएम आवास योजना राबविणे


२.वस्तीत १००%रस्ते बांधणे

३.वस्तीत १००% वीजपुरवठा

४. समाज प्रबोधनासाठी समाज मंदिर

५. वस्तीतील महिलांच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी बचत गटामार्फत मदत करणे.

या GR मध्ये ७३ वस्त्याचा उल्लेख आहे. प्रथम दर्शनी नमो नावाचे हे अभियान चांगले दिसते. परंतु, नमो कडून वरील योजनांसाठी वेगळा निधी मिळणार नाही. सामाजिक न्याय विभागाकडे असलेल्या निधीतून या वस्त्या मध्ये कामे केली जातील आणि नमो यांचा वाढदिवस साजरा केला जाईल.




३. पूर्वी दलित वस्ती सुधार योजना होती. त्या अंतर्गत जिल्हा परिषद मार्फत वस्तीत सेवा सुविधा दिल्या जातअसत. फार जुनी योजना १९७०-७५ काळातील. दलित शब्ध वापरायचा नाही म्हणून या वस्त्यांना अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्ती असे नाव दिले. २०१८ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज विकास योजना आली. या समाज घटकांच्या वस्त्यामध्ये सेवा सुविधा देण्यासाठी बजेट मध्ये फार मोठा निधी देणे सुरू झाले, चालू बजेट मध्ये १०००कोटी चा निधी ठेवला आहे. आता ह्यापैकी, नमो-अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांची वस्ती सन्मान अभियानावर खर्च होतील.

४. आमदार खासदार यांचा निधी असतो, त्यातून ही कामे केली जातात. ही नियमित स्वरूपाची योजना आहे. तेव्हा, नमो नावाचे अभियान कशासाठी? सन्मान कोणाचा? केंद्र सरकारने मागील १० वर्षात, अनुसुचित जातीच्या विकासासाठी जे बजेट लोकसंख्येचे प्रमाणात द्यायचे, SCSPचे, ते पूर्णतः दिले नाही. यामुळे नाकारलेला निधी जवळपास ४.१२ लाख कोटींचा आहे. महाराष्ट्र सरकारने सुद्धा मागील दशकात नाकारलेला निधी ४०हजार कोटींचे वर आहे. हा अनुसूचित जाती व नवबौद्ध यांचा सन्मान होत आहे असे म्हणता येईल का? बजेट कायदा नाही, जातीय अत्याचारास प्रतिबंध नाही.आरक्षण धोरण राबविले जात नाही. योजनांची नीट अंमल बजावणी नाही. शिष्यवृत्ती, फीमाफी, परदेश शिष्यवृत्ती, नामवंत संस्थांमध्ये शिक्षणासाठी मदत, वसतिगृह व त्यात सेवा सुविधा, स्वाधार, स्वाभिमान, रमाई घरकुल, आणि अजूनही, इत्यादी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र गरजूंना त्रास सहन करावा लागतो . जेथे विलंब, शोषण, भ्रष्टचार, पिळवणूक तेथे सन्मान कसा ? तेव्हा, नमो सन्मान अभियानातून काय मिळेल?

५. वर्ष २००६ मध्ये फुले- शाहू-आंबेडकर या नावाने दलित वस्ती सुंदर वस्ती असे अभियान सरकारने सुरू केले होते. हे अभियान राबविले जात आहे का?हा ही प्रश्नच आहे. असेल तर उपलब्धी काय. महापुरुषांचे नावाचे हे अभियान राबवावे, याकडे विशेष लक्ष द्यावे . हे अभियान असताना, नमो अभियानाची आवश्यकता वाटत नाही.

६. काही महिन्यांपूर्वी मी एक पोस्ट लिहली होती,, अनेक योजना असताना, किती अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीत सर्व प्रकारच्या सेवा सुविधा पुरविण्यात आल्यात व वस्त्यांचा विकास झाला? हे होत नाही मात्र, नमो नावाचे सन्मान अभियान वस्तीत सुरू होते.या समाज घटकांचा सन्मान करायचा असेल तर बजेट चा कायदा पास करा, अत्याचार थांबवा, आरक्षण द्या, विविध योजनांचा लाभ द्या. भ्रष्टनचार थांबवा, यंत्रणेत संवेदनशीलता आणा. आम्ही १-१२ मुद्दे लक्षवेधी चे स्वरूपात सरकारकडे, लोकप्रतिनिधी यांचे कडे २०२० पासून सातत्याने मांडत आहोत. समाज घटकांच्या हिताचे, कल्याण्याचे, विकासाचे हे मुद्दे आहेत. यावर कॅबिनेट मध्ये निर्णय घ्या, नाकारलेल्या निधी ची तरतूद बजेट मध्ये करा,असे केले तर सन्मान होईल अशी सरकारला विनंती आहे. शेवटी, नमो हे नाव अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बस्तीस शोभत नाही. नमो बाबत माझे मत. तुमचे मत? यावर लक्ष ठेवा.



**- इ झेड खोब्रागडे, भाप्रसे नि**

**संविधान फौंडेशन, नागपूर**

**दि १ डिसेंबर २०२३**

M-९९२३७५७९००


■■■




# आतून हादरलेल्या भाजपची मदार बाजार बुणग्यांवर!

**व्यंकटेश केसरी**

"अब की बार, चार सो पार " असा नारा देणाऱ्या भाजपच्या प्रतिकूल घटना लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर घडत आहेत. त्यामुळे सावध झालेल्या भाजपने मोठ्या प्रमाणात विद्यमान खासदारांनाच पुन्हा उमेदवारी देण्याची जोखीम घेतली आहे. निवडणूक रोख्याच्या निमित्ताने सरकारने यंत्रणेच्या माध्यमातून वेगवेगळ्या कंपन्यांकडून कसे कोट्यवधी रुपये काढले ते आता जगासमोर येत आहे. हे मनी लॉन्ड्रिंग आहे तेंव्हा मनी लॉन्ड्रिंग कायद्यानुसार गुन्हे दाखल करा, अशी विरोधकांची मागणी आहे. हे प्रकरण दाबण्यासाठी सरकारने आटोकाट प्रयत्न केले पण सर्वोच्च न्यायालयासमोर ते चालले नाही आणि अखेर भाजपचे पितळ उघडे पडले. फॅक्टस चेक यूनिटच्या माध्यमातून बातम्यांच्या प्रसारावर अंकुश ठेवण्याच्या भाजप सरकारच्या प्रयत्नाला न्यायालयाने खीळ घातली.विकसित भारत संपर्क या नावाने व्हॉटस ॲप वरुन प्रचार करण्याची त्यांची स्ट्रैटिजी चालली नाही. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्यांना भाजपने घेतले, त्यांना




लोकसभा निवडणुकीचे तिकीट दिले तर काहींना राष्ट्रीय लोकशाही आघाडी म्हणजे एन. डी. ए. मध्ये घेऊन सत्तेचे भागीदार बनविले. यात भाजपची अवस्था " गाढव गेले आणि ब्रह्मचर्य ही गेले " अशी झाली आहे. " ना खाऊंगा ,ना खाने भी दूँगा " असे म्हणणाऱ्या भाजपचे चारित्र्य आता खातो आणि खाऊही घालतो असे बनलें आहे.

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना झालेली अटक, त्यापूर्वी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना झालेली अटक, विरोधी पक्षांचे बँकेतली खाती गोठवणे याचा अर्थ एकच आहे आणि तो म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा सत्तेत येण्याची खात्री नाही. विरोधी पक्ष एक असो वा विभागलेला पण जगातला सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करणाऱ्या भाजपला कशाची भीती वाटते? नरेंद्र मोदी यांच्या करिष्मावर भाजप लोकसभा निवडणुकीचा जुगार खेळत असेल तर पक्षातले तरुण, दुसऱ्या फळीच्या कार्यकर्त्यांना का तिकिट मिळत नाही? जुन्या पुराण्या, निष्क्रीय चेहऱ्यांना उमेदवारी दिल्याने त्याचा फटका मोदी आणि भाजपला बसणार आहे.याशिवाय दुसऱ्या पक्षातील बदनाम फुटीर यांची खोगीर

## मुक्त निवडणुकांबाबत जगाला चिंता

**जगातील सर्वात मोठा, लोकशाही व्यवस्था असलेल्या भारतातील लोकसभेच्या निवडणुका कशा होतील याकडे जगाचे लक्ष लागले आहे.भाजप स्वतःला जगातला सर्वात मोठा पक्ष असल्याचा दावा करतो. परंतु या एप्रिल, मे, जून पर्यंत चालणाऱ्या या निवडणुका मुक्त आणि निःपक्षपाती (फ्री अँड फेअर ) वातावरणात होतील काय याविषयी अमेरिकेसकट जगातल्या अनेक देशांना शंका असल्याचे स्पष्ट . विरोधी पक्षांच्या मंत्र्यांना,मुख्यमंत्रांना तुरुंगात डांबणे,त्यांच्यावर आरोपपत्र दाखल करून खटले चालविण्यापेक्षा चौकशीच्या नावाखाली महिनोन महिने ,वर्षानुवर्षे तुरुंगात टाकण्याचा अर्थ काय ? पाश्चात्य देश याबद्दल प्रश्न विचारत आहेत. पण 'विश्वगुरू' ना वाटते ते भारताच्या अंतर्गत प्रश्नात दखल देत आहेत. पण मग ते विश्वगुरू' कसे ? जगाचे नेतृत्व कसे करणार ? निवडणूक आयुक्तांच्या नेमणूका सरकारच्या मर्जीने का ? त्यात सर्वोच्च नायायालयाचे मुख्य न्यायमूर्ती का नाही . चौकशी यंत्रणांचा वापर फक्त विरोधकांवर का ? त्यांची मदत सरकार का घेते ? भाजप नेत्यांची नवटंकी मागच्या दोन सार्वत्रिक निवडणुकात चालली पण आता चालताना दिसत नाही. अमेरिकेत जाऊन "अब की बार ट्रम्प सरकार "अशी घोषणा ट्रम्प यांचा प्रचार करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारला अमेरिकेने भारतातील घडामोडींबद्दल केलेले भाष्य म्हणजे अंतर्गत हस्तक्षेप वाटतो. निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षांची मुस्कटदाबी करणे, आर्थिक नाड्या आवळणे, निवडणूक आयोग आपल्या मुठीत ठेवणे, न्यायपालिकेवर दबाव आणणे, प्रसार माध्यमांना आपल्या टाचेखाली आणून निवडणुका कशा मुक्त वातावरणात होतील याबद्दल भारताबाहेरील राष्ट्रांना जबरदस्त शंका आहे.**

# वास्तव व वारे बदलू लागले आहे...

लोकसभा निवडणुकीच्या ऐन तोंडावर विरोधी पक्षांना एकत्र आणण्याचे,त्यांच्या कार्यकर्त्यात चेव निर्माण करण्याचे श्रेय निर्विवादपणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे जाते. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल,हेमंत सोरेन यांना अटक करणे,काँग्रेस पक्षाची आर्थिक नाकेबंदी करणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, शिवसेना यांच्यात फूट पाडणे ,केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर करून भाजपसाठी कोट्यवधी रुपयाचा निधी जमविणे, विरोधी पक्षांच्या सरकारांना मिळणाऱ्या निधीत पक्षपात करणे,विरोधी पक्षांची सरकारे पाडणे यामुळे आपण ही निवडणूक सहजपणे जिंकू असा नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचा अंदाज होता पण फासे उलटे पडू लागले आहेत. दिल्लीतल्या रामलीला मैदानावर झालेल्या विरोधी पक्षांच्या संयुक्त सभेने राजकीय वातावरणातील बदलाचा अंदाज नरेंद्र मोदी यांना आला असणार. तो न आला तर भाजप हवेत आहे, मस्तीत आहे असा त्याचा अर्थ निघतो. या सभेत जोश होता , आक्रमकता होती आणि भाजपला शिंगावर घेण्याची हिम्मत त्यात होती. दिल्लीत राष्ट्रपती राजवट लावली तर त्याचा फटका भाजपला दिल्ली, शेजारच्या हरियाणात ,पंजाब मध्ये बसणार आहे. २०१४ आणि २०१९च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला हिंदी भाषी प्रदेशातून ताकत मिळाली तेवढी ताकत यावेळी मिळेल असे दिसत नाही. तेजस्वी यादव, अखिलेश यादव, राहुल गांधी यांच्या चेहऱ्यावर चमक आली आहे. झारखंड मुक्ती मोर्चा लढण्याच्या तयारीत आहे.महाराष्ट्रात भाजपला मैदान साफ नाही. गुजरात भाजपतील असंतोषाचे स्वर बाहेर येउ लागले आहेत.उत्तर प्रदेशातील भाजप उमेदवाराच्या निवडीत मोदी-शहांची छाप आहे याचा अर्थ मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना चांगलाच कळतो. राजस्थान मध्ये सत्तांतरानंतरच्या पहिल्याच विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपच्या एका मंत्र्यांचा पराभव झाला हा मोदी यांच्यासाठी शुभ शकुन कसा असू शकतो. गेल्या दहा वर्षात मोदी आणि शहा यांनी दुखावलेले भाजप मधील असंतुष्ट शरणागती पत्करतील काय? विरोधी पक्षात सारे भ्रष्ट असले तर त्यांच्यातून फुटून भाजपत आलेले सगळे स्वच्छ, नीतिमान, चारित्र्यवान कसे? लोक यावर कसा विश्वास ठेवतील? निवडणुकीच्या आगोदरच भाजपच्या चेहऱ्यावरील रया जाऊ लागली आहे. टी.व्ही.चॅनेल्स भले काहीही दाखवो, कोणताही अँगल चालवो वास्तव बदलू लागले आहे. येणाऱ्या काळात नरेंद्र मोदी, भाजप अधिक चुका करतील आणि आपल्या पायावर धोंडा मारतील. वारे बदलू लागले आहे.








भरती करून त्यांना लोकसभा ,राज्यसभेत उमेदवारी देऊन भाजपची "चाल , चेहरा ,चारित्र्य " मोदी यांच्या राजवटीत बदलले गेले. आता हा पक्ष "सत्तेसाठी काहीही.. वाटेल ते " करण्यासाठी सज्ज झाला आहे .


पुढची पन्नास वर्षे आपणच सत्तेत राहण्याची उद्याम भाषा करणारा भाजप बिहार, महाराष्ट्र,कर्नाटक,आंध्र प्रदेश, तामिळनाडू, केरळ, उत्तर प्रदेश आणि नॉर्थ ईस्ट राज्यातल्या प्रादेशिक पक्षांशी, गटांशी निवडणूकपूर्व युती करत आहे. नरेंद्र मोदी यांच्यासारखे 'विश्वगुरु ', अमित शहा यांच्यासारखे ' चाणक्य ', राष्ट्रीय स्वयंसेवक सेवक संघाचे सुरक्षा कवच असताना या पक्षाला बाजार बुणग्याशी संग का करावा लागतो याचा अर्थ मतदारांना कळत नाही काय ?

अरविंद केजरीवाल यांच्या अटकेवर अमेरीका ,जर्मनीची प्रतिक्रिया मोदी सरकारला ताकत देणारी नाही . जगातील देश या घटनेवर लक्ष ठेऊन आहेत याचा अर्थ विश्वगुरू ' ना चांगलाच समजतो. ही निवडणूक पूर्वीच्या निवडणुकांपेक्षा वेगळी असेल याचे संकेत मिळू लागले आहेत. राजधानी दिल्लीत झालेली जी २० शिखर परिषद, नव्या संसद भवनांचे थाटामाटात,विधिवत झालेले उदघाटन,अयोध्येतील राम मंदिराची झालेली प्राणप्रतिष्ठा याने देशात नरेंद्र मोदी यांच्या बाजूने हवा निर्माण व्हायला पाहिजे होती पण ती होत नाही हे कळल्याने भाजप सावध झाला आहे. विरोधी पक्षात फोडाफोडी, विरोधी नेत्यांच्या मागे ईडी,सी बी आय, इन्कम टॅक्स, मनी लौंड्रीन्ग ऍक्ट याचा ससेमिरा लावणे आणि ते शरण आले की त्यांना भाजपच्या छत्रछायेत घेणे हे राजकीय पक्षाचे धोरण असू शकत नाही पण गुन्हेगारी टोळीची कार्यशैली असू शकते.

विरोधकांची चेष्टा करणे, त्यांची टिंगल टवाळी करणे,त्यांचे चारित्र्यहनन करणे,त्यांच्या राष्ट्रप्रेमाबद्दल शंका घेणे आणि लोकांच्या मूळ प्रश्नांना बगल देणे हा भाजपचा आवडता छंद आहे. त्याने प्रसिद्धी माध्यमात जागा मिळते पण लोकांचे प्रश्न सुटू शकत नाहीत. मोदी सरकारच्या काळात संविधानिक संस्था निष्प्रभ झाल्या,निवडणूक आयोग सरकारचे अंग असल्यासारखे काम करू लागला. "कॅग" चे अहवाल येणे बंद झाले. माहिती अधिकाराचा कायदा इतिहास जमा झाला.लोकपाल, सेंट्रल व्हिजिलन्स कमिशन याचे अस्तित्व जाणवत नाही. लोकसभेचे अध्यक्ष,राज्यसभेचे सभापती विरोधी पक्षांना त्यांचा स्पेस' देऊ शकत नाहीत. " आमच्या भाषणाच्या वेळी सभागृहातील माईक बंद केला जातो, टी.व्ही. सत्तारूढ पक्ष, आघाडीचे कसदार, मंत्री ,पीठासीन अधिकारी यांनाच दाखविले जाते " हे त्याचे आरोप निराधार आहेत काय ? प्रेस म्हणे प्रिंट आणि इलक्ट्रॉनिक मीडिया यांची वाट नरेंद्र मोदी यांच्या राजवटीत लागली . ते पुन्हा तिसऱ्यांदा सत्तेत असल्यास सोशल मीडियाचा अस्त होणार हे नक्की !

**चाणक्य : विश्वगुरू**
**तिकडे बघा, त्याला**
**गॅसचा सिलेंडर जड**
**झालाय!**
**विश्वगुरू : चाणक्य,**
**तिकडे कशाला**
**बघतो?**
**आपल्याला सुद्धा**
**इलेक्ट्रोल बॉन्डच्या**
**पैशाचे ओझं कुठं**
**उचलतंय? त्यात**
**सुप्रीम कोर्टाने**
**आडवा पाय**
**घातलाय!**



स्वाभिमानी आवाज! राष्ट्रवादी विचार!!


दिल्लीतील मद्य धोरणातील आरोपीना अटक होते , त्यातला एक सरकारी गवाह, भाजपला निवडून निधी देतो,इतर आरोपींना तुरुंगात डांबले जाते पण त्यांच्या विरुद्ध खटले चालविले जात नाहीत. मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक केल्यानंतर ते राजीनामा देत नसतील तर दिल्लीत राष्टपती राजवट लागण्याच्या चर्चा चालू आहेत. आम आदमी पार्टी' ची सत्ता खरी तर दीड राज्यात म्हणजे पंजाब आणि दिल्ली मध्ये आहे पण मोदी सरकारला याची धास्ती का ?

आज विरोधी पक्ष विस्कळीत दिसतो . राष्टीय पातळीवर त्याच्याकडे चेहरा' नाही, साधने नाहीत, व्यवस्थेशी लढण्यात त्याची शक्ती खर्ची पडत आहे. याचा अर्थ भाजपसाठी मैदान साफ आहे असा होत नाही. तसे असते तर नवीन जिंदाल, जनार्दन रेड्डी, महाराष्ट्रातील बदनाम चेहरे यांना भाजप प्रवेश ,निवडणुकीची उमेदवारी देण्यात आली नसती. केंद्रातील अदृश्य हात अदृश्य भीतीच्या छायेत आहे.




भारतासारख्या खंडप्राय देशात "एक व्यक्ती, एक पक्ष, एक धर्म, एक भाषा "चालत नाही. आणि विरोधी पक्ष मुक्त संसद करूनही विरोधक संपत नाहीत. गतिमान राजकारणात नवे प्लेअर्स, नवे डावपेच, नवी भाषा याचा प्रवाह सतत चालू असतो. उत्तर भारतातील निवडणुकीत जातीचा प्रभाव असतो त्यामुळे जातीय समीकरणे चालतात. याचे प्रमुख कारण म्हणजे तेथे मध्यमवर्ग नाही, उद्योग नाही पण तेथे लोकसभेच्या जागांची संख्या जास्त आहे आणि त्याचा परिणाम केंद्रातली सत्ता हाती ठेवण्यावर होतो पण त्यामुळे देश एकसंध राहतो काय ? त्याच्या उलट महाराष्ट्रासह दक्षिणेत निवडणुकीचे गणित, डावपेच वेगळे असतात. म्हणून धार्मिक ध्रुवीकरण जेवढे उत्तर भारतात चालते तेवढे ते इतरत्र चालत नाही.मणिपूर मध्ये जाण्याची हिम्मत अजून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दाखविली नाही. पंजाब मध्ये मोदी, शहा यांचे दौरे गेल्या दहा वर्षात किती झाले हा अभ्यासाचा विषय आहे. ३७० कलम हटवुनही जम्मू-काश्मीर मध्ये निवडणूका झाल्या नाहीत.

२०२४ च्या लोकसभा निवडणूका कशा असतील ? तर त्या एकतर्फी होणार नाही



# मॅचफिक्सिंग शिवाय निवडणूक जिंकणे अशक्य

**घराणेशाही, भ्रष्टाचार, पाकिस्तानला धडा शिकवू ...हे पंतप्रधान नरेंद मोदी यांचे नेहमीचे निवडणुकीतील डायलॉग आता बत्थड होत चालले आहेत.नरेंद्र मोदी यांच्या नावे तिसऱ्यांदा आपण सत्तेत येत नाही हे भाजपला कळून चुकले आहे म्हणून घाबरलेल्या या पक्षाने भ्रष्ट गणंगांना निवडणुकीत तिकिटे दिली. विरोधी पक्षांच्या दिल्लीतल्या महा रॅलीला मीडियात जबरदस्त कव्हरेज मिळेल हे लक्षात आल्यानंतर त्याच दिवशी म्हणजे ३१ मार्च रोजी नरेंद्र मोदी यांची मेरठ मध्ये जाहीर सभा ठेवण्यात आली. मोदी हे "मॅच फिक्सिंग" केल्याशिवाय निवडणूक जिंकू शकणार नाहीत आणि ते पुन्हा सत्तेत आले तर देशाची घटना बदलणार या विरोधकांच्या भीतीवर लोकात चर्चा सुरु झाल्या आहेत. सत्ता टिकविण्यासाठी नरेंद्र मोदी वाट्टेल त्या थराला जातील कारण सत्ता गेल्या नंतर पुढे काय होईल याची त्यांना पूर्ण जाणीव आहे, असेही लोक बोलू लागले आहेत. महागाई, बेकारीवर लोक बोलतात तर भाजप भ्रष्टाचार, घराणेशाहीवर जोर लावते.कारण मोदी सरकार नोकऱ्या देऊ शकत नाही, रोजगार निर्माण करत नाही पण सरकारी खिरापती वाटते.निवडणुका होईपर्यंत महागाई वाढणार नाही पण त्यांनतर ती उसळी मारेल असे ते लोक म्हणतात. दिल्लीतले रिक्षेवाले मोदी प्रेमातून बाहेर येत आहेत तर मध्यमवर्ग ही कोणाचीच कायमची वोट बँक नसते. भाजपला निवडणुकीचा पूर्ण अंदाज येत नाही तर विरोधी पक्षांना वातावरणातील बदलाची चाहूल लागत आहे. मतदानाच्या दोन टप्प्यानंतर हवेची दिशा कळेल. .**






हे निश्चित ! आणि " चार सो पार "चा नारा खरा ठरला तर खुशाल समजावे निवडणुकात, मतमोजणीत "चारसोबीसी " झाली. कारण मोदी सरकारच्या विरोधात लोक रस्त्यावर येऊ लागले आहेत. नरेंद्र मोदी यांची झळाळी कोमेजू लागली आहे. नोटबंदी, लॉक डाउन, निवडणूक आयोगाचे निकाल, पक्षांच्या फोड्याफोड्या आणि या सर्वांवर ताण म्हणजे निवडणूक रोखे, केंद्रीय यंत्रणांचा उघड राजकीय वापर --या ने सरकार आतून किती पोकळ आहे हे जगजाहीर झाले आहे. भाजपचा भरवसा बाजार बुणग्यांवर आहे. त्यांची पत लोकात किती ते या निवडणुकात कळेल.

"तुम्ही काही लोकांना काही काळ फसवू शकता , सर्व लोकांना काही काळ फसवू शकता पण सर्व लोकांना सर्व काळ फसवू शकत नाही " या राज्यशात्रातील दाखल्याचा कस एप्रिल-मे महिन्यात लागणार आहे !

■■■

# जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानाने निर्मित भारतीय केळीच्या लोकप्रिय जाती आता आपल्या करीता उपलब्ध




- वेगवेगळ्या टप्प्यावर व्हायरस इंडेक्सींग करून अस्सल, रोगमुक्त व दर्जेदार रोपे निर्मित करणारी जैन टिश्यूकल्चर ही एकमेव कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चर केळींच्या रोपांची निर्मिती रोगमुक्त, उत्कृष्ट, उच्चतम गुणवत्ता व निवडक मातृवृक्षापासून केली जाते.
- वातावरण नियंत्रित ग्रीनहाऊस व पॉलीहाऊस मध्ये शास्त्रोक्त पद्धतीने हार्डनिंग करणारी एकमेव कंपनी.
- जैन टिश्यूकल्चरच्या रोपांची वाढ पोषक तत्वांनीयुक्त असणाऱ्या, निर्जंतुक व विशेषरित्या आयात केलेल्या मातीविरहीत मिडीयामध्ये होते. अशा रितीने वाढ झालेल्या रोपांमध्ये मातीतून पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव होत नाही व रोपे रोगमुक्त असण्याची खात्री असते.
- जैन टिश्यूकल्चर रोपांचा पुरवठा रूट ट्रेनर ट्रे मधून केला जातो, त्यामुळे मुळांचा विकास व वाढ योग्यरित्या होते व हाताळणी करतांना मुळांना नुकसान होत नाही.
- जैन टिश्यूकल्चर तंत्रज्ञानानेच शेतामध्ये रोपांची झिरो-डे सेटींगची खात्री.
- जैन टिश्यूकल्चर केळीची रोपे म्हणजे विक्रमी उत्पादनाची हमी.
- जैन टिश्यूकल्चर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार एकात्मिक पॅकेज प्रदान करून त्यांना हायटेक लागवड पद्धती, अत्याधुनिक सुक्ष्म सिंचन, त्यातून खते देण्याच्या तंत्रज्ञानाचे वैज्ञानिकदृष्ट्या मार्गदर्शन करते.

- जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या केळीची रोपे निर्मित करणारी जगातील नंबर १ ची कंपनी आहे.
- जैन टिश्यूकल्चरच्या केळी रोपांना १९९४ पासून शेतकऱ्यांची पहिली पसंती.
- या वर्षी जैन टिश्यूकल्चर ग्रँडनैन जातीच्या ९.५ कोटी केळी रोपांची लागवड करून शेतकऱ्यांनी उच्चांकी उत्पादन घेतले आहे.
- शेतकऱ्यांच्या वाढत्या मागणीनुसार आता पूवन, इलाकी, रेड बनाना, नेन्द्रन, सुपर नेन्द्रन व बन्थल या लोकप्रिय भारतीय जातींचे जैन टिश्यूकल्चर केळी रोपे उपलब्ध.
- सदैव वाढणाऱ्या जैन टिश्यूकल्चर कुटुंबात त्वरित सामील होऊन फायदा घ्या.



जैन टिश्यूकल्चर - इलाकी रूपये २०/रोप



जैन टिश्यूकल्चर - पूवन रूपये १६/रोप



जैन टिश्यूकल्चर - बन्थल/ मोन्थन रूपये २०/रोप



जैन टिश्यूकल्चर - नेन्द्रन रूपये १८/रोप



जैन टिश्यूकल्चर - रेड बनाना रूपये २०/रोप

त्वरित बुकिंग करा व निराशा टाळा

जैन टिश्यूकल्चर
अधिक उत्पादन – अधिकाधिक नफा.

जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.®

जैन हाईटेक प्लॅन्ट फॅक्टरी
अधिक उत्पादन – अधिक नफा.

वाहतूक खर्च वेगळा लागेल.

# बुकिंगसाठी संपर्क: (महाराष्ट्र) अकलूज: ९४२२७७४९३७; चोपडा: ९४२२७७3394, जळगाव: ९४२२७७६७१८, ९४२२७७६७४८, ९४०४९५५३१७,९४२२७७३७६८ अंजनगाव सुर्जी: ९४२२७७५९२८; मालेगाव: ९४०३०८०१३८; नांदेड: ९४०३६९५८९३, ९४०३६९५८४६; नंदुरबार: ९४२२७७४३७५; मुक्ताईनगर: ९४०३६९५९०८; पुणे: ९४२२७७४९३३; रावेर: ९४२२७७४९३१; टेंभूर्णी: ९४२२७७४९३२; सांगली: ९४०३०८०१७२, कोकण व गोवा: ९४२२७७४९३१, ९८७०९९०७५४, ९४२२७७४९३३; ९४२२७७३७६८,

टिप - जैन टिश्यूकल्चर केळी रोप रोगमुक्त असली तरी शेतात लागवड केल्यानंतर त्यावर रोगांचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यामुळे रोगांच्या प्रादुर्भावाची व त्यानंतर येणाऱ्या उत्पादनाची हमी कंपनी घेऊ शकत नाही.



पुणे जिल्ह्याच्या भोर तालुक्यातील हरिश्चंद्री येथे ९ मार्च रोजी महाविकास आघाडी तर्फे आयोजित ‘महासभा एकजुटीची, भव्य शेतकरी मेळावा’ या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेले भाषण...

# सत्ता परिवर्तन केले तरच देशातील लोकशाही वाचेल

**शरद पवार**

या देशाचे भविष्य आणि भवितव्य हे मजबूत करण्यासाठी आता थांबायला वेळ नाही आणि या हेतूनं संग्राम थोपटेंनी सांगितलं, तसं आपण भोरपासून सुरू करूया आणि मला आनंद आहे, की आज आपण हजारोंच्या संख्येने उपस्थित आहात. ही निवडणूक तुम्हा सर्वांच्या दृष्टीने एक अत्यंत महत्त्वाची निवडणूक आहे. स्वातंत्र्यानंतर अनेकांनी देशाचे नेतृत्व केले. जवाहरलाल नेहरू असतील, लालबहादूर शास्त्री असतील, इंदिरा गांधी होत्या, मोरारजी देसाई होते, नरसिंहराव होते, अटल बिहारी वाजपेयी होते. अनेकांची नावे घेता येतील. मनमोहन सिंहासारखे प्रधानमंत्री होते. पण, या सर्व काळात देशाच्या भवितव्याची चिंता ही नागरिकांच्या मनामध्ये कधी आली नाही. पण, गेले १० वर्षे या देशाची सत्ता ज्यांच्या हातामध्ये आहे आणि ज्या पद्धतीची पावलं त्यांनी टाकली आणि त्याचे परिणाम आज तुम्ही-आम्ही ठिकठिकाणी पाहत आहोत. हे पाहिल्यानंतर परिवर्तनाशिवाय पर्याय नाही. इथे बदल केला पाहिजे, ही भूमिका देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

देशातील शेती आणि शेतकऱ्यांचा प्रश्न; १० वर्षे माझ्याकडे देशातल्या शेतीचे काम होते. मला आठवतंय राष्ट्रपती भवनावर शपथ घेतली. शपथ घेऊन घरी आलो. पहिली फाईल आली त्या फाईलमध्ये होतं की, देशामध्ये १ महिना पुरेल एवढा गहू आणि तांदूळ आहे. लोकांच्या समोर भुकेचा प्रश्न उद्धवलेला आहे आणि त्यासाठी परदेशातून धान्य आयात करावे लागेल. मी फार अस्वस्थ झालो. शेती या देशातील बहुसंख्य लोकांचा व्यवसाय आहे. आमचा बळीराजा उन्हा-तान्हाचा विचार न करता घाम गाळतोय, पीक पिकवतोय, देशाच्या भुकेचा प्रश्न सोडवत आहे. आणि आज त्याच या देशात धान्य कमी झालेले आहे. आणि मग ठरवलं की, परदेशातून धान्य आणणे हे बंद केले पाहिजे. अनेक निकाल घेतले आणि देशाचे चित्र बदलले.

एक दिवशी माझ्याकडे माहिती आली. यवतमाळ जिल्ह्यातल्या एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. शेतकरी आत्महत्या करतोय. या देशातला बळीराजा; लोकांची भूक भागवणारा तो आत्महत्येच्या रस्त्यावर जात आहे. तेव्हा प्रधानमंत्री मनमोहन सिंग होते. मी प्रधानमंत्री यांना सांगितले की, त्याने आत्महत्या का केली? हे आपण जाऊन समजून घेतले पाहिजे. दुरुस्ती करायची असेल तिथे दुरुस्ती केली पाहिजे आणि आम्ही गेलो. ज्याने आत्महत्या केली त्याच्या घरच्यांना भेटलो. माऊली रडत होती. तिच्या डोळ्यातून पाणी थांबत नव्हते. मी विचारले काय झाले? का आत्महत्या केली तुझ्या मालकाने? तिने सांगितलं, मुलीचे लग्न ठरले आणि लग्नाची तयारी करत असताना सावकाराकडून कर्ज काढले होते. जे यांना देता आले नाही. सावकाराने एक दिवशी घरी येऊन भांडीकुंडी रस्त्यावर टाकली. अब्रूचा पंचनामा झाला.

मुलीचे ठरलेले लग्न मोडले. आणि ते माझ्या मालकाला सहन झाले नाही. म्हणून त्यांनी आत्महत्या केली. याचा अर्थ एकच आहे कर्जबाजारीपणा हेच आत्महत्याचे कारण. शेतकऱ्यांच्या डोक्यावरचे कर्जाचे ओझे काढल्याशिवाय गत्यंतर नाही.

दिल्लीला गेल्यावर मनमोहन सिंग आणि आम्ही सर्वांनी निकाल घेतला की, या देशातल्या बळीराजाला जगणे मुश्किल झाले असेल तर त्याच्या डोक्यावरचे कर्ज माफ केल्याशिवाय पर्याय नाही. ७१ हजार कोटींचे कर्ज आम्ही माफ करून टाकले. आज देखील तेच चित्र आहे. आज आत्महत्या होत आहेत. रस्त्यावर भांडीकुंडी काढलं जातात. बँकेची जप्ती येते. आणि हे सर्व होत असताना देशाचे प्रधानमंत्री मोदी साहेब या सर्वांकडे पाहायला तयार नाहीत.

सत्ता ही लोकांसाठी असते. पण, आज सत्तेचा वापर मोदी साहेब लोकांसाठी करत नाहीत. ते काही लाख कोटी उद्योगपतींचे कर्ज माफीसाठी ते सत्तेचा वापर करतात. आणि हे योग्य नाही आहे. आज कोणीही प्रधानमंत्री झाला तर त्यांनी अखंड हिंदुस्तानचा विचार हा केला पाहिजे. प्रधानमंत्री सबंध देशाचा असतो. तो एका राज्याचा नसतो. तुम्ही काही कालखंडातील सर्व महत्त्वाचे निकाल बघा. प्रधानमंत्री यांचे करणारा कोणीही असो तो देशाचा प्रमुख होऊ शकत नाही. त्याला देशाचा विचार समजतच नाही. त्याच्या मनात प्रेमच नाही. तर या निवडणुकीच्या माध्यमातून त्यांचा पराभव करणे हे काम तुम्हाला आणि मला करायचे आहे. त्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे.

मोदींची गॅरंटी कसली? गॅरंटी; त्यांनी सांगितलं होतं की, परदेशात काळा पैसा आहे. तो मी आणेन आणि शेतकऱ्यांच्या खिशात टाकेन. एक दमडीही परदेशातून आणली नाही. आज सबंध देशांमध्ये अस्वस्थता आहे. पण शेतकऱ्याच्या खिशामध्ये तो काळा पैसा आणून त्याला संपन्न करण्याचे जे काही धोरण त्यांनी सांगितले होते त्याची अंमलबजावणी त्यांनी त्या ठिकाणी केली नाही. आणि त्याचा परिणाम आज ते गॅरंटी कसली देतात?

गेल्या २ वर्षांपूर्वी दिल्लीच्या सीमेवर पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश या भागातील शेतकरी हजारोंच्या संख्येने १ वर्षभर शेतकरी दिल्लीच्या रस्त्यांवर बसले. दिल्लीची थंडी, उन्हाळा याचा विचार त्यांनी केला नाही. त्या शेतकऱ्यांचे दुखणे दूर करा. एवढी एकच मागणी करत होते. पण, १ वर्ष हा काळ्या आईशी इमान राखणारा रस्त्यावर उघड्यावर बसला. पण,



**भोरचे आमदार संग्राम थोपटे हे पुष्पगुच्छ व मावळ्याची पगडी घालून शरद पवार यांचे स्वागत करताना. शेजारी संजय राऊत यांचेही स्वागत होताना.**

सर्व लक्ष एका राज्यावर आहे आणि ते राज्य म्हणजे, 'गुजरात.' गुजरातची त्यांना जास्त आस्था आहे. पण, ती ठेवत असताना अन्य राज्यं संकटात टाकायची, गरिबी करायची आणि इतर राज्यातील साधन संपत्ती गुजरातला जाईल कशी हे काम करायचे. याचा अर्थ हे गृहस्थ देशाचे प्रधानमंत्री होऊ शकत नाही. ते एका राज्याचे होतात आणि एका राज्याचा विचार त्याच्याकडे ढुंकून बघायचं काम मोदी सरकारने केले नाही. त्यामुळे, त्यांच्या गॅरंटीवर आज आमचा कुणाचाच विश्वास नाही.

रोजगार, बेकारी, महागाई हे प्रश्न आज देशामध्ये महत्त्वाचे आहेत. पण, ते यासाठी काहीच करत नाहीत. हजारोंच्या संख्येने तरुण आज वणवण फिरत आहेत. आत्ता स्टेजवर




बसल्या बसल्या मला सांगितले की, अमुक मुलाला साहेब नोकरीची व्यवस्था करा. आज कुठेही गेला तरी तरुणांची शक्ती देशाच्या भल्यासाठी वापरण्याऐवजी त्यांना बेकार ठेवणे आणि एक प्रकारचे त्यांना संकटात ढकलणे हेच काम आजचे राज्यमंत्री करत आहेत.

सत्ता ही लोकांसाठी वापरायची असते. राऊत साहेबांनी काय केले. तुमच्यासारख्या सर्वसामान्यांचा आवाज मांडला. वर्तमानपत्रातून तुमचे दुखणे मांडले. त्यांना अटक केली. म्हणून त्यांना काही महिने तुरुंगात टाकले. महाराष्ट्राचे गृहमंत्री अनिल देशमुख, काय केले त्यांनी? एक कॉलेज काढले आणि त्या कॉलेजसाठी देणगी घेतली. तर, त्यांच्यावर खटला दाखल केला आणि त्यांना वर्षभर तुरुंगामध्ये टाकले. असे कित्येक उदाहरणे सांगता येतील. सत्तेचा गैरवापर कसा करावा याचा आदर्श आज या सरकारने दाखवलेला आहे आणि त्यामुळे साहजिकच आहे या सर्व गोष्टींना कुठेतरी आवर घातला पाहिजे. आणि तो आवर घालायचा असेल तर बदल केल्याशिवाय गत्यंतर नाही आणि ती बदल करण्याची संधी उद्याच्याला तुम्हाला जेव्हा मतदानासाठी जायचे असेल त्या दिवशी जा आणि तुतारी समोरचे बटन दाबा आणि या ठिकाणी परिवर्तन करा.

आज तुम्हा सर्वांसमोर उमेदवार म्हणून सुप्रियाची उमेदवारी या ठिकाणी मी देतो. तुम्ही सर्वांनी तिला कायमच निवडून दिले. पहिल्या क्रमांकाचे जे खासदार आहेत. काम करण्यासाठी ज्यांचा नावलौकिक आहे. त्यामध्ये तुमच्या उमेदवाराचे नाव आहे. आज प्रकर्षाने ९८ टक्के हजेरी पार्लमेंटमध्ये ज्यांची आहे, त्यामध्ये तुमच्या उमेदवाराचे नाव घेतले जाते. आणि उत्तम पार्लमेंटचा सभासद म्हणून जो पुरस्कार मिळतो तो एकदा नाही तर ७ वेळेला ज्यांना पुरस्कार मिळाला असा उमेदवार तुमच्या सर्वांसमोर आहे. म्हणून त्यांना भरगच्च मतांनी निवडून देण्याचे काम तुम्हाला करायचे आहे. एक गोष्ट मला मुद्दाम सांगायची आहे की, संग्राम थोपटे यांच्या हातामध्ये तुम्ही या तालुक्याचे नेतृत्व दिले. या सर्व भागातील लोकांचे जे काही दुखणे असेल ते दूर करण्याच्या दृष्टीने त्यांच्यावर ही जबाबदारी टाकली. आज तुम्हा सर्वांच्या साक्षीने मी तुम्हाला सांगतो, संग्राम तुम्ही जे काही या तालुक्यासाठी कराल, जिल्ह्यासाठी कराल, राज्यासाठी कराल, तुमच्या पाठीशी शरद पवार हा कायम उभा राहील. आज पर्यंत आपण वेगवेगळ्या रस्त्याने गेलो असू, पण इथून पुढे शरद पवारांचा पाठिंबा असल्याचा नंतर विकासाच्या संदर्भात राजकारणात काय परिवर्तन दाखवू शकलो हे दाखवल्याशिवाय मी राहणार नाही. हा विश्वास भोर तालुक्याच्या जनतेला देतो. आणि त्यांच्यासारख्या तरुण कार्यकर्त्याला एक प्रकारचे काम करण्याची संधी आपण देऊ हीच खात्री या ठिकाणी बाळगतो. आणि माझे दोन शब्द संपवतो. जय हिंद, जय महाराष्ट्र..!

■■■

खरं तर इथे बसल्या बसल्या माझं आणि भोरचं नातं या प्रवासाचा मी विचार करत होते. मी पहिल्यांदा २००७ साली बारामती लोकसभा मतदारसंघाचा निर्णय काँग्रेस आणि राष्ट्रवादीनं घेतला, की मी लोकसभा लढणार आणि तेव्हा मी पहिल्यांदा भोर आणि या भागात आले. आधी अनेक वेळा गड आणि किल्ले चढायला आले होते. पण एक राजकीय पार्श्वभूमी घेऊन त्यावेळी पहिल्यांदा मी इथे आले आणि तेव्हापासून येथील लोकांशी माझं नातं सुरू झालं. सगळ्यांच्या आशीर्वादानं मी पहिल्यांदा थोपटे साहेबांच्या घरी गेले. त्यांचा आशीर्वाद घेतला. त्यानंतर या सगळ्या भागात भोर, वेल्हा, मुळशीमध्ये मी कामाला सुरूवात केली. सगळ्यांच्या सहकार्यानं मी २००९, २०१४, २०१९ या तिन्ही निवडणुकांमध्ये आपण मोठ्या संख्येनं मला मतदान करून दिल्लीला पाठवलं, याबद्दल सुरूवातीला मी विनम्रपणे आपल्या सगळ्यांचे आभार मानते.

पहिली पाच वर्षे सत्तेतली खासदार होते. गल्लीपासून दिल्लीपर्यंत आपली सगळ्यांची सत्ता होती. त्याच्यामुळं कामं होत होती. संघर्षाचा विषयच नव्हता. आम्ही इतकी वर्षे सत्तेत राहिलो, की आता अरे बापरे संघर्ष करायचांय का याचाही विचार आता करावा लागतो. आंदोलनाची वेळ जेव्हा येते, तेव्हा शिवसैनिक ताकदीने उतरतात. काँग्रेस आणि राष्ट्रवादीचे कार्यकर्ते म्हणतात, की अच्छा आता आंदोलन करायचंय का. खाली बसायचं म्हटलं, की शर्ट खराब होतो. म्हणजे वेगळ्या व्यवस्थेत राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस वाढलेली आहे. त्याच्यामुळे पहिल्यांदाच ही दहा वर्षे सगळ्यांनाच संघर्ष वाटतोय. पण, मला आता त्याची इतकी सवय झालीय, की आता सत्तेत गेल्यानंतर काय भाषण करायचं हा एक मोठा प्रश्न पडलेला आहे. जितका जास्त संघर्ष ना, उतना जादा मजा आ रहा है. पहिले काही दिवस गेले, की आता कसे होणार, काय होणार. पण आता काही महिन्यांनी वाटतंय, की अरे वा हे तर जास्त चांगलं आहे. त्याच्यामुळं ही लढाई कुठल्या व्यक्तीशी नाही आणि महाराष्ट्रात तर कुणाशीच नाही. माझी ही लढाई दिल्लीच्या तख्ताच्या अदृश्य शक्तीच्या विरोधात आहे, ज्यांनी आज महाराष्ट्राच्या विरोधात रान उठवलं आहे.

महाराष्ट्राचा विरोध आणि द्वेष करण्यासाठी केंद्र सरकार



आज आपल्या मागे लागलं आहे. पक्ष फोड, घरं फोड, आत्ताच बाळासाहेबांनी ईडीचा उल्लेख केला. अहो, कालचीच आमची घटना विचार करा, रोहित पवारांच्यावर काल हल्ला केला गेला. काय केलंय रोहित पवारांनी? कारखाना काढला. तसंच या राज्यामध्ये आणखी साठ लोकांनी असा कारखाना काढला. पण ते साठच्या साठ आज भारतीय जनता पक्षात आहेत किंवा त्यांच्या मित्र पक्षात आहेत. रोहित गेला नाही, म्हणून रोहितच्या मागे ईडी लागली. मी अनेकवेळा या आईसबद्दल बोलते. इंग्रजीमध्ये आईस म्हणजे बर्फ. पण हा आईस म्हणजे इन्कम टॅक्स, ईडी आणि सीबीआय. तुम्ही आमच्या बाजूनं आला तर तुम्हाला माफी. आणि जर नाही आला तर रोहितचं जे केलं ते.

लांब कशाला, सगळ्यात नवीन उदाहरण मी तुम्हाला देते. मी स्वत: माझ्या डोळ्यांनी पाहिलंय आणि कानांनी ऐकलंय. पार्लमेंटमधली गोष्ट आहे. या देशाच्या अर्थमंत्री त्याठिकाणी आल्या आणि म्हणाल्या आम्ही आज भ्रष्टचार काढणार आहोत. म्हटलं, अहो कुणाचा भ्रष्टाचार? तर म्हणाले, की काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षाचा. म्हटलं, साडेनऊ वर्षे सत्तेत होता, तेव्हा नाही तुम्हाला आमचा भ्रष्टाचार दिसला आणि आता काय झालं, की तुम्हाला भ्रष्टाचार दिसायला लागला. त्या आल्या आणि त्यांनी सांगितलं, की हा घ्या व्हाईट पेपर म्हणजे पांढरा कागद. म्हटलं, हा कसला पांढरा कागद? त्या म्हणाल्या, की भ्रष्टाचाराचा पांढरा कागद. आम्ही म्हटलं, कुठला भ्रष्टाचार? पहिलं भ्रष्टाचाराचं नाव, आदर्श भ्रष्टाचार. आता भ्रष्टाचारी आदर्श होते हे पहिल्यांदाच ऐकायला मिळालंय. हा आरोप मी नाही करत, भारतीय जनता पक्षाच्या, देशाच्या अर्थमंत्री करतायंत. गुरूवारी सव्वा चार वाजता त्यांनी हा आरोप केला. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सव्वा अकरा वाजता चर्चा सुरू झाली आणि त्यांनी सांगितलं, की या देशात सगळ्यात जास्त भ्रष्टाचार वीरपत्नींच्या विरोधात कुणी केला असेल, तर तो काँग्रेस पक्षानी केला आणि त्याला जबाबदार कोण आहे तर त्या माणसाचं नाव अशोक चव्हाण आहे. हे मी म्हणत नाहीये, भारतीय जनता पक्ष म्हणतोय. इथून काँग्रेसला मदत करावी म्हणून राष्ट्रवादी उतरली. अशोक



# निवडणुकीची ही लढाई महाराष्ट्राच्या अस्मितेची

सुप्रिया सुळे




चव्हाणांनी भ्रष्टाचार केला नाही असे आम्ही म्हणत होतो आणि आमच्यामध्ये वाद-युक्तीवाद सुरू होता. ते सातत्यानं म्हणत होते, की अशोकराव भ्रष्टचारी आहेत, आहेत. आणि आम्ही म्हणत होतो नाही, नाही. हा झाला शुक्रवार. शनिवार-रविवार पार्लमेंट नव्हतं. सोमवारी सकाळी पावणे आठ वाजता मी टीव्ही लावला बातम्या बघायला आणि त्यामध्ये येत होतं, की अशोक चव्हाण नॉट रिचेबल. मी फारसं लक्ष दिलं नाही. दुपारी पत्रकार आले आणि त्यांनी सांगितलं, की अशोकराव सापडले. भारतीय जनता पक्षाच्या ऑफिसमध्ये. सोमवारी प्रवेश, मंगळवारी फॉर्म भरला आणि बुधवारी भारतीय जनता पक्षाचे खासदार म्हणून त्यांचा शपथविधी.

अशोक चव्हाणांनी भ्रष्टाचार केला की नाही केला हे मला माहित नाही. पण, मला भारतीय जनता पक्ष आणि त्यांच्या मित्र पक्षांना विचारायचंय, की ना खाऊंगा, ना खाने दूंगाचं काय झालं? अशोक चव्हाणांनी जर भ्रष्टाचार केला असेल, तर काय करायचं हे तुम्हाला माहिती आहे आणि जर केला नसेल तर भारतीय जनता पक्षानं हात जोडून काँग्रेस पक्षाची माफी मागितली पाहिजे. कुणासाठी चाललंय हे सगळं? पक्ष फोड, घरं फोड. याचा अर्थ त्यांची ताकदच नाहीये. दहा वर्षात आम्हाला विचारतायंत, की सत्तर वर्षे तुम्ही काय केलं? माझ्याकडं त्याचं उत्तर आहे. मला सांगा, आपण हरिश्चंद्री, भोर, वेल्ह्यात बसलेलो आहोत. तुमच्याकडं वीज कोणी आणली? काँग्रेसनं आणली की भारतीय जनता पक्षानं आणली. कॉलेज, अंगणवाडी, शाळा, हॉस्पिटल्स, औषधे, बँका, दूधाचा व्यवसाय कोणी काढला सांगा मला. थोपटे साहेबांच्या नावानी सगळ्यात मोठा दुधाचा संघ इथे आहे की नाही. रस्ते बांधणी, शेतकऱ्याला हमी भाव हे सगळं काँग्रेसनं दिलं. मग दहा वर्षात आपल्या पदरात यांनी काय पाडलं, तर महागाई आणि बेरोजगारी.

इथे भोर आणि वेल्ह्यातले सगळी लोकं कष्ट करणारे आहेत. दुधाचा सगळ्यात मोठा व्यवसाय आपल्या भागातून होतोय. मुळशीतले पण काही लोकं आहेत. मला खरं सांगा, जेव्हा दुधाचं आंदोलन झालं, पाच रूपये वाढवून द्यायचा निर्णय घेतला. वाढवले का या सरकारनी. कुणाला तरी पाच रूपये मिळाले का? आणि सहा हजार रूपये देतात ते कुणासाठी? अरे, सहा हजार रूपयांनी काय आपल्या पदरात पडणार आहे? मी तुम्हाला शब्द देते. आज इथे आदरणीय पवार साहेब आणि राऊत साहेब आहेत, उद्धवजींशी चर्चा करून तुम्हाला सांगते, की राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि जेव्हा काँग्रेसचं राज्य येईल, तेव्हा या राज्यात सगळ्यात मोठी कर्जमाफी कोण करेल तर ते आमचं सरकार करेल. दहा लाख कोटी रूपये माफ केले या भारतीय जनता पार्टीनी, पण ते तुमचे नाही माफ केले, तर




ते उद्योगपतींचे माफ केले. पण, आपल्यासाठी एक लाख कोटी रूपयेही नाहीत. या देशामध्ये शाहू महाराजांनंतर जर कुठली कर्जमाफी झाली असेल, तर ती मनमोहनसिंग आणि आदरणीय पवार साहेबांनी केलेली सत्तर हजार कोटी रूपयांची कर्जमाफी झाली की नाही हे मला सांगा. दहा वर्षे यांचं सरकार आहे. माझी मागणी आहे या सरकारकडे, की कर्जमाफी करा आणि आमचं वीजेचं बिलही माफ करा. त्यांनी नाही केलं तर आपलं सरकार आल्यावर आपण हे सगळे निर्णय घ्यायचेत.

आज मी या व्यासपीठावरनं थोपटे साहेब, सोनियाजी आणि उद्धवजींची, जी मी मनापासून विनंती केली होती, की मला इथून पुन्हा एकदा संधी द्या आणि त्याला होकार दिल्याबद्दल त्यांचे मनापासून, अंत:करणापासून आभार मानते. आज तुम्ही बघताय, की तिन्ही पक्षाचे कार्यकर्ते पूर्ण ताकदीनं कामाला लागले आहेत. मोठ्या अपेक्षेनं ही सभा होत आहे. अपेक्षा काय, तर विकास. या दहा वर्षात कुठला विकास झालाय हो. मी आणि संग्राम दादा आतापर्यंत झालेलं विकासाचं काम पुढं न्यायचा प्रयत्न करत आहोत. आज आमच्यावर टीका टिप्पणी होतेय. आपलीच लोकं विरोध करतायंत. त्यांच्या काय अडचणी आहेत हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. मी एक शब्द तुम्हाला देऊ शकते, की आम्ही पूर्ण निष्ठेने महाविकास आघाडीसाठी काम करू. तिन्ही पक्ष ज्या ज्या ठिकाणी लढणार आहेत, त्या सर्व ठिकाणी आपण सर्वजण एकमेकांसाठी काम करणार आहोत.

आज या भागामध्ये किती तरी गोष्टी झालेल्या आहेत. पर्यटनासाठी आम्ही निधी आणला. संग्राम दादा तुम्हाला आठवत असेल, आपलं सरकार असताना मी उद्धवजींचं आभार मानते, की उद्धवजींनी आपल्या सईबाईंच्या समाधीसाठी साडे तीनशे कोटी रूपयांचा निधी हा महाविकास आघाडी सरकारच्या काळात दिलेला आहे. आपला तोरणा असेल, राजगड असेल याच्यासाठी सगळा निधी महविकास आघाडी सरकारच्या काळात आला. हर घर जल या स्कीमवर कुणाची सही आहे? गावा गावात पाण्याच्या स्कीम झाल्या. कोणी केल्या या स्कीम? त्या महाविकास आघाडीच्या काळात झालेल्या आहेत. काही ठिकाणी यामध्ये भ्रष्टाचार झाल्याचं सांगितलं जातं. माझ्या मतदारसंघात तर झालेला नाही. पण यासाठी महाराष्ट्र सरकारनं व्हाईट पेपर काढला पाहिजे. जिथे जिथे भ्रष्टाचार झाला असेल, तो पारदर्शकपणे भारतीय जनता पक्षाने सांगितला पाहिजे.

आरक्षणाचा मुद्दा आहे. मराठा, धनगर, लिंगायत, मुस्लिम समाज आणि भटक्या विमुक्त समाजाच्या आरक्षणासाठी सगळ्यात जास्त कोण खासदार बोलला असेल या राज्यामध्ये आणि या देशामध्ये, तर त्या खासदाराचं

नाव सुप्रिया सुळे आहे. आरक्षणाची जी मागणी आपल्या सगळ्यांचीच आहे. चर्चेला आम्ही तयार आहोत. तुम्हीही चर्चा करा. आमच्या घराच्या बाहेर येऊन देवेंद्रजी म्हणाले होते, की आम्हाला एक संधी द्या, पहिल्या कॅबिनेटमध्ये




आम्ही धनगर समाजाला आरक्षण देऊ. मराठा समाजाच्या आरक्षणाचं तेच केलं. फसवणूक नाही झाली? ही सगळी जी फसवाफसवी चालली आहे, ती फक्त पन्नास खोके, एकदम ओके नाहीये तर हे ट्रिपल इंजिन खोक्याचं सरकार आहे. मघाशी कांद्याचा विषय निघाला. पालकमंत्रीपदासाठी सगळे दिल्लीला जातात, सीट कमी दिल्या म्हणून रडत दिल्लीला जातात. कधी तुमच्या कांद्याच्या भावासाठी दिल्लीला गेलंय का? तुमच्या दुधाला पैसे मिळावेत म्हणून कुणी दिल्लीला गेलंय का? हे फक्त स्वत:च्या स्वार्थासाठी झालेलं हे सरकार आहे. छत्रपतींच्या पदस्पर्शानं पावन झालेली ही भोरची भूमी आहे आणि या भूमीत आम्ही स्वाभिमानी लोकं आहोत आणि जेव्हा जेव्हा हिमालयाला गरज पडली, तेव्हा हा सह्याद्री उभा राहिला हा आमच्या भारताचा स्वाभिमानी इतिहास आहे.

ही लढाई मोठी आहे. पण, खूप मजा येतेय या लढाईमध्ये. कारण, आपण सत्याच्या बाजूनं आहोत. आज काल अनेक जण मला म्हणतात, की धार आलीय. हो धार आलीय माझ्या भाषणाला. त्याचं कारण, माझ्याकडे दोन मार्ग होते. एका बाजूला सत्ता आणि अदृश्य शक्ती होती आणि एका बाजूला विचार, संघर्ष आणि वडील. सत्ता की संघर्ष यामध्ये मी संघर्षाची निवड केली, कारण सुप्रिया सुळे ही एक स्वाभिमानी मुलगी आहे. अहो, काय अन्याय केलाय त्यांनी, आदरणीय पवार साहेब आणि कै. बाळासाहेब ठाकरे. बाळासाहेब हे आमच्यासाठी वंदनीय प्रिय आहेत आणि आयुष्यभर राहतील. उद्धवजी आम्हाला मोठ्या भावासारखे आहेत. बाळासाहेब ठाकरेंनी पक्ष स्थापन केला, बाळासाहेब हयात असताना त्यांनी तो पक्ष उद्धवजींकडं दिला आणि दहा वर्षे उद्धवजींचं काम बघून त्यानंतरच आपण सगळ्यांनी म्हणजे जे तिकडे गेले आहेत त्यांनीसुद्धा उद्धवजींनाच नेता मानलं होतं. आणि नंतर काय झालं? अदृश्य शक्तीनं काय जादू केली माहिती नाही, पण माझी सगळ्या कार्यकर्त्यांना विनंती आहे, की हे युबीटी वगैरे काही नाही. आपल्यासाठी एक शिवसेना आहे, जी उद्धवजींची शिवसेना आहे. आता ज्यांनी काय चोरून बिरून

नेलंय त्याला काही किंमत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही तिच परिस्थिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन आदरणीय पवार साहेबांनी केला. पक्ष आणि चिन्हावर त्यांचाच अधिकार आहे. म्हणून आम्ही लढाई लढतोय. अरे, प्रेमानं मागितलं




भोर तालुक्यात सुप्रिया सुळे यांच्या प्रचारासाठी झालेल्या पहिल्या भव्य सभेला शरद पवार, बाळासाहेब थोरात, संग्राम थोपटे, विदुरा नवले, अशोक मोहोळ, शशिकांत शिंदे, जगन्नाथ शेवाळे हे नेते उपस्थित होते.

असतं तर दिलदारपणानं दिलं असतं. पण, ही अदृश्य शक्तीची लढाई मराठी माणसाच्या विरोधात आहे.

आज बाळासाहेब ठाकरे, आदरणीय पवार साहेब, थोपटे साहेब, नवले साहेब, कोण आहेत ही सगळीजणं? ही महाराष्ट्राच्या मातीत शून्यातून उभे केलेले मोठे नेते आहेत. ती महाराष्ट्राची आन, बाण आणि शान आहेत. जर अदृश्य शक्तीला वाटत असेल की ते इथे येऊन महाराष्ट्राचं वाटोळं करतील तर ते आम्ही करू देणार नाही. इंदापूरला हर्षवर्धन पाटील हे भारतीय जनता पक्षाचेच नेते आहेत. पण, आमचे भाऊ आहेत. मी कधी विसरणार नाही भाऊंनी मदत केलेली. त्यांना शिवीगाळ केली. मी प्रत्येकाला इथं सांगतेय, की दमदाटी करायची नाही. हा बारामती लोकसभा मतदारसंघ आहे आणि मी इथली खासदार आहे. आजनंतर कोणीही कुणालाही दमदाटी केली ना तर ढाल म्हणून सुप्रिया सुळेंशी त्यांची पहिली गाठ आहे. त्याच्यानंतर तुम्हाला. त्याच्यामुळं दमदाटीला बिल्कूल घाबरू नका. अनिल देशमुख, नवाबभाई, राऊत साहेब हे काय ईडी बिडीला घाबरले नाहीत. राऊत साहेब तीन महिने आतमध्ये जाऊन आले. तरीही त्यांची तोफ चालूच आहे. नाही कुणाला घाबरत. म्हणून तर स्वाभिमानी आहेत.

आज ही लढाई महाराष्ट्राच्या अस्मितेची आहे आणि माझं काम हे सेवा, सन्मान आणि स्वाभिमानाचं आहे. सेवा मायबाप जनतेची, सन्मान महिलांचा, ज्येष्ठ नागरिकांचा आणि शेतकऱ्यांचा आणि स्वाभिमान तुमच्या माझ्या महाराष्ट्राचा. आज नवीन चिन्हानी ही नांदी आज सुरू होतेय आणि माझा विश्वास आहे, आपण जी साथ इतकी वर्षे दिली, तो आशीर्वाद, प्रेम आणि विश्वास हा तुतारीवाल्या माणसाच्या शेजारचं बटन दाबून पुन्हा एकदा या भागाची लोकप्रतिनिधी जबाबदारी आणि काम करण्याची संधी आपण मला द्याल. पुन्हा एकदा मी थोपटे साहेबांचे मन:पूर्वक आभार मानून आपली रजा घेते.

■■■




# मावळ्यांनी ठरवलं तर असाध्य काहीच नाही

## आमदार संग्राम थोपटे

आजचा हा मेळावा, ताई हा तुमच्या विजयाचा मेळावा आहे आणि एकदा भोर, वेल्हा तालुक्यातल्या मावळ्यांनी ठरवलं तर कुठल्याही गोष्टी असाध्य होत नसतात. गेल्या अनेक वर्षांची मावळ भूमीची ही परंपरा आहे, की ज्या ज्या वेळेला इथं परकीय आक्रमणं झाली, त्या त्या वेळेला इथल्या मावळ्यांनी वज्रमूठ त्याठिकाणी ठेऊन ही आक्रमणं परतावण्याचं काम याठिकाणी केलेलं आहे. बारामती मतदारसंघातला पहिला मेळावा भोरमध्ये झाला पाहिजे असं आम्ही साहेबांना सांगितलं आणि साहेबांनीही तशी वेळ दिली. छत्रपती शिवाजी महाराजांनी जिथं स्वराज्याचं पहिलं तोरण बांधलं तो तोरणा किल्ला, स्वराज्याची शपथ घेतली तो रायरेश्वर किल्ला याच मावळच्या मातीमध्ये आहे. छत्रपतींचा वारसा आहे. छत्रपतींनी निवडक मावळ्यांना घेऊन हिंदवी स्वराज्याची निर्मिती केली. आज खऱ्या अर्थानं पुन्हा ती वेळ आली आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

ही निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे. बारामती मतदारसंघाबाबत लोक तर्कवितर्क करत आहेत. बारामती, दौंड, खडकवासला आदी भागातले नेते सक्षम आहेत. त्यांनी निर्णय घेतलेला आहे. पण, भोर, वेल्हा या आपल्या तालुक्यातल्या आपण सर्वांनी ठामपणे निर्णय घेऊया की या निवडणुकीमध्ये ताईंच्या पाठीमागं भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प या मेळाव्याच्या निमित्तानं केला पाहिजे. आज काळ बदलत चाललांय. महागाई असेल, भ्रष्टाचार असेल, शेतकऱ्यांचे प्रश्न असतील, बेरोजगारीचे प्रश्न असतील, याच्या विळख्यामध्ये जनता अडकलेली आहे. जनतेचे अनेक प्रश्न आहेत. जनता त्रासलेली आहे. त्याला योग्य दिशा दाखवण्याचं काम या ज्येष्ठ मंडळींनी करणं गरजेचं आहे.

मी आघाडीतला एक छोटासा कार्यकर्ता आहे. तालुकास्तरावर जे नियोजन आम्हाला द्याल, शंभर टक्के पार पाडण्याची जबाबदारी कार्यकर्ता या नात्यानं माझी आहे.

पूर्वीचा कुठलाही संदर्भ लोकं जोडतात. कोण म्हणतंय, ९९ला काय झालं. कोण म्हणतं, विधानसभेला काय झालं. कोण म्हणतं, १९ला काय झालं. या मंडळींना साहेब तुमच्या काळामध्ये तुम्ही लाभार्थी पदं दिली. या तालुक्यामध्ये ज्यांनी ज्यांनी तुमचं नाव घेऊन राजकारण केलं, ती मंडळी आम्हाला तर कायम विरोध करतच होती. पण, आज तुम्हाला सुद्धा विरोध यानिमित्तानं दुर्दैवानं करतायंत. त्या मंडळींचा खऱ्या अर्थानं बंदोबस्त करण्याची वेळ यानिमित्तानं आलेली आहे.

लोकशाही पद्धतीनं निवडणुका होऊ द्या. जनता सूज्ञ आहे. या भोर तालुक्याचं मी पूर्वी पाहिलंय, १९९९ सालामध्ये माझे वडील याठिकाणी आमदार असताना, त्यावेळी भाषणामध्ये त्यांनी एक संकल्पना मांडली होती. त्यावेळेला सुद्धा अशीच राजकीय स्थित्यंतरं झाली. त्यावेळेच्या काळात त्यांनी घोषणा दिली, की राहिले ते मावळे, उडाले ते कावळे. आज सुद्धा याठिकाही ही घोषणा लागू पडेल अशी परिस्थिती नव्हता म्हणून ताईंच्याबरोबर होता का हा प्रश्न मला त्यांना विचारायचांय. विकासाच्या मुद्यावर जर आज तुम्ही तिकडं जात असाल, तर विकास, विकास काय आहे हे तुम्ही माझ्यासमोर बसा, या तालुक्याचा विकास पंधरा वर्षात कशा पद्धतीनं झाला हे मी तुम्हाला त्याठिकाणी सांगायला तयार आहे. परंतु, कुठंतरी वेडंवाकडं बोलायचं, एमआयडीसीच्या प्रश्नावर तरूणांच्या बेरोजगारीचा प्रश्न तयार करायचा अशा पद्धतीचं घाणेरडं राजकारण या मतदारसंघामध्ये सुरू आहे. भोरच्या एमआयडीसीचा प्रश्न १९९२ साली माझे वडील मंत्री असताना मोठा प्रयत्न केला. परंतु, निवडलेल्या जागेसंदर्भात स्थानिकांनी विरोध केला आणि तो आजतागायत सुरू आहे. त्यामुळं तो प्रश्न मार्गी लागला नाही. परंतु, दुर्दैवानं त्याचं खापर आमच्या माथ्यावर फोडायचं आणि निवडणूक आली की आपली पोळी भाजायची हा कार्यक्रम या मंडळींचा आहे.

त्यामुळं, येणारा काळ हा या तरूणांना रोजगार मिळवून



**माजी खासदार व संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन विदुरा उर्फ नानासाहेब नवले यांची आवर्जून विचारपूस करताना सुप्रिया सुळे शेजारी अशोक मोहोळ व संग्राम थोपटे.**

आहे. आणि म्हणून निष्ठावंत मावळे जे याठिकाणी आहेत, त्यांनी तो शब्द दिल्यानंतर तो पाळल्याशिवाय राहात नाहीत असा या भूमीचा आजपर्यंतचा इतिहास आहे.

साहेब, तुम्ही या वयामध्येही अनेक ठिकाणी प्रवास करता. एक उर्जास्त्रोत म्हणून आम्ही सर्व तुमच्याकडं पाहत असतो. ताईंच्या माध्यमातून या मतदारसंघामध्ये लाखो रूपयांची कामं झाली. आम्ही सुद्धा कामं केली. पण, आता पूर्वीची बरोबर असणारी आणि आता विरोधात असणारी लोकं आता म्हणतायंत, की आम्ही विकासासाठी दुसऱ्या ठिकाणी गेलो. मग गेल्या पंधरा वर्षामध्ये तुम्ही विकास होत देणारा आणि चांगली दिशा देणारा यावा. तालुक्यातल्या प्रत्येक तरूणाला रोजगार मिळावा अशी आमची सर्वांची मनापासून इच्छा आहे. तालुक्यात रस्त्यांची कामे, गावांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचं काम झालेलं आहे. आत्ताची जी लढाई आहे ती स्वाभिमानाची लढाई असून, आपण ती लढत आहोत. माझी सर्व मतदार बंधू भगिनींना विनंती आहे, की लोकसभा निवडणुकीमध्ये सुप्रियाताई सुळे यांना चौथ्यांदा आपण लोकसभेत पाठवा, अशी आग्रहाची विनंती करून मी याठिकाणी थांबतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■■

शरद पवार हे या देशातल्या राजकारणातले पितामह आहेत. हा आमचा पितामह अजूनही मैदानात उभा आहे आणि लढतोय आणि लढणाऱ्याचाच इतिहास लिहिला जातो, पळपुट्यांचा नाही. सुप्रियाताईंनी मघाशी सांगितलं, की आपलं सरकार आल्यानंतर कर्जमाफी करू. नक्कीच करू. पण, गद्दारांना माफी नाही. ही लढाई केवळ बारामतीची नाहीये, तर ही महाराष्ट्राची लढाई आहे. महाराष्ट्रातली ही लढाई मोदी विरूद्ध माननीय शरद पवार, ती उद्धव ठाकरे विरूद्ध नरेंद्र मोदी अशी आहे. आपण आता विचार करायचांय, की ज्या महाराष्ट्रानं अनेक आक्रमणं परतावून लावली, मोघलांना पाणी पाजलं, जर गुजरातसारखं राज्य महाराष्ट्रावर आक्रमण करणार असेल आणि महाराष्ट्राचा सर्व उद्योग पळवून नेला जात असेल आणि त्यांचा डोळा या महाराष्ट्रात स्वाभिमान, अभिमान यासाठी लढणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि त्यांचे नेते माननीय शरद पवार, बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेली शिवसेना यांच्या पाठीत वार करून हा महाराष्ट्र ताब्यात घेण्याचा विचार कोणी करत असेल, तर हा मराठी माणूस, छत्रपती शिवाजी महाराजांचा हा मावळा जीवंत आहे हे त्यांनी लक्षात ठेवलं पाहिजे.

काही लोकं सोडून गेले. अजूनही जातील. पण, ज्यांनी त्यांना आमदार बनवलं, खासदार बनवलं, मंत्री बनवलं ती जनता आणि माननीय शरद पवार साहेब अजूनही इथं आहेत. महाराष्ट्रात चित्र असं आहे, की परवा अमित शहा आले आणि म्हणाले, की यावेळी महाराष्ट्रात मिशन ४५. अरे, मिशनच्या गोष्टी तुम्ही करू नका, तुम्ही कमिशनच्या गोष्टी करा. तुमचा पक्ष कमिशनवर पोसलेला पक्ष आहे. आम्ही मिशनवाले आहोत. आमचं मिशन आहे, की या राज्यातली प्रत्येक जागा महाविकास आघाडी म्हणून आम्ही मिळवू. या राज्यातला प्रत्येक उमेदवार हा महाविकास आघाडीचा आहे आणि त्या प्रत्येकाच्या मागे हे तिन्ही पक्ष ठामपणे उभे राहतील. त्या पद्धतीनं आम्ही काम करतोय. ४५ पार काय, ४-५ जिंकलात तरी पुरे. लाज राहील. देशाचे पंतप्रधान म्हणतात, की अब की बार, चारशे पार. हे काय बाप का राज है क्या. आम्ही म्हणतो, की अब की बार, भाजपा तडीपार. तुम्ही आमच्या कार्यकर्त्यांना तडीपारच्या नोटीसा देता, तुम्ही आमच्या नेत्यांना, सहकाऱ्यांना ईडीच्या, इन्कम टॅक्स, सीबीआयच्या नोटीसा देता, पण ही जनता २०२४च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला तडीपारची नोटीस दिल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारचं वातावरण या महाराष्ट्रात आहे.

विकासाच्या नावाखाली लोकं सोडून गेले. भारतीय जनता पक्ष, जगातला सर्वात मोठा पक्ष, नरेंद्र मोदी विकासपुरूष, अमित शहांना विकासाची कितीतरी महान दृष्टी. पण, विकास करायला लागतात काँग्रेसची माणसं, राष्ट्रवादी काँग्रेसची माणसं, शिवसेनेची माणसं. एक सुंदर कविता मी वाचली, की नागपुरी थकला म्हणून ठाण्याचा आणला, त्याच्याकडून जमेना म्हणून बारामतीचा बघितला. तो पुरेना म्हणून नांदेडवाल्याचा हात धरला, बघू आता तरी कमळाबाईचा पोटी विकास पैदा होतो का? स्वत:ला विकास होत नाही, म्हणून हे तीन-तीन बाहेरचे नवरे. त्यांच्यानेसुद्धा



होणार नाही. या महाराष्ट्राचा, देशाचा विकास गेल्या सत्तर वर्षात झाला, तो काँग्रेस पक्षानं केला. काँग्रेसशी आमचे मतभेद होते. पण, यांना वाटतंय, की हा देश २०१४ साली निर्माण झाला. त्याच्याआधी हा देशच नव्हता. काय विकास केला यांनी? एक नंबरचे ढोंगी आणि खोटारडे लोक आहेत हे.

आमचं सरकार नक्की येतंय, केंद्रात आणि महाराष्ट्रात. मोदी सरकारनं गेल्या काही वर्षात इतक्या लोकांना भारतरत्न दिलेला आहे, पण, एक स्पेशल भारतरत्न मला मोदींना




# अब की बार भाजप तडीपार

**संजय राऊत**

द्यायचांय. इतक्या जलदगतीनं फेकाफेक करणारा माणूस या जगात दुसरा जन्माला आला नाही. तो भारतात जन्माला आला. भारतीय जनता पक्षात जन्माला आला. किंवा या फेकाफेकीचा एक खेळ म्हणून ऑलिम्पिकमध्ये समावेश करावा आणि या खेळाचा वस्ताद म्हणून नरेंद्र मोदींची नेमणूक करावी अशा प्रकारचा विचार आपल्याला करावा लागेल. हातामध्ये बॅट न धरता अमित शहांचा मुलगा जय शहा भारतीय क्रिकेट मंडळाचा अध्यक्ष झाला. हे असे चोर, लफंगे, ढोंगी, थोतांडे लोकं या देशावर आणि महाराष्ट्रावर राज्य करतायंत आणि जय श्रीराम म्हणतायंत. श्रीरामाचं नाव घ्यायची तर यांची लायकी आहे का. राम हा सत्यवचनी होता. एकनिष्ठ होता. कुटुंबवत्सल होता. हे सांगतात, मेरा देश, मेरा परिवार. मग या देशातला शेतकरी आत्महत्या करतोय, काश्मिरी पंडित अजूनही निर्वासितांच्या छावणीत राहतायंत, मणिपूर पेटलंय, महिलांची नग्न धिंड काढली जातेय. ही सर्व जनता त्यांच्या परिवारात येत नाही. जवान हुतात्मा होतायंत. यांचा परिवार फक्त दोघांचा आहे. ते आणि अमित शहा. याच्याशिवाय त्यांना परिवार नाही.

मला खात्री आहे, की ज्या प्रकारचा उत्साह आपण दाखवतांय, ज्या प्रकारची निष्ठा आपण दाखवतांय, शिवसेना असेल, काँग्रेस असेल आम्ही सर्वजण या लढाईमध्ये पवार साहेब तुमच्या पाठीशी आहोत. ही महाराष्ट्राच्या अस्मितेची, मराठी माणसाच्या अभिमानाची लढाई आहे, संयुक्त महाराष्ट्राच्या काळात प्रत्येक गद्दाराला गाडण्याचं काम या मराठी माणसानं केलं आणि हा महाराष्ट्र निर्माण झाला. आज तेच वातावरण या महाराष्ट्रामध्ये आहे आणि आपण सगळ्यांनी शपथ घेतली पाहिजे, की महाराष्ट्रावर येणारं आक्रमण आपण परतवून लावू. सुप्रिया ताई, तुम्ही या मतदारसंघातून विक्रमी मताधिक्यानं निवडून याल यासाठी इथला प्रत्येक शिवसैनिक काम करेल आणि सोबतीला संग्राम थोपटे आहेतच. एवढंच सांगतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

■■■



# संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीची

आजचा दिवस हा चव्हाण साहेबांच्या जयंतीचा दिवस आहे. एक अत्यंत सर्वसामान्य कुटुंबामध्ये ज्यांचा जन्म झाला. त्यांच्या घरामध्ये एकंदर पार्श्वभूमी हालाखीची होती. पण, अतिशय कष्टाने त्यांनी ज्ञान संपादन केले. आणि हे करत असताना आज आपण भाग्यवान आहोत. आपण स्वातंत्र्य भारताचे नागरिक आहोत. पण त्या कालखंडामध्ये परकीयांचे राज्य होते. आणि त्या परकीयांच्या राज्याला या देशातून घालविण्यासाठी आपले सर्वस्व देण्याची जी पिढी होती त्या पिढीचे चव्हाण साहेब हे घटक होते.

अनेक वर्ष चव्हाण साहेबांनी तुरुंगात काढली, संघर्ष केला. आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या स्वातंत्र्याचा अर्थ सर्वसामान्य माणसाच्या जीवनामध्ये काही सुधारणा झाली पाहिजे. परिवर्तन आले पाहिजे. हे दाखवण्यासाठी ज्यांनी कष्ट केले त्या स्वातंत्र्याच्या नंतरच्या पिढीमध्ये ज्यांचे स्मरण आपल्याला कायम करावे लागेल त्यात या महाराष्ट्रामध्ये चव्हाण साहेबांचा उल्लेख हा प्रकर्षाने करावा लागेल.

१९४६ च्या आधी महाराष्ट्राच्या तेव्हाच्या मुंबईत ते मुंबई राज्याच्या विधिमंडळाचे सदस्य होते. सुरुवातीच्या काळामध्ये त्यांना राज्य सरकारमध्ये प्रशासनाची जबाबदारी प्राप्त झाली.






# अपेक्षा चव्हाण साहेबांकडून पूर्ण

**शरद पवार**

**आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण साहेबांची १२ मार्च रोजी जयंती होती. त्यानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने दिला जाणारा २०२३ सालचा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार' ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सौम्या स्वामीनाथन यांना खासदार शरदचंद्र पवार यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी शरद पवार यांनी केलेले हे भाषण...**

आणि ती करत असताना हे राज्य तेव्हा त्या काळातले दोन राज्यांनी एकत्रित असलेले असे राज्य होते. गुजरात आणि महाराष्ट्र यांना एकत्रित ठेवणे हे महाराष्ट्राच्या आणि गुजरातच्या जनतेला मान्य नव्हते आणि त्यावेळेला संयुक्त महाराष्ट्राचा संघर्ष हा त्या काळात महाराष्ट्र मध्ये झाला आणि संयुक्त महाराष्ट्राचे पूर्तता ही व्हावी यासाठी जनतेची जी अपेक्षा ती अपेक्षा पूर्ण करण्याचे ऐतिहासिक काम चव्हाण साहेबांच्या नेतृत्वाखाली १ मे १९६० साली झाले.

महाराष्ट्र राज्य झालं आणि हे राज्य एका प्रगतीच्या दृष्टीकोनातून एका रस्त्यावर आणायचे, या प्रकारची आव्हानात्मक स्थिती ही चव्हाण साहेबांकडे होती. त्यांनी अनेक निर्णय घेतले आणि त्या निर्णयातून या राज्याला आणि देशाला एक नवी दिशा दिली. आणि हे काम ते प्रभावीपणे करत असताना देशावर एक परकीयांचे संकट आले. आणि त्या संकटातून संपूर्ण देश एका अस्वस्थ परिस्थितीतून पुढे जात असताना या देशाच्या लष्कराचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी काही पावले टाकली पाहिजे, ही भूमिका त्या वेळेचे प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांनी घेतली आणि हे करायचे असेल तर महाराष्ट्रातून चव्हाण साहेबांना दिल्लीमध्ये बोलवल्याशिवाय पर्याय नाही या निष्कर्षावर ते आले.

संरक्षण खात्याची त्यांनी जबाबदारी घेतली आणि काम करत असताना त्यांनी प्रचंड परिवर्तन केले. त्या खात्यामध्ये मीही काही वर्ष काम केले. आणि माझी एक सवय होती, जे जुने कर्तृत्ववान मंत्री होते त्यांनी महत्वाच्या प्रसंगी निर्णय कसे घेतले याबद्दलची माहिती मी प्रकर्षाने घेत असे. आणि त्यातून मला स्वतःला पाहायला मिळाले की, या देशाची जी स्थिती झाली होती ती पूर्णपणे बदलण्यासाठी चव्हाण साहेबांनी संरक्षण मंत्री म्हणून अत्यंत मोलाची कामगिरी केली. त्यांच्या काळामध्ये अनेक जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. ते अर्थमंत्री होते, परराष्ट्र मंत्री होते, संरक्षण मंत्री होते, गृहमंत्री होते. एका सामान्य कुटुंबातून आलेले व्यक्तिमत्व या देशाच्या इतक्या महत्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणाने सांभाळू शकतात आणि देशासमोर एक वातावरण चांगल्या पद्धतीचे तयार करू शकतात असे एक ऐतिहासिक काम चव्हाण साहेबांनी त्या काळामध्ये केले. यामध्ये सातत्य राहील याची खबरदारी काळजी घेणे आणि आज या दृष्टीने कर्तृत्ववान लोकांचा सन्मान करण्याचा निर्णय या संस्थेने घेतला. आणि त्यासाठीच या पुरस्काराची ही परंपरा सुरू केली. सबंध यादी आपण वाचल्यानंतर त्यातली प्रत्येक व्यक्ती अशी आहे की, त्यांचे योगदान या देशासाठी आहे. काही ना काहीतरी प्रत्येक क्षेत्रासाठी त्यांनी काम केले.

जे काम नंतरच्या काळामध्ये त्यांच्या विचारांनी आम्ही केले. अनेक वैज्ञानिक त्याच्यामध्ये सहभागी झाले, त्यांनी त्यामध्ये कष्ट केले, अशांचा सन्मान डॉ. स्वामीनाथन यांनी करण्याची भूमिका घेतली होती आणि आज त्याच व्यासपीठावर त्यांचा सन्मान होतो आहे. त्यांनी अतिशय मोठे काम केले आहे. त्यामुळे, हा सन्मान होत आहे, याचा अभिमान आणि आनंद आपल्या सर्वांना आहे. मी अधिक बोलून आपल्या सर्वांचा वेळ घेऊ इच्छित नाही. चव्हाण



डॉ. सौम्या स्वामिनाथन यांना मानपत्र देवून त्यांचा सत्कार करताना शरद पवार शेजारी डॉ. अनिल काकोडकर व अरुणभाई गुजराथी.

आणि म्हणून ते केल्यानंतर या संस्थेची स्थापना आपण केली. आणि यामधून चव्हाण साहेबांना अभिप्रेत असलेले जे काम होते ते काम करण्याबद्दलचा प्रयत्न या वास्तूमधून अनेकांच्या मदतीने अखंडपणाने सुरू असतो. आणि त्या मधलाच एक भाग या देशाच्या उभारणीमध्ये कोणत्याही स्थितीत अतिशय मोलाची कामगिरी ज्यांनी केली, अशा मान्यवरांची निवड करून त्यांचा सन्मान करणे आणि असे काम करणाऱ्यांनी जे काही योगदान दिले, ते नव्या पिढीच्या समोर ठेवणे, आणि साहेबांनी जे विचार आपल्याला दिलेत, ते आपण जतन करूया. समाजामध्ये आणि देशांमध्ये उभारणीसाठी जे जे कर्तृत्व दाखवतात, योगदान करतात, अशांची निवड करून त्यांचा सन्मान करण्याची परंपरा ही आपण कायम ठेवू. आणि चव्हाण साहेबांचा वारसा खऱ्या अर्थाने जतन करू. एवढेच या ठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो...!

■■■



# चव्हाण सेंटरच्या माध्यमातून दरवर्षी नवीन उपक्रमांचा प्रयत्न

**सुप्रिया सुळे**

डॉ. सौम्या आणि माझ्यात एक गोष्ट समान आहे. आम्हा दोघींच्या वडिलांनी खरोखरच मोठे यश मिळविले आहे. आमच्यासाठी हे कठीण आहे. आमचे संबंध सर्वांनाच माहित आहेत. पण, मला वाटते, की सर्वात मौल्यवान संबंध हे मूल आणि पालकांचे असते आणि ते जेव्हा मुलगी–वडील तसेच मुलगा–आई असते त्यावेळी ते खास असतात. मी माझ्या आयुष्यात यातून गेले आहे. सौम्या यांचेही तसेच आहे. त्या हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. स्वामीनाथन यांच्या कन्या आहेत. त्या येथे आल्या आहेत हा आमच्यासाठी मोठा सन्मान आहे. जेव्हा आम्ही पार्लमेंटमध्ये असायचो, त्यावेळी ते नेहमी आमच्या विचारांबरोबर, आमच्या सर्व वादाविवादांमध्ये आणि आमच्या सर्व चर्चांमध्ये असायचे. कारण, डॉ. स्वामीनाथन हे भारतात झालेल्या थोर शास्त्रज्ञांपैकी मोठी उंची असलेले होते. त्यांचा सी टू फॉर्म्युला, मला वाटते, की याविषयी बोलू शकेल. ते भारताच्या फूड इकॉनॉमीचा अविभाज्य भाग होते, असे मी म्हणेन. कारण, ते सातत्याने भारतातील शेतकऱ्यांविषयी बोलायचे. मला त्यांच्याकडून शिकायला मिळाले याबद्दल मी सुदैवी आहे. आज महामारीच्या काळात तुम्ही सुद्धा आपल्या घराचा वारसा पुढे चालवत आहात.

ज्या घरात डॉ. सौम्या यांचा जन्म झाला, त्यांच्या वडिलांनी या देशात शेतीसाठी प्रचंड योगदान दिलंय. आणि कोविडच्या काळामध्ये ताईंच्या माध्यमातून खूप चांगलं काम भारतात झालं. म्हणजे वडिलांचं काम शेतीमध्ये झालं आणि मुलीचं काम आज आरोग्यामध्ये होतंय. या देशाच्या सेवेमध्ये या स्वामीनाथन कुटुंबाचं खूप मोठं योगदान आहे. जेव्हा जेव्हा इतिहास लिहिला जाईल, या कुटुंबाची नोंद फक्त त्यांच्या राज्याबद्दल नाही, पण, देशामध्ये त्यांचं नाव नेहमी कौतुकानं घेतलं जाईल. ही आपल्या सगळ्यांसाठी एक अभिमानाची गोष्ट आहे आणि संस्थेचा वडिलांशीही संबंध आला आणि लेकीशीही संबंध आला. मला वाटतं, की ही आपल्यासाठी अतिशय आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

आज चव्हाण साहेबांच्या १११व्या जयंतीच्यानिमित्तानं आपण इथं जमलेलो आहोत. खरं तर आज सकाळीच मी एक आंदोलन करत होते आणि सकाळचं पहिलं भाषण महाराष्ट्राचा मंगल कलश ज्यांनी आणला, शून्यातून एक महाराष्ट्र जो तुमच्या आणि माझ्या स्वप्नातला महाराष्ट्र आहे, ज्याच्यात विज्ञान, शिक्षण, समता अशा गोष्टींचा उल्लेख करून एक भाषण केलं आणि तिथून मी उठले आणि काल आंदोलनात गेले. त्या आंदोलनामध्ये काही टॅक्सचे विषय होते. आज काल तुम्हा सगळ्यांना माहिती आहे, की ही सगळी वेळ आता इलेक्शनची आहे. त्याच्यामुळं देशातला माहोल थोडासा वेगळा आहे. आणि त्याच्यामुळं त्याठिकाणी टॅक्स भरायचा, भरायचा नाही, स्थगिती द्यायची वगैरे गोष्टी होत होत्या आणि मी भाषण करताना तेच म्हटलं, की चव्हाण साहेबांच्या

जयंतीच्या दिवशी मला आंदोलन करावं लागतंय. याच्यातच खरं तर आपलं म्हणलं तर अपयश आहे, की आजही लोकांना आंदोलनं करावी लागतायंत आणि यशही आहे, की या देशात आजही लोकशाही जीवंत आहे.

चव्हाण साहेबांबद्दल आज एक आणखी वेगळा उपक्रम आपण सेंटरच्या माध्यमातून सुरू करतोय. आपण एक नवीन अपडेटेड वेबसाईट करतोय. म्हणजे ज्याला कोणाला जर चव्हाण साहेबांवर पीएचडीही करायची असेल, तर ॲट वन स्टॉप म्हणजे यशवंतराव चव्हाण डॉट इन जर तुम्ही टाईप केलं तर चव्हाण साहेबांची सगळी पुस्तकं, भाषणं, त्यांच्याबद्दलची सगळी माहिती जे काही डॉक्युमेंटेशन चव्हाण साहेबांबद्दल उपलब्ध आहे ते सगळं अपडेट करुन मराठी भाषेमध्ये आज लाँच होईल. आणि पुढच्या एक पंधरा दिवसांत महिन्याभरामध्ये ते पूर्णपणे इंग्रजी आणि हिंदी ही अशा टप्प्याटप्प्यातून अनेक भाषा अनुवादित केलं जाईल. आता तुम्ही म्हणाल, आता ट्रान्सलेशन कशाला पाहिजे? कारण, गुगलचं सगळंच ट्रान्सलेशन हे अनेकवेळा कन्फ्युजिंग होतं किंवा चुकीचंही होतं. त्याच्यामुळे आम्ही नुसतं गुगलच्या भरोशावर न राहता आम्ही पूर्ण त्या भाषेमध्ये ट्रान्सलेशन व्हावं, म्हणजे कुठल्याही नवीन पिढीच्या व्यक्तीला काही चुकीची माहिती जाऊ नये. कारण, अनेक वेळा आता नवीन तंत्रज्ञानामुळे इतके आपल्या आयुष्यात बदल झालेत, आणि सगळ्यांचा समज आहे, की आपण जीपी चॅटमध्ये जरी गेलो तर जी माहिती आहे, ती एआय देते ती खरीच आहे. आता माझीच युनिव्हर्सिटी चुकीची टाकली आहे म्हणून मला जरा भीती वाटते, की जीपीडी चॅटमध्ये मी पुन्हा युनिव्हर्सिटी स्टुडंट आहे म्हणून सांगितलंय. मी पुणे युनिव्हर्सिटीची असल्याचे सांगितलं आहे. पण मी मुंबई युनिव्हर्सिटीमध्ये पास झाले. त्याच्यामुळे तेव्हापासून जीपीटी चॅटवर भाषण करताना मी नाही, ते रेफरन्स पॉईंट म्हणून वापरत. पण, अशा गंमतीजमती तंत्रज्ञानामुळे होत असतात. कितीही कृत्रिम बुद्धिमत्ता आपण सगळ्यांनी मान्य केली केली, बदल आत्मसात केली तरी माणूस हा माणूसच असतो. म्हणूनच कृत्रिम हा शब्द त्याच्यात येतो.

यशवंतराव चव्हाण सेंटरच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षात शिक्षण, आरोग्य सेवा आणि नवीन तंत्रज्ञान आणि चव्हाण साहेबांच्या स्वप्नातला महाराष्ट्र ही जी भूमिका त्यांनी मांडली, ती पुढं न्यायचा एक प्रांजळ प्रयत्न आमच्या सगळ्यांकडून होतोय आणि त्या सगळ्या टीममध्ये एक मोठा व्यापक कार्यक्रम आम्ही शिक्षण हा बरोबर करतोय, ज्याला इनक्लुजिव्ह एज्युकेशन म्हणजे आता एक नवीन गोष्ट वाचनात येते, की राईट टू एज्युकेशनमध्ये काही बदल होणार अशी चर्चा होते असं दिल्लीमध्ये कळतंय. पण, आता हे शिक्षणात होणारे बदल आणि ते मग नुसते एआयच्या माध्यमातून नाही. पण शिक्षक आणि त्यातलं मूळ केंद्रबिंदू ठेऊन शिक्षणात बदल व्हावे आणि त्या बदलामध्ये चव्हाण सेंटर दरवर्षी इनक्लुजिव्ह एज्युकेशन म्हणजे हे फक्त जी मुलं पहिली येतात किंवा चांगल्या संस्थेत जातात, शिकतात. इंग्रजी बोलतात अशाच मुलांसाठी नाही. पण जी मुलं स्पेशल नीडस्‌मधील आहेत, त्यांच्यासाठी काही एक मोठा उपक्रम होऊ शकतो का? किंवा ऑटिजमसारखा विषय, आज डॉ. समीर दलवाई, डॉ. काणेकर उपस्थित आहेत, यांच्या मदतीनं ऑटिजमसारखा विषय ज्याच्यात जवळपास संपूर्ण महाराष्ट्रातून पहिल्यांदा आपल्या राज्यामध्ये ऑटिजमवर एवढं व्यापक पालकांना घेऊन कुठलं मोठं वर्कशॉप झालं आणि त्याच्यातून महाराष्ट्रात एक पॉलिसी झाली. ते काम चव्हाण सेंटरच्या माध्यमातून होतंय. इतिहासाबद्दल, आता इतिहास म्हटलं, की लोकांना काळजी वाटते, कारण का पार्लमेंटमध्ये इतिहास बदलोय असेही काहीवेळा रेफरन्स येतात. त्याच्यामुळे इतिहास म्हणला, की आता भीती वाटते. आता कुठला इतिहास, त्यांचा का आपला असंही झालंय. दुर्दैवानं या देशात पण हा इतिहास हा जो खरा असतो, तो सोयीचा नसतो. जो खरा असतो तोच डेटाबेस करून आम्ही शाहू, फुले, आंबेडकरांचे सगळे नवीन पिढीसाठी त्यातले जे तज्ज्ञ आहेत, त्यांच्याबरोबर अभ्यासक्रम करून तीही सगळी माहिती आम्ही एकत्र करतोय आणि या सगळ्या ज्या अनेक ठिकाणी या सगळ्या माहिती आहेत. पण, ती सगळी माहिती अंडर वन इन अम्ब्रेला आली पाहिजे. तर तोही प्रयत्न आणि एक मोठा कार्यक्रम चव्हाण सेंटरच्या माध्यमातून होतोय.

महिला सबलीकरण याच्यात तर काम गेले अनेक वर्ष चाललेलं आहे. रिलायन्स फौंडेशनबरोबर त्यांची जी दुकानं आहेत, तिथे महिलांना दुकानाच्या बाहेर आधी मार्केटिंगला संधी मिळाली. आज आमच्या बचत गटातल्या अनेक महिला आज मोठ्या ज्या कंपनीज्‌ आहेत, एफपीओज्‌ आहेत, त्यांच्याबरोबर स्पर्धा करतात. आणि त्यांचा माल रिलायन्स किंवा डी मार्टसारख्या ठिकाणी आज त्यांनी बनवलेली हळद, त्यांचं सोयाबीन, त्यांचा चहा, त्यांची साखर असे अनेक पदार्थ आहेत. ते आज मार्केटिंगच्या माध्यमातून नॅशनल लेव्हलला आज करतायंत. हेही सांगताना मला अतिशय आनंद होतोय. अनेक संस्था अशा आहेत, ज्या आमच्या महिलांना हिशोब कसा ठेवायचा याच्यापासून म्हणजे त्यांना व्यवसाय कसा करायचा, तर व्यवसायामध्ये बुक किपिंग कसं करायचं, अकाऊंटस्‌ कसे करायचे, छोट्या छोट्या गोष्टी आपल्याला वाटतात, म्हणजे मुद्रामध्ये अकाऊंटस्‌ खूप उघडली. पण, त्याचा इम्पॅक्ट खरंच त्याला टॅन्जेबल काय आहे हेही अतिशय

महत्त्वाचं आहे. नाहीतर डेटा खूप येतो, अकाऊंट एवढे उघडले. पण, त्या अकाऊंट्चे पुढे काय झालं. त्याच्यात पैसे खरंच किती राहिले. किती नंतर अकाऊंटस् बंद झाले. महिलांच्या आयुष्यात किती फरक झाला हेसुद्धा तपासलं पाहिजे.

केंद्र सरकार बजेटमध्ये सांगतं, की ८० कोटी लोकांना आम्ही आजही अन्न मोफत देतो. तर जर देशामध्ये गरीबी कमी होतेये तर मग ऐंशी कोटी लोकांना अन्न का आजही मोफत द्यावं लागतं. तर नंबर डोन्ट मॅचची अनेक व्यापक विषय आहेत. गोखले इन्स्टिट्यूटनेही याबद्दल खूप मोठा अभ्यासक्रम तयार केला आहे. तर त्यांच्याबरोबरही काम करून हे जे इम्पॅक्ट जे आपला कार्यक्रम आहे, म्हणजे शिक्षण असेल, स्किलिंग असेल, ही आपण कामं राज्यात सगळ्या जिल्ह्यांमध्ये करतो. पण, त्याचं असेसमेंट होऊन नक्की किती लोकांच्या आयुष्यात चव्हाण सेंटरच्या इंटरव्हेंटेशनमध्ये फरक पडला आहे. त्याचं एक थर्ड पार्टी ऑडिट करायचं काम पुढच्या वर्षात चव्हाण सेंटरच्या माध्यमातून होणार आहे. आणि नोव्हेंबर जेव्हा आपण २५ तारखेला भेटू, त्या सगळ्याचं एक व्यापक प्रेन्झेटेशन आम्ही तुम्हा सगळ्यांना देऊ. काही संस्था कैलासवासी यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने चालतात. हॅज टू बी द बेस्ट आणि आम्ही बाकी कुणाबरोबर कॉम्पीट करत नाही. आम्ही स्वत:बरोबर कॉम्पीट करतो. त्याच्यामुळे आमच्या स्वत:कडूनच जास्ती अपेक्षा आहेत आणि नवीन पिढीच्या माध्यमातून खूप नवीन पिढी याच्याशी जोडली जातेय. अनेक नवीन लोकं संस्थेशी जोडली जातायंत.



पुरस्काराच्या रकमेचा धनादेश डॉ. सौम्या स्वामीनाथन यांना शरद पवार प्रदान करताना. शेजारी डॉ. अनिल काकोडकर आणि अरुणभाई गुजराथी.

माझी अपेक्षा आहे, की आतापर्यंत सगळ्या ज्येष्ठांनी आम्हाला मार्गदर्शन केलं. आम्ही गेली दहा, पंधरा, वीस वर्षे या संस्थेमध्ये काम करतोय. पण, एक नवीन पिढी जी आज २५-३० वर्षाची आहे, त्याही पिढीनी या संस्थेमध्ये जोडलं गेलं पाहिजे आणि याच्यासाठी आम्ही एक मोठा कार्यक्रम, एक मेनटेरिंगचा कार्यक्रम चव्हाण सेंटर सुरू करतोय. दरवर्षी चव्हाण साहेब आणि त्यांनी केलेली कामं किंवा पुढच्या पंचवीस, पन्नास वर्षाचा महाराष्ट्र कसा असावा अशा पाच मुलांना दरवर्षी आम्ही एक स्कॉलरशीप म्हणा, स्पॉन्सरशीप म्हणा किंवा फेलोशीप म्हणा, तर ती पाच मुलांसाठी आम्ही या वर्षापासून सुरू करणार आहोत आणि या मुलांनी नंतर महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कॉन्ट्रिब्यूशन करावं ही आमची अपेक्षा आहे. खूप एक नवीन उपक्रम आम्ही सुरू करतोय आणि त्याची सगळी माहिती तुम्हाला ऑनलाईनवर मिळेलच. आणि त्यांना मेन्टेनिंग करण्यासाठी काकोडकर साहेब, सावंत साहेब, माशेलकर साहेब यांचं सगळ्यांचं मार्गदर्शन संस्थेला असतंच. ते सगळे संस्थेला जी मदत करतात, त्याबद्दल त्या सगळ्यांचे मी मन:पूर्वक आभार मानते. आणि चव्हाण साहेबांच्या नावाने ही जी आज संस्था आहे, त्या संस्थेच्या कामामध्ये सातत्य ठेऊन महाराष्ट्रात आणि देशामध्ये काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न या सगळ्या टीमकडून होतो. आज आपण सगळे इथे आलात. मी मनापासून तुमचं स्वागत करून आपली रजा घेते.

■■■

# वैद्यकीय संशोधनासाठी विज्ञानासह तंत्रज्ञानात गुंतवणुकीची आवश्यकता

**डॉ.सौम्या स्वामीनाथन**



माझ्या आधी यशवंतराव चव्हाण पुरस्कार मिळालेल्या दिग्गजांच्या यादीत माझा समावेश होत असताना मला अतिशय सन्माननीय आणि अभिमान वाटतोय. मला या पुरस्कारासाठी योग्य समजल्याबद्दल ज्युरी आणि तुम्हा सर्वांची आभारी आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे, की यशवंतराव चव्हाण हे एक उत्तुंग व्यक्तिमत्व होते. त्या काळात असे अनेक लोक होते, ज्यात स्वातंत्र्यपूर्व काळात देशाची सेवा करण्याची तीव्र इच्छा होती आणि मला माहित आहे, की माझे वडील आणि लोक त्यांच्या पिढीतील सर्वांची हीच तीव्र इच्छा होती आणि बरेच लोक माझ्या वडिलांना विचारतात, की त्यांनी आयपीएस का घेतले नाही, ज्याची त्यांनी परीक्षा दिली होती. कारण, त्यांनी प्रशासकीय सेवेत जावे अशी कुटुंबाची इच्छा होती. पण, त्यांनी पोलिस अधिकारी होण्याऐवजी शेतीत फेलोशिप घेऊन नेदरलँडला जाण्याचा पर्याय स्वीकारला. कारण, ते लहान असताना १०४१-४२च्या बंगालमधील दुष्काळाचे परिणाम आणि अन्नाच्या कमतरतेमुळे मरण पावलेले लाखो भारतीय त्यांनी पाहिले होते.

कृषी संशोधन आणि विज्ञान देशातील अन्न सुरक्षेची समस्या सोडवू शकतील असे करिअर ते करू इच्छित होते. म्हणून मला वाटते, की ती पिढी ही एक अद्वितीय पिढी होती आणि आपल्यापैकी जे भाग्यवान होते त्यांना ती बघण्याची संधी मिळाली. मॅडम सुप्रिया एकतर अशा कुटुंबात जन्माला आल्या आहेत किंवा तुम्हाला अशा लोकांशी संवाद साधण्याची संधी मिळाली आहे, जे केवळ बौद्धिक दिग्गज नव्हते, तर आपले जीवन एका उद्देशाने व्यतीत करून सेवा केली आहे, जी वैयक्तिक कामगिरीच्या, वैयक्तिक अभिमानाच्या पलिकडे होती. मोठ्या सामाजिक आणि सार्वजनिक हितासाठी होते. आणि मला वाटते, की आपण स्वत:ला चव्हाणजी आणि इतर लोकांची आठवण करून दिली पाहिजे, ज्यांनी देशाची सेवा केली आणि ज्यांनी खूप योगदान दिले. आणि आपल्या तत्वांसाठी जे लढले अशा कोणाच्या तरी नावाने जो पुरस्कार मिळत आहे, तो खरोखरच एक मोठा सन्मान आहे.

जेव्हा मी लहान होते, तेव्हा मला नेहमीच संशोधन करण्याची इच्छा होती. जरी मी डॉक्टर होण्याचा विचार केला नसला तरी कदाचित मी अशा वातावरणात वाढली आहे, जिथे भारतीय कृषी संशोधन संस्था नेहमीच कार्यरत होती. घरात पदवीचे विद्यार्थी, मास्टर विद्यार्थी, पीएचडीचे विद्यार्थी आणि ते नेहमी माझ्या वडिलांशी कामाबद्दल चर्चा करत असत आणि आम्ही त्यांच्यासोबत शेतात जायचो. त्या दिवसांत १९६०च्या हरित क्रांतीच्या काळात बरेच प्रयोग चालू होते. दिल्ली, हरियाना, उत्तर प्रदेशमधील शेतकऱ्यांची शेतीत हे प्रयोग चालू होते आणि आम्ही विशेषत: विकेंडला त्यांच्यासोबत जात असू. लहान मुलं म्हणून आम्ही शेतात खेळत असू, तर अर्थातच ते शेतकऱ्यांशी चर्चा

करत असत, की पिकाच्या नवीन जाती कशा आहेत. गहू, तांदूळ ही पिकं कशी येत आहेत. दुसरीकडं माझी आई एक शिक्षण तज्ज्ञ होती, जी सुरूवातीला शाळेत शिक्षिका होती. परंतु, सुरूवातीला आम्हा मुलांनी काळजी घेतल्यानंतर तिने शिक्षणासाठी स्वत:ला समर्पित केले आणि माझ्या मते पहिल्या लोकांपैकी एक होती, जिने बाळाच्या आयुष्याच्या पहिल्या हजार दिवसांत त्याची काळजी घेणे कसे आवश्यक आहे, हे पटवून दिलं. कारण बालपणात मुलांच्या मेंदूचा तसेच शरीराचा विकास होत असतो आणि या दिवसांत आई आणि मूल दोघांचीही काळजी घेणे आवश्यक असते.

क्रेश मुलांसाठी एवढी सुरक्षित जागा प्रदान करू शकते तसेच लहान मुलाचा पूर्ण विकास होण्यासाठी त्याला आवश्यक असलेले पोषण आणि उत्तेजना या दोन्ही गोष्टी मिळू शकतात आणि आजही मला वाटते, की ५० वर्षांनंतरही आपल्याकडे आयसीडीएसचा कार्यक्रम आहे. १९७२पासून अजूनही आमच्याकडे लहान मुलांचे कुपोषण आणि अशक्तपणाची समस्या आहे. ही एक अशी समस्या आहे, ज्यावर आपल्याला तोडगा काढावा लागेल.

देशात अनेक दशके अन्न सुरक्षा असूनही आपल्याकडे अद्याप पोषण सुरक्षा नाही. म्हणून जेव्हा मला अकरावीमधील




आणि यासाठी त्या दिवसांत अंगणवाड्या आणि बालवाड्या नव्हत्या. ती अशा लोकांपैकी एक होती, ज्यांनी खरोखरच क्रेशची गरज भागवली होती आणि ती मोबाईल क्रेशेसच्या सह संस्थापकांपैकी एक होती. बांधकाम मजुरांसाठी क्रेशची उभारणी केली होती आणि लहान मुलं म्हणून आम्हालाही माझ्या आईसोबत बांधकामाच्या ठिकाणी जाण्याची संधी मिळाली आणि या बांधकामाच्या ठिकाणी कोणत्या प्रकारचे वातावरण असते हे सांगायला नको. विशेषत: तुम्हाला माहित असलेल्या स्त्रिया आणि मुले आपले दिवस कशा पद्धतीनं घालवत आहेत हे पहायला मिळालं. एक

विद्यार्थी म्हणून उन्हाळी संशोधन प्रकल्प हाती घेण्याची संधी मिळाली, तेव्हा मी कोलकाता येथील प्रोफेसर अर्चना शर्मा यांच्या प्रयोगशाळेत गेले आणि मी काम केले. मला अनुवंशिकतेवर काम करायचे आहे म्हणून ती मला कोलकाता येथील क्लिनिकमध्ये घेऊन गेली. मेडिकल कॉलेज इस्पितळात मला माझ्यासारख्याच वयाची १६ वर्षांची किंवा एक वर्षाने मोठी मुलगी दिसली, जिला तारूण्य मिळाले नव्हते आणि तिचे पालक तिला तपासणीसाठी घेऊन आले होते. आम्ही त्या मुलीच्या रक्ताचा नमुना घेतला आणि प्रोफेसर अर्चना शर्मा यांच्या प्रयोगशाळेत मला सर्व गुणसूत्रांवर लक्ष ठेवणारे कोट

टायपिंग करण्याचे काम देण्यात आले होते. तुम्हाला माहित आहे, की आपल्याला गुणसूत्राच्या २३ जोड्या असतात आणि एका जोडीला लैंगिक गुणसूत्र म्हणतात. स्त्रियांमध्ये दोन एक्स गुणसूत्र असतात, तर पुरूषांमध्ये एक्स आणि वाय गुणसूत्र असते. परंतु, प्रत्येकाकडे गुणसूत्राच्या २३ जोड्या असतात. पण, या मुलीकडे एक क्रोमोसोम गहाळ होता. त्यामुळे तिच्याकडे फक्त एकच एक्स गुणसूत्र होता. त्यामुळेच तिला मासिक पाळी झाली नाही. त्यामुळे तिला मुलं होऊ शकली नसती. त्यामुळे माझ्यासाठी १५ वर्षांच्या वयातल्या एखाद्या व्यक्तीला घडत असलेल्या गोष्टीशी जोडण्याची विज्ञानाची शक्ती होती. क्लिनिकमध्ये काम करून आणि काही प्रयोग करून ती समस्या जाणून घेण्यास सक्षम होण्यामुळे मला संशोधनात करिअर करण्याची इच्छा निर्माण झाली आणि मग मी माझे एमबीबीएस पूर्ण केले.

पुणे हे शहर मला खरोखरच आवडते. मी माझी काही वर्षे पुण्यात घालवली. आम्ही अजूनही सशस्त्र दलाच्या वैद्यकीय महाविद्यालयाशी खूप जवळून जोडलेलो आहोत. नंतर बालरोगशास्त्र करायला गेले आणि तरीही मला हे माहित होतं, की मला संशोधन करायचं आहे. म्हणून मी माझ्या प्रशिक्षणानंतर जेव्हा भारतात परत आले, त्यावेळी डॉक्टरच्या प्रॅक्टिससाठी जागा शोधत होते, ज्याठिकाणी संशोधन करता येईल. पण मला खूप कमी संधी किंवा पर्याय सापडले. प्रत्येकाने मला सांगितले, की तुम्हाला भारतात तुम्ही एक चिकित्सक होऊ शकता. तुम्ही तुमच्या वैद्यकीय अभ्यासात खूप चांगले काम केले आहे. त्यामुळे तुम्हाला खूप चांगली प्रॅक्टिस करता येईल किंवा तुम्ही वैद्यकीय महाविद्यालयात अध्यापनासाठी जाऊ शकता आणि तुम्ही शिक्षक बनू शकता. परंतु, कोणीही संशोधनात करिअर करण्याची निवड करत नाही. तुम्हाला कोणाचीही संशोधन ही पहिली पसंत आहे असे मानले जात नव्हते. त्यामुळे त्यावेळी स्लॉट किंवा पद शोधणे खरोखरच खूप आव्हानात्मक होते आणि त्यावेळी चेन्नईतील राष्ट्रीय संस्थेत येईपर्यंत मी काही काळ संघर्ष करीत होते. याला क्षयरोग संशोधन केंद्रही म्हणतात. ते आयसीएमआर म्हणजे इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च संस्थेपैकी एक आहे. मी गेले, त्यावेळी जे नुकतेच महासंचालक झाले होते, ते त्या दिवशी चेन्नईला आले होते, म्हणून मी त्यांना भेटले. त्यांनी सांगितले, की आमच्यासाठी ही चांगली गोष्ट आहे. तुमच्यासारखे लोक,ज्यांना संशोधनात रस आहे, ते संस्थेत काम करत आहेत. तुम्हाला खूप चांगले प्रशिक्षण मिळाले आहे. तुम्ही आमच्यात का सहभागी होत नाही आणि परदेशातून परत आलेल्या लोकांसाठी एक विशेष योजना होती. त्यामुळे मी प्रशिक्षित असूनही आयसीएमआर आणि यूएनमध्ये सहभागी झाले.

बालरोग तज्ज्ञ या नात्याने मी माझा वेळ क्षयरोगावर घालवायचे ठरवले. ही लहान मुलांमध्ये एक मोठी समस्या आहे. पण, देशातही ही एक मोठी समस्या आहे. मला आणि यूएनला ही गोष्ट लक्षात आली, की क्षयरोगाबद्दल आपल्याला माहित नसलेल्या बऱ्याच गोष्टी आहेत. यावर संशोधनाची गरज होती. त्यामुळे १९९२मध्ये मी तिथे माझ्या करिअरला सुरूवात केली आणि मला खूप लवकर समजले, की क्षयरोग हा केवळ जीवाणूमुळे होणारा रोग नाही, तर तो एक सामाजिक समस्यादेखील आहे. कारण, या आजाराभोवती अनेक गैरसमजुती आणि भीती होती. सुशिक्षित लोकदेखील




हे स्वीकारू इच्छित नाहीत, की त्यांना किंवा कुटुंबातील कोणालाही क्षयरोग आहे. त्यांना हे गुप्त ठेवायचे असते. अर्थातच असमानतेने गरीब लोकांवर परिणाम झाला आहे. ज्यांना उपचारांच्या पूर्ततेच्या त्यांच्या स्वत:च्या समस्या होत्या. हा खूप मोठा कालावधी आहे.

ही नैसर्गिक मानवी प्रवृत्ती आहे, की आपल्यापैकी कोणीही माहिती असलेली औषधे घेतात. तुम्हाला माहित आहे, की काही दिवसांनी तुम्हाला बरे वाटेल, तेव्हा तुम्ही औषधे बंद करता. कारण, तुम्हाला वाटते, की तुम्ही बरे झाला आहात. पण, टीबीमध्ये तुम्हाला ६ महिन्यांपर्यंत उपचार चालू ठेवावे लागतात. जर तुम्हाला औषध प्रतिरोधक क्षयरोग असेल, तर काही महिने जास्त काळ. त्यामुळे

लोकांनी त्यांच्यावर उपचार करत राहणे हे खरे आव्हान आहे. त्यांच्यासाठी हे महत्वाचे आहे. त्यांनी कुटुंबाची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मला हेदेखील समजले, की एखाद्या रोगाचे सामाजिक-आर्थिक पैलू अत्यंत महत्वाचे आहेत.

आम्ही आमच्या सामाजिक कार्यकर्त्यांसह घरी भेटीला जायचो. कारण, अनेकदा क्षयरोगाचा रूग्ण उपचार घेण्यासाठी किंवा नियमित तपासणीसाठी परत येत नाही आणि म्हणून आम्ही नेहमी जायचो आणि त्यांना त्यांच्या घरी भेटायचो. आणि हा एक विलक्षण अनुभव होता. कारण, तुम्ही दवाखान्यात बसलेले असताना पेशंट तुमच्याकडे डॉक्टरांकडे येत असतात. सल्ला देणे खूप सोपे आहे. पण जेव्हा तुम्ही




रूग्णांना घरी भेटता आणि ते कसे आहेत ते तुम्ही पाहता. तो रूग्ण कोणत्या परिस्थितीत जगत आहे हे पाहिल्यानंतर त्यांचे जीवन तुम्हाला नम्र बनवते आणि मग तुम्ही तुमच्या रूग्णांना व्याख्यान देणे थांबवता. तुम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करता. तुम्ही त्याच्याशी अधिक चांगली सहानुभूती निर्माण करता. आमचे बहुतेक क्षयरोगी रूग्ण अत्यंत गरीब पार्श्वभूमीतून आलेले होते. म्हणून मी तुम्हाला हे आवर्जुन सांगत आहे. कदाचित चेन्नईतील प्रत्येक झोपडपट्टीत या लोकांना शोधा आणि नंतर त्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना समुपदेशन देण्याचा प्रयत्न करा. आम्ही देऊ शकू असे इतर कोणतेही समर्थन देता येईल.


काही वेळा मुले शाळाही सोडतात. अर्थातच आम्हाला भारतात एचआयव्हीची पहिली काही प्रकरणे आढळली. १९९६मध्ये पहिली सहा लैंगिक प्रकरणे कार्यकर्त्यांमध्ये आढळून आली होती. ज्यांना तामिळनाडूतून परत आणण्यात आले होते किंवा त्यांचे पुनर्वसन करण्यात आले होते. सेक्स वर्कर्स आणि ते एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले आणि अर्थातच त्यावेळी हा एक अतिशय भयावह आजार होता. जर तुम्हाला आठवत असेल, की तेथे कोणताही इलाज नव्हता, तेव्हा तुम्ही काही करू शकत नव्हता आणि तो आजार म्हणजे जवळजवळ मृत्यू होता. ती फाशीची शिक्षा होती. त्यामुळे वैद्यकीय समुदाय आणि आरोग्य क्षेत्रातही खूप भीतीचे वातावरण होते. सुरूवातीला जेव्हा कोविडसारखा आजार आला होता, तेव्हा प्रत्येकजण खूप घाबरला होता. कारण, हे काहीतरी नवीन आहे. कारण, ते प्राणघातक असू शकते. त्यामुळे तुमचा मृत्यू होऊ शकतो किंवा त्यामुळे गंभीर आजार होऊ शकतो आणि तुम्हाला हे कसे टाळावे किंवा त्यावर उपचार कसे करावेत ही माहित नव्हते. त्यामुळे अशी कोणतीही गोष्ट नेहमीच खूप भीती निर्माण करते आणि भीतीमुळे खूप गैरसमज आणि भेदभाव निर्माण होतात.

आपण कोविडमध्ये हेही लक्षात ठेऊ शकतो, की आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांना कधी कधी घरी परत येण्यासाठीही परवानगी नव्हती. त्यामुळे भीती आणि गैरसमज असतो, ज्यामुळे आजारांवर उपचार करण्यात अडथळा येतो. एचआयव्हीसाठी माझा अनुभव त्या सुरूवातीच्या काळात असा होता, जेव्हा कोणताही उपचार नव्हता. आता आम्ही इतर संक्रमणांवर उपचार करू शकतो. कारण एचआयव्ही आणि एड्स झालेल्या रूग्णाची प्रतिकारशक्ती कमी होते आणि बहुतेकदा त्यांना प्रथम संसर्ग होतो तो क्षयरोगाचा असतो. त्यामुळे तुम्ही क्षयरोगावर उपचार कराल आणि त्यातून ते सुधारतील आणि त्यांची सामान्य स्थितीही सुधारेल. त्यांना खूप बरे वाटू लागेल आणि खाणे सुरू होईल. वजन वाढणे किंवा बरे वाटणे सुरू होते. पण ते तात्पुरतेच असते. कारण, नंतर त्यांना आणखी काही संसर्ग होऊ शकतात. त्यामुळे रूग्ण आणि त्याच्या कुटुंबासाठी ही खूप कठीण वेळ असते. परंतु, या रूग्णांची काळजी घेणारे डॉक्टर आणि परिचारिका या नात्याने आमच्यासाठी खूप निराशाजनक असते. कारण, तुम्ही त्या लोकांशी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी एक बंध निर्माण करता आणि मग शेवटी तुम्हाला एक बालरोग तज्ज्ञ म्हणून खूप असहाय्य वाटू लागते.

मी अशा कठीण परिस्थितीत रूग्णांची खूप काळजी घेतली. एचआयव्ही पॉझिटिव्ह मुले, त्यापैकी बरीचशी अनाथ होती आणि एनओएसद्वारे या मुलांची काळजी घेण्यास इच्छुक असलेली बरीच रूग्णालये नव्हती. देगण्यांद्वारे आम्ही अँटी


रेट्रोव्हायरल उपचार मिळवू शकलो. परंतु, यात डॉ. युसूफ हमीद यांनी बजावलेली भूमिका आम्हाला मान्य करावी लागेल. नंतर इतर अनेक भारतीय जेनेरिक कंपन्या आल्या, ज्यांनी अँट्री रेट्रोव्हायरल औषधे तयार करण्यास सुरूवात केली. पश्चिमेकडील कंपन्या ही औषधे काही प्रमाणात कमी किंमतीत विकत होते. फक्त भारतातच नव्हे, तर जगभरातील विशेषत: आफ्रिकेतील लाखो लोकांवर उपचार सुरू असतात. सिप्लासह अनेक कंपन्यांचे आम्ही आभारी आहोत. त्यांच्यामुळे आम्ही उपचार करू शकलो.

सुरूवातीला औषधांच्या किंमती परवडणाऱ्या होत्या आणि नंतर सरकारने हा कार्यक्रम सुरू केला. यूएनने २००४मध्ये मोफत अँटी रेट्रोव्हायरल उपचार सुरू केला आणि अर्थातच



सर्व काही बदलले. कारण आज जरी एखाद्याला एचआयव्ही संसर्ग झाला असेल, तरीही आपण व्यावहारिकपणे जगण्याची अपेक्षा करू शकतो. आता उपलब्ध असलेल्या औषधांसह सामान्य जीवन जर तुम्हाला आयुष्यभर घालवायचे असेल तर तुम्ही औषध थांबवू शकत नाही. पण, तुमच्या जीवनाचा दर्जा खूप चांगला असू शकतो. त्यामुळे ही विज्ञानाची शक्ती आहे. अशा प्रकारचे संशोधन जे एचआयव्हीसाठी केले गेले होते, की अर्थातच आमच्याकडे अद्याप लस नाही. परंतु, औषधांच्या बाबतीत आणि इतर प्रतिबंधात्मक पद्धतीच्या संदर्भात पुन्हा मुख्यत: ड्रग्ज कॉम्बिनेशन वापरून आम्ही इतकी मोठी प्रगती केली आहे, की एचआयव्ही असणे ही भीती आज नाही.

तुम्हाला माहित आहे, की तुम्ही सामान्य जीवन जगू शकाल हा आत्मविश्वास तुम्हाला आहे. अजूनही समस्या आहेत. अनेक ठिकाणी अजूनही सर्व लोकांची चाचणी झालेली नाही. तेथे अजूनही गैरसमजुती आहेत. तेथे प्रवेश करण्याच्या समस्या आहेत. निदान आणि उपचारापर्यंत पोहोचण्यासाठी बराच काळ जावा लागेल. टीबीसाठीही हीच स्थिती आहे. आमच्या प्रतिबंधात्मक बाजूने चांगले उपचार आहेत. आमच्याकडे असलेली बीसीजी लस खूप जुनी आहे आणि ती १०० वर्षे जुनी आहे. दुर्दैवाने आमच्याकडे दुसरी चांगली लस नाही. म्हणून आमच्याकडे अजूनही बीसीजी वापरली जात आहे. पण, आता बरेच संशोधन चालू आहे आणि अनेक नवीन संशोधक आहेत, ते नवीन तंत्रज्ञानाच्या प्लॅटफॉर्मसह काम करत आहे आणि ते कोविड दरम्यान अधोरेखित झाले होते, त्याआधी आम्ही एमआरएनएबद्दल कधीच ऐकले नव्हते. पण, आता आमच्याकडे खूप एमआरएनए लसी आहेत. त्यामध्ये भारतात बनवलेल्याही लसींचा समावेश




आहे. आमच्याकडे एक डीएनए आधारित लस प्लॅटफॉर्म आहे. आमच्याकडे सब यूनिट प्रोटीन लसी आहेत आणि नंतर आमच्याकडे पारंपरिक लसीही आहेत. ज्यांचा वापर करून तुम्ही विषाणू मारता किंवा तुम्ही ते निष्क्रिय करता. म्हणून त्या प्लॅटफॉर्मवर आता एचआयव्ही, मलेरियासह इतर संसर्गजन्य रोगांसाठी प्रयत्न केले जाऊ शकतात.

मला वाटते, की विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साथीत मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून आपण प्रगती केली आहे. आणि ते घडले याचे कारण म्हणजे प्रथम देशांनी यामध्ये भरपूर गुंतवणूक केली. महामारीच्या काळात लोकांना फक्त साथीच्या आजारातून बाहेर पडायचे होते म्हणून त्या दोन ते तीन वर्षांत शेकडो अब्ज डॉलर्स एवढी प्रचंड रक्कम संशोधनात गुंतवली गेली. दुसरे म्हणजे, एक जागतिक मिशन आणि सहयोग तसेच एक ध्येय होते. संपूर्ण जगासाठी एकच उद्दीष्ट आहे, की आपण साथीच्या आजारातून कसे बाहेर पडू आणि

त्यामुळे अनेक देशांचे शास्त्रज्ञ सार्वजनिक आणि खासगी क्षेत्र यांच्यात मोठ्या प्रमाणात सहकार्य होते आणि त्यानंतर अर्थातच यूएनच्या माध्यमातून हे काम सर्वत्र सुरू होते. विविध विषयांवर ते सर्वजण एकत्र आले.

डॉ. काकोडकर यांनी जीनोमिक्सबद्दल सांगितले. मला वाटत नाही, की बहुतेक लोकांना जीनोमिक्स म्हणजे काय हे माहित आहे. ते काय करू शकते. पण, नक्कीच कोविड दरम्यान रस्त्यावर कोणीही तुम्हाला सांगू शकला असेल, की नवीन प्रकार कोणता पसरत आहे आणि प्रश्न आहे, पुढील प्रकार काय आहे आणि या प्रकारांमध्ये काय फरक आहे. लोक क्लिनिकल चाचण्यांबद्दल बोलत होते. लोक बरेच नवीन शब्द वापरत होते, जे सामान्यत: फक्त तज्ज्ञच वापरत असत.





म्हणून मला वाटते, की कोविडने एक गोष्ट केली आहे, ती दाखवायची आहे. जर तुम्ही विज्ञानात गुंतवणूक केलीत तर तुम्ही संशोधनात गुंतवणूक करता, तुम्ही वैज्ञानिकांमध्ये गुंतवणूक करता. तुम्ही संस्थांमध्ये गुंतवणूक करता आणि तुम्ही डेटामध्ये गुंतवणूक करता. तेव्हा तुम्हाला खूप लवकर शिकता येते आणि तुम्हाला उपाय शोधता येतात. आपल्या देशात अनेक चांगल्या वैज्ञानिक संस्था आहेत. मोठ्या प्रमाणात प्रशिक्षित मनुष्यबळ आहे. फार्मा उद्योगही चांगल्या पद्धतीने कार्यरत आहे. महामारीच्या काळात अनेकांनी खूप नाविन्यपूर्ण काम केले. त्यामुळे मला असे वाटते, की आपण त्याकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक देशाने आपण काय चांगले केले आणि आपल्याला कुठे सुधारण्याची आवश्यकता होती हे पाहिले पाहिजे आणि आम्हाला आणखी गुंतवणूक करण्याची गरज आहे. आगामी काळातही आपल्याला अनेक संसर्गजन्य रोगांचा सामना करावा लागू शकतो. त्यासाठी आतापासूनच तयारी केली पाहिजे. कारण, अलिकडच्या काळात जागतिकीकरण, शहरीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. जंगले नष्ट होत आहेत. जैवविविधता नष्ट होत आहे. मानव आणि प्राण्याच्या संपर्कात वाढ होत आहे. त्यामुळे हे विषाणू जगभर पसरत आहेत. त्यामुळे आजारांचे संक्रमण वेगाने होत आहे. हे रोखण्यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

संसर्गजन्य आजार रोखण्यासाठी पुन्हा एकदा राष्ट्रीय मिशनची आवश्यकता आहे. त्यासाठी काही उद्दीष्टे निश्चित करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी निश्चित गुंतवणुकीची गरज आहे. त्यासाठी भागीदारी आणि परस्पर सहकार्य आवश्यक आहे. मला वाटते, की भारत सर्वोत्तम स्थितीत आहे. आपल्याकडे आवश्यक सर्व घटक आहेत. आपल्याला फक्त एकत्र येऊन ठरवायचे आहे, की आपल्याला काहीतरी साध्य करायचे आहे. संसर्गजन्य रोगांना इतिहासजमा करणे शक्य झाले पाहिजे. खरे तर आरोग्याच्या शाश्वत विकासाच्या उद्दीष्टांमध्ये आपण अपेक्षेनुसार कामगिरी करत आहोत. पण संसर्गजन्य आजारांचे निर्मुलन करायचे म्हटले तर लसी उपलब्ध असणे आवश्यक आहे. लसीमुळेच आपण पोलिओसारख्या आजारांचे निर्मुलन करू शकलो. त्यामुळे मला असे वाटते, की आपण ते करू शकतो. हे अशक्य नाही. मला आशा आहे, की २०३०पर्यंत आपण भारतात काहीतरी विकसित केले पाहिजे. एकतर नवीन लस किंवा औषधांचे नवीन संयोजन केले पाहिजे.

नजीकच्या भविष्यात मला संसर्गजन्य रोग इतिहासजमा झालेले दिसल्याशिवाय मी माझ्या जीवनातील कार्यात समाधानी आहे असे मला वाटणार नाही. सार्वजनिक आरोग्य समस्या म्हणून क्षयरोगाचा नाश केला पाहिजे. म्हणून मी पुन्हा एकदा विशेषत: ज्युरींचे आभार मानू इच्छिते. मला या पुरस्कारासाठी पात्र मानले गेल्याने मी नक्कीच हा पुरस्कार माझ्या उर्वरित आयुष्यासाठी कायम स्मरणात ठेवीन. परंतु, मला हा पुरस्कार क्षयरोगग्रस्तांच्या मुलांना समर्पित करायचा आहे आणि ज्यांना गरज आहे अशांना मला शोधायचे आहे, ज्यांच्यासाठी मी हे पैसे वापरू शकेन.

■■■



# चव्हाण सेंटरकडून माणूस घडविण्याचं काम होतंय

## डॉ.अनिल काकोडकर

चव्हाण साहेबांच्या १११व्या जयंतीनिमित्त आपण सगळे इथं जमला आहात त्याबद्दल सर्वांचे धन्यवाद. चव्हाण साहेबांचा सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा चव्हाण सेंटर पुढे नेत आहे. महाराष्ट्रीयन माणूस खऱ्या अर्थाने घडवण्याचं काम हे चव्हाण सेंटर करतंय आणि तेच खरं चव्हाण सेंटरच्या कार्याचं मला तरी खरं आकर्षण आहे. याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून चव्हाण सेंटरकडे अनेक स्तरावरील पुरस्कारांची व्यवस्था आहे. आणि उच्च स्तरावरील हा राष्ट्रीय पुरस्कार आहे. जो चव्हाण सेंटर भारतातील नामांकित व्यक्तिमत्वांना देते, ज्यांनी भारतातील सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्यांमध्ये योगदान दिले आहे. या पुरस्काराच्या ज्युरीचे अध्यक्ष होण्याचे भाग्य मला लाभले आणि अर्थातच आमच्याकडे एक ज्युरी आहे जी अतिशय प्रतिष्ठित आहे, डॉ. माशेलकर याठिकाणी बसलेले आहेत. डॉ. नरेंद्र जाधव याठिकाणी बसले आहेत. विवेक सावंत आणि अन्य काही इतर सदस्य वास्तूविशारद कादरी, मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रोफेसर सुहास पेडणेकर, आणि माजी कुलगुरू डॉ. रूपा शहा याठिकाणी आहेत. या ज्युरीकडे या पुरस्कारासाठी निवड करण्याचे मोठे आव्हान सोपविण्यात आले आहे.

या कार्यक्रमात चव्हाण सेंटरचे अध्यक्ष आदरणीय पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली २५ नोव्हेंबरच्या पुरस्काराची घोषणा करण्यात येते. त्यादिवशी सेंटरच्यावतीने राज्य पातळीवर पुरस्कार दिले जातात. आणि राष्ट्रीय पुरस्कार त्यादिवशी जाहीर केला जातो. राष्ट्रीय स्तरावर तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव पाडला आहे अशा लोकांपैकी एकाची निवड या पुरस्कारासाठी करायची असते. लोक म्हणतात, की तुम्ही ही निवड कशी करता. त्यासाठी विविध मार्ग आहेत. पण, मी एक गोष्ट वाचली होती, त्याचा माझ्या मनावर खोलवर परिणाम झाला होता. त्यात फक्त चार प्रमुख मुद्दे होते. उच्च कार्यक्षमतेसाठी असलेल्या प्रोत्साहन प्रणालीवर आधारित हे पुरस्कार दिले जातात. पायाभूत सुविधांच्या विकासात दिलेले योगदान हे सरकारसाठी आणि समाजासाठीही हे फार महत्त्वाचे आहे. आणि शेवटी तंत्रज्ञानाच्या पातळीवर आधारित ज्यामध्ये समाजातील सदस्य प्रवेश करू शकतात आणि वापरण्यास सक्षम आहेत. जेणेकरून आपण पाहू शकता, की चव्हाण सेंटर खरोखर यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

या पुरस्कारासाठी निवड करताना अनेक प्रतिष्ठित व्यक्तिमत्वांची यादी उपलब्ध होते हे आमच्यासाठी भाग्याचे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून यामध्ये कोणत्याही प्रकारचा व्यत्यय आलेला नाही. या पुरस्कार्थींची नावे वाचल्यानंतर तुम्हाला भारतातील अव्वल दर्जाच्या लोकांची यादी पाहायला मिळेल. आज आपल्यासोबत डॉ. सौम्या स्वामीनाथन आहेत, ज्यांना उज्ज्वल भविष्य आहे. त्यांचा परिचय नंतर



ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना यशवंतराव चव्हाण साहेबांचा ग्रंथ भेट देताना हेमंत टकले शेजारी डॉ. अनिल काकोडकर व शरद पवार.

करून दिला जाईलच. पण त्यांच्याबद्दलचे काही ठळक मुद्दे मांडायचे झाल्यास, त्या एक बालरोगतज्ज्ञ आहेत. क्षयरोग आणि एचआयव्हीमधील संशोधनासाठी जागतिक स्तरावर मान्यताप्राप्त प्रशिक्षण देऊन त्यांनी महत्त्वपूर्ण संस्था स्थापन केल्या आहेत. उदाहरणार्थ क्षयरोगावरील संशोधनासाठी राष्ट्रीय संस्था, आणि त्याशिवाय इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च, ज्याच्या त्या महासंचालक आहेत. केंद्र सरकारच्या वैद्यकीय संशोधन विभागाच्या त्या सचिव होत्या. आपल्या सर्वांना माहित आहे, की त्या जागतिक आरोग्य संघटनेच्या उपमहासंचालक म्हणून पुढे गेल्या. संघटनेतील हे दोन नंबरचे सर्वात मोठे पद आहे. त्यामुळे त्या मुख्य शास्त्रज्ञ म्हणून ओळखल्या जातील.




कोविड आणि त्यामुळे उद्भवलेल्या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी वैज्ञानिकांनी प्रचंड काम केलं. या महामारीच्या काळात जगभरातून येणाऱ्या वेगवेगळ्या समस्यांवर उत्तरे शोधण्याचं काम जागतिक आरोग्य संघटनेनं केलं. वेगवेगळ्या देशाच्या वेगवेगळ्या समस्या होत्या. ही एक जागतिक लढाई होती आणि डॉ. सौम्या आणि त्यांच्या टीमने हे काम चांगल्या पद्धतीने हाताळले. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मी यापूर्वी सांगितली आहे. पण मला त्याची पुनरावृत्ती करायला आवडेल, की डॉ. सौम्या या एका महान व्यक्तीच्या कन्या आहेत. ही व्यक्ती म्हणजे हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. एम. एस. स्वामीनाथन. स्वामीनाथन रिसर्च फौंडेशन तळागाळातल्या विकासासाठी अतिशय सक्रीय आहे. विज्ञान तसेच कृषी, उपजीविका याच्याबाबतीत ही संस्था गेल्या अनेक दशकांपासून सातत्यपूर्ण काम करत आहे. या फौंडेशनच्या त्या आता अध्यक्षा आहेत आणि विज्ञान आणि विकासाशी संबंधित त्यांचे कार्य सुरू आहे. डॉ. सौम्याजी, आम्ही तुमचे आभारी आहोत की तुम्ही आमचे निमंत्रण स्वीकारले. त्यांच्या व्याख्यानाचा तसेच संवादात्मक चर्चेचा फायदा झाला आणि तुमच्यापैकी अनेकांनी ती चर्चा किती समृद्ध होती याचा अनुभव घेतला असेल. मला खात्री आहे, की तुम्ही मला आणखी एक असाच अनुभव येणार आहे, जेव्हा त्या या व्यासपीठावर येतील. पुन्हा एकदा डॉ. स्वामीनाथन यांचे अभिनंदन करतो. धन्यवाद आणि सर्वांचे आभार!

■■■

# निवडणूक काळातील अटक;आंतरराष्ट्रीय मीडियाने केले प्रश्न उभे



जतिन देसाई

# केजरीवाल अटकेमुळे भाजपची जगभर बदनामी

२०२४ हे निवडणुकांचं वर्ष आहे. जगातल्या अनेक राष्ट्रात यावर्षी निवडणुका होणार आहेत. अनेक देशात निवडणुका झाल्या पण आहेत. संपूर्ण जग एक 'जागतिक गाव' झालं असल्यामुळे जवळपास प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या देशात होणाऱ्या निवडणुकांकडे बारकाईने लक्ष ठेवून असतो. एखाद्या देशाच्या निवडणुकीच्या निकालाचा परिणाम दुसऱ्या काही देशात किंवा आंतरराष्ट्रीय समुदायावर पडू शकतो. आंतरराष्ट्रीय समुदाय प्रामुख्याने लोकशाही, मानवाधिकार, सौहार्दपूर्ण संबंध इत्यादी मुद्द्यांवर आग्रही भूमिका मांडत असतो. सर्वात जुनी लोकशाही अमेरिकेत पण यावर्षी अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. तर सर्वात मोठ्या लोकशाहीत निवडणूक सुरू झाली आहे. भारताच्या शेजारील राष्ट्रांचा विचार केल्यास पाकिस्तान, बांगलादेश, भूतान येथे निवडणुका पार पडल्या आहेत आणि त्या त्या देशात नवीन सरकार अस्तित्वात आली आहे. श्रीलंकेत यावर्षी अध्यक्षपदासाठी मतदान होणार आहे. तर मालदीवमध्ये संसदेची निवडणूक होणार आहे. भारताच्या जवळ असलेल्या अफगाणिस्तानात तालिबान सरकार आहे. त्यांचा आणि निवडणुकीचा काही संबंध नाही. म्यानमार (बर्मा) येथे तर लष्कराने 'लोकशाहीची हत्या' केली आहे. २०२० मध्ये झालेल्या निवडणुकीत नोबल पुरस्कार विजेत्या ऑंग सान स्यू की यांच्या नॅशनल लीग फॉर डेमोक्रेसीला (एनएलडी) प्रचंड बहुमत मिळालं असलं तरी नवीन संसद सुरू होण्याच्या सकाळी लष्कराने सत्ता काबीज केली. संयुक्त राष्ट्र (यूएन) आणि आंतरराष्ट्रीय समुदायाने लष्कराच्या कारवाईचा मोठ्या प्रमाणात निषेध केला. म्यानमार हे असोसिएशन फोर साऊथ-इस्ट एशियन नेशन्स (आशीयान) चा भाग आहे. म्यानमार येथे लोकशाहीची पुन:स्थापना व्हावी याकरिता आशियान सक्रिय आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाने लोकशाही हे मूल्य म्हणून स्वीकारले आहे. प्रत्येक देशाच्या निवडणुका खऱ्या अर्थाने "मुक्त, योग्य आणि निष्पक्ष वातावरणात" होतात की नाही,

याकडे आंतरराष्ट्रीय समुदायाच लक्ष असतं. निवडणुकीच्या आधी आणि निवडणुकीच्या काळात विरोधी पक्षांना 'समान संधी' मिळते की नाही ते पाहणं अतिशय महत्त्वाचं असतं. लोकशाहीमध्ये निवडणुकीत सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना 'समान संधी' मिळाली पाहिजे.

पाकिस्तानात शाहबाज शरीफ यांचं पंतप्रधान होणं भारतासाठी काही प्रमाणात चांगली गोष्ट आहे. अतिरेक्यांच्या विरोधात न बोलणाऱ्या इम्रान खान पेक्षा शाहबाज बरा, असं भारतीय राजनैतिक अधिकाऱ्यांना वाटतं. बांगलादेशात शेख हसिना भारतासाठी अतिशय योग्य पंतप्रधान आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर वेगवेगळ्या शक्ती काम करत असतात आणि स्वतःच्या फायद्यासाठी निवडणुकांवर प्रभाव टाकण्याचा ते प्रयत्नही करत असतात. त्यात त्यांना सहसा यश मिळतं नाही. त्यांच स्वतःचं विश्लेषण असतं. आंतरराष्ट्रीय राजकारणात कुठलंही राष्ट्र एखाद्या देशाचा कायमचा शत्रू नसतो. प्रत्येक राष्ट्र, आंतरराष्ट्रीय संबंधात, स्वतःचे हितसंबंध पाहत असतो. शीतयुद्धाच्या काळात सोव्हिएत रशिया हा भारताचा सर्वात विश्वासू मित्र होता. पण शीतयुद्ध संपल्यानंतर सर्व समीकरणे बदलली. अमेरिका सोबत काही मुद्द्यांवर मतभेद असले तरी भारताचा तो आता जवळचा मित्र झाला आहे.

साहजिकच, सर्वात मोठ्या लोकशाही असलेल्या भारताच्या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचं बारकाईने लक्ष आहे. त्यात मित्रराष्ट्र आणि ज्यांच्याशी फारसे संबंध नसलेली राष्ट्र किंवा ज्यांच्या सोबत नेहमी तणावाचे संबंध असलेल्या देशांचा पण त्यात समावेश आहे. भारत स्वतंत्र झाल्यापासून सातत्याने निवडणुका होत असल्याने आंतरराष्ट्रीय समुदायाच्या अपेक्षा वाढलेल्या असतात. त्यातही १९९२ मध्ये भारताने स्वीकारलेल्या नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम असा की आपण एक ताकद म्हणून पुढे आलो आहोत. आशियात सर्वात जास्त अब्जाधीश मुंबईत राहत आहेत. मुंबईत त्यांची संख्या ९२ आहे, तर बीजिंग येथे ९१. प्रत्येक देशाचा दूतावास निवडणुकीत अधिक सक्रिय होत असतो आणि त्यांच्या सरकारला ते नियमित अहवाल पाठवतात. त्यात कुठल्या पक्षाच्या विजयाची शक्यता पासून निकालाचे उभय देशाच्या संबंधावर होणाऱ्या परिणामाबद्दल अंदाज व्यक्त केला जातो. भारतात संसदेचा उल्लेख "लोकशाहीचे मंदिर" म्हणूनही केला जातो. निवडणुका एका अर्थाने उत्सव असतो. भारताच्या या उत्सवात ९६.८ कोटी मतदार आहेत. त्यात ४९.७ कोटी पुरुष, ४७ कोटी महिला आणि ४८ हजार तृतीयपंथी यांचा समावेश आहे. मतदानासाठी एकूण ५५ लाख ईव्हीएमचा उपयोग करण्यात येणार आहे आणि जवळपास १.५ कोटी कर्मचारी निवडणूक प्रक्रियेत सामील आहेत.

भारताच्या निवडणुकीकडे संयुक्त राष्ट्र (यूएन) ते अमेरिका ते पाकिस्तान व इतर देशांचे लक्ष आहे. भारत एक मोठी सत्ता म्हणून पुढे येत असल्याने आंतरराष्ट्रीय माध्यमातून देखील भारताच्या निवडणुकीला महत्त्व मिळत आहे. निवडणुकीच्या प्रचाराच्या काळात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि झारखंडच्या हेमंत सोरेन यांची करण्यात आलेली अटक, गोठवण्यात आलेले काँग्रेसचे बँक खाते सारख्या प्रश्नाना आंतरराष्ट्रीय मीडियात महत्त्व मिळत आहे.



जर्मनी आणि अमेरिकेच्या पाठोपाठ संयुक्त राष्ट्राने देखील अरविंद केजरीवाल यांची सक्तवसुली संचालनालया (ईडी) कडून करण्यात आलेल्या धरपकड बद्दल चिंता व्यक्त केली आहे. संयुक्त राष्ट्राचे सेक्रेटरी-जनरल एन्टोनियो गुतारस यांचे सहकारी स्टीफन दुजारिक यांनी त्यांना विचारण्यात आलेल्या एका प्रश्नाच्या उत्तरात म्हटलं," भारतासह कोणत्याही देशात होणाऱ्या निवडणुकीदरम्यान तेथील लोकांचे राजकीय आणि नागरी हक्क सुरक्षित राहतील, अशी आम्ही अपेक्षा करतो. तसेच प्रत्येक जण निष्पक्ष आणि मुक्त वातावरणात मतदान करेल, अशी आम्हाला आशा आहे." केजरीवाल यांच्या अटकेचा सरळ संबंध निवडणुकीशी आहे. आम आदमी पक्षाचे ते सर्वात मोठे नेते आहेत आणि दिल्ली व पंजाबात आपचे सरकार आहे. भारतातली यावर्षाची सार्वत्रिक निवडणूक अतिशय





महत्त्वाची असल्याचं मत सर्वत्र व्यक्त केलं जात आहे. यापूर्वी संयुक्त राष्ट्राने भारताच्या निवडणुका संदर्भात अशा स्वरूपाचा निवेदन केलेलं दिसत नाही.

जर्मनी यांनी निवडणुकीच्या काळात केजरीवालच्या अटकेबद्दल चिंता व्यक्त केली होती. भारताने लगेच जर्मनीच्या दिल्ली येथील दुतावासातील राजनैतिक अधिकाऱ्यांना बोलावून 'समज' दिली होती. अटक व इतर गोष्टी भारताची अंतर्गत बाबत आहे आणि भारताच्या अंतर्गत बाबतीत कोणीही हस्तक्षेप करू नये, असं परराष्ट्र मंत्रालयातील वरिष्ठ राजनैतिक अधिकाऱ्याने जर्मनीला सांगितलं. त्यानंतर, जर्मनीने मवाळ धोरण स्विकारले. अमेरिकेच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना पण परराष्ट्र मंत्रालयाने पाचारण केलं. त्यांनाही 'समज' देण्यात आली. पण, त्यानंतरही अमेरिकी प्रशासनाने "योग्य, पारदर्शक, कायदेशीर प्रक्रियेची आवश्यकता" असल्याचे म्हटलं. अमेरिकेकडून करण्यात आलेल्या टीकाही काही नवीन गोष्ट नाही. अमेरिका वेगवेगळ्या प्रश्नांवर त्याची भूमिका स्पष्ट करण्यासाठी प्रसिद्ध आहे. शेतकरी आंदोलन, एनजीओ आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांवर करण्यात येणाऱ्या कारवाई बद्दल देखील अमेरिकेने आधी चिंता व्यक्त केली आहे. अमेरिकेशी मैत्रीचे संबंध वाढत असताना अशा गोष्टींमुळे संबंधावर परिणाम होणार नाही, हे पाहणे महत्त्वाचे आहे. भारताच्या अंतर्गत बाबतीत हा हस्तक्षेप असल्याचं अमेरिकी अधिकाऱ्यांना सांगण्यात आलं होत. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मेथ्यू मिलर यांनी म्हटलं," केजरीवाल यांच्या अटकेसह आम्ही या सगळ्या गोष्टींवर लक्ष ठेवून आहोत." मिलर यांनी पुढे म्हटलं," काँग्रेसने त्यांच्या बँकेतली काही खाती गोठवण्यात आली असल्यामुळे त्यांना परिणामकारक प्रचार करता येत नाही अशा आरोप केला आहे आणि त्याची आम्हाला जाणीव आहे. या प्रत्येक बाबींसाठी योग्य, पारदर्शक आणि वेळेवर कायदेशीर प्रक्रिया व्हावी." २०१९ च्या सप्टेंबर महिन्यात अमेरिकेत हाऊडी मोदी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. त्या जाहीर सभेत मोदी आणि अमेरिकेन प्रमुख डोनाल्ड ट्रम्प उपस्थित होते. "अबकी बार ट्रम्प सरकार" असं या सभेत सांगण्यात आलं होत, हे विसरता कामा नये. त्यानंतर २०२० च्या फेब्रुवारीमध्ये

कोरोनाची सुरुवात झाली असताना अहमदाबाद येथे "नमस्ते ट्रम्प" कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला. त्यात एक लाखाहून अधिक लोक गोळा झालेली. राहुल गांधीने त्यापूर्वी भारत सरकारने जगभरात कोरोना वाढत चालला आहे हे लक्षात घेऊन तत्काळ पावलं उचलण्याची आवश्यकता आहे, असं ट्विट केलेलं. ट्रम्प आणि मोदी यांच्यातले संबंध अतिशय मैत्रीपूर्ण होते. पण भारत सरकारने अशा स्वरूपाने, अमेरिकेची निवडणूक जवळ आली असताना, ट्रम्पच्या बाजूने वातावरण निर्माण होईल अश्या स्वरूपाचा प्रयत्न करणं देखील योग्य नव्हतं. ते देखील अमेरिकेच्या अंतर्गत बाबींवर प्रभाव टाकण्यासारखा होत.

आंतरराष्ट्रीय माध्यमातून आणि त्यातही पाश्चात्य देशाच्या मीडियात भारताच्या निवडणुकीला महत्त्व दिलं जात आहे. पाश्चात्य मीडियाच्या बाबतीत एक गोष्ट मुद्दामून सांगितली पाहिजे कि तिथलं मीडिया त्यांच्या सरकारला सतत प्रश्न विचारत असते. ट्रम्पच्या एकूण धोरणाचा या माध्यमाने मोठ्या प्रमाणात विरोध केलेला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बाजूने तिथले कलाकार स्पष्ट भूमिका घेताना आढळतात.

ब्रिटनहून प्रसिद्ध होणाऱ्या 'द इकॉनॉमिस्ट' नावाच्या प्रतिष्ठित साप्ताहिकानी "अरविंद केजरीवाल यांची धरपकड: भारतीय लोकशाहीवर लांछन" अशा लेख छापला आहे. १९ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना "काळजी करण्यासारखा फारसं नसलं तरी सरकार निवडणुक सहजतेने घेत नाही. असं दिसतं की सरकारने वेगळं मत बाळगणाऱ्यांच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे. यावर्षी अटक करण्यात आलेले अरविंद केजरीवाल हे तिसरे नेते आहेत. भारतीय राष्ट्रीय समितीच्या के. कविता आणि झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन यांना वेगवेगळ्या खटल्यात अटक करण्यात आली आहे." त्या लेखात मोदींची "लोकप्रियता प्रचंड" असल्याचेही म्हटलं आहे. फ्रान्स येथून प्रसिद्ध होणाऱ्या लोकप्रिय दैनिक 'ला मोंड' यांनी केजरीवाल यांची अटक करण्यात आली त्या दिवसाच्या बातमीत म्हटलेलं," भारतात, सरकारने परत एकदा विरोधी पक्षाच्या नेत्यांना अटक केली." बीबीसी ने म्हटलं," मात्र एका दशकात एक नवीन पक्ष असला तरी आप एक अतिशय प्रभावी ताकद म्हणून उभा राहिला आहे." इतरही अनेक वर्तमानपत्राने भारताच्या निवडणुकांबद्दल, अरविंद




केजरीवाल यांच्या धरपकड बद्दल आणि कॉंग्रेसची बँकेतली खाते गोठवण्याबद्दल भारत सरकारला प्रश्न विचारले आहेत.

भारताच्या निवडणुकीच्या संदर्भात एवढ्या मोठ्या प्रमाणात टीका यापूर्वी झालेली आढळत नाही. संयुक्त राष्ट्र, अमेरिका, जर्मनी जेव्हा टीका करतात तेव्हा निवडणुका, नेत्यांची धरपकड वगैरे अंतर्गत बाबत आहे एवढं सांगणं पुरेसं नाही. इतरांना बोलण्याची संधी मिळणार नाही याची काळजी आपणच घेतली पाहिजे. निवडणुकीत सत्ताधारी पक्ष असो किंवा विरोधी पक्ष त्या सगळ्यांना समान संधी मिळाली पाहिजे.

■■■

शरद पवार

# मोदीवादी शक्ती बाजूला



**नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे १३ मार्च रोजी आयोजित 'महासभा एकजुटीची, साथ अनुभवाची, ताकद महाराष्ट्राची..!' या सभेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केंद्र आणि राज्यातील हुकूमशाही सरकार विरोधात उपस्थितांना केलेले संबोधन..**

देशातील लोकसभा निवडणुकीकडं सबंध देशाचं लक्ष आहे. देशाच्या बाहेरून अनेक पत्रकार, विचारवंत या देशाला भेट देतात. आम्हा लोकांची वेळ मागतात, आणि उद्याच्या निवडणुकीमध्ये या देशामध्ये काय घडणार आहे हे जाणून घेण्यासाठी उत्सुक असतात. आणि त्याचं महत्त्वाचे कारण, देशामध्ये जे चालू आहे, जे काही घडत आहे हे लोकशाहीच्या देशामध्ये घडणं हे जगाच्या हिताचं नाही, अशी एक भावना भारतात आणि भारताच्या बाहेर देखील आहे. त्यामुळेच, लोक उत्सुकतेनं या निवडणुकीकडं पाहतात.

अनेक निवडणुका, राज्यकर्ते आपण पाहिले. जवाहरलाल नेहरूंचा काळ, लालबहादूर शास्त्रींचा काळ, इंदिरा गांधींचा काळ, राजीव गांधींचा काळ, नरसिंहरावांचा काळ, डॉ. मनमोहन सिंहांचा काळ हा या देशानं पाहिला. अटल बिहारी यांचा काळ पाहिला. वैचारिकदृष्ट्या वेगळी भूमिका होती, तरी देशाच्या हिताची जपवणूक करण्यासाठी यातील प्रत्येक व्यक्तीनं प्रधानमंत्र्यांनी या देशात काळजी घेतली. आणि म्हणून ही लोकशाही टिकली. याचा अभिमान आपल्याला तर आहेच, पण, जगाला पण आहे.

हल्ली गेल्या ८ - १० वर्षात नवीन राज्यकर्ते आले. नरेंद्र मोदींनी काय केलं? कसली धोरणं आखली? कोणते प्रश्न सोडवले? मला आठवतंय, मनमोहन सिंहांच्या मंत्रिमंडळामध्ये शेतीचं काम माझ्याकडं आलं. राष्ट्रपती भवनात शपथ घेतली आणि घरी आलो. एक फाईल घेऊन अधिकारी भेटायला आले. त्या फाईलमध्ये लिहिलं होतं की, या देशामध्ये दीड महिना पुरेल एवढं धान्य आहे. काही उपाययोजना केली नाही तर या देशामध्ये लोकांना उपाशी राहावे लागेल. आणि त्यासाठी अमेरिकेवरून किंवा ब्राझीलवरून धान्य आयात करा. मी अतिशय अस्वस्थ झालो. कृषीप्रधान देश म्हणायचा आणि धान्य बाहेरून आणायचं, नाईलाज होता. स्थिती

# करून देशात बदल करूया



वाईट होती, आणि म्हणून धान्य बाहेरून आणावं लागलं. पण, आम्ही लोकांनी निर्णय घेतला, ही स्थिती बदलायची. दुसऱ्या दिवशी माहिती मिळाली की, यवतमाळ जिल्ह्यामध्ये एका शेतकऱ्यानं आत्महत्या केली. काळ्या आईशी इमान राखणारा शेतकरी आत्महत्या करतो, याच्या खोलात गेलं पाहिजे. म्हणून मी स्वतः त्यांच्या घरी गेलो. त्यांची भेट घेतली. विचारलं, काय झालं? का आत्महत्या केली? त्या माऊलीच्या डोळ्यातले अश्रू थांबत नव्हते. तिने सांगितलं, मुलीचे लग्न ठरले होते. सावकाराकडून पैसे घेतले होते. त्याची परतफेड करता आली नाही. सावकाराने एक दिवशी येऊन घरातली भांडीकुंडी बाहेर काढली आणि या स्थितीमुळे मुलीचं लग्न मोडले. ते मुलीच्या बापाला सहन झालं नाही आणि जीव दिला. हे चित्र बदलायचं होतं आणि ते बदलायचं असेल, तर दिल्लीला गेल्यानंतर एका आठवड्याच्या आत निकाल घेतला की, या देशातल्या शेतकऱ्यांचं कर्ज माफ करायचं. ७१ हजार कोटींचं कर्ज एका मताने आम्ही माफ केलं. एवढंच नाही तर शेतीमालाच्या किमती वाढवल्या. नवीन बी-बियाणे दिले. आणि ५ ते ७ वर्षामध्ये जो देश परदेशातून धान्य आणायचा विचार करत होता, त्या देशातल्या बळीराजांनी या देशातल्या लोकांची भुकेची गरज भागवली. एवढंच नव्हे तर, जगातल्या १८ देशांना आज धान्य पुरवायचं काम हा देश करत आहे. या देशातल्या शेतकरी करत आहे. पण, आजचे राज्यकर्ते या धोरणाचा विचार करत नाहीत.

सगळे सांगत आहेत, कसली गॅरंटी? मोदींची गॅरंटी. काय गॅरंटी दिली? आज या गॅरंटीमध्ये शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणार, याची गॅरंटी दिली. उत्पन्न वाढले नाही. आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्या वाढल्यात, त्याची गॅरंटी दिली होती. रोजगार वाढवणार, बेकारी घालवणार याची गॅरंटी दिली होती. त्यातली एकही गॅरंटी पूर्ण झाली नाही. फक्त आश्वासनं देणं याशिवाय दुसरं काहीच करायचे नाही. आणि ते कोणत्याही टोकावर ते केले जाते. मला आठवतंय, एकदा मोदी साहेबांनी मला सांगितलं की, 'शरदराव आपके बारामती में मुझे आना है ।' मी म्हटलं, 'आप आ सकते है।' तुमची शेती बघायचीय. ते बोलत होते. आले; सर्व शेती पाहिली, कारखानदारी पाहिली, शैक्षणिक संस्था पाहिल्या, आणि बाहेर जाऊन सांगितलं, 'शरद पवारांचं बोट धरून मी राजकारणात आलो.' राजकारणात गॅरंटी द्यायची आणि पाळायची नाही आणि त्याच राजकारणात ते माझं बोट धरून

आलेत. मी पार्लमेंटमध्ये सांगितलं, मोदी साहेब सगळ्या गोष्टी मान्य. पण, माझ्या बोटाला हात लावू नका. माझं बोट असे राजकारण करणारे नाही आणि गॅरंटी पाळणार नसाल, तर तुमची बदनामी असेल की, नाही याचा विचार तुम्ही करा. पण, माझ्यासारख्याची बदनामी या ठिकाणी करू नका.

आज अनेक गोष्टी आहेत. सत्तेचा गैरवापर आहे. त्यांच्या मनासारखी टीका आणि राजकारण कोणी करत नाही. म्हणून टोकाची भूमिका घेतली जाते. महाराष्ट्रामध्ये मंत्रिमंडळाचे मंत्री तुरुंगात टाकले. राऊत साहेबांनी आपल्या लेखणीने सरकारच्या चुकीच्या धोरणावर आवाज उठवला. त्यांना तुरुंगात टाकलं. अनिल देशमुख यांना तुरुंगात टाकलं. आज झारखंडचे मुख्यमंत्री त्यांच्या विचारांचे नाही, म्हणून मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकलं. दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांना ८ नोटीसा टाकल्या. त्यांना देखील तुरुंगात टाकल्याशिवाय राहणार नाहीत. त्यांच्या मंत्रिमंडळातील ३ मंत्र्यांना तुरुंगात टाकलं. जिथं तुमच्या मनाविरुद्ध वागतात. तुमची भूमिका स्वीकारत नाहीत. त्या ठिकाणी सत्तेचा गैरवापर करून तुरुंगात टाकण्याची कामगिरी आजचे हे सरकार करत आहे. आणि त्यामुळे, यात बदल केला पाहिजे. आणि तो बदल करायचा असेल तर ती संधी मतदानाच्या निमित्ताने आपल्यासमोर आलेली आहे.

आम्ही ठरवलं, देश वाचवायचा आहे. आम्हाला चिंता आहे ती देशाच्या संविधानाची. २ दिवसांपूर्वी भाजपाच्या एका खासदाराने दिल्लीमध्ये लोकांसमोर मत मागताना सांगितलं, या देशातली घटना आम्हाला बदलायची आहे आणि घटना बदलण्यासाठी मोदींना शक्ती द्या. विजयी करा. जे घटना बदलण्याचा विचार करतात. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला घटना लिहून या देशाचे ऐक्य मजबूत ठेवलं. सामान्य माणसाचा अधिकार हा निदर्शनास आणला. आज त्याच घटनेवर संकट आणण्याचं काम मोदी आणि त्यांचे सहकारी करत आहेत. आणि म्हणून याला उत्तर एकच आहे की, समविचारी लोकांनी एकत्र आले पाहिजे. त्यात राष्ट्रवादी काँग्रेस असेल, उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना असेल, काँग्रेस पक्ष असेल, भारतीय कम्युनिस्ट पार्टी असेल, राजकीय अन्य पक्ष असतील, आम्ही निकाल घेतला की, आम्ही एकत्र राहू. देशाला पर्याय देऊ. आणि देशाच्या ऐक्याला सुरुंग लावणारी, देशाच्या हिताची जपवणूक न करणारी जी मोदीवादी शक्ती आहे, त्यात बदल केल्याशिवाय स्वस्थ बसायचं नाही आणि या कामाची सुरुवात आम्ही आता तुमच्यापासून या ठिकाणी करत आहोत.


सन्मानचिन्ह देऊन शरद पवार यांचे स्वागत करताना

निफाड आणि हा परिसर, इथला शेतकरी हा कष्टकरी शेतकरी आहे. रोज नवनवीन संकल्पना राबवणारा हा शेतकरी आहे. अनेक गोष्टी यांनी दाखवलेल्या आहेत आणि मी स्वतः पाहिलेल्या आहेत. आणि म्हणून तुमच्यापासून या बदलाची सुरुवात हा करण्याचा निर्धार आम्ही सर्वांनी या ठिकाणी केला आहे. तुम्ही त्याला साथ द्या, एवढीच आग्रहाचे विनंती करतो, आणि माझे दोन शब्द संपवतो..!

■■■

# महाराष्ट्रातलं सरकार घाबरलंय

**जयंत पाटील**



आज आपल्या देशात आणि महाराष्ट्रात काय वातावरण आहे, रोज दहा-बारा उद्घाटनं महाराष्ट्र स्तरावर होतायंत. नव्या नव्या घोषणा होतायंत. मंत्रिमंडळाचे कोट्यवधी रूपयांचे निर्णय, जणू काय आपल्याला हे द्यायचेच नाहीत पैसे फक्त जाहीरच करायचेत या भावनेनं व्हायला लागलेले आहेत. याचा अर्थ माझ्यासारखा कार्यकर्ता एकच काढतो, की सरकार जरा घाबरलेलं आहे. सरकारला धास्ती वाटतेय महाराष्ट्राची आणि महाराष्ट्रामध्ये निकाल वेगळा लागेल, त्यामुळं जमेल ते, असेल ते तिजोरीतलं द्या, घोषणा करा, द्यायचं असेल तर नंतर बघू या भावनेनं आज महाराष्ट्रात राज्य चाललेलं आहे.

आता अब की बार, चारशे पारची घोषणा आहे. चारशे पार कशासाठी? या देशातलं संविधान बदलण्यासाठी चारशे पार आहे का? संविधान हे भारतासाठी काळ्या दगडावरची रेघ आहे आणि ते बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करणार आहात का? याचं उत्तर भारताला दिलं पाहिजे. आज जीएसटी आहे, नोटबंदी आहे, शेतकरी विरोधी कायदे आहेत, कामगार विरोधी कायदे आहेत. नोटबंदीमुळे रांगेत उभे राहून लोकांचे जीव गेले. जीएसटीमुळं या देशातला लहान व्यापारी, मध्यम व्यापारी अडचणीत आला. शेतकऱ्याच्या ताटात जेवताना जीएसटीच्या माध्यमातून सरकार बसायला लागलंय, ही भावना भारतातल्या शेतकऱ्याच्या, शेतमजुराच्या मनात निर्माण झाली. कारण, प्रत्येकाला आज जीएसटी द्यावा लागतो. १८ टक्के जीएसटी द्यायची पाळी आलेली आहे. त्यामुळं शेतकऱ्यांना दिल्लीला बसावं लागलं. सातशेपेक्षा जास्त शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. पण सरकार बधलं नाही. आजही शेतकरी दिल्लीमध्ये पुन्हा जाऊन धरणं धरतायंत. कारण, शेतकऱ्यांची मागणी आहे, की आम्हाला आधारभूत किंमत द्या, तुम्ही दिलेली खैरात तुम्ही कधीपर्यंत चालू ठेवाल हे माहित नाही. त्यामुळं आमच्या पिकाला आधारभूत किंमत द्या.

हे सरकार गरीबांच्या विरोधात कायदे करणारे आणि श्रीमंतांना मदत करणारं सरकार आहे का? याचाही विचार आपण करा. आपल्याला माहिती आहे, की भारताच्या इतिहासातली शेतकऱ्यांना सर्वात मोठी कर्जमाफी आपले नेते शरद पवार साहेबांनी ७२ हजार कोटी रूपयांची दिलेली होती. आता दहा वर्षे संपली, शेतकऱ्याला कर्जमाफी नाही. आम्हाला कर्जमाफी दिली नाही, तरी आम्ही समजू शकतो. पण या देशामध्ये ५६ लाख कोटी रूपयांचं कर्ज मनमोहन सिंगांचं सरकार गेलं त्यावेळी होतं. स्वातंत्र्यापासून आतापर्यंत. हा आकडा यांनी आता २०५ लाख कोटींवर नेला. म्हणजे तुमच्या प्रत्येकाच्या डोक्यावर दीड लाख रूपयांचं कर्ज काढलेलं आहे. बरं हे पैसे कुठे गेले? जरा शोधल्यावर लक्षात यायला लागलंय, की या देशात जवळपास २० लाख कोटी रूपये भारतातल्या उद्योगपतींना, मोठ्‌ मोठ्या श्रीमंत वर्गातल्या लोकांचं रिॲडजेस्टमेंट करण्यासाठी, स्ट्रक्चरल ॲडजेस्टमेंट करण्यासाठी आणि कर्जमाफी करण्यासाठी वापरण्यात आलं. म्हणजे आम्ही सगळ्यांनी दीड लाख रूपये डोक्यावर घ्यायचे आणि यांनी या देशातल्या उद्योगपतींना २० लाख कोटीपर्यंत कर्ज माफ करायचं आणि हे या कानाचं त्या कानालादेखील कळलं नाही. ही भारतातल्या सामान्य माणसाच्या मनातली चिंता आहे आणि यामुळं भारतातला माणूस अस्वस्थ झालेला आहे.

आज अनेक नेते इथं आलेले आहेत. कारण, या देशातला श्रम करणारा जो माणूस आहे, कष्ट करणारा माणूस आहे, कामगार आहे, त्याच्या विरोधात केंद्र सरकारनी कायदे केलेले आहेत. तुमच्या कारखान्यात ३००पेक्षा कमी कामगार असतील, तर आता कुठलाही कायदा त्या कामगाराला संरक्षण देऊ शकत नाही ही आज परिस्थिती आहे. या देशात शेतकऱ्यांच्या विरोधी कायदे झाले, कामगारांच्या विरोधी



कायदे झाले, या देशामध्ये सक्त अशी जीएसटी तुमच्या-माझ्या डोक्यावर बसवण्यात आली. आज शेतकऱ्यांचे खतासाठी एक लाख रूपये खर्च झाले, तर अठरा हजार रूपये शेतकऱ्याच्या खिशातून आणखी काढून घेण्याची व्यवस्था या जीएसटीच्या माध्यमातून झालेली आहे. म्हणून माझी आपणा सगळ्यांना विनंती आहे, हे सत्तेवर येण्याच्या आधी २०१४ साली काय होतं, सोयाबीनला सहा हजार रूपये दर द्या, कापसाला दहा हजार रूपये दर द्या, आणि आज दर काय आहे सोयाबीनला? चार-साडेचार हजार रूपये. कापूस सहा हजाराच्या वर जाईना झालांय. कांद्याची अवस्था काय आहे हे तुम्ही सगळ्यांनी अनुभवलेलं आहे. निर्यातबंदी केली.

त्याच्याचबरोबर बांगलादेशला केळी पाठवत होतो, संत्री पाठवत होतो. त्या बांगलादेशातदेखील आपला माल जायला अडचणी निर्माण झाल्या. कारण, त्यांनी आयातीचा मोठा कर आमच्यावर लावला. म्हणून मित्रांनो, आपल्याला घामाला दाम मिळत नाही. आपण कष्ट करायचे पण आपल्याकडं बघणारं सरकार नाही आणि म्हणून या सरकारला बदलण्याची भूमिका तुम्ही आणि आम्ही सगळ्यांनी घेणं आवश्यक आहे. त्यासाठी आपण सगळे संघटितपणानं याठिकाणी येणं आवश्यक आहे.

आता निवडणुका जाहीर झाल्या. भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांच्या याद्या बाहेर पडल्या. तुमच्या दिंडोरी लोकसभा मतदारसंघात केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री आहेत, त्यांनाच या मतदारसंघात पुन्हा उमेदवारी देण्यात आली. या मतदारसंघातल्या एका ग्रामीण रूग्णालयात आज काय झालं? त्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण केंद्रीय राज्यमंत्री आहेत, पण या ग्रामीण रूग्णालयामध्ये गेली दहा

## सत्तेसाठी लाचारी स्वीकारणे योग्य नाही

लोकांनी उमेदवाराला खांद्यावर घेतले आणि निवडणूक लोकांनी हातात घेतली तर कोणतीही शक्ती त्या उमेदवाराचा पराभव करू शकत नाही. निलेश लंके हे स्थानिक आहेत, लोकप्रिय आहेत, सतत फिरतीवर असतात. त्यांच्या विधानसभा मतदारसंघात त्यांनी प्रचंड काम केले आहे आणि लोकप्रतिनिधी कसा असावा याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे. या लोकसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न सुटलेले नाहीत त्यामुळे हा उमेदवार आपण पुढे केला आहे. लंके इथल्या लोकांचा आवाज दिल्लीपर्यंत पोहोचवेल. आज देशात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत तरी काही जण म्हणतात आम्ही काम करण्यासाठी सत्तेत जात आहोत. सत्तेसाठी लाचारी स्वीकारणे योग्य नाही अशी ठाम भूमिका त्यांनी यावेळी मांडली तसेच कोणत्या विचारामागे राहून आपण काम करतोय हे पाहणे गरजेचे आहे. राजकारणात विचार आणि आचार फार महत्वाचे असतात. आदरणीय पवार, उद्धवजी ठाकरे यांच्या मागे लोक मोठ्या ताकदीने उभे आहे. आदरणीय पवार साहेब, उद्धवजी ठाकरे आणि राहुलजी गांधीच ही परिस्थिती बदलू शकतात यावर लोकांचा ठाम विश्वास आहे. असेही राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे निलेश लंके यांचा अहमदनगर जिल्ह्यातून निवडणुकीसाठी अर्ज भरण्याकरिता गेले असता जाहीर सभेत म्हणाले.



वर्षे स्त्री रोग तज्ज्ञ नाहीये आणि औषधोपचाराच्या अभावी आज १३ तारखेला गरोदर माता कांचन सुरेश वाडे हिला आणि तिच्या पोटातल्या मुलाला मृत्युला सामोरं जावं लागलं.

माझ्या मतदारसंघात या. मी कधी आरोग्य खात्याचा मंत्री नव्हतो. इस्लामपूरचं प्राथमिक आरोग्य उपकेंद्र रूग्णालय, त्या उपजिल्हा रूग्णालयाला याच सरकारने आजच सगळ्यात पहिल्या नंबरचं पारितोषिक दिलंय सर्वगुणसंपन्न असं प्राथमिक आरोग्य केंद्र म्हणून. आपण ज्या मतदारसंघातले आहोत, तिथे चांगल्या व्यवस्था नसतील तर तुमच्या मंत्रीपदाला काय चाटायचंय? तुमच्या सरकारकडून आज कोट्यवधी रूपयांच्या जाहिराती केल्या जात आहेत, पण सर्वसामान्यांना सोयीसुविधा दिल्या जात नाहीत अशी अवस्था आहे. सध्या काय चाललंय, तर गॅरंटी, गॅरंटी. त्याबद्दल आमची काय तक्रार नाही. पण या महाराष्ट्रात एक हजार कोटी रूपयांचं बजेट यावर्षी ३१ मार्चपर्यंत होतं. परवा आणखी ८४ कोटी रूपये आचारसंहिता कधी लागणार हे माहित नसल्यामुळं आणखी ८४ कोटी रूपये सरकारनं जाहिरातीसाठी गुंतवले.

माझी आपणा सगळ्यांना विनंती आहे, सांगण्यासारखे अनेक मुद्दे आहेत. बेरोजगारीचा तर विषयच नाही. घराघरात बेरोजगारी आहे. आम्हाला दोन कोटींचं आश्वासन मिळालेलं. पण, आमच्या पोरांच्या हाताला काम मिळत नाही ही घराघरातली वस्तुस्थिती आहे. कांद्याला दर नसल्यामुळं घराघरातले लोक नाराज झालेले आहेत. घराघरात आरोग्याच्या सुविधा नाहीत म्हणून लोकं हताश झालेली आहेत आणि जाहिरात काय तर पाच लाख रूपयांत तुम्हाला सगळे बेनिफिट मिळणार. पण, अजून कोणालाही ते मिळालेले नाहीत. महागाईसुद्धा तुम्ही अनुभवतांय. आपण सगळ्यांनी बारकाईनं विचार केला पाहिजे, की आपल्यासमोर जे सरकार आहे ते सरकार कशा पद्धतीनं वागतंय. काही लोकं आमचा पक्ष सोडून गेले. नाशिक जिल्हा पवार साहेबांवर प्रेम करणारा जिल्हा आहे. म्हणून मागच्या १९च्या निवडणुकीत तुम्ही आमचे पाच आमदार या जिल्ह्यातनं निवडून दिले. यांनी आमचा पक्ष फोडला. आमचा पक्ष हिसकावून घेतला. पवार साहेबांनी घराघरात पोहोचवलेलं घड्याळाचं चिन्हही हे घेऊन गेले. आता पवार साहेबांनी तुमच्यासमोर तुतारी आणलीय. सगळ्यांना माझी विनंती आहे, की तुतारी वाजवणारा माणूस हे आपल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाचं चिन्ह आहे. ही तुतारी घराघरात पोहचवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाला विजयी करण्यासाठी प्रयत्न करा.

माझी तुम्हाला विनंती आहे, की जाहिरातींवर जाऊ नका. तुमच्यासमोर जी परिस्थिती दिसतेय त्याच्यावर जाऊ नका. आज शरद पवार साहेब एका बाजूनं खंबीरपणानं उभे आहेत आणि जेव्हा जेव्हा पवार साहेबांनी महाराष्ट्रात सर्व पक्ष एकसंघपणानं एकत्रित आणले, तेव्हा तेव्हा महाराष्ट्रानं पवार साहेबांच्या भूमिकेला मान्यता दिलेली आहे. आम्ही सगळ्यांना एकत्रित करायचा प्रयत्न करतोय. भाजप आणि शिवसेना तसेच आमच्यातून फुटून गेलेल्या सर्वांचा पराभव करण्याची भूमिका घेऊन आम्ही तुमच्यासमोर उभे आहोत. तुम्ही आम्हाला ताकद द्याल अशी आशा आहे. महाविकास आघाडीचा उमेदवार जिथं जिथं उभा राहील, तिथं तिथं तुमच्या सगळ्यांचा आशीर्वाद द्या ही विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद!

■■■

# सरकार आवळा देऊन कोहळा काढतंय

**डॉ.अमोल कोल्हे**


लोकसभा निवडणूक लक्षात घेऊन रोज नवनवीन घोषणा केल्या जातायंत. मंत्रिमंडळाच्या बैठकात धडाकेबाज निर्णय घेतल्याचं सांगितलं जात आहे. पण, हे सर्व होत असताना माझ्या सर्वसामान्य शेतकऱ्याला काय मिळालं हे महत्त्वाचं आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांना सहा हजार रूपये दिले जात आहे. पण, हा फक्त वरवरचा मुलामा आहे. याचा जर वर्ख खरवडून काढला तर विचार करा, ३ डिसेंबरला कांद्याची निर्यातबंदी झाली. त्यावेळी कांद्याला ४२०० रूपये दर मिळत होता. म्हणजे ४० ते ४२ रूपये किलो होता. पण, निर्यातबंदी झाल्यानंतर ४५ दिवस महाराष्ट्रातल्या शेतकऱ्याचं दोन हजार कोटी रूपयांचं नुकसान झालं. अशा परिस्थितीत दोन हजार रूपयांचं कौतुक फोनवर कितीवेळा ऐकायचं याचा विचार प्रत्येकानं केला पाहिजे. आत्ता कांद्याला समजा दोन हजार रूपये दर मिळतोय, म्हणजे किलोमागं वीस रूपयांचं नुकसान, एकरात बारा टन कांदा पिकतो आणि दोन एकराचं जर माझं वावर असेल, तर दोन एकरामध्ये माझा २४ टन कांदा, जर किलोमागं वीस रूपयांचं नुकसान तर तुमच्या प्रत्येकाचं केंद्र सरकारच्या निर्णयामुळं झालेलं नुकसान हे ४ लाख ८० हजार रूपयांचं आहे. त्यानंतरही जर कुणी कौतुक सांगत असेल, की सहा हजार रूपये परत देतोय तर याला आवळा देऊन कोहळा काढणं म्हणतात. हे लक्षात ठेवा.

बरं हे सहा हजार रूपये देतात कुठून? लाखभराची तरी खतं शेतात घालत असू ना आपण. या खतावर जीएसटी किती? १८ टक्के जीएसटी आहे. म्हणजे लाखाची खतं घालायची आणि सरकार तुमच्या खिशातून काढून किती घेतंय तर १८ हजार रूपये आणि परत किती देतंय तर सहा हजार. ही निवडणूक केवळ कुठल्या उमेदवाराची नाही, कुठल्या पक्षाची नाही, ही निवडणूक तुमच्या-माझ्या अस्तित्वाची, तुमच्या-माझ्या स्वाभिमानाची आहे. खरं तर निफाडचा भाग हा द्राक्ष बागायतदारांचा आहे. दहा वर्षापूर्वी हे सरकार सत्तेत आलं तेव्हा सांगितलं होतं, की शेतकऱ्याचं उत्पन्न दुप्पट होणार. मला एकतरी द्राक्ष उत्पादक दाखवा ज्याचं उत्पन्न दुप्पट झालंय. उलट द्राक्षाच्या बागेसाठी एकरी अडीच लाख खर्च येत होता, तो आता साडेतीन लाखावर गेलांय. जेव्हा द्राक्षाला सरासरी ८० ते ९० रूपये भाव मिळत होता, तो भाव आता ६५ ते ७० रूपयांवर आलांय की नाही. कुठं गेलं शेतकऱ्यांचं दुप्पट उत्पन्न? हे प्रश्न आपल्याला विचारावे लागतील.

आज मंत्रिमंडळाने ४५ निर्णय घेतले. त्यात वेल्हे तालुक्याचं नाव राजगड असं करण्यात आलं. नक्कीच, प्रत्येक



शिवभक्ताला अभिमान वाटेल अशी ही गोष्ट आहे, की छत्रपती शिवाजी महाराजांच्या पहिल्या राजधानीचं नाव या तालुक्याला दिलं. तसे पुरावे होते आणि आमच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सातत्यानं याचा पाठपुरावा केला होता. पण हेच सरकार छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श पाळतं का हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण, शेतकऱ्याच्या भाजीच्या देठाला हात लागू देऊ नका ही जी छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण होती, त्याप्रमाणं आत्ताच्या एक फुल, दोन डाऊटफुलच्या सरकारनं एकदाही आमच्या कांदा उत्पादक शेतकऱ्याचा प्रश्न मांडला नाही. कांद्याचा प्रश्न असेल, शेतमालाच्या भावाचा प्रश्न असेल, देशाच्या लोकसभेत महाराष्ट्रातले ४८ खासदार निवडून जातात, त्यापैकी ३९ खासदार हे महायुतीचे आहेत. त्यातील एक खासदार दाखवा, ज्यानं कांद्याची जेव्हा निर्यातबंदी झाली तेव्हा संसदेमध्ये गर्जना केली. एक खासदार दाखवा, ज्यानी महाराष्ट्रातले उद्योगधंदे पळवून नेले जात होते तेव्हा तोंड उघडलं. म्हणून आता प्रश्न विचारण्याची वेळ आलेली आहे, की संसदेमध्ये दिल्लीतून गुबूगुबू वाजल्यानंतर माना डोलावणारे नंदी बैल पाठवायचे की महाराष्ट्राच्या हितासाठी गरजणारे वाघ पाठवायचे. हे आता तुम्ही ठरवायचंय.


नाशिकजवळील रामशेज किल्ला

नाशिक जिल्ह्यामध्ये जवळच किल्ले रामशेज आहे. जुन्या काळी जेव्हा वतनच खालसा होणार असेल तेव्हा भले भले सरदार, भले भले शेर हे मिट्टीचे शेर होत असत. मुगलशाहीचं, आदिलशाहीचं आक्रमण आलं, की वतन जाऊ नये म्हणून बाजू बदलली जायची आणि याच नाशिकच्या भूमीमध्ये किल्ले रामशेज उभा आहे, हाच रामशेज किल्ला घेण्यासाठी जेव्हा औरंगजेबचा सरदार आला, तेव्हा त्यानं सांगितलं, की सकाळी जातो, दुपारी किल्ल्यावर आतषबाजी करतो आणि संध्याकाळी आपण सोबत खाना घेऊ. त्या किल्ल्यावरच्या किल्लेदाराचं नावसुद्धा आज कुणी सांगू शकत नाही. पण हा सामान्य किल्लेदार या मातीतला होता, त्या किल्लेदारानं तब्बल साडेसहा वर्षे औरंगजेबच्या बलाढ्य सैन्यासमोर लढवला. ही प्रेरणा या मातीची आहे. त्यामुळं वतनदार वतन खालसा होण्याच्या भीतीनं कुठंही गेले असतील, तरी सर्वसामान्य मावळ्याची चिकाटी या मातीत आहे आणि ही चिकाटी आपल्याला येणाऱ्या काळात दाखवायचीय.

गेल्या काही वर्षात महाराष्ट्रानं बघितलंय. दोन सिंह होते. एक सिंह जेव्हा जंगलात राहात होता ना, तेव्हा डरकाळ्या फोडत होता. डरकाळी फोडली की सगळे ऐकायचे. एक दिवस सिंहाला काय झालं कळलं नाही. सिंहाला वाटलं, की आता जंगल बास झालं, सर्कशीत जाऊ. दोन्ही सिंह सर्कशीत गेले. पण, सवयीप्रमाणं आधीसारखेच डरकाळी फोडायला लागले. गेले काही दिवस वर्तमानपत्रात तुम्ही वाचत असाल. एका गुजराती रिंग मास्टरनी हंटर वाजविला, त्यासरशी पहिली डरकाळी फोडणारा म्हटला, अठरा नको, तेरा दिल्या तरी बास. दुसरा म्हणला, महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला हेच खटकतं, जेव्हा स्वगृही असताना देणारा जो होता, तो जेव्हा दिल्लीच्या दारात जाऊन मागणारा होतो, तेव्हा महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला कुठंतरी ठेच लागते, म्हणजे आता गाडीत बसणाऱ्यांना आता सीट मिळणार आहे का नाही हेच कुठं कळणार नाही आणि त्यामुळं या पुढच्या काळात मतदान करत असताना माझी फक्त एवढीच कळकळीची विनंती आहे, की विचार करून मतदान करा. आतापर्यंत तुम्ही आणि मी ऐकत होतो मतदान. दान दिलं का विसरून जायचं. त्यामुळं ज्यांना मतदान दिलं होतं, त्यांनी तुम्हाला गृहित धरायला सुरूवात केली. ज्या माणसाकडं बघून तुम्ही मतदान केलं होतं, त्यांची साथ सोडून माणसं दुसरीकडं जायला लागली, तेव्हा मतदान हा फक्त अधिकार नाही तर ती एक जबाबदारी आहे हे लक्षात ठेवा. ही जबाबदारी लोकशाहीत टिकवण्याची, ही जबाबदारी संविधान टिकवण्याची आहे. म्हणून फक्त एवढंच सांगतो, मतदान केंद्रावर गेल्यानंतर आतमध्ये मत देऊन यायला फक्त पाच मिनिटं लागतात. या पाच मिनिटांत एकदा फक्त स्वत:ला विचारा, की माझ्या कांद्याचा भाव मातीमोल करण्याचं पाप कुणी केलं, माझ्या सर्वसामान्य शेतकऱ्याच्या ताटात माती कालवण्याचं पाप कुणी केलं, माझ्या दुधाचं दर पाडण्याचं पाप कुणी केलं, माझ्या सर्वसामान्य तरूणाच्या हातातला रोजगार हिसकावून घेण्याचं पाप कुणी केलं, माझ्या देशाला धर्मात आणि जातीत वाटण्याचं पाप कुणी केलं. या सगळ्या प्रश्नांचा जाब विचारण्यासाठी तुमच्या हातात पाच मिनिटांचा वेळ आहे. हा जाब योग्य पद्धतीनं विचारला, तर एवढीच अपेक्षा करतो, माझ्या भावांनो, तुमच्या माझ्या देशातल्या कच्च्या बच्च्यांसाठी, या देशाच्या स्वाभिमानासाठी आता बळकट हातांनी स्वाभिमानाची मशाल पेटवून विजयाची तुतारी फुंकायला विसरू नका, एवढंच तुम्हाला कळकळीनं सांगतो आणि आपली रजा घेतो. धन्यवाद! जय शिवराय!!

■■■

# गद्दारी गाडल्याशिवाय थांबायचं नाही

**जितेंद्र आव्हाड**

आज या ठिकाणी खरी महाविकास आघाडी एकत्र झाल्याचं चित्र दिसतंय. सर्व पक्षांचे कार्यकर्ते दिसतायंत. एकत्र लढण्यासाठी आले आहेत. हे एकत्रिकरण फार महत्त्वाचं आहे. कारण का, तर माज आलेल्या बैलाला चाप लावायचा आहे. हा मार्जोडा बैल का आहे हे तुम्हाला सांगतो. साहेब, तुम्ही येणार म्हणून तुमचा फोटो, याचा फोटो आणि शुभेच्छुक. अरे, मनात काळंबेरं असताना कशाला रे आमच्या बापाचा फोटो लावता रे. पत्रकार परिषदेत सांगितलं, की जयंत पाटील ढसाढसा रडत होते. होय, ते रडत होते, कारण त्यांना हृदय आहे. मन आहे. साहेबांबद्दल आपुलकी आहे. पण, हा मनात काळं असलेला माझ्या बाजूला बसलेला. तेव्हा हा काय म्हणाला, तर अहो जाऊ द्या ना. साहेबांना एकटं सोडा आणि आपण सगळे जण जाऊया त्या बीजेपीवाल्यांकडं. हे मी आधीही बोललोय. आज नाही बोलत. हाच तो निफाडचा आमदार. साहेबांनी काय नाय दिलं त्याला?

साहेब ॲग्रीकल्चर मंत्री असताना कायम दिल्लीत पडलेला माणूस म्हणजे हा. कायम साहेबांच्या दरबारात जाणारा माणूस हा. साहेबांचं नाव घेऊन सगळ्या मार्केट कमिट्यांवर कब्जा करणारा हा. अनिल कदम माझा जुना मित्र आहे. कर्तृत्ववान आहे आणि त्याच्यापेक्षा तरी नक्कीच चांगला आहे. पण, साहेबांची कृपा होती त्याच्यावरती. हा आणि माणिकराव कोकाटे, या दोघांनी मिळून अख्ख्या नाशिकचा सत्यानाश केला. अख्खी बँक लुटून खाल्ली. घरात जे काही आहे, ते कृषी उत्पन्न बाजार समिती आणि बँकेतूनच आलंय. स्वत:चं काहीच नाही. हा नाशिक जिल्हा समतेचा जिल्हा आहे. अस्पृश्य आणि स्पृशांच्या लढाईत काळाराम मंदिरात प्रवेश करून समतेची लढाई बाबासाहेबांनी इथे सुरू केली. रामाच्या पदस्पर्शानं पुनित झालेली भूमी ही पंचवटी आणि हा मतदारसंघ ज्याच्यात येतो, त्याच्यात झिरवळ नावाचे कलाकार आहेत. त्यांना जर नाटकात पाठवलं तर निळू फुले झक मारेल असा आहे. ते नाटक करायला लागले, जरा येड्यागबाळ्यासारखे वागायला लागले की लोकं जाम खूश होतात. खरं २०१९ला जेव्हा पळून गेले ना तेव्हाच त्यांचे पाय कापायला पाहिजे होते. जो स्वत:ला विकू शकतो, तो आपल्या मतदारांना का नाही विकणार.

आता अस्तित्वाची लढाई आहे. या विचारांच्या लढाईमध्ये तुम्ही कुणाला साथ देणार. ज्यांनी ८४ वर्षांच्या बापाच्या पाठीत खंजीर खुपसला अशांना साथ देणार? अरे,



आमच्या बापानी पक्ष स्थापन केला, २५ वर्षे मेहनत घेतली, निशाणी घराघरापर्यंत पोहोचवली, अशा लबाड लांडग्यांना निवडून आणलं. ते लांडगे आता एकत्र झाले आणि म्हणाले, की आता तुम्ही घराच्या बाहेर जा. ज्या बापानं घराची निर्मिती केली, मराठी संस्कृतीमध्ये त्या बापाला घराच्या बाहेर काढलं जातं का? बाप जरी म्हातारा झाला, तरी तु काम करू नको असं कर्तृत्ववान मुलगा सांगतो का? कुणी सांगत नाही. पण, ज्यांनी सगळं निर्माण केलं, ज्यांनी तुम्हाला २५-२५ वर्षे मंत्रिपदं दिली, बाहेर पडताना सांगता काय, तर आम्ही विकासासाठी बाहेर पडलो. मग २५ वर्षे काय केलं. कुठल्या खिशात, बँकेच्या लॉकरमध्ये काय ठेवलं हे पण त्यांना आठवणार नाही. आणि म्हणतात आम्ही विकासासाठी बाहेर पडलो. अहो, तुमचा खूप विकास केला, तोच मोठा प्रॉब्लेम आहे आणि तोच सगळ्यांच्या नजरेत येतोय म्हणून तुम्ही घाबरलात.



निष्ठेला काही किंमतच राहिलेली नाही अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण झालेली आहे. विचारांना किती महत्त्व होतं. जेव्हा यशवंतराव चव्हाणांना लोकसभेत पाठवण्याची वेळ आली, तेव्हा याच काँग्रेसी विचारांवर निष्ठा ठेवणाऱ्या नाशिक जिल्ह्याने यशवंतराव चव्हाणांना बिनविरोध लोकसभेवर पाठवलं होतं. त्यामुळं निष्ठा किती महत्त्वाची असते हे मी नाशिककरांना शिकवायला नको. लढाई फक्त दोघांमध्ये आहे. तुम्ही निष्ठेला महत्त्व देणार की गद्दारीला महत्त्व देणार. हाच विचार करून जर तुम्ही लोकसभेला आणि विधानसभेला बाहेर पडलात तर कुणाचा बाप आपल्याला अडवू शकत नाही.

अहो, बीजीपेला उमेदवार सापडत नाहीत. हा पक्ष फोड, तो पक्ष फोड. आता अशोक चव्हाण. १९५२ला पहिलं मंत्रीपद त्यांच्या वडिलांना शंकरराव चव्हाण यांना मिळालं. तेव्हापासून आमचं महाविकास आघाडीचं सरकार होतं तोपर्यंत म्हणजे ६० ते ७० वर्षे त्यांच्या घरात मंत्रिपद होतं. पण, त्यांनीही सांगितलं, की विकासच झाला नाही हो म्हणून मी चाललोय. शंकरराव चव्हाण हे हेडमास्तरसारखे वागायचे. सगळ्या मंत्रालयीन कर्मचाऱ्यांना शिस्तीत ठेवलं होतं. त्यांचाच मुलगा म्हणतो, की विकास झाला नाही. त्यामुळं हे सगळं झूठ आहे आणि हे झूठ तुम्हाला शाबीत करुन द्यायचं आहे. बिलकूल गडबडू नका. सगळीकडं दादागिरी सुरू आहे. मला पोलिसांबद्दल राग नाहीये. मला माहिती आहे, की त्यांची काय केविलवाणी अवस्था आहे. कारण, त्यांच्या नेमणुका या तेथील आमदारांनीच केलेल्या आहेत. छोट्या छोट्या कामांसाठी आमदारांचे फोन येतात. पण, पोलिसांनीही थोडा विचार केला पाहिजे. कायद्याने खूप अधिकार दिलेले आहेत. चुकीचे एफआयआर घेऊ नका.

सध्या वीज कापण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. दुष्काळाच्या दिवसात वीजा कापल्या जातायंत. जी काही थकबाकी असेल ती भरण्यासाठी वेळ द्या. पण, ऐन दुष्काळात वीजा कापल्या जाणार असतील तर शेतकऱ्यांनी कसं जगायचं. ऊर्जा मंत्री कोण आहे माहिती आहे का. इतर मंत्र्यांची पण नावं माहिती नसतील. कारण, आजकाल दोघंच मंत्रीमंडळ चालवतात. एक एकनाथ शिंदे आणि दुसरे देवेंद्र फडणवीस. आम्हाला मजा काय येते माहीत आहे का. आमच्याकडं एक माणूस होता. पंचपक्कानांनी भरलेल्या ताटावरती बसला होता. काय अवदसा आठवली आणि पत्रावळीवर जाऊन बसला. अन्न शोधतोय आता. पहिलं इथं दादागिरी आणि तिथं हुजरेगिरी. दिल्लीला कुणाचं चालत नाही. फक्त एका माणसाचं चालत होतं, त्याचं नाव शरद पवार आहे. दिल्लीच्या तख्ताला भिडण्याची औकात आणि ताकद असलेला महाराष्ट्रानं जन्माला घातलेला एकच माणूस आहे, त्याचं नाव शरद पवार आहे. बुद्धीनं हुशार.

३४ राष्ट्रांना आपण अन्नधान्य पुरवत होतो. आज ३६ देशांकडनं आपण अन्नधान्य घेतोय. युक्रेनसारख्या राष्ट्राकडनं आपण गहू घेतो आहोत. परत आपण भिकारी झालो आहोत. शेतकऱ्यांसाठी तळमळीनं काम करणारा नेता म्हणजे शरद पवार. आज मी सहा वाजता उठतो म्हणून सांगतात. पण, अहो तुम्हाला टेन्शनमुळे झोप लागत नाही, त्याला आम्ही काय करायचं. सहा वाजता उठून कुठे शेतकऱ्याला भेटायला गेलेले दिसला नाही तुम्ही आम्हाला. बघावं तेव्हा तीच रेती, तीच वाळू दिसते तुमच्याबरोबर. सहा वाजता उठण्याचं कौतुक महाराष्ट्राला सांगू नका. कोंबडं आरवण्याच्या आत शेतकरी शेतात पोहोचलेला असतो. तुम्ही तर एसीत झोपता. मुंबईला चाळीत येऊन बघा, सकाळी सहा वाजता घरातलं सर्व आवरून मुंबईकर कामाला लागलेला असतो. तुम्ही हे सांगू नका, काय तुम्ही महाराष्ट्रावरती मोठे उपकार केलेले नाहीत. आज जे काय आहात ते आमच्या बापामुळे आहात. ते ऋण तुम्ही विसरलेला आहात. हे ऋण महाराष्ट्राचे मतदार तुम्हाला आठवणीत आणून देतील. ज्यांनी ज्यांनी महाराष्ट्रात गद्दारी केली आहे, ज्यांनी ज्यांनी गद्दारीला मदत केली आहे त्यांना गाडल्याशिवाय महाराष्ट्र शांत बसणार नाही असं वचन मी तुमच्याकडनं घेतो आणि परत एकदा तुमच्याकडनं एकच अपेक्षा ठेवतो, की गद्दारीला थारा नाही. गद्दारी गाडल्याशिवाय थांबणार नाही.

■■■

## घंटाकर्ण

## अर्थमंत्र्यांकडेच पैसे नाहीत ?

लोकसभा निवडणुकीत भाजपने त्यांच्या राज्यसभेतील नेत्यांनाही उतरविले आहे. मुख्य उदाहरण आहे वाणिज्यमंत्री पियुष गोयल यांचे.

सुरुवातीपासून ते राज्यसभेतच आहेत. अरुण जेटली यांच्या निधनानंतर त्यांना राज्यसभेतील सत्तापक्षाचे नेते म्हणूनही जबाबदारी मिळाली.

आता ते लोकसभेवर निवडून आल्यास त्यांचे राज्यसभेचे नेतेपद त्यांना गमवावे लागेल. म्हणजेच पंतप्रधानांच्या शेजारी बसण्याचा मान त्यांना मिळणार नाही. मग राज्यसभेचे नेतेपद कुणाकडे जाईल अशी चर्चा होणारच. तो मान कदाचित अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे जाऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या आढ्यतेखोरपणाला अधिक बहरही निवडणुकीनंतर येऊ शकतो.




पण कानोकानी आलेल्या माहितीनुसार भाजपने त्यांना तमीळनाडू किंवा आंध्र प्रदेशातून लोकसभा निवडणूक लढविण्याबाबत विचारणा केली होती. त्या जन्माने तमीळ आहेत. त्यांचा मदुराई येथील जन्म आहे.

परकला प्रभाकर यांच्याशी त्यांचा विवाह झाला. प्रभाकर हे तेलगु आहेत व आंध्र प्रदेशाचे आहेत. त्यामुळे आंध्र प्रदेशाच्या त्या स्नुषा म्हणजेच सूनबाई आहेत. म्हणजेच त्या आंध्र प्रदेश किंवा तमीळनाडू या दोन्ही राज्यातून निवडणूक लढवू शकतात. असे समजते की त्यांनी तमीळनाडूतील कोयंबतूर मतदारसंघास पसंती दिली होती. परंतु भाजपच्या तमीळनाडू शाखेचे अध्यक्ष के. अन्नमलाई हे कोयंबतूरहून निवडणूक लढविणार असल्याने त्यांना तेथून उमेदवारी देणे अशक्य होते.

आंध्र प्रदेश काय किंवा तमीळनाडू काय या दोन्ही राज्यातून भाजपचे उमेदवार निवडून येणे फारसे सोपे नाही कारण मूलतः हा पक्ष तेथे रुजलेला नाही. त्यामुळे कदाचित पराभवाच्या आशंकेने अखेर निर्मलाताईंनी लोकसभेची निवडणूक लढण्याचे टाळले असावे.

परंतु लोकसभा निवडणूक लढविण्याबाबत असमर्थता व्यक्त करताना त्यांनी दिलेले उत्तर मासलेवाईक होते. लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी आपल्याकडे 'तशा प्रकारचे पैसे' नाहीत असे त्या म्हणाल्या होत्या.

इंग्रजीत त्या म्हणाल्या होत्या, आय डोन्ट हॅव दॅट काइंड ऑफ मनी.




निवडणुकीसाठी लागणारे 'तशा प्रकारचे' पैसे माझ्याजवळ नाहीत.
- निर्मला सीतारामन




आता त्यांच्या शब्दांचा काटेकोर अर्थ होतो की त्यांच्याजवळ 'तशा

प्रकारचे पैसे' नाहीत. त्यामुळे चर्चा ही आहे की देशाच्या अर्थमंत्र्यांना तशा प्रकारचे पैसे म्हणून कोणत्या पैशाचा उल्लेख करायचा असावा ? त्याचा अर्थ निवडणुकीत वेगळ्याच प्रकारचा पैसा वापरला जातो असे तर देशाच्या अर्थमंत्र्यांना सुचवायचे नसावे अशी चर्चा आहे. आता देशाच्या अर्थमंत्र्यांनी अशी टिप्पणी किंवा शेरेबाजी करणे किती गंभीर आहे हे लक्षात घ्यावे लागेल. लोकसभा निवडणुकीसाठीच्या खर्चाची मर्यादा ९५ लाख रुपये आहे.

देशाच्या अर्थमंत्र्यांकडे एवढे पैसे नसावेत असाही अर्थ त्यातून निघू शकतो. परंतु तशा प्रकारचा पैसा हे म्हणणे मात्र उत्कंठा वाढविणारे आहे हे निश्चित.




## वैश्य समाज नाराज ?

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल वैश्य समाजाचे आहेत. त्यांना केवळ राजकीय कारणासाठी अटक करण्यात आली आहे. वैश्य समाजाचे ते देशातले एकमेव मुख्यमंत्री आहेत. यामुळे त्यांना ज्या प्रकारे अटक करण्यात आली व तुरुंगात धाडण्यात आले त्यामुळे



वैश्य समाजात तीव्र नाराजीची भावना असल्याची चर्चा आहे. सोशल मीडियावरुन याची चुणुक मिळताना दिसते. जी चर्चा सोशल मीडियावर पाहण्यास मिळते ती फारच चुरचुरीत आहे.

वैश्य समाज हा सुशिक्षित व जागरुक आहे. त्यांच्या चर्चेतून हेही लक्षात येते की केंद्र सरकारकडून त्यांना शरण येणाऱ्या भ्रष्ट नेत्यांना सोडले जात आहे. पण केजरीवालांनी केंद्र सरकारविरोधात भूमिका घेतल्याने त्यांना मात्र केवळ राजकारणामुळे अटकेत टाकण्यात आले आहे असा या मंडळींचा सूर आहे. एवढेच नव्हे तर एका वैश्य नेत्याने स्थापन केलेल्या आम आदमी पार्टीला (आप) खतम करण्यासाठी भाजपतर्फे प्रयत्न सुरु आहेत याबद्दल तर तीव्र भावनाही व्यक्त होताना दिसत आहेत.

केजरीवाल व त्यांचे पक्षातील सहकारी हीच बाब जनमानसावर ठसवत आहेत की भाजपला केजरीवाल यांना संपवायचे आहे आणि त्यांचा पक्षही नष्ट करायचा आहे. केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता यांनी प्रथमच लोकांसमोर येऊन त्यांचे पति अरविंद यांची प्रकृती नीट नसल्याचे सांगितले. त्यांच्या प्रकृतीची कुटुंबियांना चिंता आहे असेही त्यांनी भवुकपणे सांगितल्याने दिल्लीत त्याची जोरदार प्रतिक्रिया उमटली आहे.

केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी दिल्लीतील व्यापारीवर्गाला असे आश्वासन दिले होते की करचुकवेगिरीसारख्या प्रकरणात छापेमारीसारख्या कारवाया केल्या जाणार नाहीत आणि त्यांनी ते आश्वासन पाळल्याने दिल्लीतील व्यापारी वर्ग केजरीवाल यांच्यावर फिदा आहे. भले लोकसभेला ते भाजपला मते देत असतील परंतु विधानसभेला ते केजरीवाल यांनाच पसंती देतात.

वैश्य समाज प्रामुख्याने दिल्ली, हरयाणा आणि पश्चिम उत्तर प्रदेशात आढळतो. केजरीवाल हरयाणाचे आहेत. पंजाबमध्येही त्यांचे काही प्रमाण आहे. त्यामुळे या ठिकाणी केजरीवाल यांना सहानुभूती मिळणे अपेक्षित आहे.

केजरीवाल यांना त्यांच्या प्रामाणिक प्रतिमेचाही फायदा होताना दिसतो. कोर्टात स्वतःची बाजू मांडताना त्यांनी ज्या व्यक्तीच्या जबानीवरुन त्यांना अटक करण्यात आली आहे त्या व्यक्तीनेच ५५ कोटि रुपयांचे निवडणूक रोखे भाजपच्या पदरात टाकले आहेत.

त्यांचे हे म्हणणे लोकांना पटू लागल्याची चिन्हे आहेत.

ज्याप्रमाणे मोदी सरकार ईडीचा वापर केवळ निवडणुकी आधी विरोधी पक्षांच्या नेत्याविरुध्द करीत असल्याची लोकांमध्ये ठाम धारणा झाली आहे. त्याचप्रमाणे निवडणूक रोखे प्रकरण हा एक मोठा भ्रष्टाचार असल्याचीही लोकांची धारणा होऊ लागली आहे. त्यात भाजपलाच जास्तीतजास्त देणग्यांचा लाभ झाल्याने या समजुतीवर शिक्कामोर्तब झाल्यासारखे आहे. त्यामुळे नरेंद्र मोदी चुका करु शकत नसल्याची जी हवा आतापर्यंत तयार करण्यात आली होती त्या हवेचा बुडबुडा आता फुटू लागला आहे.

भाजप आणि मोदींना खरी चिंता याची आहे.

बिहारमध्येही वैश्य समाजाची तिकिटे भाजपने कापल्याने नाराजीत भर पडली आहे. बिहारमध्ये वैश्य समाज मागासवर्गीयात समाविष्ट होतो. बिहारमध्ये भाजपने वैश्य समाजाची तिकिटे कापून उच्चवर्णीयांना दिल्यानेही हा समाज खवळला आहे. यातूनच भाजपच्या विरोधात मागासवर्गीयांना एकजूट करण्याच्या प्रक्रियेलाही जोर मिळताना दिसत आहे.

थोडक्यात काय तर केजरीवाल यांच्या अटकेचे परिणाम दिसू लागले आहेत.

## 'चारशे पार' चे भाजपचे गणित

अबकी बार चार सौ पार ही घोषणा दिली जात असली तरी आता ती




हळूहळू क्षीण होताना दिसत आहे.

देशातल्या प्रत्येक राज्यात कोणत्या कोणत्या प्रकारे शिरकाव करण्यासाठी धडपड भाजपतर्फे चालू आहे. त्यासाठी त्यांनी जेथे भाजपचे अस्तित्व नगण्य आहे तेथील प्रादेशिक राजकीय पक्षांबरोबर हातमिळवणी करणे, त्यांच्या पाठीवर बसून तेथील राजकारणात प्रवेश करण्याचे प्रयोग सुरु केले आहेत.

पंजाबमध्ये एकेकाळी भाजपची अकाली दलाबरोबर युति होती. परंतु शेतकरी कायदे आणि शेतकऱ्यांचे त्याविरोधात झालेले आंदोलन व मोदींचा त्या आंदोलनाला बदनाम करण्याचा प्रयत्न यामुळे अकाली दलाने भाजपशी संबंध व आघाडी तोडली.

महाराष्ट्रात शिवसेनेशी दगाबाजी केल्याने शिवसेनेनेही भाजपला सोडून दिले. दक्षिणेत तर भाजपचे अस्तित्व नगण्यच आहे. तेलंगणात भाजपबरोबर कोणत्याही प्रादेशिक पक्षाने हातमिळवणी केली नाही.

आंध्र प्रदेशात मात्र भाजपने तलेगु देशम (चंद्रबाबू नायडू) आणि जनसेना पार्टीच्या पवन कल्याण यांच्याबरोबर युति केली आहे. यामध्ये त्यांनी सत्तारूढ वायएसआर काँग्रेसला वाऱ्यावर सोडल्याचे चित्र पाहण्यास मिळते.

तमीळनाडूत काही किरकोळ प्रादेशिक पक्षांबरोबर भाजपने समझोता केला आहे. केरळमध्येही भाजपला साथीदार पक्ष भेटलेला नाही.

ओडीशामध्ये बिजु जनता दलाबरोबर समझोता करुन त्यांना भाजपच्या आघाडीत सामील करुन घेण्यासाठी दस्तुरखुद्द पंतप्रधानांनी पुढाकार घेतला. पण हाती काही लागले





नाही. बिजु जनता दलाने स्वतंत्रपणे आणि कुणाशीही समझोता न करता निवडणुका लढविण्याचा निर्णय केला.

अकाली दलानेही भाजपबरोबर समझोता करण्यास नकार दिला.

महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पाडण्यात भाजपला यश आले असले ती प्रत्यक्षात त्यांना या फुटीर गटांबरोबर जागावाटप करताना दमछाक झालेली आहे.

मुळातच देशभरात ज्याज्या ठिकाणी भाजपने विविध पक्षांबरोबर जे समझोते केले आहेत त्यामुळे भाजप अडचणीत आहे. कारण यातून पक्षाबाहेरच्या लोकांना भाजपकडून दिल्या गेलेल्या झुकत्या मापामुळे पक्षाचे जुने निष्ठावंत नाराज झाले आहेत. महाराष्ट्रात तर भाजपमध्ये बंडखोरी झालेली आहे. हीच स्थिती सर्व देशभरात आहे. यामुळे भाजपने विरोधी पक्षांना वाव मिळू नये आणि सर्वत्र आपले अस्तित्व असावे या हेतुने केलेल्या निवडणूक समझोत्यांच्या जाळ्यात भाजप गुरफटत चालला आहे.

त्यामुळेच हा पक्ष चारशे जागांचे लक्ष्य कसे गाठणार याबाबत शंका उत्पन्न होऊ लागल्या आहेत.

पाहू यात घोडामैदान तर आता जवळच आहे.

## पंतप्रधान आणि गृहमंत्र्यांमध्ये मतभिन्नता

भाजपच्या विविध आघाड्यांचाच विषय चालल्याने कानोकानी आलेली आणखी एक रंजक माहिती.



ओडीशामध्ये नवीन पटनाईक यांच्या बिजु जनता दलाबरोबर आघाडी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः उत्सुक होते.

विशेष म्हणजे त्यांनी ओडीशा दौऱ्यात स्वतःच हा विषय नवीन पटनाईक यांच्याबरोबर काढला होता.

यानंतर गृहमंत्री अमित शहा यांना एका कार्यक्रमाच्या वेळी पत्रकारांनी ओडीशामधील बिजु जनता दलाबरोबरच्या आघाडीबद्दल प्रश्न विचारला असता त्यांनी, त्याबाबत भाजपच्या सर्वोच्च पातळीवर म्हणजे पंतप्रधानांच्या पातळीवर बोलणी सुरु आहेत, पंतप्रधान व पक्षाध्यक्ष काय तो निर्णय करतील, असे काहीसे तुटक उत्तर दिले होते.

अमित शहा हे औपचारिकदृष्ट्या पक्षाचे अध्यक्ष नसले तरी पक्ष आणि पक्षसंघटनेबद्दलचा कोणताही निर्णय त्यांच्या संमतीखेरीज होत नाही एवढी पकड त्यांची कायम आहे.

त्यामुळेच त्यांच्या या तुटक उत्तराबद्दल काहीसे आश्चर्य व्यक्त करण्यात आले होते.

अखेर पंतप्रधानांच्या प्रयत्नांना यश येऊ शकले नाही आणि भाजप व बिजु जनता दलात समझोता होऊ शकला नाही आणि बिजु जनता दलास भाजपच्या एनडीए आघाडीत सामील करुन घेण्याचे पंतप्रधानांचे स्वप्न स्वप्नच राहिले.

आता असे कळते की ओडीशातील प्रदेश भाजपचा बिजु जनता दलाबरोबर समझोता करण्यास विरोध होता. कारण सध्या तेथे भाजप हा प्रमुख विरोधी पक्ष आहे. काँग्रेस



तिसऱ्या क्रमांकावर आहे.

अशा परिस्थितीत हा समझोता योग्य ठरणार नाही असे प्रदेश भाजपचे मत होते. परंतु मोदींसमोर तोंड उघडून बोलण्याची त्यांची हिंमत नव्हती. शेवटी मोदी व पटनाईक यांच्यात मैत्रीचे संबंध असल्याने प्रदेश भाजप नेत्यांनी गप्पा राहूनच मजा पाहण्याचे ठरविले.

अखेर बिजु जनता दलाने आघाडी करणे शक्य नसल्याचे सांगितल्यावर प्रदेश भाजपनेही स्वबळावर निवडणूक लढण्याची घोषणा केली. असे बोलले जाते की अमित शहा यांचा या अशा प्रकारच्या आघाडीला विरोध होता आणि त्यांच्या पाठिंब्यामुळे प्रदेश भाजपच्या नेत्यांना हिंमत मिळाली आणि त्यांनी हा समझोता होऊ दिला नाही.


चला या जोडगोळीमध्येही मतभेद होऊ शकतात हे तरी यानिमित्ताने समोर आले. अर्थात ओडीशातील राजकारणात बिजु जनता दल व भाजप यांचे संबंध फारसे चांगले नाहीत.

बिजु जनता दलाचे कटकचे खासदार भर्तृहरी महताब यांनी भाजपबरोबर असे काही सूत जमविले आणि आघाडीसाठी प्रयत्न केले. अखेर तेच भाजपमध्ये गेले.

दुसरीकडे माजी सनदी अधिकारी व भाजपच्या आक्रमक महिला नेत्या व भुवनेश्वरच्या खासदार अपराजिता सारंगी यांचाही या आघाडीला घोर विरोध होता. बिजु जनता दलाने त्यांना भाजपने भुवनेश्वरहून तिकिट देऊ नये अशी अट घातल्याचे समजते. त्यावरुनच आघाडी बिघडल्याचे कळते. त्यामुळे भाजपच्या प्रदेश अध्यक्षांनी आघाडी होणार नसल्याचे जाहीर करताच सर्वप्रथम अपराजिता सारंगी यांनी त्यांच्या घोषणेचे स्वागत केले. सारंगी या पटनाईक यांच्या घनघोर टीकाकार आहेत. मोदींची दादागिरी ओडीशातील भाजपवर चालू शकली नाही हे खरे.

## मणिपूरच्या प्रश्नावरुन बोलती बंद

केरळमध्ये भाजपला शिरकाव करता यावा म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या खास नाटकी शैलीत भरपूर गोष्टी केल्या. परंतु एवढे प्रयत्न करुनही त्याचे फळ काही मिळत नसल्याचा अनुभव भाजपला येऊ लागला आहे.






भाजप संघ परिवाराच्या संस्कारात वाढलेल्या आणि अल्पसंख्यक समाजाबद्दल फारसे प्रेम नसलेल्या पंतप्रधानांनी केरळमधील ख्रिश्चन समाजाबरोबर संधान बांधण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी त्यांनी केरळचे काही दौरे केले. त्यावेळी चर्चमध्ये जाऊन मेणबत्ती लावण्याचे नाटकही केले. ख्रिश्चन समाजाच्या प्रतिनिधींना बोलावून त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या परंतु मदतीचे कोणतेही आश्वासन दिले नव्हते. या नाटकांनंतरच मणिपूर घडले.

तेथील ख्रिश्चन धर्मीयांवर करण्यात आलेल्या अत्याचारांच्या कहाण्या जगभर प्रसिध्द झाल्या.

अजुनही मणिपूर शांत झालेले नाही. परंतु मणिपूरमध्ये भाजप व संघ परिवाराने योजनाबध्द रीतीने वांशिक शुध्दीकरण केल्याचा आरोप केला जात आहे. या सर्व प्रकरणात पंतप्रधानांचे मौन बोलके ठरले. मणिपूरला जाण्याची हिंमत ५६ इंची छातीचे पंतप्रधान करु शकलेले नाहीत. एवढेच काय शेजारच्या मिझोरममध्ये विधानसभा निवडणूक झाली तेव्हा तेथील प्रचाराला देखील जाण्याची हिंमत पंतप्रधान करु शकले नाहीत. त्यामुळे पंतप्रधानांचे ख्रिश्चन लोकांबरोबर संबंध प्रस्थापित करण्याचे नाटक सपशेल आपटले.

केरळमध्ये भाजपने उमेदवार उभे केले आहेत.




थ्रिसूर येथील उमेदवार सुरेश गोपी यांना मणिपूरमुळे ख्रिश्चन समाजात निर्माण झालेल्या तीव्र भावनांशी नुकताच सामना करावा लागला.

एका गावात ते प्रचाराला गेले असता तेथील ख्रिश्चनधर्मीयांनी मणिपूरवरुन गोपी यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. त्यामध्ये पंतप्रधानांच्या निष्क्रियतेबद्दलही प्रश्न विचारण्यात आले. गोपी यांची अक्षरश- बोबडी वळली आणि काहीतरी तोंडातल्या तोंडात बोलत व थातूरमातूर उत्तरे देत त्यांनी तेथून काढता पाय घेतला असे उपस्थितांनी सांगितले. आता लोकसभा निवडणुकीत प्रचारासाठी तरी महान पंतप्रधान मणिपूरला जाणार काय हेच पाहण्याची उत्कंठा आहे.

## निवडणूक आयोगाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह

देशाचे पंतप्रधान एका बाजुला एक देश एक निवडणूक करण्याचे स्वप्न पहात असताना दुसरीकडे त्यासाठी देशाचा निवडणूक आयोग तेवढा सक्षम आहे काय याबद्दल ते अंधारात असावेत.

लोकसभेची निवडणूक जाहीर झाली. लोकसभेबरोबरच देशात चार विधानसभांच्या निवडणुकाही होतात.

ओडीशा, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि सिक्किम या चार राज्यांतही लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुकाही होत आहेत.

निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर करताना आयोगाला विविध गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. अगदी हवामानाचा अंदाज देखील घ्यावा लागतो. त्याचप्रमाणे विविध भागातील सणवार, चालीरीती यांचेही पुरेसे आकलन आयोगाला असणे आवश्यक मानले जाते. पूर्वी निवडणुकांच्या तारखांचे वेळापत्रक जाहीर करताना या सर्व गोष्टींची दखल घेतली जात असे. क्वचितच तारखांमध्ये बदल केला जात असे. आता मात्र निवडणूक आयोग पूर्वीसारखा सतर्क किंवा दक्ष असल्याचे दिसून येत नाही.

लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुका जाहीर करताना आयोगाने अरुणाचल व सिक्किममध्ये १ जून रोजी एक दिवसाचे मतदान ठेवले. मतमोजणी व निकालासाठी लोकसभेप्रमाणेच ४ जून ही तारीख जाहीर केली.

मागाहून आयोगाच्या असे लक्षात आले की या दोन राज्यांच्या म्हणजेच






अरुणाचल व सिक्किम विधानसभांची मुदत २ जूनलाच संपत आहे.

कायद्याप्रमाणे मुदत संपण्यापूर्वी नवी विधानसभा अस्तित्वात येण्याचे घटनात्मक बंधन आहे. येथे तर आयोगाने या दोन राज्यांचे निकालही ४ जूनला लागतील असे जाहीर केलेले होते. आता घाईघाईने तारखांमध्ये बदल करण्यात आला आणि या दोन राज्यांमध्ये २ जूनलाच मतमोजणी होऊन संध्याकाळपर्यंत तेथील नवी विधानसभा अस्तित्वात आल्याची घोषणा करण्याची कसरत आयोगाला करावी लागणार आहे. या कसरतीत त्यांना किती यश मिळते ते पाहू.

मागेही मेघालयसारख्या ख्रिश्चनधर्मीय राज्यात आयोगाने रविवारी मतदान ठेवले. जेव्हा त्याविरुध्द संतप्त प्रतिक्रिया येऊ लागल्या तेव्हा आयोगाने तातडीने तारखा बदलल्या.

आता आयोगात हे का घडायला लागले आहे हे एक गूढ आहे.

ख्रिश्चन लोकांसाठी रविवार हा प्रार्थनादिवस असतो आणि त्यांना त्यासाठी चर्चमध्ये जायचे असते.

आता ही एवढी साधी बाब आयोगाच्या लक्षात का येऊ शकली नाही हा खरा प्रश्न आहे.

...... की वर्तमान भाजप संघपरिवाराच्या सत्ताधाऱ्यांच्या मनात अल्पसंख्यक मुस्लिम, ख्रिश्चन यांच्याबद्दल असलेल्या रागाचे हे प्रकटीकरण मानायचे अशी शंका मनात आल्याखेरीज रहात नाही.

याच मालिकेत निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीचे जे प्रदीर्घ वेळापत्रक तयार केले आहे त्याबद्दलही चर्चा आहे.

असे सांगितले जाते की १९५२च्या निवडणुकीनंतरचे हे सर्वात मोठ्या कालावधीचे वेळापत्रक आहे.

पूर्ण दोन महिने मतदान चालणार आहे आणि ४ जूनला मतमोजणी व निकाल लागणार आहेत.

एप्रिल व मे हे दोन्ही महिने देशातले कडक उन्हाळ्याचे महिने मानले जातात. परंतु निवडणूक आयोगाला त्याची फारशी फिकिर दिसत नाही. यावर्षी तर अत्यंत कडक अशा उन्हाळ्याचे भाकित करण्यात आले आहे. त्यामुळेही ही निवडणूक प्रक्रिया परीक्षा घेणारी ठरणार आहे. २०१४ व २०१९ मधील निवडणुकांची प्रक्रिया मे महिना संपण्यापूर्वी पूर्ण झालेली होती. परंतु यावेळी आयोगाने निकालासाठी ४ जून ही तारीख निश्चित केली.

आता अशी चर्चा ऐकू येते की पंतप्रधानांनी सातत्याने चारशे पार जागा



जिंकण्याचा जो घोष सुरु केला आहे त्याला पूरक व पोषक म्हणून आयोगाने ४ जूनची तारीख निश्चित केली असावी. त्याचा प्रत्यय लगेचच आला.

आंध्र प्रदेशातील प्रचारसभेत बोलताना महान पंतप्रधानांनी या योगायोगाचा उल्लेख करुन चार जून के चार सौ पार अशी घोषणा करुन टाकली.

एका घटनात्मक व स्वायत्त संस्थेने सत्ताधाऱ्यांची बटीक असल्यासारखे किती वागावे यालाही मर्यादा असावी. म्हणूनच निवडणूक आयोगाकडून एखाद्या नेत्याचे लांगूलचालन किती केले जात आहे याचा हा एक नमूना मानावा लागेल.

## राज्यपालांचा वाढता अडेलतट्टूपणा

मोदी राजवटीतले राज्यपाल हे केंद्राचे प्रतिनिधी असण्यापेक्षा ज्या राज्यात विरोधी पक्षांची सरकारे आहेत त्यांच्या मुळावर उठलेली मूळ नक्षत्रे आहेत.

विरोधी पक्षांच्या सरकारांना निमूटपणे राज्यकारभार करु द्यायचा नाही अशा नतद्रष्ट भावनेनेच ही मंडळी काम करताना आढळतात.

हा राज्यपालांचा दोष नाही. त्यांना नेमणाऱ्या आणि ते ज्या केंद्रातील राजवटीचे प्रतिनिधित्व करतात या राजवटीच्या क्षुद्र आणि सुमारबुध्दीचे ते प्रतिनिधी आहेत. लोकशाही न मानणारे केंद्रात सत्तेत असल्यानंतर विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांना केवळ छळणे हेच यांचे काम असते.

राज्यांनी समंत केलेले कायदे अडवून ठेवण्याचा क्षुद्रपणा तर ही मंडळी सातत्याने करीत असतात.

तमीळनाडूचे राज्यपाल आरएन रवि हे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात असतात. नवीन प्रकरणात त्यांनी तमीळनाडूत एका मंत्र्याला शपथ देण्यासच नकार दिल्याने वाद निर्माण झाला. तमीळनाडूत द्रमुकचे सरकार आहे आणि हा पक्ष विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीचा घटक पक्ष आहे. त्यामुळे तर तेथील एमके स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा छळ करण्याचा अधिकारच राज्यपालांना मिळाला आहे. तर या तऱ्हेवाईक रवींनी द्रमुक आमदार के. पोनमुडी यांना मंत्रीपदाची शपथ देण्यास नकार दिला.

याचे कारण त्यांनी असे दिले की



बेहिशोबी मालमत्ता प्रकरणात त्यांना कनिष्ठ न्यायालयाने दोषी ठरविले आहे आणि शिक्षाही सुनावली आहे. परंतु सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्याविरुध्दच्या या निर्णयाला स्थगिती दिली आहे.

यामुळे त्यांना मंत्रीपदाची शपथ देता येऊ शकते. परंतु रवि साहेब विलक्षण नीतीमत्तावादी असावेत. त्यांनी सांगितले घटनात्मक नैतिकतेमुळे मी त्यांना शपथ देऊ शकत नाही. परंतु जी व्यक्ती आमदार म्हणून काम करु शकते त्या व्यक्तीला मंत्री होण्यापासून कुणी रोखू शकत नाही. त्यामुळे रवि यांच्या घटनात्मक नीतीमत्तेच्या तत्वाला फारसा आधार रहात नाही.

पोनमुडी यांना शपथ देण्याबद्दल त्यांनी अडेलतट्टूपणा चालू ठेवल्याने हे प्रकरण पुन्हा सर्वोच्च न्यायालयापुढे गेले. त्यावर न्यायालयाने राज्यपाल रवि साहेब यांची चांगलीच कानउघाडणी केली आणि त्यांना शपथ देण्यास सांगितल्यावर नाईलाजास्तव रविसाहेबांनी पोनमुडी यांना मंत्रीपदाची शपथ दिली.

२०१४ नंतर या देशात राज्यपाल या पदाचा आणि संस्थेचा ज्या प्रकारे दुरुपयोग सुरु आहे तसा प्रकार ७० वर्षांत कधी झाला नव्हता. या देशाचे दुर्दैव की सुमारबुध्दी राज्यकर्ते आणि क्षुद्र मनोवृत्तीमुळे लोकशाही व संघराज्य प्रणालीवरच संकट आल्याची स्थिती आहे.

■■■

मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर १७ मार्च रोजी झालेल्या इंडिया आघाडीच्या ऐतिहासिक महासभेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी उपस्थितांना केलेले मार्गदर्शन.....



# भाजपपासून मुक्तीसाठी

व्यासपीठावर बसलेले, ज्यांचा सन्मान आणि स्वागत करण्यासाठी आपण येथे एकत्र आलो आहोत आणि ज्यांनी भारत जोडो न्याय यात्रा पूर्ण केली, हिंदुस्थानातील अनेक राज्यांमधील लाखो लोकांना भेटण्याची संधी ज्यांना मिळाले, त्या राहुल गांधी यांचे स्वागत करण्यासाठी मी येथे उभा आहे. अनेक सहकारी आज देशाच्या वेगवेगळ्या भागातून येथे आले आहेत. वेगवेगळ्या राजकीय पक्षाचे नेते याठिकाणी आहेत आणि त्यांचा सन्मान आणि स्वागत करण्यासाठी आपण येथे अनेक तासांपासून उपस्थित आहात. यामागे एकच गोष्ट आहे, आज जी राज्याची अवस्था आहे, हिंदुस्थानची जी स्थिती आहे, यामध्ये बदल करण्याची गरज आहे. हा बदल घडवू शकतो, आपण सर्वांनी एकत्र येऊन, एकजूट होऊन. ज्या लोकांना देशाला वेगवेगळी आश्वासने देऊन फसवले, त्यांना दूर करण्यासाठी ज्यावेळी आपल्याला मतदान करण्याची संधी मिळेल, त्या दिवशी आपल्याला हे पाऊल उचलावे लागेल. आपण लोकांनी पाहिले, की आज ज्या लोकांच्या हातात देशाची सत्ता आहे, अनेक गॅरंट्या देशवासियांना दिल्या होत्या, शेतकऱ्यांना दिल्या होत्या. कामगारांना दिल्या होत्या, बेरोजगार युवकांना दिल्या होत्या. महिलांना दिल्या होत्या, दलितांना दिल्या होत्या



# सर्वांनी एकत्र राहूया

**शरद पवार**

आणि आदिवासींना दिल्या होत्या आणि आपण पाहतो, की यामध्ये जी काही वचनबद्धता दिली होती, त्यावर या लोकांनी कोणतीही अंमलबजावणी केली नाही आणि त्यामुळे जे लोक आश्वासने देतात आणि पूर्ण करत नाहीत, त्यांना दूर करण्यासाठी आपल्याला लोकांना घेऊन पाऊल उचलावे लागेल आणि ही संधी आपल्याला पुढील महिन्यात मिळेल. आपण गेल्या काही महिन्यांपासून दररोज टीव्हीवर एक खोटी गोष्ट ऐकत होतो. मोदींची गॅरंटी. ही गॅरंटी चालणारी नाही. या गॅरंटीमध्ये सिक्युरिटी नाही आणि त्यामुळे चुकीची गॅरंटी देऊन, चुकीची आश्वासने देऊन त्यांनी आपल्याला एका वेगळ्या मार्गावर घेऊन जाण्याचा प्रयत्न चालविला आहे. एक चांगली गोष्ट होईल, की आजपासून टीव्हीवर गॅरंटी येणार नाही. ती रोखण्याचे काम निवडणूक आयोगाने करण्याचे निश्चित केले आहे. त्यासाठी मी त्यांनाही धन्यवाद देतो. मी एवढेच सांगू इच्छितो, की याच शहरात १९४२मध्ये महात्मा गांधीजींनी छोडो भारतचा नारा दिला होता. छोडो हुकूमशाहीचा नारा दिला होता. आज त्याचा शहरात आपण लोकांनी हे निश्चित केले पाहिजे, की छोडो भाजप, भाजपपासून मुक्ती हे म्हणण्यासाठी एकत्र राहू, एवढीच अपेक्षा करतो आणि आपली रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

जाता जाता फिरस्ता

# कच्चथिवूचा निष्कारण वाद

निवडणुकीत मते मिळावीत यासाठी कोणत्याही खालच्या थराला जाण्याची भाजप संघ परिवाराची क्षमता अलौकिक आहे. स्वघोषित महान पंतप्रधानांनी निवडणुकीच्या प्रचारात कच्चथीवू बेटाचा वाद उकरुन काढला आहे. विशेष म्हणजे त्यांचे 'एचएमव्ही' किंवा 'हिज मास्टर्स व्हॉइस' असलेले परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर हे तरी परराष्ट्र संबंधांबाबत प्रगल्भ असतील अशी अपेक्षा होती. पण ते देखील बोलके पोपटच निघाले आणि पंतप्रधानांच्या सुरात सूर मिसळून याला खतपाणी घालू पहात आहेत. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेबद्दलही आता शंका येऊ लागली आहे. हा वाद उकरुन काढला असे म्हणण्यामागे तसे कारणही आहे.

भाजपच्या तमीळनाडू शाखेचे अध्यक्ष आणि माजी आयपीएस पोलिस अधिकारी के. अन्नमलाई यांनी कच्चथिवू बेटाबाबतच्या माहितीसाठी माहिती अधिकाराखाली केंद्र सरकारकडे अर्ज केला होता.

पाहता पाहता चक्रे फिरली आणि केंद्र सरकारने विलक्षण चपळाई व तत्परता दाखवीत या बेटासंबंधीची माहिती या अन्नमलाई यांना पुरवली.

लगेचच देशाच्या पंतप्रधानांनी ती माहिती उचलली आणि काँग्रेस पक्षावर आगपाखड सुरु केली.

जे सरकार, जे पंतप्रधान आणि त्यांचे परराष्ट्रमंत्री व संरक्षणमंत्री चीनच्या पूर्व लडाखमधील घुसखोरीबद्दल संसदेत एक चकार शब्द काढत नाहीत आणि त्याबद्दल विचारणा केली असता सुरक्षाविषयक संवेदनशीलतेचे कारण सांगून गोपनीयता बाळगतात त्यांनी कच्चथिवू बद्दल निवडणुकीत राजकीय फायद्यासाठी वाद उकरणे किती उचित आहे हे लोकांनी विचारात घेणे महत्वाचे आहे. नव्हे या मुद्यांच्या आधारे राजकारण आणि तेही निवडणुकीचे राजकारण होऊ शकत नाही हेही समजण्याची वेळ आली आहे.

परंतु सुमारबुध्दी आणि क्षुद्र मनोवृत्तीच्या राजकीय विकृत्तीत(संस्कृति नव्हे) ज्यांचा पिंड पोसलेला आहे त्यांच्याकडून प्रगल्भतेची, बौध्दिक उंची व पातळीची अपेक्षा करणे चुकीचे आहे.

या पंतप्रधानांनी उकरलेल्या वादाच्या संदर्भात प्रथम माहिती घेऊ आणि त्यानंतर पूर्व लडाखमधील चीनची घुसखोरी, भारत चीन व भूतानच्या सीमा मिळतात त्या ट्रायजंक्शन परिसरात (दोकलाम) चीनने उभारलेले तळ आणि पक्क्या इमारती व बांधकामे व रस्ते यांची माहिती घेऊ. त्याबद्दल बोलताना बहुधा ५६ इंची छाती आक्रसून सहा इंचाची होत असावी.

कच्चथिवू बेट हे भारत व श्रीलंके दरम्यानच्या पाल्क सामुद्रधुनीत आहे. हे एक निर्जन बेट आहे. २८५ एकर



क्षेत्रफळाचे हे बेट आहे. ऐतिहासिक कागदपत्रांनुसार रामनाथपुरमच्या संस्थानिकांचा त्यावर ताबा होता. भारतीय किनाऱ्यापासून ३३ किलोमीटर तर श्रीलंकेच्या जाफना या उत्तर भूशिरापासून ते साठ किलोमीटर अंतरावर आहे. बेट निर्जन आहे कारण तेथे पिण्याच्या पाण्याचा एक थेंबही उपलब्ध नाही. केवळ वैराण असे हे बेट आहे. १९२१ नंतर ब्रिटिशांनी त्यांच्या नाविक हालचालींच्या दृष्टीने सोयीचे म्हणून ते वापरण्याबाबत रीतसर करार केला होता. ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे पाहिल्यास श्रीलंकेतील जाफना प्रांत किंवा संस्थानिकांचा या बेटावर ताबा होता. परंतु या बेटाचा वापर श्रीलंकेच्या उत्तर भागात म्हणजेच जाफना परिसरात वसलेले तमीळ मच्छिमार आणि भारतीय तमीळ मच्छिमार करीत असत. मुख्यतः मच्छिमारीनंतर विश्रांती आणि त्यांची मासेमारीची जाळी सुकविण्यासाठी या बेटाचा वापर दोन्ही देशांकडून होत असे. तरीही या बेटावर १९७४ पर्यंत भारताचे अघोषित आणि एकप्रकारे अनधिकृत असे आधिपत्य राहिले. १९७४ मध्ये दोन्ही देशांमध्ये करार होऊन हे बेट श्रीलंकेच्या ताब्यात दिले गेले असले तरी मासेमारीबाबत दोन्ही देशांच्या मच्छिमारांना समान संधी देण्याची आणि बेटाचा पूर्वीप्रमाणेच वापर करण्याची मुभा देण्यात आली. परंतु श्रीलंकेतील जाफना प्रांतात तमीळ बंडखोरी वाढत गेली. भारतातून या जाफनामधील तमीळींना मदत मिळते या संशयावरुन श्रीलंकेच्या नौदलाकडून भारतीय तमीळ मच्छिमारांच्या बोटी अडविणे, त्यांची तपासणी करणे असे प्रकार वारंवार होऊ लागले. यातून हिंसक चकमकीही घडू लागल्या. भारतीय तमीळ मच्छिमारांना अटक करण्यापर्यंत प्रकार वाढत गेले. परंतु जाफनामधील तमीळ विभाजनवाद्यांची म्हणजेच एलटीटीईच्या नेतृत्वाखालील स्वतंत्र तमीळ देश स्थापन करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या गटांना श्रीलंकेने सेनेचा वापर करुन नेस्तनाबूत केले आणि श्रीलंकेच्या उत्तर भागात पुन्हा आपला अधिकार प्रस्थापित केला. यानंतर श्रीलंकेच्या नौदलाकडून हे प्रकार कमी झाले.



इंदिरा गांधी या पंतप्रधान असताना या बेटाचा ताबा श्रीलंकेकडे देण्यात आला. १९७४ या वर्षातील या परिसरातील भूराजनैतिक परिस्थितीचेही थोडेफार आकलन करण्याची आवश्यकता आहे. १९७१ मध्ये बांगला देशाची निर्मिती झाली. त्यामध्ये भारताची निर्णायक भूमिका होती. इंदिरा गांधी यांच्या त्या कणखर भूमिकेमुळे भारताच्या शेजारी देशांमध्ये भारताबद्दल एक दबदबा निर्माण झाला होता. भारताने सोव्हिएत रशियाशी मैत्री करार केलेला असल्याने अमेरिकेच्या मनात भारताबद्दल शंकाकुशंका वाढीला लागलेल्या होत्या. बंगालच्या उपसागरात अमेरिकेच्या आरमाराचा म्हणजेच नौदलाचा मोठा ताफा १९७१ मध्ये आलेला होता. एंटरप्राईझ या अण्विक युध्दनौकेच्या नेतृत्वाखाली अमेरिकेने हे नाविक दबावतंत्र वापरलेले होते. त्यावेळी अमेरिका आणि चीनदरम्यान मधुर संबंध प्रस्थापित झालेले होते. त्यामुळे त्या परिस्थितीत श्रीलंकेला न दुखावता भारताच्या पंखाखाली ठेवणे श्रीलंकेला अमेरिका व चीनच्या कह्यात जाऊ न देणे हा मुद्दा महत्वाचा होता. कारण तसे झाले असते तर अमेरिका व चीनचा शिरकाव श्रीलंकेत होणे सुलभ होऊन भारताची डोकेदुखी वाढली असती. ज्याप्रमाणे दिएगो गार्शिया या हिंदी महासागरातील बेटावर अमेरिकेने कब्जा केला तोच प्रकार कच्चथिवूबद्दल होऊ शकला असता. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन या बेटाचा ताबा श्रीलंकेकडे देण्यात आला. परंतु जाणीवपूर्वक ही बाब अस्पष्ट व संदिग्ध राखण्यात आली. संसदेच्याद्वारा या बेटाच्या हस्तांतरणाचा ठराव करण्यात आला नाही. याचा अर्थ स्पष्ट होता की अनौपचारिकरीत्या श्रीलंकेला ताबा मिळालेला असला तरी प्रसंग पडल्यास भारतातर्फे कधीही करार रद्द करण्याचे पाऊल उचलणे शक्य झाले असते. संसदेचे शिक्कामोर्तब झाले असते तर सर्व व्यवहार अधिकृत होऊन अडचणीचे झाले असते. कधीकधी काही प्रश्न मुद्दाम वादग्रस्त ठेवायचे असतात हा देखील परराष्ट्र संबंधिविषयक नीतीचा किंवा रणनीतीचा भाग असतो. श्रीलंका हा भारताचा सदैव मित्रदेश राहिलेला आहे आणि त्यादृष्टीने हे बेट त्यांना दिल्याने भारताला फारसा फरक न पडणारे होते. अर्थात तमीळ समूहांच्या बंडाच्या पवित्र्यानंतर तणाव निर्माण झाला. परंतु त्यांचा बीमोड झाल्यानंतर स्थितीत सुधारणा झाली असल्याचे दिसून येते.

आता ही सर्व पार्श्वभूमि समजण्याइतकी प्रगल्भता ज्यांच्याजवळ असते त्यांना त्याचे गांभीर्यही कळते आणि ते त्याचा उच्चार करण्याचे टाळतात. परंतु सुमारव क्षुद्रबुध्दीच्या मंडळींना एवढे सखोल ज्ञान पचविणे अवघड व अशक्य असते.

केवळ आपल्या पदरात मते पडावीत अशा अत्यंत क्षुद्र

हेतुने ते हे वाद उकरत असतात. ते ज्या उच्चपदावर बसलेले असतात त्याची प्रतिष्ठा राखण्याचे भानही ते विसरतात. कारण मुळातच ज्यांचा मेंदूच आखूड असतो त्यांच्याकडून समजूतदारपणाची अपेक्षाच चुकीची आहे.

आता जरा अरुणाचल प्रदेश, पूर्व लडाख येथील चिनी घुसखोरीबद्दल बोलण्याची पाळी आली आहे.

पूर्व लडाखमध्ये चीनने घुसखोरी केली आहे ही आता सर्वविदित बाब आहे. याबद्दल सर्वांना माहिती झाली आहे. गलवान खोऱ्यात तर भारतीय व चिनी सैनिकांमध्ये हिंसक चकमक व शारीरिक झटापट होऊन भारताचे वीस जवान शहीद झाले. मे २०२० पासून चिनी सैन्याने देमचोक, पॅन्गाँग जलाशय, गलवान नदी परिसर, स्पॅन्गूर जलाशय, चुशुल, हॉट स्प्रिंग्ज, गोग्रा व्हॅली हा तो परिसर आहे जेथे चिनी सैन्याने घुसखोरी केलेली आहे. आता या प्रकारास चार वर्षे होत आली आहेत.



दोन्ही देशांचे लष्करी अधिकारी तसेच परराष्ट्र मंत्रालयांचे अधिकारी यांच्या संयुक्त बैठका घेऊन हा प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न सुरु आहेत. चर्चेच्या १९ फेऱ्या आतापर्यंत झालेल्या आहेत. अद्याप चीनने घुसखोरी केलेल्या परिसरातून पूर्णपणे माघार घेतलेली नाही. या प्रकरणाची थोडी पार्श्वभूमि समजणे आवश्यक आहे.

भारत व चीनदरम्यानची सीमारेषा वादग्रस्त आहे. १९६२च्या युध्दानंतर चीनने आपणहोऊन एका विशिष्ट सीमेपर्यंत माघार घेतलेली होती. यानंतर सीमारेषेचा विवाद सोडविण्याचे प्रयत्न सुरु करण्यात आले. त्यासाठी दोन्ही देशांनी एक प्रत्यक्ष नियंत्रण किंवा ताबारेषा मान्य करुन ती ओलांडून पुढे न येण्याचे ठरविले. त्यासाठी उभय देशांनी दोन ताबारेषांदरम्यानच्या परिसरात संयुक्त गस्तीची तरतूद केली की ज्यामुळे जर कुणी प्रत्यक्ष ताबा रेषा ओलांडून पुढे आल्याचे आढळल्यास ते चटकन लक्षात येऊन त्या विशिष्ट स्थानी यथास्थिती म्हणजेच जैसे थे स्थिती निर्माण करणे शक्य व्हावे. ही पध्दत बिनबोभाट चालू राहिली. दुसरीकडे दोन्ही देशांच्या संबंधात सुधारणा होत जाण्याबरोबरच सीमाविवाद सोडविण्यासाठी एक स्वतंत्र समितीची उभय देशांकडून स्थापना करण्यात आली आणि त्या समितीच्या बैठका नियमितपणे घेऊन हा विवाद मिटविण्यासाठी प्रयत्न सुरु करण्यात आले. २०१४ पर्यंत ही यंत्रणा व्यवस्थितपणे कार्यान्वित होती. २०१४ मध्ये सरकार व सत्ताबदल झाला आणि परिस्थिती बदलत गेली.

आपल्यापूर्वीचे सर्व पंतप्रधान आणि सत्ताधारी हे जणू काही नेभळट होते आणि आपण भारतीय राजकारणात पौरुषत्व आणल्याचा आव व अभिनिवेश असलेले नेतृत्व देशाला मिळाले.

(वेडा) साहसवादी भूमिका आणि परराष्ट्रसंबंध विषयक धोरणाचा अंगिकार करण्याचा आव आणला गेला. आपण काहीतरी चाकोरीबाह्य करुन जगाला जिंकत असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रकार सुरु झाला होता. परराष्ट्र धोरणात हास्यास्पद अशा आलिंगन नीतीचा शिरकाव झाला. जगात भारताच्या पंतप्रधानाला मान दिला जातो, त्या संबंधित म्हणजेच ते पद भूषविणाऱ्या व्यक्तीला नव्हे हे सोयीस्करपणे विसरुन स्वनामधन्यता, स्वतःचा उदोउदो असा सवंग उथळपणा परराष्ट्र संबंध विषयक धोरणात सुरु झाला. या साहसवादामुळे नेपाळ भारतापासून दुरावला.

डोकलाममध्ये घेतलेल्या बोटचेप्या भूमिकेमुळे भूतानने चीनबरोबर संधान बांधण्यास सुरुवात केली.

बांगला देश, श्रीलंका यांनीही त्यांच्या पावलावर पाऊल ठेवले. पाकिस्तानबद्दल तर बोलायलाच नको. म्यानमारने तर आधीच भारतापासून फटकून चीनबरोबर हातमिळवणी केलेली आहे. थोडक्यात उथळ धोरणांमुळे शेजारी देशांशी चांगले संबंध राखण्यात २०१४ नंतर अपयश येत गेले.

याच्याच जोडीला अमेरिकेच्या नको इतके कच्छपि लागण्याचे लोचट धोरण अमलात आणले गेले.

अगदी अमेरिकेच्या तालावर नाचण्याचे प्रकार सुरु

करण्यात आले. यामुळे चीनमध्ये अस्वस्थता निर्माण होणे अपेक्षितच होते. भारतीय उपखंड किंवा दक्षिण आशियात अमेरिकेचा हस्तक किंवा दलाल देश म्हणून भारताने भूमिका वठविण्यास सुरुवात केल्यास चीनसारखा देश ते सहन करणार नाही हे उघड होते. परंतु सुमारबुध्दी उथळय़ावांना समजावणार कोण ?

जे परराष्ट्रमंत्री झाले ते तर अमेरिकेच्याच सांगण्यावरुन आणि त्यामुळेच त्यांनी भारताला अमेरिकेच्या कह्यात नेऊन सोडण्याचे काम इमानइतबारे पार पाडले आहे.

जागतिक राजकारणात चीनचे जेवढे प्रतिस्पर्धी आहेत त्या सर्वांबरोबर सुमारबुध्दी उथळय़ावांनी जवळीक केली आणि आपण चीनला कसे खिजवत आहोत असे दाखविण्याचा प्रयत्न सुरु करताच चीनने नखे काढण्यास सुरुवात केली. त्याचीच परिणिती लड़ाखमधील घुसखोरीत झाली.

एकीकडे चीनचे राष्ट्राध्यक्ष शि जिनपिंग यांच्याशी आपली किती जवळीक आहे हे दाखविण्यासाठी त्यांच्याबरोबर झोपाळ्यावर बसून झुलणाऱ्या भारतीय पंतप्रधानांना चीनने कधी टांग मारली तेच कळले नाही. याचे कारण निव्वळ उथळपणा.

चीनने लडाखमध्ये घुसखोरी केली. आता साहेबांचे दात पडण्याची पाळी आली. त्यातही गलवान नदी परिसरात जेव्हा भारतीय व चिनी सैनिकांची हिंसक झटापट होऊन त्यात वीस जवानांचा बळी गेल्यानंतर तर दातखीळ बसण्याची वेळ आली. या जवानांच्या मृत्युला कोण कारणीभूत आहे हे विचारण्याचीही वेळ आली आहे. यानंतर देशात जेव्हा या प्रकाराची तीव्र प्रतिक्रिया निर्माण झाल्यावर पंतप्रधानांनी याबाबत खुलासा करावा या मागणीने जोर धरला. एवढा लाजिरवाणा प्रसंग ओढवूनही विरोधी पक्षांना विश्वासात घ्यायचे कशाला अशी हुकुमशाही गुर्मी कायम होती. परंतु देशातील भावनांची तीव्रता लक्षात आल्यानंतर अखेर लाजेकाजेस्तोवर पंतप्रधानांनी विरोधी पक्षांना विश्वासात घेण्याचे ठरविले.

पंतप्रधानांनी विरोधी पक्षांच्या प्रमुख नेत्यांना बोलाविले आणि त्यांना सरळ सांगून टाकले की भारतीय प्रदेशात घुसखोरी झालेलीच नाही. जी थोडीफार घुसखोरी झाली आहे तेथे यथास्थिती निर्माण करण्यात येत आहे. हे धादांत असत्य होते. खोटेपणा होता. तो खोटारडेपणा आजही चालू आहे.

यानंतर वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय व चिनी लष्कराचे अधिकारी व उभय देशांचे परराष्ट्र मंत्रालयाचे अधिकारी अशा संयुक्त बैठकी सुरु झाल्या.

आतापर्यंत १९ बैठका झाल्या आणि अद्याप चीनने घुसखोरी केलेल्या भागातून पूर्णत्वाने माघार घेतलेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

ताज्या माहितीनुसार आणि उपग्रहांच्या मदतीने घेतलेल्या छायाचित्रांचा आधार घेतला असता चीनने अद्याप ४०२५ चौरस किलोमीटर परिसरावर आपले सैन्य कायम राखले आहे आणि सैन्यमाघारी अमलात आणलेली नाही हे स्पष्ट झालेले आहे. या संयुक्त वाटाघाटींसाठी सैन्यमाघारी व तणावमुक्तता ही दोन तत्वे आधारभूत धरण्यात आली.त्यासाठी घुसखोरीपूर्वीची स्थिती या सीमा परिसरात प्रस्थापित करण्याची भारताची मागणी होती परंतु चीनने तसे केलेले नाही.

ताज्या माहितीनुसार चीनने पॅन्गाँग जलाशय किंवा सरोवरात चीनने एक पूलही बांधला आहे. म्हणजेच हे सरोवर वादग्रस्त असताना वादग्रस्त भागात चीनने ही आगळीक सुरु केली आहे. या चर्चेच्या ज्या १९ फेऱ्या झाल्या त्यात भारताच्या पदरी काय पडले हे अद्याप जनतेसमोर आलेले नाही. माहीतगार गोटातून समजलेल्या माहितीनुसार दोन्ही देशांच्या प्रत्यक्ष ताबा रेषांच्या दरम्यान असलेल्या भूभागात दोन्ही बाजुंना गस्तीचे अधिकार असतानाही त्यासाठी पूर्वपरवानगीची अट नव्याने चीनने घातल्याचे समजते.

थोडक्यात या घुसखोरीबाबत सरकार मूग






गिळून गप्प आहे. चीन अद्याप ४०२५ चौरस किलोमीटरच्या भूभागावर अनधिकृतपणे ठाण मांडून बसलेला असल्याची माहिती असूनही भारत सरकार मात्र सोयीस्कर मौन पाळून आहे. हा प्रकार म्हणजे चक्क लपवालपवी आहे. सरकारची नाचक्की जनतेसमोर उघड होऊ नये यासाठीची ही लपवालपवी आहे. परंतु कधीतरी यातील सत्य उघडकीस आल्याखेरीज राहणार नाही. चीनच्या घुसखोरीबाबत विरोधी पक्षांनी वारंवार आणि जवळपास प्रत्येक अधिवेशनात चर्चेची मागणी केली होती. परंतु सरकारतर्फे काहीतरी थातूरमातूर निवेदन करुन आणि विषयाची संवेदनशीलता लक्षात घेऊन सभागृहात या विषयावर चर्चा करणे उचित ठरणार नाही असे सांगून चर्चेचा मार्ग बंद करुन टाकण्यात येत आहे.

सरकारच्या दुर्दैवाने देशी विदेशी माध्यमांनी हा विषय लावून धरलेला आहे. केवळ लडाखच नव्हे तर अरुणाचल प्रदेशाजवळच्या परिसरात आणि डोकलाम परिसरात चीनने पक्की बांधकामे करुन आपले बस्तान बसविले आहे.

आता सुजाण नागरिकांनी असल्या लपवालपवी करणाऱ्या पक्षाला आणि त्या पक्षाच्या नेत्यांना पाठिंबा द्यायचा की नाही हे ठरवावे.

दुसऱ्या पक्षांना आणि आधीच्या पंतप्रधानांची निंदा करुन स्वतःला मोठे दाखविण्याचे हे प्रयत्न आहेत. प्रत्यक्षात हे मोठे नसून खोटे आहेत हे लडाखमधील चिनी घुसखोरीने सिध्द झालेले आहे. अशा देशविरोधी व खोटारड्यांना मतदान करायचे की नाही हे ठरविण्याची वेळ आली आहे.

याठिकाणी परराष्ट्रसंबंध विषयक नीती किंवा धोरणाबाबतची मूलभूत बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे. परराष्ट्र संबंधांबाबत सबुरी आणि आस्तेकदम धोरणच लागू पडते. साहसवाद आणि आपण कुणी टिकोजीराव आहोत असा अविर्भाव आणणारे हास्यास्पद ठरतात.

आपण ज्या क्षेत्राला नवे आहोत तेथे सावधगिरीने पावले टाकणे हिताचे असते. परंतु, सत्तेत आल्याआल्या आपण जगच पादाक्रांत केल्याचा आव आणणारे हे आंतरराष्ट्रीय टिंगलीचा विषय ठरतात. यामध्ये त्या व्यक्तीची नव्हे तर देशाची प्रतिष्ठा पणाला लागते हे लक्षात ठेवणे अत्यावश्यक असते.

म्हणूनच ही आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला खाली मान घालायला लावणारी नौटंकी बंद करण्याची वेळ आली आहे.

## आघाडी विस्ताराची धडपड कशाला ?

देशातील प्रमुख विरोधी पक्षांनी इंडिया आघाडी स्थापन केली आणि त्यांच्या परीने ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. परंतु निकोप स्पर्धेपेक्षा खुनशी ईर्षा बाळगणाऱ्यांना लोकशाहीतील निकोप स्पर्धा कळत नाही कारण त्यांची तेवढी बौध्दिक क्षमता नसते.

इंडिया आघाडीकडे अमुक इतके पक्ष असतील तर आपणही त्या स्पर्धेत मागे नाही हे दाखविण्यासाठी भाजप नेतृत्वाची धडपड आता केविलवाणी दिसू लागली आहे.

बिजु जनता दल, अण्णा द्रमुक यासारख्या प्रमुख पक्षांशी भाजपला आघाडी करता आलेली नाही. तरीही लहानलहान पक्षांना आपल्या पंखाखाली घेण्याचे प्रकार सुरुच आहेत.

महाराष्ट्रात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात

भाजपने फूट पाडली. तेवढ्यानेही समाधान न झाल्याने त्यांनी इतरही लहानसहान संघटना व पक्षांना आकर्षित करण्याचे प्रकार सुरु केले आहेत.

राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर हे याचे मोठे उदाहरण आहे. हे जानकर महाविकास आघाडीकडे तिकिटासाठी फेऱ्या घालत होते परंतु अखेर पोहोचले महायुतीकडे.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनाही दिल्लीला पाचारण करुन त्यांना महायुतीत सामील करुन घेण्याचा प्रयत्न झाला. तोही यशस्वी झाल्याचे चित्र नाही.

यामध्ये आणखी एक बाब स्पष्टपणे समोर आली.

या गोष्टीचे भाकित फिरस्त्याने यापूर्वी केले होते.

एकनाथ शिंदे यांचा तसेच अजित पवार यांचा गट यांना एखाद्या जागेवर ॲडजस्ट करण्यासाठी त्यांना भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढण्यास सांगण्याचे प्रकार घालण्यात आली होती. उपलब्ध माहितीनुसार राज ठाकरे यांनी ती बहुधा अमान्य केल्याचे समजते.

दुसरीकडे भाजपमधील उत्तर प्रदेश व बिहारमधील लॉबीने राज ठाकरे यांच्याबरोबरच्या समझोत्यास विरोध केल्याच्या बातम्याही प्रसिध्द झाल्या आहेत. याचसंदर्भात असेही बोलले जात आहे की उत्तर प्रदेशातील मतदानाच्या पहिल्या दोन फेऱ्या पार पडल्यानंतर मनसे आणि भाजपमध्ये समझोता होऊ शकेल. राज ठाकरे यांच्या पक्षाच्या नावात महाराष्ट्र आहे. त्यामुळे त्यांनी महाराष्ट्र या राज्याला, तेथील अस्मितेला जागावे अशी अपेक्षा आहे.

भाजपचे सर्वोच्च नेतृत्व महाराष्ट्रद्वेष्टे आहेत, हे आता उघड झाले आहे. ज्या पध्दतीने महाराष्ट्राचे महत्व कमी करण्याचे प्रकार या भाजप नेतृत्वाने सुरु केले आहेत तो त्यांच्यात आजही अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्रद्वेषाचा पुरावा आहे.



भाजपने सुरु केले आहेत. हा प्रकार दुसरातिसरा काही नसून या पक्षांचे अस्तित्व संपविण्याची सुरुवात आहे. याचे कारण एकदा भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढवून जिंकून आलेल्या उमेदवाराला पुन्हा त्याच्या मूळ पक्षाकडे जाण्याचा म्हणजे परतीचा मार्ग बंद होतो. अन्यथा त्याचे सदस्यत्वच रद्द होऊ शकते. त्यामुळे हे जे दोन फुटीर गट आहेत त्यांच्या मागे भाजपने लागणे हे अपेक्षितच होते. तीच चलाखी किंवा ट्रिक भाजपने राज ठाकरे यांच्याबद्दल खेळण्याचा प्रयत्न केला.

राज ठाकरे यांच्या पक्षाला जागा देऊ करताना त्यांच्या उमेदवाराने भाजपच्या चिन्हावर निवडणूक लढविण्याची अट

महाराष्ट्रातील चांगले मोठे प्रकल्प गुजरातला पळवून नेण्याचे घाणेरडे प्रकार करणारे हे राज्यकर्ते आहेत. मुंबईचे आर्थिक राजधानी असलेले महत्व त्यांना नष्ट करायचे आहे.

देशातल्या सर्व गोष्टी गुजरातमध्येच कशा होतील यावर त्यांचा भर असतो. इतके संकुचित व हलक्या मनोवृत्तीचे राज्यकर्ते देशाला कधीही मिळाले नव्हते.

राज ठाकरे पुरुषार्थ दाखवतील आणि या महाराष्ट्रद्वेष्ट्या शक्तींशी हातमिळवणी करणार नाहीत एवढीच माफक अपेक्षा आहे.

■■■

**शेवटचे पान**

# फॅसिस्टांना दाखवा पराभवाचे अस्मान!



खऱ्या लोकशाहीवर श्रद्धा नसणारे लोक लोकशाही मार्गाने सत्तेवर आले म्हणजे फॅसिझमचा उदय होतो. कारण ही माणसे विरोधकांना वाढूच देत नाहीत, नव्हे नव्हे त्यांनी शक्यतो जिवंतच राहू नये अशी व्यवस्था तयार करण्याच्या मागे ते लागतात. पर्यायी पक्ष तयारच होऊ देत नाहीत. जोपर्यंत सत्तेचे प्रलोभन दाखवून विरोधी पक्षातील कार्यकर्ते फोडून लाचार करता येतात किंवा ईडी, सीबीआय, प्राप्तीकर विभाग, पोलिस यांसारख्या यंत्रणांचा धाकधपटशा दाखवून विरोधकांना नामोहरम व हतबल करता येते, तोपर्यंत गोळ्या घालून मारण्याची किंवा तुरुंगाची हवा दाखविण्याची गरज नसते. जोपर्यंत जाती, धर्म व पैसा यशस्वी रीतीने हाताळता येतो व विरोधी पक्षात फूट पाडता येते, एवढेच नव्हे तर आता पक्षही जेव्हा आमदार, खासदार व चिन्हासह पळवून नेता येतो तोपर्यंत अडचण नसते. ज्यावेळी हे मार्ग अपुरे ठरतात आणि आपण अंतिम उद्दिष्टापर्यंत पोहोचू शकत नाही हे जेव्हा लक्षात येते तेव्हा दडपणाखाली निवडणूक घेतली जाते. सर्व स्वायत्त संस्थांवर नियंत्रण आणले जाते. बोलणारी, लिहिणारी तोंडे बंद करून त्यांना जेलची हवा खाण्यास पाठविले जाते. खोटे-नाटे आरोप करून, गुन्हे लावून, कट व सापळे रचून विरोधकांना 'दे माय धरणी ठाय' करून सोडण्याचे अजब कसब या कसायांच्या हाती असते. मनात येईल त्या, काय वाट्टेल त्या गोष्टी ते करू शकतात. हे सगळे करताना आमचा लोकशाहीवर विश्वास नाही असे स्वतःच्या तोंडाने ते कधीही म्हणत नाहीत. चतुर फॅसिस्टांना आपली मूठ उघडण्याचे बंधन नसते. ठोकशाहीचा व दडपशाहीचा वापर करून निती नियम व कायदेकानून धाब्यावर बसवित आम्ही लोकशाहीच्या रक्षणासाठीच हे सगळे करतो आहोत, असे निर्लज्जपणे व बेमुर्वतखोरपणे सांगणारे नेते आज आपण पाहतो आहोत. इतकंच काय त्यांनी आता 'विकासासाठी आम्ही गद्दारी केली आहे' असे गोंडस बारसं करून सांगतात तेव्हा आपल्याला परवडणारी लोकशाही सोयीनुसार करून फॅसिस्ट कसे वापरतात याचा वस्तुपाठ आपल्याला पाहायला मिळत असतो.




असत्याचा प्रसार व प्रचार करणे हे फॅसिझमचे प्रमुख लक्षण असते. त्यांना सत्याचे वावडे असते. असत्याशी त्यांचा नित्य संग असतो. त्यांचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगवेगळे असतात. हातात आलेली सत्ता पुन्हा हातून कधीही जाता कामा नये यासाठी त्यांचा प्रचंड अट्टाहास असतो व ती सत्ता टिकविण्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची त्यांची तयारी असते. याचा अनुभव भारतातील जनता मागील दहा वर्षांपासून घेत आली आहे. जनतेचा प्रचंड कोंडमारा झालेला आहे. अनेक समस्या व प्रश्नांनी ती त्रस्त आहे, उद्विग्न आहे, संतापलेली आहे आणि कधी एकदा मतदानाचा शिक्का उठवून झालेल्या त्रासाचा बदल घेते या भावनेने जनता पेटून उठलेली आहे.

फॅसिझम हा हुकुमशाहीचाच एक प्रकार आहे. पण तो इतर हुकुमशाह्यांपेक्षा वेगळा आहे. इतर हुकुमशाह्या जनतेच्या पाठिंब्यावर अस्तित्वात येत नाहीत, जनतेच्या पाठिंब्याची त्यांना गरजही नसते. फॅसिझम ही वेगळ्या प्रकारची हुकुमशाही आहे. ह्या हुकुमशाहीला जनतेतील एका मोठ्या गटाचाच सक्रिय पाठिंबा असतो. हजारो शिस्तबद्ध कृतीप्रवण कार्यकर्ते यांच्या ताकदीवर फॅसिझम उभा राहतो आणि सत्ता हाती आल्यावर कसा फोफावतो हे आपण सध्या अनुभवतो आहोत. यामुळे आपल्या देशाची लोकशाही व संविधान धोक्यात आले आहे. ती बदलण्याची भाषा फॅसिस्टांकडून चालू आहे. तिला वेळीच आवर घालायचा असेल तर फॅसिस्टांना या निवडणुकीत पराभवाचे अस्मान दाखविले पाहिजे. ते आपण 'मतदानाचा रुपाने करा' एवढीच कळकळीची विनंती!